**अध्यक्षस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी** :सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा. 1)सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, 2) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून),लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, 3) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, 4) सहकार,पुनर्वसन व मदतकार्य मंत्री,5) वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्री. 6) वित्त व नियोजन मंत्री,7)ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून),वैद्यकीय शिक्षण,उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, 8) पणन,रोजगार हमी योजना, संसदीय कार्य,महिला व बाल विकास मंत्री, 9) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, 10)वने मंत्री, 11) अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्री, यांच्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरु.

**उपसभापती** :खर्चाच्या पूरक विवरणत्रावरील काल अपूर्ण राहिलेली चर्चा आता पुढे सुरु होईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांच्यासंदर्भात मी या ठिकाणी माझे विचार मांडणार आहे. बाब क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 5. या ठिकाणी छायाचित्र देण्यासाठी 10 कोटी रुपयाची पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे.निवडणूक आयोगाने मतदारांना ओळखपत्र देण्यास यापूर्वीच सुरुवात केलेली आहे. 4,44,55,999 एवढया मतदारांना ओळखपत्र देण्यात आलेले आहेत. बाकी राहिलेल्या मतदारांना जे ओळखपत्र द्यावयाचे आहेत, त्यासाठी 10 कोटी रुपयाची तरतूद करकण्यात आलेली आहे. निवडणूक आयोगाने मतदारांना ओळखपत्र देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे. तो चांगला निर्णय आहे. परंतु या ओळखपत्राचा मतदानाच्यावेळी कुठल्याही प्रकारचा उपयोग होत नाही. आयडेन्टीकार्ड Conclusive proof असला पाहिजे. निवडणुकीच्यावेळी हे आयडेन्टीकार्ड घेऊन गेल्यानंतर आयडेन्टीकार्ड सोडून बाकी सर्व पुरावे आणा तरच तुम्हाला मतदान करता येईल असे सांगण्यात येते. ते पुरावे आणले नाही तर मतदान करण्याचा अधिकार जरी हे आयडेन्टीकार्ड निवडणूक आयोगाने दिलेले असले तरी मिळत नाही अशा प्रकारची परिस्थिती निवडणुकीच्यावेळी आपण बघितलेली आहे. मुंबईत गेल्या लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान हजारो मतदारांची नांवे मतदार यादीत होती, परंतु त्यांना मतदान करता आले नाही. त्यावेळी आम्ही पार्टी म्हणून, पक्ष

श्री. गुरुनाथ कुलकर्णी.....

म्हणून निवडणूक आयोगाच्या ही गोष्ट निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे या बाबीवर खर्च जरुर करावयास पाहिजे, पण हे आयडेन्टीकार्ड Conclusive proof असला पाहिजे आणि त्या आयडेन्टीकार्डच्या आधारावर मतदारांना मतदान करता आले पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना निवडणूक आयोगाला द्याव्यात, अशा प्रकारची मी या ठिकाणी मागणी करतो.

बाब क्रमांक 27, पृष्ठ क्रमांक 20. कालच याबाबत सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी काल या ठिकाणी एक मागणी केली होती. 1992-1993 च्या बॉम्बब्लास्टमधील आरडीएक्स ज्या पोलीस अधिका-यांना मिळाले किंवा सापडले त्यांना रिवॉर्ड देण्यासाठी 10 लाख रुपये देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. नक्षलग्रस्त भागात अनेक ठिकाणी पोलीस कॉन्स्टेबल, पोलीस अधिकारी दिवगंत झाले तर त्यांच्यासाठी रिवॉर्ड देतो. पण आरडीएक्स ज्या पोलीस अधिका-याला मिळाले , ज्यांनी ते शोधून काढले त्यांना रिर्वार्ड देण्यासाठी शासनाने अद्यापपर्यंत निर्णय घेतलेला नाही. ते रिवॉर्ड देण्याचे आश्वासन मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी द्यावे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 29, बाब क्रमांक 40 वर बोलणार आहे. यामध्ये मुद्रांक छपाईच्या संदर्भात 54 कोटी 22 लाख 39 हजार रुपये खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये, ज्या राज्याला एक संपन्न राज्य म्हणून समजतो त्या राज्यामध्ये आज बाजारात पाहिले तर मुद्रांकाची मागणी जास्त आहे आणि पुरवठा कमी आहे. आज शाळा कॉलेजेसमध्ये जे दस्तऐवज लागतात किंवा जे मुद्रांक लागतात ते त्या ठिकाणी उपलब्ध नाहीत. मुद्रांकाचा मोठया प्रमाणावर तुटवडा आहे. फ्रँकींगची व्यवस्था करण्यात आलेली आहे परंतु मुद्रांकाचे सर्क्युलेशन कमी का आहे किंवा त्याची छपाई का केली जात नाही याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 30, बाब क्रमांक 45 वर बोलणार आहे. यामध्ये वनाच्या संरक्षणासाठी 14 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. वन विभागाचे माननीय मंत्री आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. ते पंढरपूरला वारकरी म्हणून गेले होते. राज्यामध्ये वन खात्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे हे समजत नाही. मध्यंतरी दोडामार्ग तालुक्यामध्ये हत्तींनी धुमाकूळ घातला होता आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. माननीय वन मंत्री त्या ठिकाणी गेले आणि त्यांनी त्या ठिकाणी भरमसाठ आश्वासन दिले. आम्ही शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर अनुदान देऊ असे सांगितले. परंतु वन खात्याचे जे निकष आहेत, जे नियम आहेत तेवढेच अनुदान त्या ठिकाणी देण्यात आले. ज्या ठिकाणी पाच दहा लाख रुपयांचे नुकसान झाले त्या ठिकाणी पंधरा वीस हजार रुपये देण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे या खात्याची परिस्थिती समजण्याच्या पलीकडे आहे. ज्यावेळी युतीचे शासन होते त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये श्री. गौतम नावाचे जिल्हाधिकारी होते. त्यांनी त्या ठिकाणी सॅटेलाईटवरुन सर्व्हे केला. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये डोंगर सुध्दा खाजगी आहेत. त्या ठिकाणी शासनाचे डोंगर नाहीत. वन खात्याची जमीन काही ठिकाणी संरक्षित आहे आणि बाकीची सर्व जमीन खाजगी आहे. त्यांनी सॅटेलाईटवरुन सर्व्हे केल्यानंतर सांगितले की, हा जो हिरवागार भाग दिसतो तो भाग वन खात्याच्या अंतर्गत संरक्षित करावयास पाहिजे. या राज्यामध्ये 62.5 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली आहे व त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयामधील 42.5 हजार हेक्टर जमीन वनसज्ञेखाली आणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ SBT/ MHM/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .......

दिली.. ही जमीन वन सज्ञेखाली आणून दिल्यानंतर त्या ठिकाणी गोठा सुध्दा दुरुस्त करता येत नाही. त्या ठिकाणी प्रकल्पांची कामे अडकून पडलेली आहेत. आज वन सज्ञेखाली जमीन आल्यामुळे खाजगी मालकांना आंब्याची झाडे असतील किंवा काजूची झाडे असतील अशी झाडे लावता येत नाहीत. तेथील जमीन वन सज्ञेखाली करुन ठेवलेली आहे. जसे ग्रीन झोन असते त्याप्रमाणे 42.5 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली आणल्यामुळे अशी परिस्थिती झालेली आहे. त्यानंतर श्री. भूषण गगराणी हे जिल्हाधिकारी म्हणून त्या ठिकाणी आले. त्यांनी पुन्हा सर्व्हे केला. त्यानंतर जी 42.5 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली होती ती जमीन त्यांनी 8.5 हजार हेक्टरवर आणली. मागच्या सात आठ वर्षामध्ये हे झालेले आहे. ज्यावेळी 42.5 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली आणली होती त्यावेळी वन खात्याच्या मंत्र्यांना विचारले नाही. सचिवांना माहीत नाही. सुप्रीम कोर्टामध्ये प्रकरण दाखल झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी जे ॲफिडेव्हीट फाईल केले त्यामध्ये त्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी 42.5 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली घेतलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ श्री.बरवडनंतर 10:40

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

परिणाम असा झाला की, सुप्रीम कोर्टाने त्याच्यावर शिक्कामोर्तब करुन सांगितले की, सिंधुदुर्ग जिल्हयातील 42,500 हेक्टर जमीन ही वन संज्ञेखालील आहे. यासंदर्भात 7-8 बैठका तत्कालीन वन मंत्री श्री.सुरुपसिंग नाईक यांच्याबरोबर झाल्या आहेत. परंतु त्याच्यातून काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे आता पुन्हा त्याचा रिव्हयू घेतला जात आहे.

( मा.सदस्यांचा वेळ संपल्याबाबत मा.उपसभापती घंटा वाजवितात.)

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझ्या पक्षाच्यावतीने मी एकटाच बोलणार आहे.

**उपसभापती** : मी मा.सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आपल्याला ही चर्चा दुपारी 12.45 वाजता पूर्ण करावयाची आहे. पूरक मागण्यांवरील चर्चा करण्यास मी नाही म्हणत नाही, परंतु ही चर्चा उत्तरासह दुपारी 12.45 वाजता संपवावयाची आहे याची सर्व मा.सदस्यांना नोंद घ्यावी अशी मी विनंती करीत आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे या विषयासंबंधी एक जनहित याचिका दाखल करावी लागेल. सिंधुदुर्ग जिल्हयात 42,500 हेक्टर जमीन वन संज्ञेखाली घेतलेली आहे ती सोडविण्यासाठी शासनाने गांभीर्याने लक्ष घेतले पाहिजे.

यानंतर मी पान क्रमांक 125 वरील बाब क्रमांक 142 वर माझे विचार मांडणार आहे. सन्माननीय पणन मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील आठ खार जमिनीच्या विकास योजनांची कामे घेण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मी परवाही यासंबंधीची चर्चा उपस्थित झ ाली होती तेव्हा सांगितले होते की, त्या योजनांमध्ये देवबाग, तांबडणे आणि तळाशील या तीन ठिकाणचा खार जमीन विकास योजनांमध्ये समावेश करण्यात यावा. त्याप्रमाणे मा.मंत्रिमहोदयांनी कार्यवाही करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पान क्रमांक 182 वरील बाब क्रमांक 248 वर मी बोलणार आहे. तत्कालीन आरोग्य मंत्री श्री.दिग्विजय खानविलकर यांनी अकोला, लातूर आणि कोल्हापूर या तीन जिल्हयांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये स्थापन केली. आमची त्याबाबत काही हरकत नाही, शासनाने कोल्हापूरला, लातूरला, पंढरपूरलाही वैद्यकीय महाविद्यालये काढावीत परंतु कोकणासाठी एक तरी वैद्यकीय महाविद्यालय द्याल की नाही ? आम्ही सातत्याने ही मागणी करीत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.....

आहोत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये करावयाचे नसेल तर मध्यवर्ती ठिकाण असलेल्या रत्नागिरी येथे केले तरी चालेल. आज त्याठिकाणी चांगले हॉस्पिटल आहे, आवश्यक तेवढया खाटांची सोय आहे. त्यामुळे कोकणामध्ये एक तरी वैद्यकीय महाविद्यालय काढण्यात यावे अशी माझी प्रमुख मागणी आहे त्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी बंदर या विषयाच्या बाबीवर शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. मा.श्री.शरद पवारसाहेब हे केंद्रामध्ये कृषी मंत्री झाले त्यामुळे मी त्यांचे यानिमित्ताने अभिनंदन करतो.

कर्नल सुधीर सावंत (बसून) : मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीसाहेब, बंदरे व कृषी विभागाच्या मागण्यांवरील चर्चा दुपारनंतर आहे. त्यावेळी आपण या खात्यांवर बोलावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी बंदरे, कृषी विभागासंबंधीचे माझे विचार त्यावेळी मांडीन. सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरक मागण्यांचा बारकाईने अभ्यास केला तर अ, ब, क अशी तीन विवरणपत्रे आपल्याला दिसून येतात.

नंतर श्री.शिगम.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 10:45

(श्री. गुरुनाथ कुलकणी पुढे सुरु...)

आपल्या राज्याचे बांधकाम राज्यमंत्री हे कोकणातील पेण मधील आहेत. मला वाटले होते की, हे राज्यमंत्री झाल्यानंतर आमच्या कोकणाला जास्त काही मिळेल. पण ही सूची पाहिल्यानंतर बांधकाम राज्यमंत्री हे कोकणातील असताना सुध्दा सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी वगळता त्यांनी राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये बांधकामे घेतलेली आहेत. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे या बांधकामाच्या सूचीमध्ये कुठेही दिसत नाहीत. वास्तविक ज्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामाची कामे घेण्याची आवश्यकता आहे त्या ठिकाणी ती घेतली जात नाहीत. तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. अंतुलेसाहेबांनी सागरी महामार्गाची कल्पना मांडली. पुणे एक्सप्रेस हायवे दोन-तीन वर्षात पूर्ण होऊ शकला. त्यावर 2300 कोटी रु. खर्च करण्यात आले. परंतु 1980 साली सागरी महामार्गाची कल्पना मांडून त्यास 2005 साली 25 वर्षे पूर्ण होऊन देखील हा सागरी महामार्ग आपण पुरा करु शकत नाही. आम्हाला असे सांगितले जाते की, अजून 38-40 कि.मी.चा रस्ता व्हावयाचा आहे, अजून चार-पाच पूल बांधावयाचे आहेत. या सागरी महामार्गासाठी किती निधी लागणार आहे आणि हा सागरी महामार्ग केव्हा पूर्ण होणार आहे ते तरी एकदाचे आम्हाला सांगावे. कोकणाला आपण काही देणार आहात की नाही ? अ,ब,क या विवरणपत्रावरुन रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बांधकाम खात्याने एक पैसाही खर्च केलेला नाही. माझी माननीय राज्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, नागपूरच्या अधिवेशनामध्ये तरी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीसाठी पुरवणी मागण्यामध्ये तरतूद करावी अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये प्रश्नाला न्याय मिळण्याच्यादृष्टीनें मी फक्त एकाच बाबीवर माझे विचार मांडण्याचे ठरविले आहे, जेणे करुन शासनाकडून यथोचित उत्तर येऊ शकेल. स्वाभाविकपणे ही मागणी प्रादेशिक असमतोलासंबंधात आहे. पृ.क्र.77वर सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 91 ही आहे. अमरावती शहराकरिता एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमान्वये रस्त्याच्या बांधकामामधील विकासाचा वेग कायम राखण्यासाठी 10 कोटी रुपये यावर्षी अमरावती शहराकरिता या कार्यक्रमान्वये वेग कायम राखण्याकरिता तरतूद करण्याचे ठरविलेले आहे. ही मागणी ह्या ठिकराणी का आली ? मी मुद्दाम ही गोष्ट आपल्या समोर ठेवू इच्छितो की, राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांनी 18 डिसेंबर 2003ला या सभागृहामध्ये एक निवेदन केले. मंत्रिमंडळाच्या मान्यते नंतर विदर्भ पॅकेज या नावाची घोषणा करणारे निवेदन मा.मुख्यमंत्र्यांनी केले. त्या निवेदनाचा संदर्भ असा आहे की, महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल सन 2002 तयार करण्यात आला असून त्यामध्ये विदर्भातील नागपूर वगळता सर्व जिल्हे हे मानव विकासाच्याबाबतीत राज्य सरासरीच्या खाली आहेत. तसेच मा. राज्यपालांनी नेमलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार विदर्भात मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे हे देखील स्पष्ट झालेले आहे. याबाबतीत आर्थिक अडचण होती हे त्यांना माहीत होते. मंत्रिमंडळाचे निवेदन करताना ते असे म्हणाले की, "आर्थिक अडचण आहे म्हणून आम्ही गप्प बसणार नाही. विदर्भाचा विकास करणे हे आमचे ध्येय आहे." त्यानंतर या निवेदनामध्ये त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा निर्णय झाल्याचा उल्लेख केला. "दिनांक 17.12.2003 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विदर्भ विकासाचा आढावा घेण्यात आला व हाती घेतलेली कामे पूर्ण करता येतील याबाबतीत सखोल चर्चा केली व आर्थिक अडचण आहे म्हणून गप्प न बसता त्यावर मात करुन चालू वर्षी 748 कोटी विदर्भ पॅकेज करीता देऊन विदर्भाचा सर्वांगीण विकास करण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये खालील कामांचा समावेश आहे". सभापती महोदय, त्यावेळी माझे म्हणणे असे होते की काही स्पेशल पॅकेज वगैरे देऊ नका. कायद्याने आणि घटनेने जे काही देणे आहे ते द्या. पण आता हे विदर्भ पॅकेज जाहीर झाले. यामध्ये पाटबंधारे संबंधीची तरतूद सांगितली आहे. रस्ते विकासाची तरतूद सांगितलेली आहे.

...नंतर श्री.गिते...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 10:50

प्रा.बी.टी.देशमुख...

त्यात स्पष्टपणे असा उल्लेख केला आहे की, नागपूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पासाठी 35 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अमरावतीच्या एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पासाठी रुपये 25 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, 18 डिसेंबर, 2003 रोजी यासंबंधी निवेदन सभागृहामध्ये केले गेले आहे. अमरावती आणि नागपूरच्या आय.आर.डी.पी.साठी विशेष बाब म्हणून हया तदतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यांनी एक विशेष्ट गोष्ट सांगितली आहे. " अध्यक्ष महाराज, सर्वसाधारणपणे विदर्भासाठी पॅकेज तयार होते. परंतु निधी उपलब्ध होत नाही अशा तक्रारी नेहमी केल्या जातात. यावेळेस मात्र असे निश्चितच होणार नाही असे मी सांगू इच्छितो. यातील काही कार्यक्रम पुढच्या वर्षात स्पीलओव्हर होतील, परंतु कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या निधीबाबत कोणीही मनात संदेह बाळगू नये." आता हे जे पॅकेज जाहीर केले गेले. मला त्यावेळेस देखील सांगताना दु:ख होत होते व आजही होत आहे की, वर्षभर याबाबतीत काहीच कार्यवाही झाली नाही. या सभागृहामध्ये 18 मार्च, 2005 रोजी प्रश्न आला. सन्माननीय सदस्य श्री. नतिकोद्दीन यांनी प्रश्न विचारला होता की, 25 कोटी रुपयांच्या विशेष तरतुदीपैकी आतापर्यन्त किती निधी उपलब्ध करुन दिला आहे ? यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी असे उत्तर दिले की, विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत अमरावती शहर रस्ते विकासासाठी 25 कोटी रुपये कर्ज रोख्याव्दारे उभारावयाचे होते ते उभारण्यात आले आहेत. एका बाजुला माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, विशेष अनुदान म्हणून आम्ही 25 कोटी रुपये देऊ आणि या ठिकाणी माननीय बांधकाम मंत्र्यांनी असे उत्तर दिले की, विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत अमरावती शहर रस्ते विकासासाठी 25 कोटी रुपये कर्ज रोख्याव्दारे उभारावयाचे होते ते उभारण्यात आले. सभापती महोदय, कर्ज रोखे हे अगोदरच उभारण्यात आले होते. कर्ज रोखे उभे करण्याचा अधिकार हा 2002 या वर्षात होता. माननीय मुख्यमंत्र्यांची घोषणा 18 डिसेंबर, 2003 रोजीची आहे. 18 डिसेंबर,2003 च्या घोषणेला अनुकूल असा शासन निर्णय दिनांक 5 जानेवारी, 2004 रोजी निर्गमित झाला आहे. या निर्णयातील तिस-या नंबरवर रस्त्यांसाठी 164 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याच्यामध्ये या रक्कमा समाविष्ट आहेत. यासंदर्भात एक रुपया देखील निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. या ठिकाणी या संदर्भातील प्रश्न विचारला तर कर्ज रोख्याच्या अनुषंगाने उत्तर दिले गेले. सभागृहात कर्ज रोख्यांचा उल्लेख झाला नंतर बरीच चर्चा झाली. इ

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..

त्यावेळी सभागृहाने या कामी मदत केली. माननीय सभापतींनी याबाबतीत आदेश दिले त्यानंतर मग माननीय मंत्री महोदयांनी ही गोष्ट कबूल केली. या विषयाच्या बाबतीत सभागृहात चर्चा सुरु असताना माननीय मंत्री महोदयांनी दहा ते पंधरा मिनिटांनी उत्तर दिले आहे ते मी नमूद करु इच्छितो. " मी उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की,25 कोटी रुपये अमरावतीसाठी आणि 35 कोटी रुपये नागपूरसाठी असे एकूण 60 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जातील. लवकरात लवकर उपलब्ध करुन दिले जातील." सभापती महोदय, लवकरात लवकर काही झाले नाही त्या गोष्टीस खूप उशीर झाला. सभागृहामध्ये त्यांनी सांगितले की, दोन तीन दिवसांनी बजेट आहे. माननीय मंत्र्यांनी यासंदर्भात जसे उत्तर दिले आहे ते उत्तर मी जसेच्या तसे वाचून दाखवितो." बजेटमध्ये ही बाब येणार असेल तर अडचण नाही, परंतु अडचण येणार असेल तर 15 दिवसात या अनुषंगाने तरतूद करण्यात येईल." सभापती महोदय, ही बाब बजेटमध्ये आली नाही. यासंदर्भात 15 दिवसात निवेदन करण्यात यावे माननीय सभापतींनी माननीय मंत्र्यांना निदेश दिले होते. तसेच आदेश देताना माननीय सभापती असे म्हणाले की, सभागृहामध्ये जे तुम्ही कबूल केलेले आहे ते झाले पाहिजे याची आपण काळजी घ्या. माननीय मंत्र्यांनी 15 दिवसांनी निवेदन केले. त्या निवेदनात असे सांगितले की, 10 कोटी रुपये आम्ही या पुरवणी मागणीमध्ये देऊ आणि उरलेला निधी हा नागपूरच्या अधिवेशनामध्ये देऊ. मी शासनास धन्यवाद देतो की, त्यांनी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यावेळी सभागृहामध्ये दोन्ही बाजुच्या सदस्यांनी सांगितले की ही गोष्ट बरोबर नाही. मी हा मुद्दा या कारणासाठी उपस्थित केलेला आहे की, मला तीन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहेत. मान्य केल्याप्रमाणे 10 कोटी रुपयांची तरतूद केली त्याबद्दल धन्यवाद. विनियोजन विधेयकास माननीय राज्यपालांची मान्यता मिळाल्यानंतर येत्या 15 दिवसात किंवा एका महिन्यात हा निधी एम.एस.एस.आर.डी.सी.कडे वा संबंधित यंत्रणेकडे सुपूर्त केला जाईल काय ? उर्वरित 15 कोटी रुपयांची तरतूद ही नागपूर अधिवेशनामध्ये येथे आम्हाला फारसा त्रास न देता उपलब्ध करुन दिली जाईल काय ? सभापती महोदय, मी एक गोष्ट सांगू इच्छितो की,

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 10:55

श्री. बी.टी.देशमुख...

सभापती महोदय, नागपूरच्या बाबतीत सुध्दा अन्याय झालेला आहे. नागपूरसाठी 35 कोटी रुपयांची तरतूद आहे ती सुध्दा पुढील पुरवणी मागण्यांमध्ये समाविष्ट करण्याचे मान्य केले आहे. त्याप्रमाणे ही तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये आली पाहिजे. मी उपस्थित केलेल्या तीन मुद्यांचे उत्तर दिले तर प्रादेशिक असमतोलाच्या या प्रश्नाला फार मोठा न्याय मिळेल असे वाटते. एवढे बोलून पूरक मागण्यांवरील मी माझे भाषण संपवितो.

---

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. पृष्ठ क्र.40 बाब क्र.29च्या संदर्भात मी बोलणार आहे. मुद्रांकाची छपाई यासंदर्भातील ही बाब आहे. मुद्रांकाच्या उपलब्धतेबाबत नागरिकांची अक्षम्य अशी हेळसांड होत आहे आणि ओढाताण होत आहे. शासनाच्या काही दुर्देवी निर्णयामुळे लोकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. ओल्ड कस्टम हाऊसमध्ये दस्तऐवज नोंद करण्याकरिता जी व्यवस्था होती ती व्यवस्था आता याठिकाणी उपलब्ध नाही. या व्यवस्थेच्या माध्यमातून पूर्वी मुंबई नोंदणी उपमहानिरीक्षक आणि इनफोर्समेंट उपमहानिरीक्षक यांच्या माध्यमातून जवळजवळ 3 कोटी रुपयांचा महसूल शासनाला मिळत होता. नोंदणी उपमहानिरीक्षकाचे पद याठिकाणी आहे पण कोणाची नियुक्ती केलेली नाही. पुण्यामध्ये महानिरीक्षक आहेत त्यांच्याकडे चार्ज दिला आहे. ते दोन दिवस मुंबईत आणि बाकीचे दिवस पुण्यात बसतात. त्यामुळे लोकांची कोंडी होते ती फार गंभीर आहे. स्टॅम्प ऑफीसला पूर्वी दिलेले अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत. त्याचा परिणाम असा झाला आहे की, स्टाफही कमी असल्यामुळे कामे वेळेवर होत नाहीत. पूर्वी 3 कोटी मूळ महसूल मिळत होता आणि अधिकचा तीन कोटी मिळाला असता तो थांबलेला आहे. पैसे नसल्यामुळे वार्षिक योजनेवर शासन कट लावते. शासन कशा प्रकारे आणि महाराष्ट्रात कोठे कोठे रेव्हेन्यू लॉसेस करीत आहे हे पाहिले तर त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासावर परिणाम होत आहे. फ्रँकींगची ओल्ड कस्टम हाऊसमध्ये असलेली सोय बंद केलेली आहे. हे काम आता बँकेकडे दिलेले आहे. उपनगरात मात्र ही सोय चालू ठेवली आहे. म्हणजे शासनाचे याबाबतीत नेमके धोरण काय आहे ? ओल्ड कस्टम हाऊस येथील फ्रँकींगची सोय बंद केली आणि उपनगरात चालू ठेवली म्हणजे नक्की धोरण काय आहे ? लोकांना सुविधा मिळत होती. तेलगी प्रकरणामध्ये बोगस फ्रँकींग मशीन आली काय ?त्या संदर्भात शासनावर काही परिणाम झाला काय ? बोगस स्टॅम्पप्रमाणे बेकायदेशीर फँकींग मशीन आल्याची कुठेतरी नोंद झालेली आहे. फ्रँकींग काही ठिकाणी बंद केले आणि काही ठिकाणी सुरु ठेवले आहे ते का ठेवले आहे याचा खुलासा झाला पाहिजे. बोगस स्टॅप प्रकरणी आणि फ्रँकींग मशीन प्रकरणी किती पोलीस केसेस केल्या आणि कोणती कारवाई केली ? सभापती महोदय, महसूली कर्मचारीवर्ग होता त्या स्टाफला काम होते. स्टाफ तेथेच आहे. आता बँकेला हे काम दिल्यामुळे त्यांना एक टक्का द्यावा लागतो यातून बँकेचा फायदा होऊ लागला आहे. बँकेकडे फ्रँकींग मशीन असल्यामुळे तुम्ही

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 10:55

श्री. दिवाकर रावते .....

सांगाल त्या किमतीचे फ्रँकींग होत आहे.पूर्वी दस्तऐवजी बघत होतो. मोजत होतो. त्याप्रमाणे नोंदणी होत होती. ऑडीट ऑब्जेक्शन येत नव्हते. प्रत्यक्षात दस्तऐवज नोंदणीसाठी जातात त्यावेळी ऑब्जेक्शन येते आणि बँकेला अधिकार नसल्यामुळे आणि तेथील कर्मचा-यांना याचे तेवढे ज्ञान नसल्यामुळे लोकांचे नुकसान होत आहे. तुम्ही डॉक्युमेंट फ्रँकींगसाठी घेऊन जाता आणि 50 लाख रुपये किंमतीचा माझा दस्तऐवज आहे असे सांगता आणि त्याप्रमाणे किंमत भरता. कागदपत्रे तुमच्याकडे येतात तेव्हा त्याचे व्हॅल्युएशन 50 लाख केले जात नाही आणि पुन्हा खोडून दुसरे फ्रँकींग करावे लागते अशा प्रकारचा बारभाईचा कारभार आहे तो थांबला पाहिजे. मुंबई हे महसूली उत्पन्न देणारे मोठे केंद्र आहे तेथे ही दुरावस्था झालेली आहे. डीआयजीच्या नवीन दोन जागा तातडीने भरुन न्याय देऊन मुंबईतून मिळणा-या महसूलासंबंधी आपण काय करणार हा महत्वाचा प्रश्न आहे. शासनाने अभय योजना सुरु केली त्यामध्ये सुध्दा अशा प्रकारे चार्ज दिलेले आहेत आणि त्यातून सुध्दा तोटा होत आहे. मुंबई हा महसूल मिळण्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या टप्पा आहे आणि त्याप्रमाणे मा.मंत्रीमहोदयांनी लक्ष घालावे. स्टॅम्प सध्या आपण तीन ठिकाणी छापता.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.कानडे 11.00

श्री.दिवाकर रावते..

पूर्वी नाशिक येथील प्रेसमध्ये स्टॅम्प पेपर्स छापण्यात येत होते आणि तेथून ही सगळी व्यवस्था केली जावयाची .नाशिक येथील मशिनरी तेलगीला विकली असल्याचे बाहेर आल्यामुळे व आता तेलगीचा धसका घेतला गेल्यामुळे नाशिक येथे थोडेसे स्टॅम्प पेपर्स छापले जातात आणि बाकीचे स्टॅम्प पेपर्स आता कलकत्ता आणि हैद्राबाद येथे छापण्यात येतात. तेव्हा या परिस्थितीच्या बाबतीत शासनाने अत्यंत गांभीर्याने विचार करावा आणि आपल्या लोकांवर गैरविश्वास दाखविण्या ऐवजी आणि हैद्राबाद आणि इतर ठिकाणी जे स्टॅम्प पेपर्स छापले जातात त्या योजनेत सुधारणा करण्यासाठी केन्द्र सरकार बरोबर चर्चा करावी आणि त्यांना याबाबतीत सांगावे अशी मला या निमित्ताने विंनती करावयाची आहे.

सभापती महोदया, यानंतर मला पान क्रमांक 116 बाब क्रमांक 129 संबंधी बोलावयाचे आहे. कृत्रिम पर्जन्यधारणा प्रयोग कार्यक्रमासाठी 7 कोटी रुपयांची तरतूद या पूरक मागणीमध्ये करण्यात आली आहे. कृत्रिम पर्जन्यधारणा प्रयोग कार्यक्रम या पूर्वी सुरु करण्यात आला होता आणि नंतर तो बंद करण्याचेही ठरविण्यात आले होते. परंतु नंतर असे लक्षात आले आहे की सांगली जिल्हयात पाऊस पडलेला नाही त्यामुळे पुन्हा कृत्रिम पर्जन्यधारणा प्रयोग कार्यक्रम सुरु करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. त्या भागात पाऊस पडलेला नाही व तो भाग दुष्काळी असलातरी सुध्दा त्या भागात श्री.प्रकाश बापू पाटील यांना एक साखर कारखाना मंजूर करण्यात आला आहे .याबाबतीत मी नंतर बोलणार आहे. सांगली जिल्हयात एवढे साखर कारखाने असतांना पुन्हा या साखर कारखान्यामुळे अगोदरच्या कारखान्यात आणखी भर पडलेली आहे.सांगली जिल्हयात पाऊस न पडल्यामुळे कृत्रिम पर्जन्यधारणा प्रयोग कार्यक्रम चालू ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे. या संदर्भात रविवार, दिनांक 17 जुलै 2005 च्या "दैनिक देशोन्नती" या वर्तमानपत्रात प्रहार नावाचा स्तंभ लिहिला गेला होता.त्यात असे म्हटलेले आहे की, " आता ज्या भागात पाऊस कमी झाला त्या भागात " प्रकल्प वर्षा " ही योजना राबविली जाणार आहे. मागच्या वर्षीही राज्याच्या काही भागात ही योजना राबविली गेली होती. विमानाव्दारे ढगांवर रसायनांची फवारणी करुन पाऊस पाडण्याचा हा प्रयत्न मागच्या वर्षी साफ फसला होता " तेव्हा हा प्रयोग मागच्या वर्षी फसला होता किंवा नाही याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावे. या स्तंभात पुढे असेही म्हटले होते की, " या प्रयत्नातून पडलेला पाऊस त्या भागातील पाण्याची समस्या दूर

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

करण्याच्या दृष्टीने अगदीच अत्यल्प होता. मात्र या प्रयोगासाठी झालेला खर्च कोटयावधीच्या घरात गेला.मागच्या वर्षीचा अनुभव लक्षात घेता या वर्षी हा प्रकल्प गुंडाळण्याचे सरकारने ठरविले होते परंतु काही भागात अतिशय कमी झालेल्या पावसामुळे हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याचे घाटत आहे.प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी जवळपास 9 कोटीचा खर्च अपेक्षित आहे." आता पूरक मागणीव्दारे 7 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या स्तंभात पुढे असेही म्हटलेले आहे की, " प्रकल्पाची फलनिष्पत्ती सगळयांनाच माहीत असली तरी या प्रकल्पाच्या माध्यमातून होणा-या खर्चातले हिस्से प्रकल्प राबविण्यासाठी आग्रह धरणा-यांना आकर्षित करीत आहेत. कोणतीही योजना जिथे केवळ खाण्याच्या दृष्टीने राबविली जाते तिथे योजनेचे भवितव्य निश्चित नसते. " वर्तमानपत्रातून आपल्यावर जाहीरपणे आरोप करण्यात आलेला आहे. तेव्हा यातून कोणाला हिस्से मिळतात ? कसे मिळतात ? यासंबंधी उत्तर देणे आवश्यक आहे असे मला या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे. या स्तंभात पुढे असे म्हटलेले आहे की,"कोणतीही योजना जिथे केवळ खाण्याच्या दृष्टीने राबविली जाते तिथे योजनेचे भवितव्य निश्चित नसते. " यावरुन प्रकल्प वर्षा प्रयोग यशस्वी झालेला आहे असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदया, यानंतर मला बाब क्रमांक 142 पान नंबर 125 सबंधी बोलावयाचे आहे.सिंधुदूर्ग जिल्हयातील खार जमीन विकासाच्या अंतर्गत हाती घ्यावयाच्या 8 खार जमिनीच्या विकासाच्या कामाच्या खर्चासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारु इच्छितो की, नागपूरच्या अधिवेशनामध्ये विदर्भातील खारपणपट्टयाच्या संदर्भात दोन अधिवेशनापूर्वी शासनाला अहवाल सादर करण्यात आला होता. श्री.विलासराव देशमुख हे त्यावेळी मुख्यमंत्री होते.त्यावेळी नागपूरच्या अधिवेशनात हा अहवाल सादर करण्यात आला होता. 1500 कोटी रुपये खर्च केल्याशिवाय विदर्भातील खारपणपट्टयाचा हा प्रश्न सुटणार नाही असे त्या अहवालात सांगण्यात आले होते. तेव्हा त्या अहवालाचे पुढे काय झाले ? त्या अहवालाच्या संदर्भात शासनाने कोणती नोंद घेतली आहे? अमरावती पासून अकोल्यापर्यन्तचा हा खारपणपट्टा आहे. त्या संदर्भात शासनाने कोणत्या योजना राबविल्या आहेत.या संदर्भात काहीही खुलासा होत नाही.विदर्भातील या भागात खारपण पट्टयाची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे त्या ठिकाणी पाणी आहे परंतु ते खारे पाणी आहे.त्यामुळे त्या भागात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाणवते. ही समय्या दूर करण्यासाठी शासनाने कोणती व्यवस्था केली आहे ? हे जाणून घेणे मला महत्वाचे वाटते.तेव्हा त्या भागातील समस्या दूर करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

सभापती महोदया, यासंदर्भात बाब क्रमांक 181 वर मिरज आणि सांगली येथील खार जमिनीकरता आपण नियोजन केलेले आहे. केन्द्र सरकारचा खारपण पट्टयाकरता आलेला पैसा आपण पश्चिम महाराष्ट्रात वापरलेला आहे. सिधुदूर्ग जिल्हयात या कामाचे नियोजन केलेले आहे परंतु विदर्भामध्ये खारपण पट्टयासबंधीची गंभीर समस्या निर्माण झालेली असतांना त्या ठिकाणी काही नियोजन केले असल्याचे माझ्या वाचनात आलेले नाही किंवा त्याकरता काही खास तरतूद करण्यात आलेली दिसून येत नाही तेव्हा याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी माझी त्यांना विनती आहे.विदर्भातील खारपणपट्टयाच्या बाबतीत मी स्वतंत्रपणे भाष्य केल्याचे मला आठवत आहे .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

या सदनामध्ये खारबांधपट्ट्यासंबंधात मी स्वतंत्रपणे भाष्य केले होते ते मला आठवते.

सभापती महोदया, पृ.171, बाब क्रमांक 208 यामध्ये गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नांदेड जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमारिता म्हणून 150 कोटीची तरतूद आपण केलेली आहे. हा विशेष कृती कार्यक्रम काय आहे याचा पूर्ण खुलासा आपण करावा म्हणजे मग त्यातील नेमक्या कोणत्या योजना आपण राबविणार आहात याचे आम्हाला निश्चितपणे मार्गदर्शन होईल.

सभापती महोदया, त्यानंतर मी सहकार विभागासंबंधात बोलणार आहे. यातील पृ.303, बाब क्रमांक 270 याकडे माननीय मंत्री महोदयांचे मी लक्ष वेधू इच्छितो. 1250 मे.ट. चे आपल्याकडे जे 12 सहकारी साखर कारखाने होते त्यांना आपण भागभांडवल दिले होते. पण ते बंद पडल्याने आता त्यांना ब्रीज लोन देण्यासाठीची ही व्यवस्था आहे. या संदर्भात मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, आपल्या अपेक्स बँका बुडाल्या किंवा बेकायदेशीर ठरल्या असे म्हणा वाटल्यास., त्यामुळे हे कारखाने बंद पडले आहेत आणि त्यांचे पुनरूज्जीवन व्हावे, ते कारखाने पुन्हा सुरू व्हावेत यासाठी पुन्हा शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ? नाबार्डच्या माध्यमातून कोणते प्रयत्न झाले आहेत ? हे कारखाने सुरू करण्यासंबंधात कोणत्या ठोस योजना केल्या याची माहिती आम्हाला येथे मिळावी ही अपेक्षा आहे. हे 12 कारखाने सुरू झाले आणि झाल्या बरोबरच बंद पडले अशी एक वेगळी, विचित्र परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा आता यातून दुष्काळी भागासाठी जे पैसे आपण देत आहात ते किती योग्य आहे त्याचाही विचार आपणास करावा लागेल. नाबार्डच्या माध्यमातून या कारखान्यांचे कोणते आणि काय भवितव्य आपण घडविणार आहात ? हे बंद पडलेले 12 कारखाने पुन्हा सुरू करण्यासाठी आपण काय करीत आहात ? अगोदरच शासनाचे कोट्यवधी रूपये यामध्ये अडकलेले आहेत. त्याचा विचार न करता केवळ आपले सरकार टिकावे, ... खरे तर आता आपले सरकार पाडण्यासाठी राणे देखील नाहीत, त्यावेळी निदान ती तरी भीती आपल्याला होती. पण तरीही एक राजकीय खेळी म्हणून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागातील चार कारखान्यांना आपण मान्यता दिली आहे. अगोदरच राज्यातील बंद पडलेल्या 12 कारखान्यांमध्ये मराठवाड्यातील कारखाने जास्त संख्येने आहेत. असे असतानाही राजकीय सोयी साठी, जुन्या बंद पडलेल्या 12 कारखान्यांचे पुनर्वसन होत नाही, ते चालू करण्यासाठी काही

.... एच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

प्रयत्न होत नाहीत आणि अशा वेळी आणखी आठ कारखाने आपण काढण्यास परवानगी देत आहात. त्यातील उमरगा येथे 2 कारखाने आहेत, बीड मधील श्री. बाजीराव जगताप यांनाही एक कारखाना आपण दिलेला आहे. या कारखान्याची देखील एक गंमत आहे. या श्री.जगताप यांनी प्रथमत: प्रबोधनकार ठाकरे सहकारी साखर कारखाना या नावाने कारखाना सुरू करण्यास परवानगी मागितली होती. पण नंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. कशासाठी तर केवळ हा माजलगाव येथील सहकारी साखर कारखाना चालू व्हावा म्हणून. पण राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना सांगितले की, प्रथम तुम्ही या कारखान्याचे प्रबोधनकार ठाकरे असे जे नाव आहे ते काढून टाका म्हणून मग त्यांनी ते नाव काढून टाकून त्या जागी छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव दिले. त्यानंतर त्याचे भागभांडवल आता आलेले आहे. म्हणजे नाव बदलल्यानंतर त्यांना भागभांडवलाचे पैसे दिले गेले ...

**तालिका सभापती (डॉ.नीलम गोऱ्हे)** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, आपल्याकडे वेळ अपुरा आहे, तेव्हा वेळेचे भान ठेवून आपण आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मी आपला अधिक वेळ घेणार नाही. पण यांची शाहू, फुले प्रवृत्ती कशी ठेचली पाहिजे हे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. कारखाने देतानाही राजकारण यांनी कसे खेळले ते मला येथे दाखवून द्यावयाचे आहे. म्हणूनच तर जालना येथे अगोदरचा एक कारखाना असतानाही श्री. टोपे यांना आणखी एक कारखना दिला. हिंगोली येथे तसेच भूम-परांडा येथेही दुष्काळी भाग असतानाही तेथे कारखाना दिला आणि सांगलीमध्ये तर प्रकाशबापू पाटील यांनाही तेथे दुष्काळी भाग असताही कारखाना आपण दिला. अशा प्रकारे दुष्काळग्रस्त ठिकाणी नवे कारखाने देऊन आपण यामध्ये नव्याने तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे अगोदरचे जे आपले 12 कारखाने बंद पडलेले आहेत त्यांच्यासाठी प्रथमत तरतूद आपण करायला पाहिजे आणि नंतर जी काही तुमची राजकीय खेळी आहे ती आपण खेळावी असे मला आपणास सांगावयाचे आहे. आपले जुने कारखाने उध्वस्त झालेले असताना, ते पुन्हा सुरू करण्याची आवश्यकता असताना पुन्हा नवीन कारखाने कशासाठी आपण निर्माण करीत आहात याचे उत्तर तुम्ही येथे देणार आहात काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ....

( यानंतर श्री. जागडे ..... आय 1 ..

अध्यक्षीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

म्हणून सहकाराच्या माध्यमातून हा जो प्रकार चालू आहे, तो अतिशय अयोग्य आहे. सभापती महोदया, जुन्या तसेच उद्ध्वस्त झालेल्या साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत, याची या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती द्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद । जय महाराष्ट्र ।

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, आताच माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख केला आहे. फुले, शाहू आणि आंबेडकर या तीन महात्म्यांची नांवे घेऊन कृपया त्यांचा अपमान करु नका, एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. कारण महात्मा फुले नसते तर छत्रपती शाहू महाराज झ ाले नसते. छत्रपती शाहू महाराज नसते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले नसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नसते तर डोक्यावरुन आईस्क्रीम विकणारा, संत्री विकणारा, झोपडपट्टीमध्ये राहणारा माझ्यासारखा गरीब माणूस आमदार झाला नसता. त्यामुळे महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महात्म्यांची नांवे घेऊन कृपया त्यांचा अपमान करु नका. सभापती महोदया, मी ज्येष्ठ कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर.....

**तालिका सभापती ( श्रीमती नीलम गो-हे )** : मला माननीय सदस्यांना एक विनंती करावयाची आहे. आपणाला ही चर्चा 12.45 वाजता संपवावयाची आहे. अजून बरेच सदस्य बोलावयाचे असल्यामुळे माननीय सदस्यांनी आपले भाषण पाच मिनिटांत संपवावे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी व माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे या सभागृहात गरिबांच्या, दलितांच्या, सर्वसामान्यांच्या प्रश्नावर अतिशय पोटतिडकीने बोलत असतो. तेव्हा आम्हाला थोडासा जास्तीचा वेळ द्यावा, अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदया, मी ज्येष्ठ कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर यांना असे विचारले होते की, " मी आपल्या अलका, उलका आणि इतर कादंब-या वाचलेल्या आहेत. आपण इतक्या कादंब-या लिहिल्या आहेत. परंतु दलितांच्या बाबतीत अजून काही लिखान केलेले नाही." त्यांनी मला असे सांगितले की, एका रिक्शाचालकाची बायको आणि मुले उपाशी आहेत. त्या परिस्थितीत त्याचा रिक्शा पंक्चर झाला तर त्याने काय करावयाचे ? ज्याची बायको आणि मुले उपाशी आहेत आणि जे मी भोगले नाही, त्याचे वर्णन मी करु शकत नाही.

सभापती महोदय, मी पान क्र. 194 वरील बाब क्र. 225 वर बोलत आहे. ही मागणी वैद्यकिय शिक्षणाबाबतची आहे. आज वैद्यकिय शिक्षणामध्ये मोठा घोळ सुरु आहे. वैद्यकिय शिक्षणाची फी भरमसाठ झाल्यामुळे पालक रस्त्यावर आलेले आहेत. अशा परिस्थिती प्रायव्हेट कॉलेजेस बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. याबाबत सुप्रिम कोर्टातही केस गेली आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : या बाबतची लक्षवेधी सूचना आज चर्चेला येणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, डॉ. अविनाश चौधरी, संचालक आरोग्य विभाग, आहेत. त्याच ठिकाणी उपसंचालक श्री. ठोंबरे असताना श्री. ठोंबरे यांच्या घरी 1 कोटी रुपये सापडले आहेत........

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MHM/ 11:15

श्री. रमेश निकोसे...

सभापती महोदया, श्री. विजय करवाडे या 25 वर्षे शासनाची सेवा केलेल्या माणसाला सक्तीने घरी बसविण्यात आले. त्याला नोकरीतून काढून टाकण्यात आले. त्याला नोकरीतून काढून टाकण्याचे कारण म्हणजे तो अडीच ते तीन वर्षे सुट्टीवर होता. या काळामध्ये त्याने वैद्यकीय प्रमाणपत्र पाठविले होते. परंतु गरीबाच्या व्यथा काय असतात, त्याचे प्रापंचिक जीवन कसे उध्वस्त होते, तो सुट्टीवर कशासाठी गेला होता याची साधी विचारणाही न करता त्याच्याविरुध्द विभागीय चौकशी लावली. चौकशीमध्ये काहीही सिध्द झाले नाही. त्यानंतर त्या माणसाला तीन वेळा बोलाविले गेले, त्याला पैश्याची आवश्यकता होती म्हणून तो गेला नाही. त्यावेळी उपसंचालक डॉ. अविनाश चौधरी यांनी कोणत्याही नियमाचा आधार न घेता त्याला कामावरुन काढून टाकले. कोणत्याही कर्मचाऱ्याला काढून टाकण्याच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारचे, सुप्रिम कोर्टाचे काही निर्णय आहेत. कुणालाही सेवेतून बडतर्फ करावयाचे असेलतर त्यासाठी नियम आहेत. या माणसाच्या बाबतीत त्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे. यासंबंधी माननीय सार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ. विमलताई मुंदडा यांच्याकडे 29 तारखेला निवेदन दिले, त्यावर त्यांनी चौकशी करुन कारवाई करा असा शेरा लिहिला. परंतु त्या पत्रावर अजून त्यांच्याकडून कोणती कारवाई करण्यात आली यासंबंधीचे उत्तर आलेले नाही. सभापती महोदया, मला यानिमित्ताने माननीय श्री. बाळासाहेब तिरपुडे यांची आठवण होते. एकदा एका कर्मचाऱ्याला गोंदीयाच्या वनअधिकाऱ्याने कामावरुन काढून टाकले. तेव्हा त्यांनी "जा त्या वन अधिकाऱ्यांना कामावर घेण्यास सांगा" असे मला सांगितले. तेव्हा त्या वनअधिकाऱ्याने मी मंत्रिमहोदयांना ओळखत नाही मला लेखी पत्र पाहिजे असे मला सांगितले. तेव्हा मी माननीय श्री. बाळासाहेब तिरपुडे यांना भेटून तुम्हाला ते वनअधिकारी ओळखत नाहीत, तुम्ही मला त्यांचे लेखी पत्र आणून द्या असे म्हणाले. तेव्हा माननीय श्री. बाळासाहेब तिरपुडे यांनी त्या डी.एफ.ओ. ला तात्काळ निलंबित करा असे आदेश दिले. त्या अधिकाऱ्याला सहा महिने घरी बसू द्या. I want to see whether you have taken action or not. त्या प्रमाणे तो अधिकारी निलंबित झाल्यानंतर माननीय श्री. बाळासाहेब तिरपुडे यांना भेटायला आला. तेव्हा माननीय श्री. बाळासाहेब तिरपुडे म्हणाले की, तुम्ही मला ओळखत नाही, आता सहा महिने घरी बसा, त्यानंतर विचार करतो. सांगण्याचे तात्पर्य असे की, त्या काळामध्ये अशाप्रकारे मंत्रिमहोदयांचा आपल्या अधिकाऱ्यावर धाक होता. मला याठिकाणी असे सांगावयाचे आहे की, एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

निरपराध माणसावर अन्याय झाला आहे. मी अनुसूचित जाती कल्याण समितीचा सदस्य आहे. या समितीचे माननीय सदस्य सर्वश्री संपतराव अवघडे, सुभाष साबणे, दिलीप बनकर, रमेश बागवे, साहेबराव घोडे, सुरेश खाडे, जोगेंद्र कवाडे यांनी समितीचे माननीय समिती प्रमुख प्रा. जनार्दन चांदूरकर साहेबांच्या सहीने पत्र दिले की, या माणसाला आपण पहिल्यांदा कामावर घ्या. त्यानंतर त्याची चौकशी करा. जर एखाद्या मागासवर्गीय कर्मचाऱ्याला हेतुपुरस्सर कामावरुन काढून टाकण्यात येत असेलतर संबंधित अधिकाऱ्यास ॲट्रॉसिटी ॲक्टखाली अटक केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. ही गंभीर बाब लक्षात घेऊन आपण संध्याकाळ होईपर्यंत या कर्मचाऱ्याला पहिल्यांदा कामावर घ्या व त्यानंतर त्याची चौकशी करा. चौकशीमध्ये जर तो दोषी आढळत असेल तर त्याला नोकरीमधून काढून टाका अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, त्यानंतर मला ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 170 व 171 वर बोलावयाचे आहे. गेल्या दहा वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये नव्याने कोणत्याही विद्युत निर्मिती प्रकल्पाची उभारणी झ ालेली नाही. मी या सभागृहामध्ये 2002 साली सदस्य म्हणून आलो त्यावेळी मी खापरखेडा, उमरेड व महुद्याच्या विद्युत निर्मिती प्रकल्पासंबंधी बोललो होतो. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी लवकरात लवकर कार्यवाही करु असे आश्वासन दिले होते. आज लोडशेडींगचे प्रमाण वाढल्यामुळे लोक विद्युत मंडळाची कार्यालये जाळायला लागली आहेत. गेल्या चार वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये 2500 मेगावॅटची तूट आहे ती भरुन काढून 10 हजार मेगावॅटपर्यंत वीजेचे उत्पादन वाढविले जाणार आहे याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री व माननीय ऊर्जामंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांना धन्यवाद देतो व त्यांना मानाचा मुजरा करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:20

श्री.रमेश निकोसे . . . .

सभापती महोदय, समाजकल्याण विभागाच्या मागण्यांसंदर्भात मला बोलावयाचे आहे. तसेच महिला व बालविकास विभागाच्या बाबतीत देखील बोलावयाचे आहे. यासंदर्भात दोन योजना आहे आणि त्या योजना अशा आहेत की, . . . .

काही सन्माननीय सदस्य : आज समाजकल्याण विभागाच्या मागण्या चर्चेसाठी नाहीत.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, ठीक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

. . . .के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्र. . . . .

**तालिका सभापती (डॉ.नीलम गो-हे)** : मला सदनातील सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, 12.00 वाजेपर्यंत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे संपली पाहिजेत. दुसरी गोष्ट म्हणजे सभागृहाची बैठक सुरु होते, त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्य उपस्थित नसतात. मात्र त्यांनी भाषण करण्यासाठी नाव दिलेले असते. नंतर अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित होतात आणि बोलणा-या वक्त्यांची संख्या वाढत जाते. अशा वेळी त्यांना असे वाटते की, आम्हाला बोलण्याची संधी मिळाली नाही. तेव्हा आपल्याला 12 वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचा वेळ ॲडजेस्ट करावयाचा आहे. त्यामुळे पाच मिनिटे झाल्यावर मी बेल वाजविणार आहे आणि त्यानंतर फक्त दोन मिनिटे जास्त मिळतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधातील बाब क्र.106, पान क्र.84 बाबत सांगावयाचे तर लातूर येथे वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम करण्यासाठी ही प्रोव्हीजन केली आहे. आपण जर याचे डिटेल्स् पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, याठिकाणी वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुलांच्या आणि मुलींच्या वसतीगृहासाठी प्रोव्हीजन केली आहे. याठिकाणी "अतिरिक्त बांधकाम करण्यासाठी" असे येथे म्हटलेले आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या 120 दिली आहे. म्हणजे 120 विद्यार्थ्यांच्या संख्येसाठी अतिरिक्त बांधकाम करण्याकरता ही प्रोव्हीजन केली आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी उल्लेख केला की, लातूरला मेडिकल कॉलेज सुरु झाले आहे. पण जेव्हा हे कॉलेज सुरु झाले, तेव्हा त्या कॉलेजमध्ये वसतीगृह होते का ? एम.सी.आय.ने जर 120 मुलामुलींच्या संख्येसाठी मान्यता दिली होती, तर त्यावेळी एम.सी.आय.चे नॉर्म वेव्ह करुन अशा प्रकारे कॉलेजला कशी मान्यता देण्यात आली हा बेसिक प्रश्न आहे. तसेच येथील अतिथीगृहाचे बांधकाम करणे आणि मुख्य प्रवेशव्दाराचे बांधकाम करणे यासाठी तरतूद प्रस्तावित केली आहे. मग जेव्हा कॉलेज सुरु झाले, तेव्हा तेथे मुख्य प्रवेशव्दार नव्हते का ? तसे असेल तर मग हे कॉलेज कसे सुरु झाले ? त्या वेळी कॉलेजचे बांधकाम किती झाले होते आणि आता ही प्रोव्हीजन करण्याची शासनाला का गरज पडली ?

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पान क्र.182, बाब क्र.217 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये निरनिराळी विकास कामे पार पाडण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

. . . .के-3





डॉ.दीपक सावंत . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यामध्ये राज्यातील विकास कार्यक्रम पार पाडण्याच्या दृष्टीने उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे अपूर्ण राहीलेले बांधकाम, औषध व साधनसामग्री पुरवठा, आरोग्य संस्थांना ॲम्ब्युलन्स् पुरविणे अशी निरनिराळी कामे पूर्ण करण्यासाठी ही प्रोव्हीजन केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र याठिकाणी किती बांधकाम शिल्लक आहे ? ही बांधकामे निर्धारित वेळेत आणि निर्धारित निधीमध्ये पूर्ण करणार आहात का ? कारण प्रत्येक वेळी बांधकाम करण्यासाठी मुदतवाढ दिली जाते. त्यामुळे बजेट वाढत जाते आणि मग अतिरिक्त तरतूदीसाठी पूरक मागणीव्दारे या बाबी आपल्या समोर येतात.

सभापती महोदय, राजश्री शाहू महाराज योजने अंतर्गत तत्कालीन माननीय आरोग्य मंत्र्यांनी 250 ॲम्ब्युलन्स् देण्याचे कबूल केले आहे. या ॲम्ब्युलन्स् कुठे-कुठे देण्यात आल्या आहेत ? जर दिल्या असतील तर आपल्याला महाराष्ट्रात जिकडे-तिकडे ॲम्ब्युलन्स् दिसतात का ? सगळीकडे ॲम्ब्युलल्स्चा सुळसुळाट झाल्याचे दिसत आहे का ? कुटीर रुग्णालयांमध्ये या ॲम्ब्युलन्स् दिलेल्या आहेत का ? महाराष्ट्रात कालपर्यंत रेट कॉन्ट्रॅक्ट अस्तित्वात नव्हते, ते आज अस्तित्वात आले आहे. फक्त आजही मुंबई महानगरपालिका आणि कर्नाटक शासनाचे रेट कॉन्ट्रॅक्ट वापरले जाते. तसेच जी साधनसामुग्री दिली जाणार आहे, ती कोणती आहे ? कारण औषधे आणि साधनसामुग्री या व्हेग टर्म्स् आहेत.

सभापती महोदय, मला बाब क्र.218, पान क्र.182 बाबत सांगावयाचे आहे. लातूर येथील 200 खाटा असलेल्या जिल्हा रुग्णालयाची कपॅसिटी 400 खाटांपर्यंत वाढवावयाची आहे आणि वैद्यक परिषदेच्या सुधारित प्रमाणकानुसार ही वाढ करण्याचे ठरविले आहे असे यामध्ये म्हटलेले आहे. म्हणजे नेमके काय करणार आहात ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे.... 11:25

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

त्या ठिकाण्री 200 बेडच्या ऐवजी 400 बेडची व्यवस्था करत आहात. या रुग्णालयामध्ये फिजिशियन, सर्जन, रेडिओलॉजिस्ट, ॲनॅस्थेटीस्ट, आर्थोपिडीक सर्जन यांची नियुक्ती करणार आहोत, ही पदे त्या ठिकाणी पूर्वी नव्हती काय ? पूर्वी नसतील तर ते कॉलेज कसे चालत होते, याबाबतचा खुलासा व्हावा.

त्यानंतर बाब क्रमांक 220 पान क्रमांक 185, 100 खाटा असलेल्या जव्हार जि.ठाणे, येथील कुटीर रुग्णालयाकरिता पदे निर्मिती करण्यासाठी पूरक मागणी केलेली आहे. जव्हार कुटीर रुग्णालयाच्या संबंधाने अनेकदा चर्चा झालेली आहे. मंत्री महोदयांना विनंती आहे की, जव्हार, जि.ठाणे हे मुंबईपासून लांब नाही, त्यांनी स्वत: त्या ठिकाणी एकदा जाऊन रुग्णालयाची पहाणी करावी. विशेषत: पावसाळ्यामध्ये त्या ठिकाणचे बांधकाम पाहिल्यानंतर असे दिसून येईल की, सगळीकडे गळती लागलेली आहे. तो कुपोषणाचा विभाग आहे. त्या रुग्णालयामध्ये अनेक रिक्त पदे आहेत, त्याबाबत मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी.

त्यानंतर बाब क्रमांक 221,पान क्रमांक 187, रत्नागिरी, लातूर व पुणे जिल्ह्यांमध्ये 8 नवीन ग्रामीण रुग्णालयांची स्थापना करण्यासाठी मागणी केलेली आहे. आपण प्रादेशिक असमतोल असे म्हणतो. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एक रुग्णालय व लातूर जिल्ह्यामध्ये एक रुग्णालय आणि पुणे जिल्ह्यामध्ये 6 रुग्णालये स्थापन करण्यात येणार आहेत. परंतु सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये रुग्णालय दिलेले नाही. सिंधुदूर्ग जिल्ह्याचा मोठा बॅकलॉग आहे, त्या ठिकाणी एकही रुग्णालय नाही. याबाबत विचार व्हावा.

त्यानंतर बाब क्रमांक 225, पान क्रमांक 194. वैद्यकीय शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी तरतूद करण्यासाठी मागणी आहे. मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रुपात शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे ठरविलेले आहे. अलीकडे एक मंत्रीमहोदयांनी घोषणा केली की विद्यार्थ्यांना फी भरण्यासाठी बँक लोन उपलब्ध होईल. या बँक लोनचे काय झाले ? किती विद्यार्थ्यांना आज फी भरण्यासाठी बँकेकडून लोन उपलब्ध झाले याची आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना म्हणजे ई.बी.सी.च्या विद्यार्थ्यांना फी माफी देतो, असे किती विद्यार्थी आहेत, याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

त्यानंतर पान क्रमांक 195, पूरक मागणी क्रमांक एस-1 यामध्ये सेंट जॉर्ज रुग्णालय, जी.टी. हॉस्पिटल, कामा रुग्णालय यांना अनुदान देतो. या शासकीय रुग्णालयांच्याबाबतीत

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

सभागृहामध्ये अनेकदा चर्चा झालेली आहे. जे.जे. रुग्णालयात डॉ.बन्सल म्हणून आहेत त्यांच्यावर स्टेंट्स प्रकरणी फौजदारी कारवाई करणार आहात का ? रुग्णाच्या आयुष्याशी खेळणाऱ्या या डॉक्टरला आपण सेवेमध्ये ठेवलेले आहे. माझा अनुभव सांगतो. आठ दिवसापूर्वी शिवसेनेच्या एका कार्यकर्त्याच्या आईच्या एन्जीओग्राफ्री, एन्जीओप्लास्टी करण्यासाठी डॉ.बन्सलनी 1 लाख 20 हजार रुपयाची मागणी केली. नानावटीसारखे खाजगी रुग्णालय आहे, त्या ठिकाणीही एवढे पैसे घेतले जात नाहीत. स्टॅन्टसाठी 40 हजार रुपये लागतात. मी यामध्ये मध्यस्थी केल्यानंतर डीनने 80 हजार रु. केले. मी सभागृहाला सांगू इच्छितो की,महापालिकेच्या, शासनाच्या रुग्णालयामध्ये खाजगी रुग्णालयांप्रमाणे पैसे घेणे कितपत योग्य आहे, हा खरा प्रश्न आहे.

यानंतर बाब क्रमांक 229, पान क्रमांक 196, राज्यातील आयुर्वेदिक, होमियोपॅथी व युनानी महाविद्यालयांना चालना देण्यासाठी वित्तीय सहाय्य देण्यासाठी मागणी केलेली आहे. अहमदनगर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, अहमदनगर, वाय.एम.टी.वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, खारघर, म्हणजेच येरळा मेडिकल कॉलेज यांना सहाय्य करत आहेत. या येरळा मेडिकल कॉलेजच्या संदर्भात अनेकवेळा सभागृहात चर्चा झाली. त्यांनी मुंबई महानगरपालिकेचे पैसे बुडविले अशा कॉलेजला अनुदान देत आहोत. त्यानंतर सोनाजीराव क्षिरसागर होमिओपॅथी वैद्यकीय कॉलेज,बीड येथील दादासाहेब सुरुसिंग नाईक आयुर्वेदिक महाविद्यालय आणि संत विष्णु चॅरिटेबील रुग्णलय यांना अनुदान देत आहोत. मी या संदर्भातने मंत्री महोदयाना सांगू इच्छितो की, या सर्व कॉलेजमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर आहेत काय ? हे पाहिले पाहिजे, त्याचबरोबर त्यांच्या अकौंटमध्ये किती पैसे आहेत, ते किती डोनेशन घेतात, याचीही माहिती घ्यावी आणि मगच त्यांना अनुदान वितरीत करावे, अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

--

यानंतर कु.थोरात....

अस्धारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) :सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 75,76 आणि 78.वेगवेगळी कामे महाराष्ट्रात सगळीकडे चालू आहेत. मार्च महिन्यात मराठवाडयातील 150 कोटी रुपयांची देयके ट्रेझरी ऑफिसला उशिरा पोहचली म्हणून ती त्यांनी परत पाठवून दिली. तेव्हा पासून आता पर्यंत ती तशीच घोळात पडलेली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग कोण चालवते? सन्माननीय मंत्री, श्री. छगन भुजबळ साहेब चालवतात की, वित्त मंत्री, श्री. जयंत पाटील चालवतात? कां ट्रेझरी ऑफिस चालवते ? हेच कळत नाही. आता सगळी कामे बंद कां आहेत आणि हे लोकांची देयेके सारखी परत कां येतात, असे पी.डब्ल्यू.डी.च्या अधिका-यांना विचारले तर तेव्हा त्यांनी असे सांगितले की, गेल्या चार महिन्यापासून आम्ही ट्रेझरी ऑफिसमध्ये चकरा मारीत आहोत. आमची बिल्स स्वीकारली जात नाहीत. 30 मार्चला बजेट प्रोव्हिजन होते. 31 मार्चला ग्रॅन्ट्स येतात. आणि 5 एप्रिल पर्यंत बिल्स सबमिट करा असे सांगितले जाते.

(मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, श्री. भुजबळसाहेब सभागृहात येतात.)

श्री. श्रीकांत जोशी : बरे झाले मंत्रिमहोदय, श्री. भुजबळसाहेब सभागृहात आता आले आहेत. ट्रेझरी ऑफिसचा तोंडी आदेश मिळतो की,ही देयके स्वीकारण्याचा आम्हाला आदेश नाही. त्यामुळे ती देयके परत पाठविली जातात. महाराष्ट्र सरकारची ही देयके असती तर मी समजू शकलो असतो पण सेंट्रल रोड फंड केंद्रीय निधीचे व केंद्र सरकारचे हे पैसे आलेले आहेत. मा. श्री.जयंत पाटील यांचे ट्रेझरीवर इतके अतिक्रमण आहे की, शेवटी, त्यांचे बिल सुध्दा ट्रेझरी ऑफिस परत पाठवून देतात. गेले चार महिने झाले, महाराष्ट्राचे 300, 400 कोटी रुपये आणि पी.डब्लू.डी.चे सेंट्रल रोड फंडचे आणि वर्ल्ड बँकेचे मराठवाडयातील 150 कोटी रुपयांसाठी त्यांची सारखी ये, जा चालू आहे. अजून त्यातून मार्ग निघालेला नाही. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, या निमित्ताने एकदा ट्रेझरी ऑफिसचे फंक्शनिंग ट्रान्सफरंन्ट केलेच पाहिजे. बिल तोंडी आदेशान्वये परत पाठविण्याचा जो संकेत आहे, तो कायमचा बंद केला पाहिजे. प्रा. बी. टी. देशमुख साहेब याबाबत मागे एकदा या सभागृहात बोलले होते. ट्रेझरी ऑफिसचे आक्रमण थांबविले पाहिजे.

..2..

श्री. श्रीकांत जोशी..

या प्रकरणाची एक उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करावी आणि मराठवाडयातील 157 कोटी रुपयांची देयके, चार महिन्यापर्यंत, मंजूर न करण्याबाबत,मग त्यामध्ये ज्या अधिका-यांचा दोष असेल,तो फायनान्सचा अधिकारी असो वा पी.डब्लू.डी.चा असो,त्यांच्यावर कडक कारवाई करुन, त्यांना घरी पाठविले पाहिजे. अशा पध्दतीने सरकारी पैशांचा खेळखंडोबा करुन जनतेची दिशाभूल करण्याचे काही कारण नाही.

जलसंपदा विभाग. पृष्ठ क्रमांक 116.बाब क्रमांक 128. कृत्रिम पर्जन्यमान, यामध्ये 7 कोटी रुपयाची पूरक मागणी सादर केलेली आहे. मी याबाबत एक-दोन वेळा बोललो आहे की, याबाबतची विभागाने अकाऊन्टेबिलिटी द्यावी. हा खर्च पाच-सात कोटीचा आहे. पण त्या ढगात किती वॉटरकन्टेंन्ट आहे हे रडारवरुन कळते. नेमका पाऊस कुठे पडला हे सुध्दा रडारवरुन कळते. गेल्या वर्षीच्या 19 कोटी रुपयाचा हिशेब आम्हाला मिळाला नाही. या वर्षी 7 कोटी रुपयाची पूरक मागणी सादर केलेली आहे त्याचा हिशे्ब मिळेल अशी आशा प्रकट करतो. आज आमच्या मराठवाडयातील संभाजीनगर, जालना इत्यादि जिल्हयात बिलकूल पाऊस पडलेला नाही त्याठिकाणी प्रयोग करावेत. त्याचे दोन-तीन वर्षानंतर रिझल्ट मिळतील. पण ते चालू ठेवावे आणि त्याचा रिपोर्ट द्यावा. तंत्रज्ञानावर काही पैसे खर्च करणे हे दुष्काळी भागासाठी आवश्यक आहे असे मला वाटते.

पृष्ठ क्रमांक 130. मोठे पाटबंधारे प्रकल्प, कालवा दुरुस्ती. जायकवाडीच्या बाबतीत घोषणा झाली. पण बजेटमध्ये प्रोव्हिजन नाही. मराठवाडयातील 1 लाख हेक्टर शेतीचे आणि शेतक-यांचे 1 हजार कोटी रुपयांचे नुकसान केवळ कॅनॉलची दुरुस्ती न केल्यामुळे शासन करीत आहे. जायकवाडी धरण भरलेले आहे. कॅनॉल दुरुस्त नाहीत, त्यामुळे शेतक-यांना पाणी मिळत नाही. मराठवाडयाचा जी.डी.पी. 1 हजार रु पये पर पर्सनने कमी करण्याचे पाप आपण सगळेजण करीत आहात, एवढेच आपण लक्षात ठेवावे.

आरोग्य विभाग. पृष्ठ क्रमांक 199. बाब क्रमांक 224. जागतिक बँकेच्या माध्यमातून अत्यंत सुंदर प्रकल्प होता. माननीय मंत्रिमहोदया श्रीमती विमलताई मुंदडा अमेरिकेत जाऊन आल्यात. आम्हाला आनंद वाटला.त्यांनी आणखी ब-याचवेळा अमेरिकेत जावे.

3...



श्री. श्रीकांत जोशी..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पण त्यातील 100 कोटी रुपये आपण ग्रामीण आरोग्यावर खर्च करु शकला नाहीत, याचे आम्हाला आश्चर्य वाटते. वर्ल्ड बँक आरोग्यासाठी राज्याला लोन देते. आरोग्यासाठी जे 650, 700 कोटी रुपये लोन दिले होते त्यातील 100 कोटी रुपये खर्चच करता आलेले नाहीत. मराठवाडयातच नाही तर सगळयाच ठिकाणी ग्रामीण रुग्णालयांची अवस्था अतिशय बिकट आहे. विशेषत: ग्रामीण भागात हे 100 कोटी रुपये तातडीने खर्च करण्याची व्यवस्था करायला पाहिजे होती. पण ती केलेली नाही. मराठवाडयात ग्रामीण आयुर्वेदिक रुग्णालयाची मागणी आहे. तालुका स्तरावर छोटेसे, किमान 10 बेडचे आयुर्वेदिक ग्रामीण रुग्णालय करावे. तसेच जिल्हा स्तरावर 50 बेडचे आयुर्वेदिक रुग्णालय काढावे ,अशी ब-याच वर्षापासून आयुर्वेदिक डॉक्टरांची मागणी आहे. मराठवाडयामध्ये 2500 बी.ए.एम.एस. डॉक्टर्स सध्या बेरोजगार आहेत. पण ज्यांना प्रॅक्टीस अलाऊ नाही, असे शेकडो लोक प्रॅक्टीस करीत आहेत. त्यामुळे एका दृष्टीकोनातून या बेरोजगार डॉक्टर्सवर हा अन्याय आहे. ग्रामीण भागातील लोकांना सर्व्हिस मिळत नाही. आयुर्वेदासारखा अत्यंत साधा, सोपा आणि कमी खर्चाचा इलाज सुध्दा आपल्याकडे मॅनपॉवर उपलब्ध असतांना सरकारच्या नाकर्तेपणामुळे त्यांच्यापर्यंत पोहचत नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. आज मला वैद्यकीय

शिक्षणा विषयी बोललेच पाहिजे. पृष्ठ क्रमांक 195. बाब क्रमांक 227. खरे म्हणजे मराठवाडयासाठी अत्यंत भूषण असेलेले हे वर्षे आहे. शासकीय रुग्णालय संभाजीनगर घाटी, आणि आयुर्वेदिक रुग्णालय, नांदेड ही दोन रुग्णालये सर्वांत पहिल्यांदा स्थापन झाली होती. या दोन्ही रुग्णालयाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, 50 वर्षे त्यांनी पूर्ण केले आहेत. त्यांनी लाखो रुग्णांना बरे केलेले आहे. तेथून हजारो डॉक्टर्स तयार झालेले आहेत. त्यां डॉक्टर्सनी मराठवाडयातील संपूर्ण आरोग्य बघितले. तरीही या रुग्णालयासाठी एक रुपयाचीही प्रोव्हिजन केलेली नाही. या रुग्णालयाची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. 50 वेळेस डॉक्टर्सनी पेशंटच्या नातेवाईकांकडून मार खाल्ला आहे.

एन 1

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

कारण त्या ठिकाणी व्यवस्थापन नीट नाही. त्या ठिकाणी अत्यंत चांगले डॉक्टर्स असताना सरकारच्या नाकर्तेपणामुळे दोन्ही संस्थांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. मेडिकल कॉलेजमध्ये चांगली ट्रिटमेंट करणारे डॉक्टर्स आहेत पण तेथील होस्टेल पाहिले तर त्याची अवस्था फार वाईट आहे. या ठिकाणी घोषणा खूप होतात. सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलसाठी 32 कोटी रुपयांची घोषणा केली परंतु खिशामध्ये पैसा नाही. बजेटमध्ये त्याबाबतीत तरतूद नाही याची आठवण मी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना करुन देऊ इच्छितो.

सभापती महोदया, यानंतर मी उच्च शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 297, पृष्ठ क्रमांक 317 बाबत बोलू इच्छितो. विद्यापीठाला असलेले अनुदान याबाबत यामध्ये मागणी केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाबाबत फार बोलता येईल तसेच मागण्याही भरपूर आहेत परवा नोकरभरतीमध्ये झालेला भ्रष्टाचार हा उच्च शिक्षण विभागाला शरमेने मान खाली घालावयास लावणारा आहे. यासंदर्भात लक्षवेधी सूचना दिलेली आहे. यामध्ये माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी लक्ष घातले पाहिजे. तरच उच्च शिक्षणावर लोकांचा विश्वास बसेल. नाही तर नोकरभरतीमध्ये झालेला भ्रष्टाचार शरमेने मान खाली घालावयास लावणारा आहे.

सभापती महोदया, यानंतर तंत्रशिक्षणाच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक 318, बाब क्रमांक 301 बाबत मी बोलणार आहे. मराठवाडयातील एकमेव इंजिनिअरींग कॉलेजची अत्यंत दुरावस्था आहे. त्यावर एक रुपयाचीही तरतूद झालेली नाही. सभापती महोदय, यानंतर पृष्ठ क्रमांक 310, बाब क्रमांक 291 याबाबत मी सांगू इच्छितो. यामध्ये कापसाचे भाव देण्यासाठी शासनाने 1072 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यवतमाळमध्ये सरकी दोन ते अडीच रुपये किलो दराने सिंडिकेट करुन विकली. त्यामध्ये कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. मी या निमित्ताने सभागृहाचे लक्ष या बाबीकडे वेधू इच्छितो. फक्त सरकीच्या विक्रीतून या वर्षी पणन महासंघाला झालेला तोटा 100 कोटी रुपयांचा आहे. तो तोटा करणारी माणसे आणि यातील एजंट्स सरकारला माहीत आहेत. सरकारने याची उच्चस्तरीय चौकशी केली तर निश्चितपणे पुढच्या काळात पणन महासंघाचा तोटा कमी होऊ शकेल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. श्रीकांत जोशी .....

सभापती महोदया, यानंतर मी ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 169, पृष्ठ क्रमांक 144 बाबत बोलू इच्छितो. मराठवाडा विभागातील कृषी पंपासाठी 35 कोटी 75 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु 33 केव्ही आणि 132 केव्ही सबस्टेशन्सची मागणी प्रलंबित आहे त्याबाबत कार्यवाही होत नाही. नुसते पंप वाढवून चालणार नाही. सर्व सिस्टीममध्ये सुधारणा करावी लागते. त्यांची मागणी आपण पुढच्या काळामध्ये पूर्ण करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

**तालिका सभापती (डॉ. नीलम गोऱ्हे)** : यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे बोलतील. मी काही सदस्यांची नावे पुकारली पण ते अनुपस्थित आहेत. सदस्यांची नावे पुकारल्यानंतर ते जर सभागृहात अनुपस्थित असतील तर त्यांची बोलण्याची टर्न जाईल. काही सन्माननीय सदस्यांनी आयत्यावेळी नावे दिलेली आहेत. दुपारी 12.00 वाजेपर्यन्त किती सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण होतील हे पहावे लागेल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदया, माझे नाव खाली कसे गेले ?

**तालिका सभापती** : आज सकाळी 10.30 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झाले त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित नव्हता.

श्रीमती सुधा जोशी : माझे नाव पुकारलेले नाही. आता आम्हाला बोलता येणार की नाही ?

**तालिका सभापती** : यामध्ये वेळ वाढवून घेणे हा एक मार्ग आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात बोलणार आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या बाबींचा उल्लेख केला त्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 108, पृष्ठ क्रमांक 85 याबाबत मी बोलणार आहे. कोटोल, वरोरा, चेंबूर, करमाळा आणि उस्मानाबाद या ठिकाणी अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता शासकीय वसतिगृहांच्या बांधकामासाठी जी पुरवणी मागणी केलेली आहे त्याबद्दल मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे अभिनंदन करतो. राज्यात विविध ठिकाणी अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता जी शासकीय वसतिगृहे बांधली जाणार आहेत ती अत्यंत उत्कृष्ट आणि अद्ययावत असावीत अशी अपेक्षा मी या प्रसंगी व्यक्त करतो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 11:40

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सभापती महोदया, जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 140 वरील बाब क्रमांक 124 वर माझे विचार मांडणार आहे. यामध्ये चालू वर्षाकरिता वेतन व भत्ते यासाठी तरतूद प्रस्तावित केलेली आहे त्याचे देखील मी समर्थन करतो. हे करीत असताना यासंबंधी माझी एक विनंती आहे की, नांदेड जिल्हयाच्या जलसंपदा विभागातील काही अभियंत्यांनी जातीचे खोटे दाखल देऊन पदोन्नती मिळविली आहे त्यामुळे अनुसूचित जातीच्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे, यासंबंधी शासनाने उचित कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 189 वरील बाब क्रमांक 223 वर मी माझे विचार व्यक्त करीत आहे. मी मा.आरोग्य मंत्र्यांचे अभिनंदन करतो. कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते चौथीमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची हृदयशल्यचिकित्सा यासह विशेष शालेय आरोग्य तपासणी करण्याचे ठरविले आहे. ही बाब निश्चितच चांगली आहे. यासाठी जी तरतूद प्रस्तावित केली आहे तिचे मी समर्थन करतो.

यानंतर पृष्ठ क्रमांक 189 वरील बाब क्रमांक 224 वर मी बोलणार आहे. जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र आरोग्य सेवा प्रकल्पांतर्गत बांधकाम करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे ती उचित आहे असे मला वाटते. हे करीत असताना माझी मा.आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे की, नागपूर येथे जे शासकीय महाविद्यालय व रुग्णालय आहे तेथे सुपरस्पेशालिटी विभाग आहे त्याचे आधुनिकीकरण करण्याची आणि आवश्यक त्या सुविधा उपलब्ध होण्याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. या हॉस्पिटलमध्ये दीर्घ कालावधीसाठी आजारी व्यक्ती भरती होतात त्यामुळे अशा रुग्णांच्या नातेवाईकांसाठी जर धर्मशाळा बांधता आली तर त्याबाबत शासनाने विचार करावा.

यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 304, बाब क्रमांक 273 व 274 वर मी याठिकाणी माझे विचार मांडतो. राज्यातील अवर्षणग्रस्त स्थिती असलेल्या क्षेत्रामध्ये सर्वेक्षण करुन आणि बागायती पिकांचे नुकसान सहन करणा-या लहान व सीमांत शेतक-यांकरिता 100 कोटीची मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 2003-2004 मध्ये कर्ज घेणा-या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

प्रा.जोगेंद्र कवाडे....

शेतक-यांसाठी ही पूरक मागणी करण्यात आली होती. त्याच प्रयोजनासाठी आणखी वाढीव मागणी करण्यात येत आहे. शासनाने गरीब शेतक-यांच्या कर्जावरील व्याज माफ केले आहे. त्याप्रमाणे शासनाने मागासवर्गीयांसाठी महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ निर्माण केले आहे. या महामंडळाकडून लाभार्थ्यांनी घेतलेले कर्ज अल्प असल्यामुळे त्यावरील व्याज देखील शासनाने माफ करावे असे मला यानिमित्ताने सुचवावेसे वाटते.

यानंतर बाब क्रमांक 279 नुसार सहकारी सूत गिरण्यांचे शेअर खरेदी करण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्दांना वित्त सहाय्य करण्यासाठी 5 लाख 10 हजारांची मागणी प्रस्तावित करण्यात आली आहे. परंतु ही मागणी पुरेशी असल्याचे वाटत नाही. त्याचा देखील मंत्रिमहोदयांनी विचार करावा.

यानंतर नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 173 वरील बाब क्रमांक 215 वर मी बोलत आहे. चालू वर्षासाठी पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 150 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु विदर्भातील विशेषत: नागपूर विभागातील गोसीखूर्द हा महत्वाकांक्षी प्रकल्प अनेक वर्षापासून रखडलेला आहे तो पूर्ण करण्यासाठी योग्य ती तरतूद होणे आवश्यक आहे त्याबाबत मंत्रिमहोदयांनी विचार करावा अशी विनंती करतो.

यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 318 वरील बाब क्रमांक 298 वर मी बोलणार आहे. अमरावती विद्यापीठात मध्य युगीन इतिहास व संस्कृती याबाबत डॉ.श्रीकांत जिचकार स्मारक संशोधन केंद्रासाठी इमारतीच्या बांधकामाकरिता 50 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी मी शासनाचे आणि मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन करतो. परंतु मी एका गोष्टीकडे मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. अमरावती विद्यापीठामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट हा विषय सुरु करण्यासाठी मी वारंवार विनंती केलेली आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 11:45

(प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु....)

तसेच त्यासाठी 3 कोटी रु.ची तरतूद करतो अशा प्रकारचे आश्वासन वारंवार दिल्यानंतर देखील कोणत्याही प्रकारची तरतूद या पुरवणी मागण्यामध्ये केलेली दिसत नाही. तेव्हा यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. म.ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ समिती कायमय करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. त्या कामासाठी आवश्यकत्या निधीची तरतूद केलेली दिसत नाही. यासंदर्भात देखील मा.मंत्री महोदयांनी निश्चितपणे विचार करावी अशी माझी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

महिला व बालविकास विभागाच्या पृ.क्र.325 वरील बाब क्रमांक 319 अंतर्गत केंद्र पुरस्कृत बाल न्याय कार्यक्रमांतर्गत, शासकीय बाल संगोपन संस्थांना 50 टक्के आणि अशासकीय संघटना, संस्था यांना 45 टक्के सहाय्य देण्यात आलेले आहे. केन्द्र सरकारकडून मिळालेल्या अनुदानावर संनियंत्रण करण्यासाठी ही लाक्षणिक मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी समर्थनीय आहे. बाब क्रमांक 320 मध्ये महिलांकरिता समुपदेशन केंद्रासाठी 30 लाख 24 हजार रु.ची मागणी करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्रांकडून महिलांसाठी मिळणा-या निधीमधून महिलांच्या विकासाकरिता गेल्या 3 वर्षापासून 10 समुपदेशन केंद्रे चालविण्यात येत आहेत. आता ही केंद्रे राज्य शासनाच्या निधीमधून चालविण्याचे ठरविण्यात आले आहे. याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो.

वन विभागाच्या पृ.क्र. 30 वरील बाब क्रमांक 45मध्ये सन 2005-06 ते 2009-10 या कालावधीकरिता वनांच्या संरक्षणासाठी वित्त आयोगाने 70 कोटी रु. इतक्या सहाय्यक अनुदानाची शिफारस केली आहे. यामध्ये वनीकरणासाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. वनीकरणाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यामध्ये वृक्षरोपण करण्याची गरज आहे.

बाब क्रमांक 44मध्ये नैसर्गिक आपत्ती निवार सहाय्य निधीसाठी 95 कोटी 92 लाख रुपयाची मागणी करण्यात आलेली आहे. या संदर्भामध्ये मी सांगू इच्छितो की, नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेले जे खरेखुरे लाभधारक असतात त्यांना लवकरात लवकर आर्थिक सहाय्यक कसे मिळेल, कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही आणि त्यांच्या पुनर्वसनाची काळजी घेतली जाईल अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो. तालिका सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु...)

त्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो आणि 2005-06 या कालावधीसाठी ज्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत त्यांचे समर्थन करतो. धन्यवाद.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : मा.तालिका सभापती महोदया, पुरवणी मागण्याच्या संदर्भामध्ये तीन-चार मुद्यांवर मी माझे विचार अगदी थोडक्यात मांडणार आहे. पृ.क्र.53 वरील बाब क्रमांक 71मध्ये विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संगणकीकरणाकरिता 20 लाख रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. ज्याप्रमाणे वित्त विभागाने या विमा संचालनालयासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्याप्रमाणे गेली अनेक वर्षे शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून वित्त विभागाकडे शालेय शिक्षण विभागामध्ये शिक्षकांचे जे पी.एफ.अकौन्टस, भविष्य निर्वाह निधीचे अकौन्टस् आहेत त्यांचे संगणकीकरण करण्यासाठी वित्त विभगाने शिक्षण विभागाला काही आर्थिक मदत द्यावी यासाठी वर्षानुवर्षे मागणी केली जात असताना त्या मागणीचा विचार झ ाालेला नाही हे मला याठिकाणी नमूद करावयाचे आहे. विमा संचालनालयासाठी जशी संगणीकरणासाठी तरतूद केलेली आहे तशी तरतूद शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीच्या अकौन्टचे संगणकीकरण करण्यासाठी तरतूद होणे आवश्यक आहे. या पी.एफ.अकौन्टचे संगणकीकरण न झाल्यामुळे परिणाम असा होतो की, शिक्षकांच्या पी.एफ.च्या रकमा त्यांच्या वेतनातून कपात केल्या जातात परंतु त्या रकमा ना शाळेमध्ये जमा होत ना संबंधित शिक्षण खात्यामध्ये जमा होत. कोटयवधी रुपयाच्या रकमा ह्या सस्पेन्स अकौन्टस्मध्ये पडलेल्या आहेत. हा पैसा शिक्षकांचा आहे. शिक्षकांच्या वेतनातून हे पी.एफ.चे पैसे कपात होतात. या वेतनातून कपात होणा-या पैशांचे हिशेब व्यवस्थित ठेवले जावेत, पी.एफ.चे अकौन्टस् व्यवस्थित ठेवले जावेत म्हणून सदर कामाचे संगणकीकरण करण्यासाठी तरतूद होणे आवश्यक आहे.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 11:50

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदया, प.क्र.70 वरील बाब क्रमांक 79 सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. आमदार निवासात रोजंदारीवर काम करणारे कर्मचारी होते, त्या कर्मचा-यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्याचा व त्यांना नियमित वेतनश्रेणी देण्याबाबतचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतलेला आहे. अतिशय चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिनंदन करतो व माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदया, पृष्ठ क्रमांक 318 वरील बाब क्रमांक 300 च्या अनुषंगाने माझे विचार व्यक्त करीत आहे. अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी परत देण्यासाठी 52 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. 2003-2004 या वर्षातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी परत देण्यासंदर्भातील ही तरतूद करण्यात आलेली आहे. सुमारे 10 हजार 400 विद्यार्थी अवर्षणग्रस्त भागातील आहेत. या विद्यार्थ्यांना ही परीक्षा फी परत मिळणार आहे. 2003-04 या वर्षाची परीक्षा फी ही 2005-2006 या वर्षामध्ये दिली जात आहे. अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना ही परीक्षा फी मिळाली पाहिजे, त्यासाठी शासनाने तरतूद देखील केलेली आहे. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करण्यास काहीही हरकत नाही. परंतु यासंदर्भात महत्वाचा प्रश्न असा आहे की, अवर्षणग्रस्त भागातील संबंधित महाविद्यालयांना, संबंधित संस्थांना ही तरतूद उपलब्ध करुन दिली जाणार आहे. खरोखरच ही रक्कम विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे काय? कारण 2003-2004 या वर्षातील काही विद्यार्थी संबंधित संस्थांमध्ये शिकत असतील, काही विद्यार्थी शाळा सोडून गेले असतील, त्यामुळे खरोखरच अवर्षणग्रस्त विभागातील विद्यार्थ्यांना ही फी संस्थेकडून दिली जाईल काय याबाबतीत मी साशंक आहे. विद्यार्थ्यांच्या खोटया सहया करुन, खोटी कागदपत्रे तयार करुन पैसे देण्यात आलेले आहेत असे दाखविले जाण्याची शक्यता आहे. सभापती महोदय,अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची जी काही फी परत करावयाची आहे. जवळपास 52 लाख रुपयांचे वितरण या अनुषंगाने करावयाचे आहे. ही परीक्षा फी विद्यार्थ्यांना खरोखरच मिळावी यासाठी आपण त्या विद्यार्थ्यांना फी चे पैसे रोखीने न देता किंवा संबंधित संस्थांनी कॅशने न देता संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाने चेकने किंवा ड्रॉफ्टने दिले जावे. या विद्यार्थ्यांना ही परीक्षा फी चेक अथवा ड्रॉफ्टने परत केली तरच ख-या अर्थाने योग्य त्या विद्यार्थ्यांना लाभ मिळेल. मी केलेल्या सूचनेचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदया, बाब क्रमांक 313 ते 318 च्या अनुषंगाने मागण्या सभागृहात सादर करण्यात आलेल्या आहेत. त्या मागण्यांचे मी समर्थन करतो. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, राज्यात ब-याच विना अनुदानीत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण शिक्षण संस्था सुरु झालेल्या आहेत. या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु झालेल्या आहेत, त्यांना शासकीय नियमाप्रमाणे अनुदान उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात यापूर्वी या सभागृहात चर्चा झालेली आहे. त्या चर्चेच्या वेळी माननीय मंत्र्यांनी मान्य केले आहे की, याबाबतीत निश्चित विचार करता येऊ शकेल. राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना शासकीय अनुदान देण्यात यावे अशी मी उच्च शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----

श्री. कन्हैयालाल गिडवानी : काल पक्षाची बैठक होती त्यामुळे आम्ही पूरक मागण्यांवर आमचे विचार मांडू शकलो नाही. सभापती महोदया, सगळया सदस्यांना बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे. पूरक मागण्यांवर माझ्यासह अनेक सदस्यांना अजून विचार व्यक्त करावयाचे आहेत. आपण कृपया या चर्चेवरील वेळ वाढवून द्यावी.

**तालिका सभापती** : मला सदनाला अशी विनंती करावयाची आहे की, अजून 10 सन्माननीय सदस्यांना यावर आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी डॉ. पवार यांचे नाव माझ्याकडे पाठविलेले आहे. सर्व सदस्यांना कमीत कमी वेळेत बोलण्याची संधी द्यावयाची म्हटले तरी...

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदया, मी माझ्या भाषणास सुरुवात करते..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांना सांगू इच्छिते की, आपण आपले भाषण अजून सुरु करु नका. या ठिकाणी अनेक सदस्य आपापले म्हणणे मांडत आहेत. त्यांचे म्हणणे मला ऐकून घेतले पाहिजे.

यानंतर श्री. कानडे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, काल सभागृहामध्ये असा निर्णय झाला होता की, आज सकाळी 10.30 वा सभागृह सुरु करावयाचे आणि 12.45 वा. ही चर्चा पूर्ण करावयाची. आता ब-याच मा.सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर आपले विचार मांडले आहेत. आता संबंधित खात्याच्या मंत्र्यांची उत्तरे सुरु करणे आवश्यक आहे. कारण उपस्थित केलेल्या प्रश्नांना न्याय मिळणे महत्वाचे आहे.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदया, आज संध्याकाळी सुध्दा पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. ही चर्चा आणि आता झालेली चर्चा यावर एकत्रित उत्तर घेण्यास हरकत नाही.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी 15 तारखेला नोटीस दिली होती. त्यामुळे माझे नांव यादीमध्ये यावयाला पाहिजे होते ते आलेले नाही. माझे नांव यादीमध्ये का आले नाही हे तपासले पाहिजे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदया, प्रत्येक सदस्याला किमान पाच मिनिटे तरी बोलण्यास संधी दिली पाहिजे. आम्ही प्रश्न उपस्थित केल्याशिवाय मंत्री उत्तरे कशी देणार ? पुरवणी मागण्या शासनाने मांडल्या आहेत म्हणजे त्यावर चर्चा झालीच पाहिजे.

श्री. छगन भुजबळ :सभापती महोदया, काल सभागृहामध्ये काम अपूर्ण राहिले ते पूर्ण करण्यासाठी आज ही विशेष बैठक बोलाविली आहे. म्हणजे कालचा वेळ आज देण्यात आलेला आहे. 10.30 ते 12.45 पर्यंत आपल्याला कामकाज पूर्ण करावयाचे आहे. अजून सदस्यांना विचार व्यक्त करावयाचे आहेत. म्हणजे मंत्रीमहोदयांना 1/2 मिनिटात उत्तर द्यावे लागणार आहे. यातून काय न्याय मिळणार आहे याचा विचार झाला पाहिजे.

**तालिका सभापती** (डॉ. नीलम गो-हे) : मा.सदस्यांचे आणि सरकार पक्षाचे म्हणणे मी ऐकून घेतले आहे. या चर्चेला मंत्रीमहोदयांनी दिलेले उत्तर ऐकून घेणे महत्वाचे आहे. सदस्यांचे म्हणणे देखील योग्य आहे. प्रत्येक सदस्याला 5 मिनिटे सुध्दा कमी पडणार आहेत याची मला जाणीव आहे. अजूनही 15-20 सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे 3 मिनिटात सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे. म्हणजे मंत्रीमहोदयांच्या उत्तरासाठी वेळ शिल्लक राहील. दोन मिनिटे झाल्यावर मी बेल वाजवणार आहे तेव्हा सदस्यांनी कृपया मला सहकार्य करावे. आता श्रीमती सुधा जोशी आपले विचार व्यक्त करतील.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना बाब क्र. 88 आणि 95 कडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. शासकीय इमारती,शासकीय निवासी इमारती आणि न्यायाधिशांची निवासस्थाने यांची स्वच्छता हा विषय या बाबीमध्ये अंतर्भूत आहे. यानिमित्ताने मला असे सांगावेसे वाटते की, विधानभवनाची जी इमारत आहे त्या इमारतीमधील स्वच्छतागृहांचे नूतनीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ...

मला खेदाने असे म्हणावेसे वाटते की, त्या ठिकाणच्या काही स्वच्छतागृहांना कडया नाहीत, काही स्वच्छतागृहांच्या टाईल्स अतिशय गलिच्छ आहेत तसेच काही ठिकाणी तुटलेल्या आहेत. काही स्वच्छतागृहामध्ये दिवे नाहीत. तेव्हा विधान भवनातील स्वच्छतागृहाच्या नुतनीकरणाचे काम तातडीने करण्यात यावे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदया, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत जे.जे. हॉस्पिटल,सेन्ट जॉर्जेस हॉस्पिटल किंवा इ.एस.आय.एस. रुग्णालयाची देखभाल केली जाते परंतु त्या इमारतीमधील पाण्याची टाकी गळते, तसेच तेथे ब-याच ठिकाणी दिवे नाहीत , तेथील फिटीग कुचकामी झालेली आहे, काही खिडक्यांच्या काचा फुटलेल्या आहेत अशा प्रकारे इमारतीची दुरवस्था झालेली आहे. तेव्हा तेथे जी सोय केलेली आहे तिला सोय म्हणावयाचे की नाही असा प्रश्न निर्माण होत असतो.या इमारतीच्या दुरुस्तीसाठी तसेच देखभालीसाठी बजेटमध्ये तरतूद केली नाही. तेव्हा या कामासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात यावी अशी मला या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे.त्याचबरोबर तेथील अधिकारी आणि कर्मचा-याच्या निवासस्थानासाठी ज्या इमारती आहेत त्या इमारतीचीसुध्दा अशीच अवस्था आहे तेव्हा त्या निवासस्थानाच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी विशेष तरतूद करुन ते काम लवकर पूर्ण करावे अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे. सभापती महोदया, यानंतर मला या चर्चेच्या निमित्ताने दुसरा एक मुद्दा मांडावयाचा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गेल्या अनेक वर्षापासून नोकर भरती केली गेलेली नाही .तेथे दहा पंधरा वर्षापासून रोजंदारीवर कर्मचारी काम करीत आहेत व कायम नोकरी मिळण्यापासून ते वंचित झालेले आहेत. तेव्हा त्या कर्मचा-यांना कायम नोकरीवर घेण्यात यावे अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदया, यानंतर बाब बाब क्रमांक 89 पान नंबर 70 संबंधी मला बोलावयाचे आहे.आमदार निवासामध्ये स्थायी व अस्थायी पदावर काही कर्मचारी काम करतात ही जी अंतर्गत व्यवस्था आहे ती समाधानकारक नाही. तेव्हा ही अंतर्गत व्यवस्था समाधानकारक का नाही याबाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, आमदार निवासामध्ये पुष्कळ कार्यकर्ते येत असतात. ते कार्यकर्ते तेथील पॅसेजमध्ये सकाळी 10.00 वाजेपर्यन्त झोपतात. हे सर्व कार्यकर्ते सकाळ पर्यन्त पॅसेजमध्ये धुटमळत असतात तेव्हा आमदार निवासामध्ये येणा-या कार्यकर्त्याच्या सोयीसाठी तेथे स्वतंत्र पेन्डॉलची व्यवस्था करावी तसेच त्यांच्याकरता स्वच्छतागृहाची व्यवस्था करावी ..

( वेळ संपत आल्याची बेल वाजविण्यात येते )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी..

सभापती महोदया, मला आणखी थोडा वेळ देण्यात यावा. आमदार निवासामध्ये येणा-या कार्यकर्त्यासाठी स्वतंत्र पेन्डॉलची व्यवस्था करावी तसेच स्वच्छतागृहाची व्यवस्था करावी.कार्यकर्त्याची व्यवस्था करणे हे जरी आमदारांचे काम असले तरी सुध्दा सर्व कार्यकर्ते पॅसेजमध्ये झोपतात आणि "आवो जावो घर तुम्हारा" अशी या आमदार निवासाची अवस्था झाली आहे.आज आमदार निवासावर कोणाचेही नियंत्रण नाही. या मंडळीने इतस्ततः वावरणे हे सावधगिरीच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तेव्हा याबाबत निश्चित विचार करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे

सभापती महोदया,.यानंतर मला बाब क्रमांक 54 आणि 55 पान नंबर 38 वर बोलावयाचे आहे. मुंबई शहरामध्ये भेसळयुक्त दूध येत असते.त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे राज्यातील एकूण दूधापैकी 30 ते 35 टक्के दूध हे भेसळयुक्त असल्याचे सरकारी यंत्रणांना आढळून आलेले आहे.ग्राहकांना देण्यात येणा-या दुधात अनेक प्रकारची भेसळ करण्यात येते त्याचबरोबर विदेशातून जी दुधाची पावडर येते त्यामध्ये सुध्दा भेसळ करण्यात येते. भेसळयुक्त दुधामुळे मती मंदता, हाडांचे व मणक्याचे आजार उद्भवण्याची भीती असते. याबाबतीत श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने दूध दर निश्चिती समिती नेमण्यात आली असून त्यांच्या माध्यमातून या संदर्भातसुध्दा अनेक शिफारशी शासनाला करण्यात येणार आहेत.भेसळयुक्त दूध समुद्रात फेकून देण्यात यावे तसेच तो अजामीनपात्र गुन्हा समजण्यात यावा अशा प्रकारच्या त्या शिफारशी असू शकतील. तेव्हा दुधातील भेसळ ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे त्याकडे शासनाने लक्ष द्यावे व सबंधिताविरुध्द कडक कारवाई करावी असे मला सांगावयाचे आहे ...

**(सभापती स्थानी माननीय उपसभापती )**

नतर श्री सुंबरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला 12 वाजता ही चर्चा संपवावयाची आहे आणि 12.45 पर्यंत मंत्र्यांची उत्तरे पूर्ण करून घ्यावयाची आहेत. तेव्हा सगळ्यांनीच वेळेच्या मर्यादेचे भान ठेवावे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, पृ.325, बाब क्रमांक 319 - केंद्र पुरस्कृत बाल न्याय कार्यक्रमाखाली शासकीय बाल संगोपन संस्थांना 50 टक्के आणि अशासकीय संघटना, संस्था यांना 45 टक्के सहाय्य देण्यात येते. या योजनेसाठी भारत सरकारकडून मिळलेल्या अनुदानावर संनियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्याचे आपण आता ठरविले आहे. पण हे अनुदान केव्हा पासून आपल्याला मिळते आहे आणि आतापर्यंत किती मिळाले आहे ? तसेच आताच या अनुदानावर संनियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कशासाठी पाहिजे याचा खुलासा व्हावा. तसेच संयुक्त राष्ट्रांकडून महिलांसाठी मिळणाऱ्या निधीतून महिलांसाठी केंद्रे चालविण्यात येतात. आता ही केंद्रे राज्य सरकारच्या निधीतून चालविण्याचे ठरविले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. परंतु संयुक्त राष्ट्रांकडून मदत मिळण्याचे बंद झालेले आहे काय याचाही खुलासा या निमित्ताने व्हावा.

सभापती महोदय, शेवटचा एकच मुद्दा मांडून माझे भाषण मी संपविणार आहे. संसदीय कार्यमंत्र्यांशी संबंधित ही बाब आहे, ती त्यांनी समजून घ्यावे. आपल्या सभागृहामध्ये दिलेली आश्वासने आणि त्यांची होणारी पूर्तता हा एक संशोधनाचा विषय झालेला आहे. कारण अनेक वर्षे ही आश्वासने पाळली गेलेली नाहीत त्यामुळे ही आश्वासने पाळली जावीत अशी मी या निमित्ताने विनंती करते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर भाषण करतील. ...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हा आमच्यावर अन्याय आहे. आम्ही गप्प राहतो, समजून घेतो म्हणून नेहमीच आमच्यावर अन्याय होतो आहे. आम्ही हे किती काळ सहन करावयाचे. .. या अगोदर आपण सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना संधी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मोते यांना संधी दिली म्हणजे त्यानंतर आता मला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे होती. पण आपण मला संधी न देता पुन्हा त्याच पक्षातील सदस्यांना संधी देत आहात ...आम्हालाही आता हे सहन होत नाही. ...

..... टी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, त्यांनी माझेही म्हणणे ऐकून घ्यावे. प्रथमत: आपण खाली बसावे. तुम्हाला सहन होत नाही आणि मलाही सांगता येत नाही अशी ही बाब आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी खाली बसूनच जी सूचना केली होती तीच मला योग्य वाटते आहे. म्हणजे जे सदस्य सकाळी 10.30 वाजता येथे उपस्थित होते त्यांनाच बोलण्यास संधी द्यावी अशी सूचना त्यांनी केली होती ती योग्यच होती. दुसरे असे की, शेवटी आपल्या युतीतील सहयोगी पक्ष सदस्यांनाच मी संधी दिली आहे, आपणही समजून घ्यावे. असो. आता मी सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर यांना भाषण करण्यास संधी दिली आहे. त्यांनी आपले भाषण सुरू करावे आणि वेळेची मर्यादा लक्षात घेऊन भाषण दोन मिनिटांमध्ये पूर्ण करावे.

....... टी 3 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पृ.319, बाब क्र.303 - शासकीय कला संस्थांना आपण 1996 पासून वेतन आयोग लागू केला आहे. परंतु अशासकीय कला संस्थांना येथे आपण 5,57,50,000 रुपयांची तरतूद केलेली आहे परंतु त्यांनाही आपण 1 एप्रिल 2004 पासूनहा आयोग लागू करणार आहात. त्यांच्यावर हा अन्यायच आपण केलेला आहे. त्यांना आपण हा आयोग लागू केला पण तोही उशिराने लागू केला आहे आणि शिवाय मागील थकबाकी देखील दिलेली नाही. त्यामुळे नाईलाजाने आता त्यांचेवर कोर्टामध्ये जाण्याची पाळी आलेली आहे. वाटल्यास, मागील थकबाकी आपण त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये तरी टाकावी. तसेच अधिक दोन स्तरावर जो अभ्यासक्रम आपण सुरू केलेला आहे त्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून 2004 पासून कालबद्ध पदोन्नती दिलेली आहे. त्यामुळेही सगळ्यांवर अन्याय झालेला आहे. आपण एकाचवेळी ही पदोन्नती सगळ्यांना दिलेली आहे. म्हणजे आता लागलेले आणि 1980 मध्ये लागलेल्या सगळ्यांनाच आपण एक न्याय लावलेला आहे त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे तो आपण लक्षात घ्यावा आणि दूर करावा.

त्यानंतर पृ. 322, बाब क्रमांक 316 - व्हीजेटीआय च्या 192 मुलींसाठी आपण वसतिगृहाची इमारत बांधत आहात. पण मग बाकीच्या 504 विद्यार्थिनींची देखील सोय होणे आवश्यक आहे. अर्थात तूर्तास या 192 मुलींची सोय झाली हेही नसे थोडके, उरलेल्या मुलींसाठी देखील लवकरात लौकर सोय केली जावी ही विनंती.

त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 108, 109, पृ.85 - अनुसूचित जाती वसतिगृहाचे बांधकामासाठी तरतूद आपण यामध्ये केलेली आहे. परंतु जी अस्तित्त्वात असलेली वसतिगृहे आहेत त्यांचीही अवस्था अत्यंत वाईट आहे. त्याच्याबद्दल देखील आपण विचार करावा. तेथील मुलांना आंदोलन करावे लागू नये एवढे तरी आपण लक्ष द्यावे.

त्यानंतर नियोजन विभागाची बाब क्रमांक 208, पृ.171 - नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रमासाठी 15 कोटी रुपयांची तरतूद आपण येथे केलेली आहे. पण जे काम करतात त्यांना समान न्याय दिला पाहिजे. केंद्र तसेच महाराष्ट्र शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या घरभाडे भत्त्यामध्ये वाढ केली आहे तशीच वाढ शिक्षकांसाठी सुद्ध आपण दिली पाहिजे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना अजूनपर्यंत आपण ही वाढ दिलेली नाही. त्यांनाही ही वाढ आपण द्यावी एवढीच विनंती करते आणि वेळे अभावी माझे भाषण मी आटोपते घेते. धन्यवाद.

**** (यानंतर श्री.जागडे ....यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MAP/ KGS/ 12:10

श्री. अरविंद सावंत ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी बाब क्र. 45 वर बोलत आहे. वन विभागाची ही मागणी आहे. या ठिकाणी 14 कोटी रुपयाची मागणी करण्यात आली आहे. याच विषयावर मी यापूर्वी बोलत असताना ज्यावेळी जंगलात वणवा लागतो, त्यावेळी एसओएसची सूचना केली होती. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय श्री. बबनराव पाचपुते यांनी कारवाईचे आश्वासन दिले होते. परंतु त्या बाबतीत कोणतीही प्रगती दिसून येत नाही. सभापती महोदय, दुसरी बाब अशी की, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून आज झाडे लावली जात आहेत. परंतु झाडांचे संवर्धन करण्याची जबाबदारी कोणावरही सोपविलेली नाही, त्यामुळे त्याचा काहीच फायदा होत नाही. वन खात्याचे एक महामंडळ आहे. त्या महामंडळामार्फत रोजगार हमी योजनेतून झाडे लावून घेतली जातात. परंतु या लावलेल्या झाडांचे संवर्धन होण्यासाठी निधीचा वापर करण्याची आवश्यकता आहे. तसेच त्याबाबत कोणावर तरी जबाबदारी टाकण्याची आवश्यकता आहे. ही जबाबदारी बेरोजगारांवर टाकावी. त्यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होईल.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र. 90 वर बोलणार आहे. रस्ते व पुलांच्या बांधकामासाठी तरतूद करण्यात आली आहे. आज मुंबईतील वांद्रे ते नरिमन पॉईंट, वांद्रे ते वरळी या सेतूंचे काम तसेच राहिले आहे. मालाड, किंग्जसर्कल, सायन, प्रियदर्शनी, विक्रोळी लिंक रोड, जोगेश्वरी तसेच महिंद्रा आणि महिंद्रा कंपनीसमोर उड्डान पुलाची अत्यंत आवश्यकता आहे. या कामासाठी या ठिकाणी तरतूद नाही. ती करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र. 144 वर बोलणारा आहे. नांदूर मध्यमेश्वर प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आली आहे. आता ही तरतूद एस्टॅब्लिशमेंटवर खर्च होईल, अशी भीती मला वाटत आहे. मी स्वत: या ठिकाणी जाऊन आलो आहे. मला या प्रकल्पाची माहिती आहे. तेव्हा या प्रकल्पाला पैसा कमी पडता कामा नये आणि तो प्रकल्पासाठीच खर्च व्हायला हवा. या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र. 173 वर मी माझे विचार मांडीत आहे. उर्जा खात्याची ही बाब आहे. आज आपण विद्युत मंडळाचे विभाजन करीत आहोत. मला या निमित्ताने प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे या ठिकाणी मांडावयाचे आहे. 514 प्रकल्पग्रस्तांना अजून नोक-या मिळालेल्या नाहीत. तेव्हा त्यांचे दायित्व कोणाकडे जाणार आहे ? याचा खुलासा माननीय उर्जा मंत्र्यांनी या ठिकाणी करावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र. 206 कडे सदनाचे लक्ष वेधीत आहे. रोजगार हमी योजना, जवाहर विहिरी कार्यक्रम आणि फलोत्पादनासाठी या ठिकाणी तरतूद करण्यात आली आहे. मला या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या वर्षात किती विहिरी जवाहर योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या आहेत ? व यासाठी किती तरतूद केली होती ?

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र. 212 वर बोलत आहे. आमदार / खासदारांच्या स्थानिक विकास निधीसाठी या ठिकाणी तरतूद करण्यात आली आहे. जून महिन्यापर्यन्त जेमतेम 13 लाख 34 हजार रुपये वितरीत करण्यात आले आणि अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उर्वरित निधी वितरीत करण्यात आला आहे. आता मुंबई शहरातील इमारत दुरुस्तीच्या कामासाठी हा निधी वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही, असा जी. आर. काढण्यात आला आहे. तेव्हा आमदारांनी हा निधी कोठे वापरावा ? म्हणून या बाबत योग्य तो खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र. 220 वर मी बोलत आहे. 100 खाटा असलेल्या जव्हार, जिल्हा ठाणे, येथील कुटीर रुग्णालयाकरिता पद निर्मिती करणे तसेच उपकरणांची खरेदी करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की. जव्हारपेक्षा मोखाडा तालुक्याकडे या सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. मोखाडा तालुक्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ठाणे जिल्ह्याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांना आहे. आज त्या ठिकाणी विजेचा पुरवठा होत नाही. त्या ठिकाणी ऑपरेशन थिएटर असतानाही काहीएक फायदा होत नाही. म्हणून याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी बाब क्र. 323 वर बोलत आहे. पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलस्त्रोत बळकट करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या बाबत मी कणकणवली तालुक्याती कुंभवडे या माझ्या गावाचे उदाहरण देईन. नदीच्या ऐलतिरावर पाण्याचा स्त्रोत असताना नदीच्या पैलतीरावर पाण्याची टाकी बांधली आहे. पूर्ण गाव ऐलतीरावर वसले आहे. पाणी पुरवठ्याची टाकी पैलतीरावर उंच माथ्यावर आहे. त्या ठिकाणी सिमेंटचा कोल्हापूर टाईप बंधारा बांधण्यात आला आहे. त्यात भरपूर गाळ साचला आहे. तो काढला जात नाही. कोल्हापूर टाईप बंधा-याची दुरुस्ती सुध्दा करण्याएत येत नाही. त्या ठिकाणी पूरक जलस्त्रोताची आवश्यकता आहे. मी या विभागातील

..3..



ASJ/ MAP/ KGS/ 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

अधिका-यांना पूरक जलस्त्रोताची माहिती दिली असताना ते कार्यवाही  करीत नाही. त्यामुळे एप्रिल आणि मे महिन्यात पिण्यासाठी पाणी मिळत नाही.  तेव्हा या बाबत योग्य तो विचार करण्याची गरज आहे. या निमित्ताने मला या बाबतची संपूर्ण माहिती मिळाली तर योग्य होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या पान क्रमांक 144 वरील बाब क्रमांक 170 व 171 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या मागणीमध्ये आपण 50 कोटी रुपये इतकी रक्कम वसूल होईल असे अंदाजित करण्यात आल्याचे म्हटले आहे. मुळात 100 कोटी रुपये मार्चपूर्वी जमा झाले आहेत. त्यामुळे 50 कोटी रुपये वसूल झालेले आहेत. आता जमा झालेल्या 100 कोटी रुपयांपैकी आपण अपारंपारिक ऊर्जेसाठी किती रक्कम वापरणार आहात हे मला आपल्याला विचारावयाचे आहे?

सभापती महोदय, सहकार विभागाच्या पान क्रमांक 304 वरील बाब क्रमांक 276 व 277 मध्ये रस्ते विकासासह पायाभूत विकासासाठी सहकारी साखर कारखान्यांना सहायक अनुदान याकरिता तरतूद करण्यात आली आहे. गेल्या दोन तीन महिन्यापासून वर्तमानपत्रामध्ये बातम्या छापून येत आहेत की, बऱ्याच साखर कारखान्यांना लिज नोटीस देण्याचे काम सुरु केले आहे. याबाबत मला सहकार विभागाला विचारावयाचे आहे की, ज्या साखर कारखान्यांना लिज नोटीस दिलेली आहे, त्या साखर कारखान्यांना बँकांनी कर्जे दिलेली आहेत त्यांची आपण पहिल्यांदा परवानगी घेतली आहे काय? याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा.

त्यानंतर पान क्रमांक 305 व बाब क्रमांक 278 मध्ये सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यातीसाठी 18 लक्ष 55 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या एक वर्षापासून साखरेची निर्यात झालेली नाही. या उलट मोठया प्रमाणावर आयात झाली आहे. तेव्हा कोणत्या कारखान्यांना निर्यातीचे पैसे द्यावयाचे आहेत याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच, ज्या 27 कारखान्यांच्या पायाभूत विकासासाठी आपण तरतूद केली आहे, ते 27 कारखाने कोणकोणते आहेत त्याची माहिती देण्यात यावी? त्याशिवाय इतर कारखान्यांच्या ठिकाणी आपण पायाभूत विकासासाठी कां तरतूद केली नाही याचाही खुलासा करावा अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय सभापतींनी 12 तारखेला पत्र सर्क्युलेट केले आहे, त्यानुसार 15 तारखेला आम्ही नोटीस दिलेली आहे. तेव्हा संबंधित विभागाच्या मंत्रिमहोदयांनी आपल्या भाषणामध्ये आमच्या नोटीशीला उत्तर दिले पाहिजे.

श्री. दिलीप वळसे पाटील : माननीय सदस्यांनी ज्या विभागाला नोटीस दिली आहे, त्या विभागाचे मंत्रिमहोदय त्याचे उत्तर देतील...

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील (ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व ऊर्जा या तीनही विभागांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये काही माननीय सदस्यांनी भाग घेतला. वेळेअभावी त्या माननीय सदस्यांच्या नावाचा मी उल्लेख करु शकत नाही. तसेच, ज्या माननीय सदस्यांची इच्छा असतांना देखील वेळेअभावी त्यांना आपले विचार मांडण्याची संधी प्राप्त झाली नाही. त्यांना ती संधी मिळाली असती तर त्यांच्या भाषणामधून मला थोडे मार्गदर्शन झाले असते व निर्णय घेण्याच्या बाबतीत मदत झाली असती. तरीसुध्दा त्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या 45 कोटी 32 लाख रुपयांच्या मागण्या सभागृहापुढे सादर करण्यात आल्या आहेत. त्यापैकी 29 कोटी योजनेंतर्गत आणि 15 कोटी योजनाबाहय तरतूद करण्यात आली आहे. पूरक मागणीमध्ये ज्या बाबीसंबंधी माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयीन प्रशिक्षणासाठी 2 कोटी 22 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**(सभापतीस्थानी मा.तालिका सभापती श्रीमती कांता नलावडे)**

सभापती महोदया, नव्याने सोलापूरला विद्यापीठ निर्माण केले आहे त्या निर्माण केलेल्या विद्यापिठाला पैसे उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. त्या ठिकाणी निधीच्या उपलब्धतेनुसार 2 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. अमरावतीला डॉ. श्रीकांत जिचकार स्मारक संशोधन केंद्र निर्माण करण्याची शासनाने घोषणा केली आहे. त्यासाठी पहिल्या टप्प्यामध्ये 50 लाख रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र स्थापन करण्यासाठी 50 लाख रुपये पुरवणी मागणीच्या रुपाने उपलब्ध करुन दिले आहेत. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची फी माफी करण्याचे सरकारने जाहीर केले होते. त्यासाठी गेल्या वर्षीच्या फीच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी 52 लाख रुपयांची रक्कम विद्यार्थ्यांना देण्यासाठी या पुरवणी मागणीव्दारे याठिकाणी मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदया, जपान सोशल डेव्हलपमेंट फंडाच्या माध्यमातून 3 कोटी 26 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या सर्व बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणण्यासाठी या ठिकाणी मागण्या करण्यात आलेल्या आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील . . . .

तसेच कलासंस्थांना अनुदानाच्या पोटी द्यावयाची रक्कम ब-याच दिवसापासून प्रलंबित होती. त्यासाठी 5 कोटी 57 लाख रुपयांची मागणी आज याठिकाणी मांडलेली आहे. शासकीय ग्रंथालया साठी अतिरिक्त परिरक्षण अनुदान द्यावयाचे होते, त्यासाठी 9 कोटी 30 लाख रुपये आणि सार्वजनिक ग्रंथालयांसाठी अतिरिक्त परिरक्षण अनुदानाकरता 40 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. आय.टी.आय.मध्ये साधनसामुग्री खरेदी करण्याकरता 6 कोटी 36 लाख रुपये, व्ही.जे.टी.आय.येथे मुलीचे वसतीगृह नाही, त्याअंतर्गत 2 कोटी 36 लाख रुपये विशेष अनुदान देण्याचे ठरविले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये यंत्रसामुग्री साठी 2 कोटी, आय.टी.आय. प्रशिक्षण संस्थांमध्ये साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी जवळपास 9 कोटी रुपयांची मागणी येथे मांडण्यात आलेली आहे. एक गोष्ट खरी आहे की, या सदनात ज्या ज्या मागण्या येतात, त्यासाठी आपण येथे तरतूद करतो. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेबांनी आंबेडकर थॉटच्या संदर्भात गेल्या अनेक वर्षापासून मागणी केली आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी याबाबतीत सभागृहात आपली भूमिका मांडली असली तरी आपल्याला वेळ कमी पडल्यामुळे ही मागणी आज सदनासमोर येऊ शकली नाही. पण सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेब तुम्हाला आणि तुमच्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज या तिघांचे साहित्य प्रकाशित करण्याच्या संदर्भात ज्या वेगवेगळया तीन कमिटया नेमल्या होत्या, त्या एकत्रित करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे आणि या तीनही कमिटयांच्या माध्यमातून महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराज या तिघांचे साहित्य प्रकाशित करण्याच्या संदर्भात एक योजना आखली जात आहे. जसे तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य ज्ञान महामंडळ स्थापन केले. आज त्याचा टर्न ओव्हर 60 कोटीपर्यंत गेला आहे आणि नजिकच्या काळात तो 100 कोटीपर्यंत जाईल. तसेच बांद्रा येथील जागेमध्ये सेंट्रल लायब्ररीच्या धर्तीवर एक लायब्ररी तयार करण्याचे ठरविले आहे. ती तयार केल्यानंतर तेथे महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज या तिघांचे साहित्य आणि त्यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी एक योजना हाती घेतली आहे आणि माझी खात्री आहे की, या माध्यमातून आपण त्यांचा सामाजिक प्रगतीचा विचार पुढे घेऊन जाण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करणार आहोत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इंफरमेशन आहे. मी माननीय

. . . .डब्ल्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी जी प्रकाशन समिती आहे . . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, त्या तीनही समित्या एकत्रित केल्या आहेत. आपणही त्यातील एका कमिटीचे सभासद आहात.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात ज्या मागण्या मांडण्यात आल्या आहेत. वैद्यकीय कॉलेजांच्या शुल्काच्या बाबतीत सांगावयाचे तर दोन वर्षे फी मध्ये वाढ झाल्यामुळे गरीब मुलांना शिक्षण घेता येईल की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा शासनाने असा निर्णय घेतला.एस.सी.,एस.टी.मधील विद्यार्थी असतील किंवा व्ही.जे.एन.टी.मधील एक, दोन, तीन मधील विद्यार्थी असतील, यांना संपूर्ण फी आणि ओ.बी.सी.मधील आणि ओपन मध्ये मेरिटमध्ये आलेल्या पहिल्या 10 विद्यार्थ्यांना फी देण्याच्या बाबतीत शासनाने भूमिका घेतली होती.पण गेल्या दोन वर्षात हा निधी उपलब्ध करुन देता आला नव्हता. यासाठी 10.79 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. पुण्याला ससून हॉस्पीटलमध्ये इम्फोसेस या संस्थेने अद्ययावत हॉस्पीटल बांधून दिलेले आहे. तेथे विशेष उपचारासाठी  वर्ग 3 व वर्ग 4 ची पदे निर्माण करण्यासाठी 84 लाख रुपये आणि जिल्हा योजनेअंतर्गत साधन सामुग्रीसाठी 2 कोटी 52 लाख रुपये  आणि मराठवाडा विकास पॅकेजच्या अंतर्गत यंत्रसामुग्रीसाठी आणि बाकीच्या कामांसाठी 2 कोटी 63 लाख रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. लातूर येथील मेडिकल कॉलेजसाठी वसतीगृह आणि बाकीच्या कामांसाठी 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तेथे 500 बेडचे हॉस्पीटल असून यामध्ये वेगवगळे आयटम आहेत. केवळ लातूरपुरता प्रश्न नाही तर महाराष्ट्रात जी नवीन हॉस्पीटल निर्माण केली आहेत, त्या सर्व हॉस्पीटलसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, शेवटी ऊर्जा विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात सांगावयाचे आहे. राज्य शासनाने शेतक-यांना विजेच्या बाबतीत सवलती देण्याच्या संदर्भात जे निर्णय घेतले होते, त्याच्या पोटी एम.एस.ई.बी.ला 1571 कोटी आणि मुळा-प्रवरा सोसायटीला 39 कोटी असे 1610 कोटी रुपये देणे बाकी होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

त्यापैकी 713 कोटी रुपयाची तरतूद आपण मागच्या बजेटमध्ये केलेली होती, उर्वरित 897 कोटीची तरतूद यावेळी पुरवणी मागण्यांमध्ये केलेली आहे. विद्युत मंडळाची पुनर्रचना केलेली आहे, त्या पुनर्रचनेसाठी कंपनीला भागभांडवल देण्यासाठी आपण तरतूद केलेली आहे. मराठवाडा पॅकेजच्या अंतर्गत मराठवाड्यातील कृषी पंपांचा अनुशेष काढण्यासाठी 35 कोटी रुपयाच्या तरतुदीची मागणी केलेली आहे. जिल्हा स्तरावरुन आलेला हा पैसा आहे. सभागृहाला मला सांगितले पाहिजे की,या महाराष्ट्रातील कृषी पंपांचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीकोनातून आपण मार्चमध्ये जो अर्थसंकल्प मांडला, त्यामध्ये 335 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. माझी खात्री आहे की, या सगळया मागण्यांच्या संदर्भाने सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. एका गोष्टीचा खुलासा करण्याचे राहिलेला आहे. जे.जे. रुग्णालयामधील स्टॅन्टच्या संदर्भातील विषय चर्चिला गेला. या सभागृहाला मी एवढेच सांगू इच्छितो की, या संदर्भामधील खालच्या सभागृहामध्ये उपस्थित झालेला प्रश्न राखून ठेवलेला आहे. याबाबत विभागामध्ये विचारविमिनय सुरु आहे. फक्त जे.जे.रुग्णालयच नाही तर कोणत्याही रुग्णालयामधील मानवी जीवनाशी खेळणाऱ्या कोणत्याही डॉक्टरांना, अधिकाऱ्यांना स्पेअर केले जाणार नाही. जे.जे. रुग्णालयाव्यतिरिक्त सरकारी मालकीची जेवढी रुग्णालये असतील त्या सर्व रुग्णालयामध्येही या संबंधाने चौकशी केली जाईल. चौकशीमध्ये अशाप्रकारच्या अनियमितता कोठे आढळून आल्या तर मग फौजदारी स्वरुपाचे गुन्हे असू दे किंवा आणखी कोणत्या कायद्याखाली कारवाई करावयाची असेल तर त्या संदर्भातील कारवाई करण्याच्या संदर्भात निश्चित प्रकारे निर्णय करणार आहोत आवश्यकता वाटली तर उच्च स्तरिय समिती नेमण्याच्या संदर्भात खालच्या सभागृहात चर्चा झाली. निर्णय पूर्ण झालेला नसल्यामुळे मी आज या ठिकाणी अनाऊन्मेंट करत नाही. परंतु याबाबतीत कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे मी सांगतो आणि सभागृहाने माझ्या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो. सन्माननीय सदस्यांनी काही वैयक्तिक प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्या सर्व सन्माननीय सदस्यांना त्याची उत्तरे लेखी स्वरुपात पाठविण्यात येतील.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KGS/ MAP/ MHM/

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन, महिला व बालकल्याण मंत्री) : सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्या मांडत असताना, पणन विभाग, रोजगार हमी योजना विभाग आणि महिला व बाल विकास विभागाच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात चर्चा करत असतांना, सन्माननीय विरोधी पक्षनेते फुंडकर साहेबांनी आपल्या भाषणामध्ये काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मी सुरुवातीलाच सभागृहाला ग्वाही देऊ इच्छितो की, अनेकवेळा या सभागृहामध्ये कापसाचे पेमेंट देण्याच्या संदर्भातील चर्चा झाली. या पुरवणी मागण्यामध्ये 989.80 कोटी रुपयाची तरतूद शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाचे पैसे देण्याकरिता म्हणून प्रस्तावित केलेली आहे. सभागृहात या संदर्भात निवेदन करा, म्हणून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता. यामध्ये 535 कोटी रुपयाच्या पहिल्या हप्त्याच्या ॲग्रीमेंचे वाटप राज्यामध्ये सुरु झालेले आहे. त्यातील जवळपास 272 कोटी रुपयाचे आजच्या तारखेला शेतकऱ्यांना अदा केलेले आहेत. राहिलेल्या पाच-सहा दिवसामध्ये हे 535 कोटी रुपयाच्या अग्रीमचे वाटप केले जाईल अशाप्रकारची व्यवस्था देखील केलेली आहे. अग्रीम दोन हा ऑक्टोबरमध्ये देणार आहोत, त्याकरिता लागणारी तरतूद आपण पुरवणी मागण्यांमध्ये प्रस्तावित केलेली आहे. सभागृहाने ही मागणी मान्य केल्यानंतर साधरणत: ऑक्टोबर महिन्याच्या अगोदर ही रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येईल, अशाप्रकारची व्यवस्था झालेली आहे. या वर्षी कापूस एकाधिकार खरेदी योजनेमध्ये विक्रमी कापसाची खरेदी केलेली आहे. राज्यामध्ये 212 लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. या वर्षाचे कापसाचे धोरण केंद्र सरकारने ठरवून दिलेला आहे, त्या हमी भावाप्रमाणे राबविण्याचा राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न केलेला आहे. हे सांगत असतांना सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणामध्ये सरकारवर आरोप केलेले आहेत. ते भाषण करीत असतांना मी खालच्या सभागृहामध्ये होतो. त्यांनी काल केलेल्या भाषणाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी पाच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी पाच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्या मुद्यांच्या संदर्भात खुलासा करणे ही माझी जबाबदारी आहे. विभागाचा प्रमुख म्हणून कारभार करत असतांना निश्चितपणे मी जबाबदारीने विधान करतो. या वर्षी कापसाची विक्रमी खरेदी झालेली आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM// प्रथम श्री. किल्लेदार..... 12:30
श्री. हर्षवर्धन पाटील....

यामध्ये राज्य सरकारने,मोठया प्रमाणात, जेथे जेथे काटकसर करता येईल, तेथे तेथे करण्याचा प्रयत्न केला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनीसुध्दा एकेकाळी या कॉटन फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून तीन वर्षे कामकाज पाहिलेले आहे. त्यांचा पहिला आरोप होता तो यवतमाळच्या सरकीच्या संदर्भातील आणि हे जे प्रकरण आहे, त्यासंदर्भात या सभागृहात एक लक्षवेधी सूचना दाखल झालेली आहे. याबाबतीत नागपूर उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली होती. काही अधिका-यांनी 50 रुपये किलो या प्रमाणे सरकी विकली अशा प्रकारचे आरोप याठिकाणी झालेत. सदनाच्याबाहेरसुध्दा याबाबतीत आरोप झाला की, पाच ते सहा कोटी रुपयांचा यामध्ये भ्रष्टाचार झाला. वास्तविक पाहता त्या सरकीची किंमत तीन ते साडेतीन कोटी रुपये आहे. म्हणून शासनाने याबाबीची संपूर्णपणे चौकशी केली. त्यामध्ये काही दोषी अधिकारी सापडले. त्यांना शासनाने निलंबित केलेले आहे. यासंबंधीचे प्रकरण उच्च न्यायालयात गेले होते. उच्च न्यायालयाने यासंबंधात काही आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे निश्चतपणाने कारवाई करण्यात येईल. श्री. फुंडकरसाहेबांनी दुसरा महत्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला तो गाठींच्या विक्री बाबत,त्या गाठी विक्रीमधील चार-पाच कंपन्यांची नांवे त्यांनी याठिकाणी सांगितली. ती नांवेसुध्दा रेकॉर्डवर आहे. या निमित्ताने मला सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, हा गाठी विक्रीचा कारभार, सरकी विक्रीच्या ंसदर्भातील व्यवस्था आहे. श्री. रावतेसाहेबांना या प्रकरणासंबंधीची सगळी माहिती आहे.पूर्णपणे ट्रान्सफरन्सी ठेवण्याची आम्ही पध्दत पाळलेली आहे. याबाबतीत आपल्याकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती मला उपलब्ध करुन द्यावी. त्या सगळया प्रकरणांची चौकशी करण्याची माझी तयारी आहे. कोणालाही आम्ही पाठिशी घालणार नाही. मात्र सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक सेल निर्माण केलेला आणि दर आठवडयाला, दर सोमवारी आपण काही रेट्स ठरवितो. इंटरनेटवर त्यासंदर्भातील सिस्टिम ठरवून घेतलेली आहे. त्यामध्ये फक्त सचिवच नाहीत, तर चार-पाच अधिका-यांची ती समिती गठित केली आहे. यापूर्वी मंत्री त्या सेलचे अध्यक्ष होते. कदाचित मंत्र्यांवर हा आक्षेप होऊ शकतो म्हणून आम्ही असे सांगितले की, विक्रीच्या संदर्भात कुठल्याही समितीचा अध्यक्ष हा त्या खात्याचा मंत्री असता कामा नये.त्या समितीमध्ये फक्त एका खात्याचे सचिव नाहीत. त्याच्यामध्ये एम.डी. आहेत. जॉईन्ट एम.डी.आहेत. जनरल मॅनेजर आहेत.

..2..



SMT/ SBT/ MHM// प्रथम श्री. किल्लेदार..... 12:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

ही जी समिती गठित केलेली आहे. ती समिती इंटरनेटवर रेट्स मागवते. इंटरनेटच्या माध्यमातून एक वेबसाईट तयार केलेली आहे. ओपन लिलावपध्दतीने विक्री आपण सुरु करीत आहोत. मा. विरोधी पक्ष नेत्यांनी जो आरोप केला होता, त्यासंदर्भात माझ्याकडे दोन परिपत्रके आहेत. शासनाने पहिल्यांदा दिनांक 27.6.2005 ला एक परिपत्रक काढले होते. त्या पारीपत्रकामध्ये साधारणत: 2000 ते 5000 जे कोणी गाठी घेतील त्यांना 100 रुपये डिस्काऊंट देऊ. 5000 ते 10000 पर्यंत जे कोणी गाठी घेतील, त्यांना साधारणत: 200 रुपये डिस्काऊंट देऊ. 10000 ते 50000 पर्यंत जे गाठी घेतली त्यांना 300 रुपये डिकसऊंट देऊ. आणि 50000 च्या वर जे गाठी घेतील त्यांना 400 रुपये पर गाठी डिस्काऊंट देऊ, अशा प्रकारची एक पॉलिसी शासनाने फ्रेमआऊट केली. त्यानंतर ते पेपरआऊट केले. इंन्टरनेटच्या माध्यमातून ते उपलब्ध करुन दिले. त्यानंतर काही टेंडर्स आले. पण त्यामध्ये याला जास्त रिस्पॉन्स मिळाला नाही. यामध्ये फक्त 1.49 लक्ष एवढयाच गाठी विक्री झाल्या. त्याचा उल्लेख आपण या ठिकाणी केलेला आहे.त्यानंतर शासनाने दिनांक 15.07.2005 ला दुसरे एक परिपत्रक काढले. यामध्ये हा डिस्काऊंटचा विषय रद्द केला. कारण डिस्काऊंट देऊनही कोणी रिस्पॉन्स दिला नाही. त्यमुळे 200 रुपयापासून 400 रुपयापर्यंत गाठीचे रेट कमी करण्याचा शासनाने पुन्हा असा निर्णय घेतला. कारण आज 44 लाख गाठी शासनाकडे उपलब्ध आहेत. त्याची कॉस्ट काढली तर 4000 पेक्षाही अधिक किंमतीचा माल शासनाकडे शिल्लक आहे.ही सिस्टिम पूर्णपणे ट्रान्स्फरन्सी असलेली केलेली आहे. यामध्ये कोणालाही फेव्हर करण्याकरिता किंवा कुठल्यातरी कंपनीला डोळयासमोर ठेवून हे रेट शासनाने घोषित केलेले नाहीत. म्हणून या संदर्भात जर सन्माननीय सदस्यांच्या मनात काही शंका असतील तर त्या शंकांचे पूर्णपणाने निरसन करण्याची माझी पूर्णपणे तयारी आहे. ॲरेंजरच्या बाबतीत या ठिकाणी एक आरोप करण्यात आला. सभापती महोदया, मी जबाबदारीने सांगतो, साडे अकरा, बारा टक्क्याने हया कॉटन फेडरशेनला आज पर्यंत कर्ज घ्यावे लागत होते. दोन-दोन/तीन-तीन हजार कोटीचे बारा टक्के ते तेरा टक्के व्याजाने शासनाच्या गॅरन्टीच्या माध्यमातून आपण घेत होतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

हजारो कोटी रुपयांचे व्याज राज्य सरकारला भरावे लागत होते. पहिल्यांदा ओपन मार्केटमधून पैसे उभे करण्याचा धाडसी निर्णय घेतला. 7.25 टक्के एवढया दराने आज आपल्याला एक हजार कोटी रुपये उपलब्ध झाले. राज्य सरकारची फक्त व्याजाची जवळपास 100 कोटी रुपयांपेक्षा अधिकची रक्कम वाचलेली आहे. 62 लाख रुपये एवढी रक्कम अरेंजरला देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. 0.19 टक्के एवढी फी अरेंजरला देण्याचा निर्णय केला. आपण यामध्ये इस्टॅब्लिशमेंटचा खर्च कमी करण्याच्या संदर्भात निर्णय घेतला. माननीय विरोधी पक्ष नेते हे पणन महासंघाचे अध्यक्ष होते. आपल्या काळात इस्टॅब्लिशमेंटवर 100 कोटी रुपयांपर्यन्त खर्च होत होता.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय माझ्यावर आरोप करीत आहेत...

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर हे या महासंघाचे अध्यक्ष असताना त्यांनी पाचवा वेतन आयोग देण्याचा निर्णय घेतला. वास्तविक पाहता शासनाची मान्यता न घेता तो निर्णय घेतला. पाचवा वेतन आयोग देत असताना माझ्या मनात वेगळी शंका नाही. मग आम्ही असे म्हणावयाचे काय की, ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय पणन मंत्र्यांनी असे सांगितले की, तुमच्या काळात इस्टॅब्लिशमेंटचा खर्च जास्त होता. मागच्या पाच वर्षात आपण इस्टॅब्लिशमेंटसाठी किती खर्च केला आणि युतीचा काळात किती खर्च झाला ही माहिती आपण सभागृहाच्या पटलावर ठेवली पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांनी पाचव्या वेतन आयोगासंबंधी दुसरा आरोप केला. पाचवा वेतन आयोग आमच्या काळात लागू केला ही गोष्ट खरी आहे....

श्री. हर्षवर्धन पाटील : मी आरोप केलेला नाही. मी माहिती सांगत होतो. सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्ष नेते पणन महासंघाचे अध्यक्ष होते आणि त्यांना सगळया व्यवहाराची माहिती आहे. त्यांनी चांगले काम केले. त्यांनी पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला. मी आरोप केलेला नाही. यांनी पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला परंतु त्याला शासनाची मान्यता नव्हती. त्यामुळे रिकव्हरी करण्याचे आदेश झाले होते. मी पणन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. हर्षवर्धन पाटील .....

मंत्री झाल्यानंतर माझ्यापर्यन्त ती फाईल आली. मी विचारले की, अशा पध्दतीने निर्णय कोणी घेतला ? मी आपल्याला बोललो नाही. मी आपल्यावर आरोप केलेला नाही. मी फक्त माहितीकरिता सांगितले. आपण जे मुद्दे उपस्थित केले होते त्यांचा खुलासा या माध्यमातून करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, ...

**तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे)** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छिते की, आपल्याला या मागण्यांवरील चर्चा 12.45 वाजता संपवावयाची आहे तसेच आणखी बऱ्याच मंत्रिमहोदयांना उत्तर द्यावयाचे आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, पणन मंत्रिमहोदयांना अधिक माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. त्यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे. त्यांचे लेखी भाषण माझ्याकडे आहे. जर आपल्याकडे काही माहिती उपलब्ध असेल तर पणन मंत्री म्हणून त्यांची चौकशी करण्यास माझी तयारी आहे. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या बाबतीत पणन विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो. सभापती महोदया, रोजगार हमी योजनेच्या बाबतीत या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केले गेले. त्या सर्व प्रश्नांचा खुलासा मी करु इच्छित नाही. रोजगार हमी योजना विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्या अशी मी विनंती करतो. सभापती महोदया, महिला व बालविकास विभागाच्या संदर्भातील मागण्या सुध्दा सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो. कापसाचे पैसे देण्याकरिता 989 कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये केलेली आहे. यामध्ये अडचण राहिलेली नाही. थोडाफार उशीर झालेला आहे पण याबाबतीत निश्चितपणे पुढच्या काळामध्ये शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर दिले जातील अशी ग्वाही देतो. यासंदर्भातील मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, मी फक्त एकच प्रश्न विचारतो. 62 लाख रुपयांच्या ब्रोकरेजचा प्रश्न आहे. माननीय पणन मंत्र्यांनी चौकशीची तयारी ठेवली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. गाठी विक्रीच्या प्रकरणामध्ये 27 जूनची प्राईस लिस्ट आल्यानंतर त्या ठिकाणी दीड लाख गाठी विकल्या गेल्या त्याची चौकशी करण्याचे त्यांनी मान्य केले. मी त्याची माहिती

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

देण्यास तयार आहे. 300 कोटी रुपयांचे कर्ज घेतले. त्यामध्ये 62 लाख रुपये अरेंजर्सची फी म्हणून दिली. हे पैसे देत असताना पणन महासंघाने प्रस्ताव केला नव्हता. तुमच्याकडे पाच टेंडर्स आली होती. त्यापैकी चार्टर्ड फायनान्शिअल कॉर्पोरेशनलाच आपण हे का दिले ? बाकीच्या लोकांची 19 पैशामध्ये देण्याची तयारी होती. अरेंजर्स फी न देता हे पैसे आपल्याला उपलब्ध होऊ शकले नसते काय ? युतीच्या काळात आम्ही अशा प्रकारे 3 हजार कोटी रुपये मार्केटमधून उपलब्ध केले होते. त्यावेळी एक नया पैसा सुध्दा अरेंजर्स फी दिलेली नव्हती.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

त्यावेळी राज्य सहकारी बँकेचा व्याज दर हाच होता आणि इतर बँकांचा सुध्दा हाच दर होता. पणन महासंघाला माहीत नसताना निर्णय घेण्यात आला. त्यांची कार्योत्तर मंजुरी घेतली पण अगोदर निर्णय घेतल्यामुळे पणन महासंघाला निर्णय घ्यावा लागला हे का घडले ते विचारले होते.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, हे सर्व प्रस्ताव पणन महासंघाकडून शासनाला प्राप्त झाले होते. त्यामध्ये अरेंजर्सकडून प्रस्ताव आला होता. सुरुवातीला पहिल्या 10 दिवसामध्ये कोणीही टेंडर भरले नव्हते. नंतर 5 टेंडर्स आल्यानंतर प्रीक्वालीफाय करण्यात आले. त्याच्यानंतर निगोशिएशन करण्यात आले. याबाबतचा निर्णय मुख्य सचिवांकडे झाला. मी युतीच्या काळामध्येही राज्यमंत्री होतो. त्यावेळी 15 टक्के व्याज दर होता आणि 7.25 टक्के दराने ही रक्कम घेतलेली आहे. त्यामुळे व्याजदरामध्ये शासनाचा फायदाच करुन घेतला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्याकडे पणन महासंघाचे पत्र आहे. पणन महासंघाकडूनच प्रस्ताव आले होते असे मंत्रिमहोदयांनी म्हटले आहे. सभागृहामध्ये चुकीची नोंद होऊ नये म्हणून सांगत आहे. पणन महासंघाकडून प्रस्ताव गेलेले नव्हते. यामध्ये असे म्हटले आहे की, "तथापि, पण महासंघाने दिनांक 21.4.2005 रोजी बँक ऑफ इंडियाला अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव पाठविला नव्हता. अरेंजर्समार्फत प्रस्ताव गेलेला आहे असे गृहित धरले, चार्टर्ड फायनांस बँक यांना सुध्दा मँडेट दिनांक 26.4.2005 ला दिले होते. यासंबंधी वस्तुस्थिती काय आहे हे शासनाला माहीत असेल असे म्हटले आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल न करता सत्य माहिती काय आहे ते सांगावे नाही तर सर्व प्रकरणाची चौकशी करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या ज्या काही शंका असतील त्या कार्यालयामध्ये बसून दूर करण्याचा माझा प्रयत्न राहील. यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. यामध्ये संपूर्ण पारदर्शक व्यवहार केलेला आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे चौकशी करणार आहे, माझी तयारी आहे, यामध्ये काही अडचण नाही एवढेच मी सांगू इच्छितो.

-------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री ) : सभापती महोदया, सन 2005-06 या वर्षाकरिता या अधिवेशनामध्ये एकूण 56 पूरक मागण्या सादर करण्यात आल्या असून त्यांची 327 कोटी 30 लाख 51 हजार इतकी किंमत आहे. या मागण्यांवर बोलत असताना अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले, काही मा.सदस्यांनी चांगली कामे झाल्याबद्दल शासनाला धन्यवादही दिले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी प्रलंबित देयकांबद्दल सांगितले आहे. हे खरे आहे की, थोडासा विलंब झालेला आहे परंतु हे पैसे ताबडतोब देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासंबंधी 26 मागण्या केल्या आहेत. प्रलंबित देयकांसाठी 87 कोटी 25 लाख 88 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दीपक सावंत यांनी सागरी मार्गाबाबतचा प्रश्न विचारला होता. मार्चच्या बजेटमध्ये यासाठी सर्व निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयाला पूरक ठरणारे रस्ते सुधारण्यात येत आहेत. मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी देखील हा मुद्दा उपस्थित केल्यामुळे त्यांना सुध्दा हेच उत्तर आहे की, मार्चच्या बजेटमध्ये सागरी मार्गासाठी 104 कोटी 18 लाखाच्या अंदाजित किंमतीच्या कामापैकी 55 कोटी 29 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. आगवण, दापोली, दांडा व काजीरभाटी पूलाच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी काही पनवेल-महाड या मार्गाचे चौपदरीकरण करावे असा मुद्दा मांडला होता. NHAI मार्फत हे काम प्रगतीपथावर आहे, यासंबंधी चौकशी करुन पाठपुरावा करण्यात येत आहे. हे काम लवकर सुरु करण्यात येईल असे वाटते. केंद्र सरकारशी संबंधित हे काम असल्यामुळे सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. रस्ते दुरुस्तीचा निधी हा पर्जन्यमान, वाहतुकीची वर्दळ, काळया मातीचे रस्ते, घाट रस्ते या सर्व बाबींचा विचार करुन निश्चित करण्यात येतो एवढेच मी त्यांना सांगेन.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

(श्री. छगन भुजबळ पुढे सुरु...)

या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत ज्या ज्या मा.सदस्यांनी आपली मते मांडलेली आहेत त्या त्यांच्या मतांचा आदर करुन त्यानुषंगाने निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : मा. मंत्री महोदयांनी सार्वजनिक उपक्रमासंबंधी उत्तर दिले नाही.

श्री. छगन भुजबळ : मा.सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांच्या मतांचाही विचार करुन त्यासंदर्भात निश्चितपणे पाठपुरावा करण्यात येईल आणि त्याबाबतची माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण मंत्री) : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये मा.सदस्य डॉ. दीपक सावंत, मा.सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे, मा.सदस्य श्री. रमेश निकोसे आणि मा.सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी भाग घेऊन आपले विचार मांडलेले आहेत. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. याठिकाणी जव्हारचा उल्लेख करण्यात आला. त्याठिकाणी 94 नवीन पदे मंजूर झालेली आहेत. प्राथमिक आरोग्य केन्द्राचा उल्लेख याठिकाणी करण्यात आला. एकूण 1812 प्राथमिक आरोग्य केन्द्र आहेत. 1991च्या जनगणनेनुसार प्राथमिक आरोग्य केन्द्राचा बॅकलॉग शिल्लक नाही. उपकेन्द्रांचा बॅकलॉग होता. परंतु मागील वर्षी 727 उपकेन्द्रे मंजूर करण्यात आल्यामुळे उपकेन्द्रांचा बॅकलॉग देखील शिल्लक नाही. राज्यामध्ये 363च्या आसपास ग्रामीण रुग्णालये आहेत. या ग्रामीण रुग्णालयांच्या बाबतीत देखील अनुशेष राहाता कामा नये अशी भूमिका शासनाने घेतलेली आहे. जसे नॅशनल रुरल हेल्थ मिशन आहे त्याप्रमाणे राज्यामध्ये आयुर्वेदिक दवाखाने असले पाहिजेत असा मुद्दा याठिकाणी मांडण्यात आला. मी सांगू इच्छिते की, आयुर्वेदिक दवाखान्यांचा देखील अंतर्भाव आम्ही केलेला आहे. आदिवासी भागामध्ये कुपोषण होता कामा नये, बालमृत्यू होता कामा नयेत, इन्स्टीटयूशनल डिलिव्हरी वाढली पाहिजे, यासर्वदृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. छोट्या मोठ्या शस्त्रक्रियांसाठी लागणारी साधनसामग्री खरेदी करण्यासाठी 3 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. वेळेअभावी मला सर्वच मुद्यांना उत्तरे देता येत नाही. तेव्हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपविते.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : वन विभागाच्या पुरवणी मागणी क्रमांक 7 आणि 8वर मा.सदस्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत. साधारणत: 12व्या वित्त आयोगाकडून निधी मिळणार आहे. 14-14 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील वनसंरक्षणाच्या कामाला बळकटी देण्यासाठी हे पैसे आहेत. ज्या पध्दतीने हे पैसे देण्यात आलेले आहेत त्याच पध्दतीने ते खर्च करण्यात येणार आहेत. मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डोंगर-जमिनींचा उल्लेख केला. या प्रकरणी मी स्वत: दिल्लीला जाऊन आलो आहे. वकिलांशी देखील या प्रकरणी चर्चा झालेली आहे. पुन्हा ॲफिडेव्हिट दाखल करण्याच्या संदर्भात मिटींग होणार असून त्यामध्ये हे क्षेत्र कमी करण्यासाठी आम्ही पुढाकार घेणार आहोत. तेव्हा वन विभागाच्या मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जा मंत्री) : अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या सुमारे 50 कोटीच्या पुरवणी मागण्या सभागृहामध्ये चर्चेला आल्या. महाराष्ट्रामध्ये हा नव्याने सुरु झालेला विभाग आहे. महाराष्ट्रातील विजेची परिस्थिती लक्षात घेऊन तसेच ग्रामीण महाराष्ट्राला वीज निर्मितीद्वारे बळकटी देण्याचा प्रयत्न करण्यासाठी महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच ग्रीन सेस फंडातून 50 कोटी रु.ची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये दर्शविलेली आहे. या विभागाच्या मागण्यांवर मा.सदस्यांनी चर्चा केली नाही. मा.सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी मात्र काही शंका उपस्थित केल्या. या सभागृहामध्ये यासंबंधी बिल मंजूर होत असताना या विभागामध्ये काही नवीन घडावे अशा प्रकारचे विचार आम्ही संगळयांसमोर मांडलेले आहेत. तेव्हा या अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 12:50

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा,लाभक्षेत्र विकास,वित्त व नियोजन,संसदीय कार्य राज्यमंत्री): सभापती महोदया, नियोजन विभागाच्या एकूण 771 कोटी 15 लाख 52 हजार रुपयांच्या मागण्या मांडण्यात आल्या आहेत त्यात रोजगार हमी योजनेच्या 418 कोटी रुपयांच्या पूरक मागण्या समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. वित्त विभागाच्या 10 कोटी 99 लाख 14 हजार रुपये, जलसंपदा विभागाच्या टोटल 575 कोटी 73 लाख 97 हजार आणि पाणीपुरवठा विभाग या सर्व विभागांच्या पुरवण्या मागण्या सभागृहासमोर मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत. या विभागांच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. नांदेड येथे गुरु-दा-गद्दी त्रिशताब्दी सोहळा कार्यक्रमासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 817 कोटी रुपयांची ही योजना आहे. शिख धर्माचे धर्मगुरुंची गादीची स्थापना 1708 साली झालेली आहे. या गादीच्या प्रतिष्ठापनेस 300 वर्षे होत आहेत. गुरुव्दाराच्या विकासासाठी 210 कोटी रुपये, शहर पायाभूत योजनेसाठी 392 कोटी आणि टँक विकासासाठी 215 कोटी अशी एकूण 817 कोटी रुपयांची ही योजना आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाने 492 कोटी रुपये देण्याचे कबूल केलेले आहे. राज्य शासनाचा 232 कोटी रुपयांचा वाटा आहे. इतर खाजगी संस्थांकडून 92 कोटी मिळणार आहेत. असा एकंदर 817 कोटी रुपयांचा या योजनेचा आराखडा आहे. या योजनेस आपण टोकन प्रोव्हीजन केलेली आहे. नक्षलग्रस्त भागाचा विकासासाठी आतापर्यन्त 268 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. हा खर्च पाच नक्षलवादी जिल्हयामध्ये खर्च केलेला आहे. नक्षलग्रस्त भागाच्या विकासामध्ये कोणकोणती कामे हाती घेण्यात येतात अशा प्रकारचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला आहे. नक्षलग्रस्त भागाचा विकासामध्ये कोणकोणती कामे घेण्यात येतात यासंबंधीचा शासनाचा जी.आर.आहे तो मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी कोकणाच्या विकासासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला. त्याबाबतची देखील माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. मी सभागृहाला विनंती करतो की, वित्त, नियोजन, जलसंपदा,पाणीपुरवठा विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी ( राज्य मंत्री-अन्न व नागरी पुरवठा विभाग ):सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री सरपोतदार जी एवं सम्माननीय सदस्य श्री जयंत पाटील ने अन्न व नागरी पुरवठा विभाग के अन्तर्गत चर्चा के दौरान शासकीय गोदामों की दुरुस्ती के संदर्भ में यहां अपने विचार रखे हैं.मैं इस संबंध में माननीय सदस्य श्री जयंत पाटील जी को यह बताना चाहता हूं कि जिन शासकीय गोदामों की दुरुस्ती की जा रही है, उनमें कोंकण का भी एक शासकीय गोदाम है. जिला स्तर पर 80 गोदामों की दुरुस्ती करना आवश्यक है. इनमें से 29 गोदामों की दुरुस्ती की जा रही है. औरंगाबाद में 9, नाशिक में 12, पुणे में 2, नागपुर में 3, अमरावती में 2 और कोंकण में एक, इस प्रकार से 29 गोदामों की दुरुस्ती की जा रही है. दुरस्ती के काम के लिए बाब क्रमांक 184 के अन्तर्गत एक करोड़ रुपये की मांग रखी गई है. इसके अलावा बाब क्रमांक 185 एवं 186 के अन्तर्गत भी मांगे रखी गई हैं. माननीय सदस्यों से मेरी विनती है कि वे इन मांगों को मंजूर करें. धन्यवाद. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

-----

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार,पणन,वस्त्रोद्योग व व्यसन मुक्ती कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदया,सहकार व वस्त्रोद्योग विभागाच्या पूरक मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या आहेत. या विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, जयंत प्र.पाटील, जोगेंद्र कवाडे व इतर काही सदस्यांनी चर्चा उपस्थित करुन काही सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. मराठवाडयातील साखर कारखान्यांच्या बाबतीत साखरेचे भाव कोसळल्यामुळे ऊस दर कमी झाल्यामुळे मराठवाडयातील साखर कारखानदारी अडचणीत आलेली आहे. मराठवाडयात नवीन पाणी येणार आहे,त्यानंतर ऊसाचे पीक घेतले जाणार आहे त्यामुळे तेथे साखर कारखानदारी असणे आवश्यक आहे असाही मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला गेला आहे. याबाबतीत आपण सगळयांनी एकत्रित येऊन यासंदर्भात चर्चा करु. सरकारची  ग्रामीण भागातील साखर कारखानदारी बाबत नेहमी सकारात्मक भूमिका राहिलेली आहे. भविष्यात सुध्दा अशीच सरकारची भूमिका राहणार आहे. कारखाने पुनरुज्जीवीत करण्याच्या बाबतीतील भूमिका असली तरी ती देखील सकारात्मक असेल. या ठिकाणी लीजच्या बाबतीत अंतीम धोरण ठरविले गेले नाही असाही मुद्दा उपस्थित केला गेला. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा आहे. त्या चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न देखील सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सहकार आणि वस्त्रोद्योग विभागाच्या पूरक मागण्या सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या आहेत त्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदया, मी प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. त्यावेळी माननीय राज्यमंत्री उपस्थित होते व ते नोटस् लिहून घेत होते. त्यामुळे मी काही बोललो नाही. मी उपस्थित केलेल्या प्रश्नास उत्तर द्यावे की द्यावयाचे नाही हा त्यांचा प्रश्न आहे. मला उत्तर मिळाले नाही तर मी निषेध करुन सभागृहाच्या बाहेर जाईन. परंतु मी या ठिकाणी पॉईंटेड प्रश्न विचारतो की, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटल्यानंतर सुध्दा आपण कार्यवाही केली नव्हती. आपण 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 15 कोटी रुपयांची तरतूद पुढच्या अधिवेशनात करु असे सभागृहात सांगितले होते. ती तरतूद करण्यात येईल की नाही याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदया, 10 कोटी रुपये अगोदर मंजूर करण्यात आलेले आहेत. 15 कोटी रुपये या डिसेंबरच्या आत पूर्ण केले जातील.

-------------------

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती कांता नलावडे) : सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वा. पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 12.55 ते 1.00 पर्यंत स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- स्थगिती नंतर -

**( सभापती स्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी : तोंडी उत्तरे**

**वरिष्ठ व निवडश्रेजीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाज ाळ ग्राहय धरज्याबाबत**

**(1) * 5584 श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायज र , डॉ. अशोज मोडज , श्री. क्हे. यू. डायजव्हाजे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. वसंतराव जोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. ऐनापूरे , श्री. वसंतराव चव्हाज , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जजनाथ शेवाळे , प्रा. फौजीया जान, प्रा. जोजेंद्र ज वाडे , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. नितिज ोद्दीन जतिब तारांजि त प्रश्न ग्र मांज 1761 ला दिनांज 17 मार्च, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : स-मा-न-नीय शालेय शिक्ष, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वरिष्ठ श्रेजी व निवड श्रेजीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाज ाळ अनुज्ञेय न धरज्याची ऱ्ति ही नियमबाहय आहे असा जो धोरजात्मज निर्जय मुंबई उच्च न्यायालयाच्या जंडपीठाने दिनांज 14 सप्टेंबर, 2000 रोजी एज ा याचिजेमध्ये (सन 2000 ची याचिजा ग्रमांज 4346) दिला त्याची धोरजात्मज अंमलबजावजी जरज्याबाबत जॅबिनेट समोर येऊन एज महिन्याच्या आत त्या संबंधी निर्जय घेज्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ज झाला आहे ज ाय,

(2) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्जयाचे स्वरुप ज ाय आहे,

(3) अद्यापही विचार पूर्ज झालेला नसल्यास, याबाबत होजा-या विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ,प्रा. वसंत पुरजे यांच्याकरिता** : (1) होय.

(2) प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेला निकाल व मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय यामध्ये विसंगती होऊ नये म्हणून या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामनाथ मोते :सभापती महोदय,आज सुध्दा पुन्हा एकदा तेच उत्तर देण्यात आलेले आहे.या प्रश्नाच्या बाबतीत यापूर्वी भरपूर चर्चा झालेली आहे. तसेच सभापती महोदय, आपण सुध्दा याबाबतीत शासनाला निर्देश दिले होते.या प्रश्नावर चर्चा होत असतांना सभापती महोदय आपण सुध्दा हस्तक्षेप केला होता. या प्रश्नाला दिलेले उत्तर बरोबर नसल्यामुळे व दिशाभूल करणारे असल्यामुळे याबाबतीत पुन्हा उत्तर देण्याचे आपण निर्देश दिले होते व हा प्रश्न राखून ठेवण्यात

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5584....

श्री. रामनाथ मोते (पुढे सुरु...

आला होता.आता सुध्दा पुन्हा शासनाचे हेच उत्तर दिलेले आहे की," या संदर्भात विधी व न्याय विभागाच्या सल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. " या संदर्भात उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश दिलेले आहेत, उच्च न्यायालयाने शासन निर्णयाचा अर्थ सुस्पष्ट केलेला आहे.तसेच त्याचे इंटरप्रिटेशन केलेले आहे की, विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राहय न धरणे हा शासनाचा निर्णय चुकीचा आहे. असे असतांना आता पुन्हा विधी व न्याय विभागाचा सल्ला घेणे, त्यांच्याकडून माहिती घेणे किंवा त्यांच्या सल्याने निर्णय घेणे हे दिशाभूल करणारे आहे आणि आम्हाला पुन्हा एकदा टांगत ठेवण्यातला हा प्रकार आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णया नुसार महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ग्राहय धरण्याचा विना अट निर्णय तातडीने लागू करण्यात येईल काय ?

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.आपण हे कसे काय स्वीकारले आहे याबाबत आपण न्याय द्यावा. प्रस्तुत प्रकरणामध्ये हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे.हायकोर्टाने दिलेला निर्णय हा सरकारवर बंधनकारक आहे.हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द सरकारने सुप्रीम कोर्टात अपील करावयास पाहिजे. किंवा सरकारने अपील करुन स्टे मिळवावयास पाहिजे होता परंतु हा स्टे सरकारने मिळवलेला नाही.म्हणून प्रस्तुत प्रकरणी हायकोर्टाच्या निर्णयाची तपासणी पुन्हा विधी व न्याय विभागाकडून करणे हे कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे .माझी आपल्याला अशी विनंती आहे की, याबाबतीत न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे हे सरकारचे वैधानिक व विधिवत कर्तव्य आहे.ते न केल्यामुळे या संदर्भात दुसरा प्रश्न उदभवत नाही.खरे म्हणजे हा कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे. तेव्हा माझी अशी विनती आहे की याबाबतीत सरकारने खुलासा करावा . हा कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होणे बरोबर होणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, त्याही दिवशी मी असे म्हणालो होतो की,या देशाच्या घटनेच्या विरोधात कोणालाही बोलता येत नाही हे जेवढे खरे आहे तेवढेच हे सुध्दा खरे आहे की त्याच्याविरोधात उत्तर देता येत नाही.दुर्देवाचा भाग असा आहे की, मंत्रिमडळाच्या समोर ही बाब इफेक्टीव्हली, सत्य रीतीने आणि इमानइतबारे नेण्यामध्ये विभागाला

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5584....

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरु....

अपयश आलेले आहे.त्या दिवशीसुध्दा मी हे सांगितले होते की, दिनांक 11 जून 2004 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 36739 विचारण्यात आला होता की,वरिष्ठ श्रेणी किंवा निवड श्रेणी साठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही  नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंड पीठाने दिनांक 14 सप्टेंबर 2000 रोजी एक याचिका क्रमाक 4346मध्ये दिला हे खरे आहे काय ? तेव्हा त्या प्रश्नाला आपण " होय " असे उत्तर दिले होते.दुर्देवाचा भाग असा आहे की, मंत्रिमंडळासमोर जात असतांना कोणत्या तरी अधिका-याने हे वाक्य धुसवले होते.

नंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे चालू...) ता.प्र.क्र.5584 ....

ते वाक्य असे आहे की, हा निर्णय केवळ याचिकाकर्त्या पुरता मर्यादित आहे. म्हणजे सभागृहामध्ये आपण उत्तर दिले होते की, हा धोरणात्मक निर्णय आहे म्हणून आणि तसा तो आहे देखील. सभापती महोदय, तो निर्णय या ठिकाणी मी मागील वेळेस वाचून दाखविलेला असल्याने आता पुन्हा वाचून दाखवित सभागृहाचा मी वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु उच्च न्यायालयाचा निर्णय हा केवळ याचिकाकर्त्यापुरता मर्यादित आहे असे म्हणून आम्ही तो अमान्य करीत आहोत असे आता शासन म्हणते आहे आणि हे मंत्रिमंडळापुढे देखील तशाच स्वरूपात ठेवले गेले. सभापती महोदय, 2000 सालातील हा निर्णय आहे आणि 2004 मध्ये हे कौतुकास्पद उत्तर आपल्याकडून येत आहे. अगदी मिरवणूक काढण्याजोगे हे उत्तर आहे. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाची नोटीस देखील यांना दिलेली आहे भाग 1 मध्ये. मला आश्चर्य हे वाटते आहे की, शासनाचा शिक्षण विभाग हे सारे प्रकरण वाचत नाही काय ? न वाचताच सरळ उत्तर देत आहे की, उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आणि मंत्रिमंडळाने घेतेला निर्णय यामध्ये विसंगती राहू नये म्हणून आता विधी व न्याय विभागाकडे ही बाब तपासण्यसाठी दिलेली असून त्यांच्या सल्लाने पुढे कार्यवाही करण्यात येईल. सभापती महोदय, म्हणून माझे त्या दिवशीही म्हणणे असे होते की, हा व्यवस्थेचा मुद्दा आहे. तेव्हा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे तो योग्य असाच आहे. हायकोर्टाच्या निर्णयावर अशा पध्दतीने कार्यवाही करणे बरोबर नाही, योग्य नाही. या ठिकाणी मंत्री महोदयांनी अत्यंत अयोग्य असेच काम केलेले आहे हे आपल्यालाही मान्य आहे ना ? तरी याबाबत सभापती महोदय, आपण निर्णय द्यावा हे उचित होईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मला देखील या हरकतीच्या मुद्यावर बोलावयाचे आहे. ...

**सभापती** : मी आता कोणालाही हरकतीच्या मुद्यावर बोलण्यास परवानगी देऊ इच्छित नाही. एक अपवाद म्हणून मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना बोलावयास परवानगी दिली. याचा अर्थ प्रत्येक सदस्याने यावर बोलावयास मागितले तर मी आपणास तशी परवानगी देणार नाही.

...... एफएफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5584 ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण माझ्या हरकतीच्या मुद्यावर निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. कारण या प्रश्नावर आता येथे चर्चा होऊच शकत नाही. आपण येथे ही चर्चा केली तर आपणही हायकोर्टाचा अवमान करतो आहोत असे होईल. सत्तारूढ पक्षाला हायकोर्टाबद्दल काय वाटते तो त्यांचा प्रश्न आहे. या प्रकरणी हायकोर्टाचा जो निर्णय आहे तो धोरणात्मक आहे असे आपण मान्य केले आहे. पण समजा तसे ते आपल्याला मान्य नसेल तर आपण त्याबाबत सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन अपील करावयास पाहिजे होते. पण शासनाने अपील केले नाही आणि हायकोर्टाच्या निर्णयाची अमलबजावणी देखील केलेली नाही. इतकेच नाही तर त्या बाबत मंत्रिमंडळामध्ये ती बाब निर्णयासाठी ठेवली गेली. हायकोर्टाचा निर्णय तपासण्याचा अधिकार मंत्रिमंडळाला आहे का ? पुढे आणखी मोठी गोष्ट अशी की, कॅबिनेटचा निर्णय आणि हायकोर्टाचा निर्णय यामध्ये विसंगती आहे काय हे तपासण्याकरिता आपण ही बाब विधी व न्याय विभागाकडे पाठवित आहात. तेव्हा सभापती महोदय, या सभागृहामध्ये या प्रश्नावर चर्चा होणार असेल तर वैधानिकदृष्ट्या ते बरोबर नाही. तो हायकोर्टाचा अवमान ठरेल आणि आपण तसे करू नये असे मला वाटते. म्हणून आपण स्वत: हे मॅटर ताबडतोब तपासावे आणि सरकारला हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एक गोष्टी मंत्रिमंडळाच्या तसेच सभागृहाच्याही लक्षात आणून दिलेली नाही. खरे तर हायकोर्टाच्या निर्णयावर अपील करण्याची वेळ देखील केव्हाच निघून गेलेली आहे ही ती गोष्ट. असे असतानाही मंत्री महोदय येथे सांगतात की, हायकोर्टाचा निर्णय असला तरी त्यावर आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये अपील करू शकतो. म्हणून मग शेवटी या प्रश्नावर आपल्याला सभागृहामध्ये हा प्रश्न तहकूब करावा लागला. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, हायकोर्टाने जो निर्णय या प्रकरणी दिलेला आहे त्यावर अपील करण्याची मुदत संपलेली आहे. तेव्हा हायकोर्टाच्या निर्णयाविरोधात आपण हे उत्तर देणार आहात काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण जो हरकतीचा मुद्दा येथे उपस्थित केलेला आहे, त्यावर मी आपल्याला नेमके समर्पक उत्तर देणार आहे. पण तत्पूर्वी या बाबत शिक्षण राज्यमंत्र्यांचे काय म्हणणे आहे ते आपण ऐकून घेऊ या.

...... एफएफ 3 ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5584 ....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी शांतपणे आपल्याला सगळे काही सांगतो. पण एकदम असे अंगावर आल्यास मलाही गांगरल्यासारखे होते. तेव्हा आपण सर्वांनीच शांतपणे माझे म्हणणे ऐकून घ्यावे ही विनंती. सभापती महोदय, वरिष्ठ श्रेणी आणि निवड श्रेणी बाबत उच्च न्यायालयाचा निर्णय झालेला आहे हे खरे आहे. हा निर्णय 20 याचिकाकर्त्यांपुरता अमलात आणावा असे मंत्रिमंडळाने ठरविले हेही खरे आहे. मंत्रिमंडळासमोर जे आले त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला ते खरे आहे. ....

( यानंतर श्री. जागडे ....जीजी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...... ता.प्र.क्र. 5584...

त्याबाबत परिणामकारकरित्या कॅबिनेटसमोर ही बाब मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सारासार विचार करुन तसेच सदसदबुध्दीचा विचार करुन मंत्रिमंडळाने या बाबतचा निर्णय केला आहे.काल प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबतचा प्रश्न आला होता. केंद्राच्या वेतनश्रेणीप्रमाणे राज्यातील प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या बाबत माननीय मुख्यमंत्री, अर्थमंत्री तसेच आमचे कॅबिनेट मंत्री आणि मला माननीय सभापती महोदय, आपल्या दालनात बोलावून या निर्णय करणार आहोत. त्यावेळी याही प्रश्नाचा आपण अंतर्भाव करावा आणि दोन्ही निर्णय एकत्रित करावेत, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या ठिकाणी मी माझा निर्णय देत आहे. या ठिकाणी प्रश्न क्र. 1 असा विचारण्यात आला आहे की, " वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे, असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे, त्या बाबत एक महिन्यात कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय घेण्यात येईल काय ? " या बाबत माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, या बाबत कोणतीही विसंगती राहू नये म्हणून आम्ही विधी व न्याय विभागाचा सल्ला घेत आहोत. मला माननीय मंत्रिमहोदयांना हे सांगावयाचे आहे की, कॅबिनेट सुरु असताना विधी व न्याय विभागाचे अधिकारी उपलब्ध असतात. दुसरी बाब अशी की, एखाद्या बाबीबाबतचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला तर त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. हा निर्णय योग्य नसेल तर त्या बाबत राज्य सरकारने रितसर न्यायालयात जाणे आवश्यक आहे. हा उचीत आणि योग्य मार्ग आहे. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या प्रश्नाबाबत आपण सर्वजण माझ्या दालनात बसण्याचे ठरविले आहे. त्या वेळी या प्रश्नाबाबत विचार करणे शक्य आहे.

( गोंधळ )

मी माझे वक्तव्य संपविलेले नाही. या ठिकाणी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे आपणाला जावयाचे असेल तर........माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षण विभाग आपल्याकडून सवर्तोपरी प्रयत्न करीत आहे. या बाबत कॅबिनेटने निर्णय घेणे आवश्यक होते, अशी माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. परंतु तसा निर्णय झालेला नाही. या बाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेणे गरजेचे आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे. आता उच्च न्यायालयाच्या निर्णयावर

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.... ता.प्र.क्र. 5584...

कॅबिनेटमध्ये चर्चा करावयाची की नाही, हे शासनाने ठरवावयाचे आहे. त्या बाबतीत मी कोणतीही सूचना करणार नाही. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी येणे अपेक्षित नाही, असे मला वाटते. तेव्हा मी या बाबत असा निर्णय देत आहे की, या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी मी सर्वांना माझ्या दालनात बोलावेन. त्याबाबत चर्चा करेन. त्यावेळी जे निष्कर्ष येतील, त्या बाबत पुन्हा सभागृहात चर्चा होईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, न्यायालयाचा अवमान करण्याच्या बाबतीत आपण आम्ही सहभागी होऊ नये, असे माझे मत आहे. आपल्या दालनात चर्चा करणे म्हणजे न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा करणे असा अर्थ होईल. न्यायालयाने दिलेला निर्णय हा सरकारवर बंधनकारक आहे. भारतीय घटनेनुसार न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर कॅबिनेटला, विधी व न्याय विभागाला चर्चा करण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने दिलेल्या निर्णय अंमलबजावणी करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. आता राज्य शासनाला हायकोर्टाचा निर्णय मान्य नव्हता तर वेळीच राज्य शासन त्याविरुध्द सुप्रिम कोर्टात अपील करु शकत होते. आता त्याची मुदत संपलेली आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5584...

श्री. नितीन गडकरी...

त्यामुळे आता न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. परंतु आपण या लोकशाहीचे चौथे स्तंभ आहात. आणि म्हणून न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची चर्चा आपल्या चेंबरमध्ये करणे योग्य होणार नाही. माझी आपणास विनंती आहे. मी आपणास एक मार्ग सुचवितो, आपण हा प्रश्न आता स्थगित करावा. आणि त्यानंतर विधी विभागाच्या ॲडव्होकेट जनरलना बोलावून घेवून आपण त्यांचे मत जाणून घ्यावे. व त्यानंतर आपण आपले मत सभागृहामध्ये द्यावे. जेणेकरुन या सभागृहाने उच्च न्यायालयाचा अवमान केला असे पाप आपल्या माथी लागू नये अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माझ्या दालनामध्ये यासंबंधी जी काही चर्चा होईल ती या ठिकाणी सांगण्याची व्यवस्था होईल असे मी सांगितले. याचा अर्थ मी या ठिकाणी निर्णायक उत्तर दिले असा होत नाही. अशा परिस्थितीत अन्य कोणताही पर्याय मला योग्य वाटत नाही. फक्त हा एकच पर्याय योग्य असून त्यासंबंधी मी निर्णय घेतला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**□ाजपूर महा□जर पालिजे चे माध्यमिज शाळेतील शिजज □□ा पाचव्या वेत□ आयोजाची सुधारित वेत□श्रेजी 1 जा□वारी, 1996 पासू□ लाजू □ ज रजे**

**(1) * 5627 श्री. व्ह्‌ही. यू. डायजव्हाजे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. वसंतराव जोटरे , श्री. □□□साहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अै□□पूरे तारांजीत प्रश□ ज्र मांज 1780 ला दि□ांज 16 मार्च, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : स-मा-न-नीय मु□य मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) □ाजपूर महा□जर पालिज ा अधि□स्त चालविल्या जाजाऱ्या माध्यमिज/उच्च माध्यमिज शाळेतील शिजज ज र्मचाऱ्यां□ा शालेय शिजज विभाजाच्या दि□ांज 13 मे, 1999 च्या शास□ □िर्जयाप्रमाजे पाचव्या वेत□ आयोजाच्या सुधारित वेत□श्रेज्या दि□ांज 1 जा□वारी, 1996 पासू□ लाजू □ ज रता दि□ांज 1 जा□वारी, 2000 पासू□ लाजू जेल्या, हे जरे आहे ज ाय,

(2) दि□ांज 1 जा□वारी, 1996 पासू□ सुधारित वेत□श्रेजी देजे व शिजजाधिज ारी □ाजपूर ज ार्यालया□ी थज बाजीसाठी दिलेली रक्ज म रु. 1 जोटी 10 लाज शिजजांचे पुढील वेत□ावर जर्ची ज रजे याबाबत माजविज्यात आलेला आयुक्त □ाजपूर महा□जर पालिज ा यांचा अहवाल शास□ास प्राप्त झाला आहे ज ाय,

(3) असल्यास, सुधारित वेत□श्रेजी दि□ांज 1 जा□वारी, 1996 पासू□ लाजू ज रज्याबाबत शास□ा□ी ज ाय ज ारवाई जेलेली आहे,

(4) अद्यापही ज ारवाई जेलेली □सल्यास होजाऱ्या विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुज यांच्याकरिता** : (1) होय, हे जरे आहे.

(2) होय.

(3) व (4) □ाजपूर महा□जरपालिज ा शिजज संघ, □ाजपूर यां□ी □ाजपूर उच्च □्यायालयात रिट पिटींश□ (ज्र.2260/2002) दाजल जेली आहे. मा. □्यायालयाच्या आदेशा□ंतर सदर प्रज रजी पुढील उचित ज ार्यवाही ज रज्यात येईल.

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न ज्यावेळी लावला त्यावेळी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याची माहिती आमच्याकडे नव्हती. परंतु या संदर्भात अतिशय मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे. जरी महानगरपालिकेचे कर्मचारी असले तरी त्या कर्मचाऱ्यांना 100 टक्के अनुदान हे शालेय शिक्षण विभागामार्फत दिले जाते. तेव्हा वेतन अनुदान म्हणून दिलेले 1 कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** 5627** ...

10 लाख रुपये हे वेगवेगळया कामांसाठी खर्च करण्यात आल्याची माझी माहिती आहे. नागपूर ही या राज्याची उपराजधानी आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षकांना 1.1.1996 पासून पाचवा वेतन आयोग लागू झाला आहे. या महानगरपालिकेला दिलेले वेतन अनुदान हे कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आले याची तपासणी करण्यासाठी हे प्रकरण आयुक्तांकडे चौकशीसाठी सादर करण्यात आले.आयुक्तांचा चौकशी अहवाल अजून आलेला नाही.तेव्हा या प्रकरणाची सत्यासत्यता पडताळून पहाण्यासाठी एक महिन्याच्या आत आपण संबंधितांची एक बैठक घेऊन या प्रश्नामधून मार्ग काढणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 1 कोटी 10 लाख रुपये हे दिनांक 31.3.2000 रोजी चेकने देण्यात आले आहेत. त्यानंतर ते रुटीन सॅलरी ग्रॅंटमध्ये ॲडजस्ट करण्यात आले. माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे तशा पध्दतीने या रकमेचा गैरवापर केला किंवा महानगरपालिकेने हा निधी दुसऱ्या कारणासाठी वापरला असे दिसत नाही. परंतु आलेले पैसे हे सॅलरी ग्रॅंट व नंतर येणाऱ्या ग्रॅंट मधून वजा करुन घेतले जातात. त्याप्रमाणे 1 कोटी 10 लाख रुपये हे दोन महिन्यानंतर कमी केले आहेत. त्यामुळे यामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही. माननीय सदस्यांची इच्छा असेल आणि त्यांना खात्री करुन घ्यायची असेल तर मी जरुर माननीय सदस्यांना माझ्या दालनामध्ये बोलावून घेऊन त्या संदर्भात बैठक घेईन.

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे: सभापती महोदय, ही बैठक एक महिन्याच्या आत घेण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : होय.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मोदी रेल्वेजेट ते हुडजो (जि.सोलापूर) या रस्त्यावर दिवाबत्तीची सोय □सल्याबाबत**

(2) * 6319 **श्री. रजजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया जा□, श्री. वि□ायज राव मेटे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ** : स-मा-न-नीय मु□य मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) मोदी रेल्वेजेट ते हुडजो (जि.सोलापूर) या स्मशा□भूमीजवळ असलेल्या रस्त्यावर दिवाबत्तीची सोय □सल्या□ चोऱ्यांचे प्रमाज वाढले आहे हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, याबाबत या भाजतील □ाजरिजां□ी दिवे लावज्याची माजजी जेलेली आहे हे जरे आहे जाय,

(3) असल्यास, उपरोक्त रस्त्यावर तत्परते□ दिवे लावज्याबाबत शास□ा□ जोजती जार्यवाही जेली आहे वा जरज्यात येत आहे,

(4) अद्याप जोजतीच जार्यवाही झाली □सल्यास विलंबाची जारजे जाय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुज यांच्याकरिता** : (1) □ाही.

(2) व (3) स्मशा□भूमी रस्त्यावर पूर्वीपासू□च दिव्याचे जांब लावले असू□, दिवे चालू स्थितीत आहेत. त्यामुळे दिवे चालू □सल्याचा प्रश□ उद्‌भवत □ाही.

(4) प्रश□ उद्‌भवत □ाही.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या उत्तराने माझे समाधान झाले आहे.

(उपप्रश्न नाहीत)

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**म्हाडा अंतर्जत मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्रचा मंडळाला उपज राची रक्ज म मिळज्याबाबत**

**(3) * 5772 श्री. मधुज र चव्हाज , श्री. विोद तावडे , श्रीमती ज ंता लावडे , डॉ. अशोज मोडज** : सन्मानीय मुय मंत्री पुढील ोष्टींचा ुलासा रतील ाय :-

(1) म्हाडा अंतर्जत मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्रचा मंडळाला म्हाडा जायद्या अंतर्जत शासाज डे उप-ज रा-पोटी जमा झालेली सर्व रक्ज म मुंबई इमारत दुरुस्ती पुर्रचा मंडळाला ित्य ियमा प्रत्येज वर्षी अदा ज रजे हे शासाचे ज र्तव्य आहे हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, जेल्या पाच वर्षात शासाज डे उपज रापोटी 158.71 ज ोटी रक्ज म जमा झाली हे जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, त्यापैज ी शासा आजपर्यंत फक्त रु.112 ज ोटी मुंबई इमारत दुरुस्ती व पुरचा मंडळाला दिले हे जरे आहे ज ाय,

(4) असल्यास, उपज रापोटी जमा झालेल्या रज मेपैज ी 46.71 ज ोटी रुपये मुंबई इमारत दुरुस्ती पुरचा मंडळाला शासा दिले ाहीत हे जरे आहे ज ाय,

(5) असल्यास, मॅचिंज ्रँट स्वरुपात व उप ज रापोटीच्या स्वरुपात आजपर्यंत  दिलेली रक्ज म, शास मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्रचा मंडळाला जेव्हा देजार आहे ?

**श्री. दयानंद मस्के, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता** : (1) होय,

(2) स 2000-2001 ते स 2004-2005 या 5 वर्षात महाज रपालिजे उपज रापोटी रु. 151.97 ज ोटी एवढी रक्ज म शासाज डे जमा जेली आहे.

(3) स 1999-2000 पर्यंतची उपज राची जमा असलेली रु. 31.73 ज ोटी आजि जेल्या पाच वर्षात महाज रपालिजेज डू जमा झालेली रु. 151.97 ज ोटी अशा एज ूज रु. 183.70 ज ोटी मधू शासा जेल्या पाच वर्षात रु. 150.79 ज ोटी एवढी रक्ज म म्हाडास दिली आहे.

(4) उपज रापोटी जमा झालेली फक्त 32.91 ज ोटी एवढी रक्ज म मंडळाला देजे बाज ी आहे.

(5) उपज रापोटी शासाज डे जमा झालेली रक्ज म तसेच शासा वार्षिज अंशदाची (मॅचिंज ्रँट) रक्ज म लवज रात-लवज र देज्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** 5772** .....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना छापील उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय?

श्री. दयानंद मस्के : नाही, उत्तर बरोबर आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल सभागृहामध्ये या विषयावरील लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत त्यांनी याकडे लक्ष द्यावे की, कालच्या लक्षवेधी सूचनेच्या वेळी या खात्याची लक्तरे वेशीवर टांगण्यात आली. इतकी भयानक गोष्ट झाली आहे की, त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे अशी माझी आपणास हात जोडून कळकळीची विनंती आहे. काल या ठिकाणी सांगण्यात आले की, एकूण उपकरापोटी 96 कोटी रुपये शिल्लक आहेत आणि 168 कोटी मंडळाला द्यावयाचे आहेत. आणि आजच्या उत्तरामध्ये 32 कोटी 91 लाख रुपये देणे आहे असे म्हटले आहे.तरमग यामधील नेमका खरा आकडा कोणता?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5772 . . . .

श्री.मधुकर चव्हाण . . . .

सभापती महोदय, काल असे उत्तर दिले आहे की, "वरील आकडेवारी पाहता शासनाचे वार्षिक अंशदानापोटी 72 कोटी 66 लाख आणि दुरुस्ती उपकरापोटी 96 कोटी 19 लाख असे एकूण 168 कोटी रुपये एवढी रक्कम म्हाडास देणे बाकी आहे." हे काल सदनामध्ये दिलेले उत्तर चुकीचे होते का ? ते उत्तर बरोबर आहे की याठिकाणी दिलेले उत्तर चुकीचे आहे ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, 1999-2000 पर्यंतची उपकराची जमा झालेली रक्कम 31.73 कोटी रुपये आहे. या प्रश्नामध्ये उपकराच्या पाच वर्षाच्या आकडेवारी बाबत विचारणा केलेली असल्यामुळे त्यानुसार उत्तरामध्ये पाच वर्षाची आकडेवारी विचारात घेऊनच माहिती दिलेली आहे. मात्र उपकराच्या बाबतीत 31 मार्च 2005 अखेरपर्यंत 96.19 कोटी रुपये व मनपाकडून येणारी रक्कम 63.28 कोटी रुपये व प्रत्यक्षात शासनाकडे जमा झालेली रक्कम 32.91 कोटी आहे. अंशदानापोटी आलेली 31 मार्च 2005 पर्यंतची देय रक्कम 72 कोटी 66 लाख आहे. उपकर 96.19 कोटी , अंशदान 72.66 कोटी , 168 कोटी , 85 कोटी हे म्हाडाकडे देय आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण याठिकाणी उत्तरात 32.91 कोटी रुपये असे दिलेले आहे. म्हणून मी सुरुवातीला विचारले की, आपल्याला या उत्तरात काही सुधारणा करावयाची आहे का ? कारण एका दिवसात एवढा फरक कसा पडला ? आपल्या अधिका-यांचे गणित चांगले नाही. ते तेथे भ्रष्टाचार करुन म्हाडाला लुटण्यासाठी बसलेले आहेत. शासनाकडून किती येणे आहे ? ट्रान्झिट कॅम्पमध्ये लोकांचे कसे हाल होतात ? हे त्यांना काहीही माहिती नाही. ते दलालांच्या गराडयात बसलेले असतात. त्यांना गणित येते का ? याठिकाणी उत्तरात उपकरापोटी 32 कोटी रुपये म्हटलेले आहे आणि आता लगेच 96 कोटी रुपये असे माननीय राज्यमंत्री सांगत आहेत. तेव्हा माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, कृपया आपण हे लाईटली घेऊ नका.

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : गणित कच्चे नाही. हा टक्केवारीचा मुद्दा आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य काही वर्ष म्हाडाचे अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांना अधिक माहिती आहे आणि अधिक चांगला कारभार करण्यासाठी आम्हाला त्यांच्या माहितीचा उपयोग होईल. आम्ही जरुर त्यांचा सल्ला घेऊ. याठिकाणी माननीय

. . . .2 आय-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख . . . .

राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे, ते वस्तुस्थितीला धरुन आहे. कारण ब-याच वेळेला असे घडते की, कॉर्पोरेशन पैसे वसूल करते आणि ते शासनाकडे जमा करते आणि शासन ते पैसे परत म्हाडाला देते. ब-याच वेळेला कॉर्पोरेशनने जमा केलेले पैसे आणि राज्य शासनाकडे येणारे पैसे यात तफावत रहाते. कारण पूर्वीचे एकमेकांचे काही हिशोब असतात. शासनाकडून त्यांना काही देणे असते. त्यामुळे काही रकमा अशा प्रकारे प्रलंबित असतात. त्यामुळे ही आकडेवारी येथे देत असताना, तसेच हे काम सफर होउ नये म्हणून ब-याच वेळेला शासनाच्यावतीने म्हाडाला जे पैसे देय असतात, ती रक्कम म्हाडा, शासनाच्यावतीने एक ब्रीज म्हणजे ज्याला आपण फायनान्शिअल लोन म्हणतो, त्यापध्दतीने खर्च करीत असते. प्रत्यक्ष कामावर याचा परिणाम होऊ नये म्हणून म्हाडाने आपल्या इतर फंडातून यासाठी पैसे उपलब्ध करुन द्यावेत आणि नंतर शासनाकडून जे येणे आहे किंवा कॉर्पोरेशनकडून येणारा जो हिशोब आहे, तो नंतर करावा अशा पध्दतीची व्यवस्था आपण याठिकाणी करत असतो. त्यामुळे आम्ही आपल्याला जरी आकडेवारी सांगितली असली तरी, प्रत्यक्षात हे काम म्हाडाने करावयाचे आहे आणि ते काम केल्यानंतर आम्ही त्यांना 32 कोटी रुपये देणे शिल्लक आहे असा त्याचा अर्थ होतो. पण आपण विचारले की, कॉर्पोरेशनकडून 63 कोटी रुपये यावयाचे आहेत, परंतु त्यांनी वसूल केले आहेत, मात्र आमच्याकडे जमा केलेले नाहीत. कारण शासनाकडून त्यांचा काही हिशोब व्हावयाचा राहीलेला आहे. त्यामुळे ही 63 कोटी रुपयांची रक्कम दिसते.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी उपकराच्या बाबतीत वस्तुस्थिती सांगितली आहे की,प्रचलित धोरणाप्रमाणे उपकर महानगरपालिकेने एजन्सी म्हणून घेतल्या नंतर महानगरपालिकेकडून शासनाकडे आणि शासनाकडून ती रक्कम म्हाडाला दिली जाते ही वस्तुस्थिती आहे. पण प्रत्यक्षात तसे अंमलात येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी उपकराच्या बाबतीत प्रश्न विचारला की, 2001 पासून 2005 पर्यंत जवळजवळ 32 कोटी रुपयांची थकबाकी आहे आणि काल माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले होते की,"वस्तुत: दुरुस्ती उपकराची रक्कम भाडेकरुंकडून वसूल करण्यात येत असल्यामुळे ही रक्कम इमारतीच्या दुरुस्तीच्या कार्यक्रमाच्या वेळी देणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.तेव्हा ही बाब कायदेशीररित्या

. . . .2 आय-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट . . . .

बंधनकारक असताना देखील महानगरपालिकेने उपकर शासनाकडे जमा केला आहे, पण तो उपकर शासनाने म्हाडाला दिलेला नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5772(पुढे सुरु...

श्री.विलास अवचट (पुढे सुरु...

या ठिकाणी कायद्याचे उल्लंघन झालेले आहे, याबाबत तरी मा.मंत्रीमहोदय सांगू शकतील काय ?

श्री.विलासराव देशमुख : 63.28 कोटी रुपये कार्पोरेशनने वसूल केलेली रक्कम सरकारकडून कार्पोरेशनला पैसे मिळाले नाहीत या हिशोबापोटी सरकारकडे जमा केलेले नाहीत.आता त्यांनी 25 कोटी रुपये या महिनाअखेर भरण्याचे मान्य केलेले आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : पाचव्या उपप्रश्नाला उत्तर देताना म्हटलेले आहे की, उपकरापोटी शासनाकडे जमा झालेली रक्कम तसेच शासनाने वार्षिक अंशदानाची (मॅचिंग ग्रँट) रक्कम लवकरात लवकर देण्यात येईल. माझा प्रश्न असा आहे की, किती कालावधीमध्ये ही रक्कम देणार आहात ?

श्री.दयानंद मस्के : या संदर्भामध्ये कालच सभागृहामध्ये स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे की, वित्तमंत्री आणि महानगरपालिकेचे अधिकारी आणि म्हाडा यांची 15 दिवसाच्या आत बैठक घेण्यात येईल आणि योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले. परंतु आम्हाला जे उत्तर अपेक्षित होते तसे उत्तर आलेले नाही. उत्तराच्या तिसऱ्या भागामध्ये म्हटलेले आहे की, सन 1999-2000 पर्यन्तची उपकराची जमा असलेली रु.31.73 कोटी आणि गेल्या पाच वर्षात महानगरपालिकेकडून जमा झालेली रु.151.97 कोटी अशा एकूण 183.87 कोटीमधून शासनाने गेल्या पाच वर्षात 150.79 कोटी एवढी रक्कम म्हाडास दिली आहे आणि पाचव्या भागाच्या उत्तरामध्ये "उपकरापोटी शासनाकडे जमा झालेली रक्कम तसेच शासनाने वार्षिक अंशदानाची (मॅचिंग ग्रँट) रक्कम लवकरात लवकर देण्यात येईल." प्रश्न असा आहे की, शासनाकडून वेळेवर मॅचिंग ग्रँट मिळायला पाहिजे ती मिळत नाही, परिणामी दुरुस्तीची कामे थांबतात. आकड्यांच्या घोळाबाबत भाष्य करत नाही. परंतु म्हाडाकडे लक्ष दिले जात नाही. मा.मुख्यमंत्री महोदयांकडे या विभागाचा चार्ज असला तरी त्यांच्या व्यापातून म्हाडाकडे त्यांना लक्ष देता येत नाही. मा.राज्यमंत्री महोदय म्हणतात की, 15 दिवसामध्ये वित्त मंत्री आणि महापालिकेचे अधिकारी यांची बैठक घेतली जाईल. परंतु मॅचिंग ग्रँट कधी मिळणार आहे आणि दुरुस्तीची कामे केव्हा सुरु होतील हा महत्वाचा प्रश्न आहे, त्याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ MHM/ SBT

ता.प्र.क्र.5772(पुढे सुरु...

श्री.विलासराव देशमुख : गेल्या पाच वर्षामधील शासनाचे अंशदान 226.57 कोटी रुपये देणे होते, त्यापैकी गेल्या पाच वर्षामध्ये 186.13 कोटी रुपये दिलेले आहेत आणि 40.40 कोटी रुपये देणे बाकी आहे. मी मघाशी सांगितले की, कामे सफर होऊ नयेत म्हणून म्हाडाने पैसे खर्च करावेत. सरकारचे पैसे आले नाहीत म्हणून म्हाडाने कामे थांबविण्याचे कारण नाही. नंतर शासन आणि म्हाडाचा हिशोब पूर्ण करता येईल. राज्यमंत्री महोदयांनी बैठक घेऊन हे पैसे ताबडतोबीने म्हाडाकडे वर्ग केले जातील, असे सांगितले. आमची जबाबदारी आम्ही पार पाडू. परंतु अंशदानाच्या रक्कमेची वाट न पहाता म्हाडाने आपल्या फंडातून हे पैसे खर्च करावेत अशा सूचना दिलेल्या आहेत. सरकारच्या अंशदानामुळे काम बंद असेल तर ही जबाबदारी सरकार घ्यायला तयार आहे.

---

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ MHM/ SBT/

**जामलोली व दहिसर (तर्फे म□ोर) (ता.पालघर,जि.ठाजे) या जावालजतच्या**

**वैतरजा □दीच्या पायालजत रेती जजू□ ज ाढज्याचे सुरु जे लेले ज ाम**

(4) * 5812 **श्री. वि□ोद तावडे , डॉ. अशोज मोडज , श्री. □ि□ी□ जडज ी , श्रीमती ज ांता □ळावडे , श्री. राम□ाथ मोते , श्री. मधुज र चव्हाज** : स-मा-ा-ीय मु□य मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) ता. पालघर ( जि. ठाजे ) येथील जामलोली व दहिसर ( तर्फे म□ोर ) या जावा दरम्या□च्या वैतरजा □दीच्या पात्रालजत रेती जजू□ ज ाढज्याचे ज ाम जेल्या ज ाही महि□्यांपासू□ रेती उत्पादज ां□ी सुरु जे ल्यामुळे पात्राची जोली 30 ते 40 फुटांवर जेली आहे, परिजामी □व्या□ बांधज्यात येजाऱ्या जामलोली पूलाला धोज ा □िर्माज झाला आहे, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, रेती व्यावसायिज ां□ी जैरमार्जा□ सुरु ठेवलेल्या सततच्या उत्ज□□ामुळे या □दीच्या पात्रांची जोली वाढत चालली आहे, व त्यामुळे □दीपात्रालजतच्या शेतजमि□ी व बाजायतदारांच्या सुपीज जमि□ीला धोज ा □िर्माज झाला आहे, हे जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, वरील धोज ा लजात घेऊ□ सदर रेती उत्ज□□ाचे ज ाम तातडी□ थांबविज्याबाबत शास□ ज ाय जार्यवाही ज रजार आहे ?

**श्री. विलासराव देशमुज** : (1) हे जरे □ाही.

(2) व (3) प्रश□ उद्‌भवत □ाही.

डॉ.अशोक मोडक : मुळामध्ये रेती खणून काढण्याचे काम हा विषय गंभीर आहे. ठाणे जिल्ह्यातील हा विषय वेगवेगळया मार्गाने चर्चेला येऊन गेला. त्या संदर्भाने रेती काढण्याचे काम लिलावाने देण्याचा धोरणात्मक पवित्रा सरकारने घेतला होता, तीच पध्दती याही ठिकाणी लागू आहे काय ?

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5772...

डॉ. अशोंक मोडक...

तेच या ठिकाणी ॲप्लीकेबल आहे काय? ठाणे जिल्हयाचे सोईसाठी वाळू उपसण्यासाठी, रेती उपसण्यासाठी दोन-तीन भाग केलेले आहेत.

( उत्तर आले नाही )

श्री. नितीन गडकरी : या ठिकाणी रेतीचे उत्खननच झालेले नाही, असे सरकारला म्हणावयाचे आहे काय? जर तेथे रेतीचे उत्खनन झाले असेल तर किती रेती काढली गेली आहे? त्यामुळे धोका होतो की नाही? हा प्रश्न वेगळा आहे. ही रेती काढणा-या लोकांनी यासबंधात परवानगी घेतली आहे काय? रॉयल्टीपोटी किती पैसे भरले आहेत?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, प्रामुख्याने ठाणे जिल्हयातील यांत्रिक पध्दतीने वाळू उत्खननावर बंदी टाकलेली आहे. मंत्रिमंडळाच्या उप समितीने दिनांक 3 मार्च, 2004 रोजीच्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे आणि तेथे लिलावाला बंदी टाकलेली आहे.ठाणे जिल्हयात फक्त डुबी पध्दतीनेच वाळू काढण्यास परवाना दिला जातो. 2004-2005 मध्ये ठाणे जिल्हयात एकंदर 20 लाख 40 हजार ब्रास वाळू... (उत्तर अर्धवट).

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, वैतरणा नदीपुरता हा प्रश्न विचारलेला आहे.

श्री. विलासराव देशमुख : पालघर तालुक्यामध्ये 23 रेती स्थळे आहेत. त्यासगळयांचे डिटेल्स मी या ठिकाणी सांगणार नाही. सकाळ या वर्तमानपत्रात दिनांक 21 एप्रिल, 2005 ला जी बातमी आलेली होती.......( उत्तर अर्धवट)

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, माझा प्रश्न स्पेसिफिक आहे. वैतरणा नदीत रेती उत्खनन केले जाते. खामलोली व दहिसरतर्फे मनोर या गावाच्या दरम्यान या पात्रालगत जी रेती खणली, त्यामुळे या नदीच्या पात्राची खोली 30 ते 40 फूट खाली गेली आहे. त्यामुळे खामलोली पुलाला धोका निर्माण झालेला आहे. त्याबाबतीत प्रश्न विचारलेला आहे. तेथे रेतीचे उत्खनन चालू आहे काय ? किती फूट खोल उत्खनन झालेले आहे? आणि त्या पुलाला धोका आहे की नाही हे तपासले आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5772...

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, त्या ठिकाणी पूलाला धोका नाही. अशा पध्दतीने 500 मीटरपर्यंत उत्खनन करता येत नाही, असा नियम आहे. या उत्खननामुळे या पुलाला धोका निर्माण झालेला आहे, असे जे म्हटलेले आहे, ते बरोबर नाही. पालघर तालुक्यामधून आतापर्यंत 3.63 कोटी रुपयाचे स्वामित्व सरकारला मिळालेले आहे.

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, माझ्या जवळ यासबंधीचा फोटो आहे. "किना-यालगतची रेती खणल्याने वैतरणा नदीवरील पुलाला धोका आहे" असे म्हटले आहे. तेथील मातीला बाजूला सारुन, त्याखालील रेती व्यावसाईक बिना परवानगी मोठया प्रमाणावर रेती काढत आहेत.हे एक स्कॅन्डल आहे. या संदर्भात मी मंत्रिमहोदयांना विचारलेले आहे की, प्रत्यक्षात ते उत्खनन किती फूट खाली गेलेले आहे? हे गंभीर प्रकरण आहे. त्याचा फोटो माझ्याकडे आहे. सन्माननीय मुख्यमंत्रिमहोदय सांगत आहेत की, त्याचा धोका नाही, तर त्याबाबतची तपासणी कोणाकडून केलेली आहे? धोका नाही हे कोणी सर्टिफाय केलेले आहे?

श्री. विलासराव देशमुख : वाळूच्या उत्खननास परवाने देतांना मुख्य अट अशी आहे की, पुलापासून 500 मीटर पर्यंत कसल्याही प्रकारचे उत्खनन करता येणार नाही.अशा पध्दतीची नियमावली आहे आणि त्याप्रमाणे कारवाई केली जाते.अशा पध्दतीची वृत्तपत्रामध्ये ज्यावेळी बातमी आली, त्यावेळी त्याची तपासणी करण्यात आली. आणि त्यांनी शासनाला कळविलेले आहे की, अशा प्रकारचा कुठलाही धोका नाही. उलट त्या पुलाजवळ वाळूचे उत्खनन करुन त्याचे ढीग वगैरे टाकले जात होते, वृत्तपत्रात बातमी आल्यानंतर त्यालाही आता बंदी केलेली आहे.500 मीटरमध्ये तेथे ढीग वगैरे असे काहीही करु नका, कुठलिही ॲक्टिव्हिटी करु नये अशा प्रकारची कारवाई केलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर आलेले नाही. त्या पूलाला धोका नाही हे कोणी सर्टिफाईड केले याचे उत्तर मिळालेले नाही.

श्री. विलासराव देशमुख :या पुलाला धोका आहे, अशी वर्तमानपत्रात बातमी आल्यानंतर त्याची तपासणी केली आणि जेव्हा यासंबंधात सरकारकडे माहिती विचारण्यात आली तेव्हा संबंधित खात्याचे अधिकारी असतात प्रामुख्याने बांधकाम विभागाचे अधिकारी असतात त्यांच्याकडून ही माहिती घेण्यात आलेली आहे आणि कसल्याही प्रकारचा धोका नाही, असे त्यांनी शासनाला कळविलेले आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**म्हाडातील जैरज ारभार व भ्रष्टाचाराबाबत श्री. रामकृ ष्ज□, तत्ज ालीन उपाध्यज व मुज्य ज ार्यज ारी अधिज ारी यां□ी जे लेली तज्र ार**

**(5) * 5657 श्री. विलास अवचट , श्री. अ□ि तरे , श्री. दिवाज र रावते , श्री. अरविंद सावंत तारांज्ति प्रश□ ज्र मांज 2723 ला दि□ांज 13 एप्रिल, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : स-मा-ा-नीय मु□य मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) म्हाडातील जैरज ारभार व भ्रष्टाचाराबाबतच्या तज्र ारीबद्दल चौज शी ज रज्यासाठी स्थाप□ ज रज्यात आलेल्या श्री. आर.सी.सि□हा, उपाध्यज व व्यवस्थापजीस संचालज, महाराष्ट्र विमा□तळ विज ास ज ंप□ी यांच्या एज सदस्यीय समिती□ आपला चौज शी अहवाल शास□ाला सादर जे ला आहे ज ाय,

(2) असल्यास, अहवालाप्रमाजे शास□ा□ दोषी व्यक्तींवर ज ाय ज ार्यवाही जे ली वा ज रज्यात येत आहे,

(3) असल्यास, विलंबाची ज ारजे ज ाय आहेत व ज ार्यवाही जे व्हापर्यंत पूर्ज होजे अपेजित आहे ?

**श्री. दयानंद मस्के, विलासराव देशमुज यांच्याकरिता** : (1),(2) (3) म्हाडातील जैरज ारभार व भ्रष्टाचाराबाबतच्या तज्र ारीची चौज शी ज रज्यासाठी शास□ा□ प्रथमत: श्री.आर.सी.सि□हा, उपाध्यज व व्यवस्थापजीय संचालज, महाराष्ट्र विमा□तळ विज ास ज ंप□ी यांची एज सदस्यीय समिती प्रमुज म्हजू□ □ियुक्ती जे ली होती. तथापि, त्यां□ी ज ार्यबाहुल्यामुळे समितीचे ज ाम ज रज्यास असमर्थता दर्शविली त्यामुळे त्यांचे ऐवजी आता श्री.बी.ए□.बहाद्दुर,सेवा □िवृत्त भा.प्र.से.यांची एज सदस्यीय समिती जठित जे ली आहे. समितीला ती□ महि□यात (दि.30-9-2005 पर्यंत) अहवाल सादर ज रज्याचे सुचविज्यात आले आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, म्हाडातील गैरकारभार व भ्रष्टाचाराबाबत श्री. रामकृष्णन, तत्कालीन उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात 15 एप्रिल 2005 रोजी या ठिकाणी प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, श्री. आर.सी.सिन्हा यांची एक सदस्यीय समिती नियुक्त केली आहे आणि त्यांचा अहवाल तीन महिन्यात सादर होईल. ज्यावेळी म्हाडातील श्री. रामकृष्णन सारखा एखादा अधिकारी तक्रार करतो तेव्हा त्याची गंभीर दखल घेण्याऐवजी या ठिकाणी उत्तरामध्ये असे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र. 5657 ..... श्री. विलास अवचट .....

म्हटले आहे की, श्री. आर.सी.सिन्हा यांची जी कमिटी नेमली होती त्यांनी कार्यबाहुल्यामुळे समितीचे काम करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे आता श्री. बी.एन.बहादूर, सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी यांची एक सदस्यीय समिती गठित केली आहे आणि तीन महिन्यात अहवाल अपेक्षित आहे. त्यांनी असे कोणते भ्रष्टाचाराचे आरोप केले होते की, त्यासाठी आपल्याला अशा प्रकारे चौकशीसाठी आयए.ए.एस. अधिकाऱ्याची किंवा निवृत्त आय.ए.एस. अधिकाऱ्याची नियुक्ती करणे भाग पडले ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, यामध्ये प्रामुख्याने म्हाडा कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी व्यापारी भूखंड शासनाच्या मान्यतेशिवाय देण्यात येणे, काही व्यक्ती व संस्थांना सवलतीच्या दरामध्ये गाळे मंजूर करणे, शासनाची मंजुरी न घेता 2.5 एफ.एस.आय. मंजूर करणे आणि इतर तक्रारी आहेत. यामध्ये विशेषत: आदर्शनगर, समतानगर, चारकोप (कांदिवली) येथील बेकायदेशीर हस्तांतरण करणे अशा काही तक्रारी त्यावेळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य सचिवांना पत्र लिहून केलेल्या होत्या. कोणताही निर्णय म्हाडा ज्यावेळी करते त्यावेळी त्या ठिकाणी ते बोर्डाचे निर्णय असतात. त्या निर्णयामध्येमध्ये स्वत: सदस्य सचिव असतात, उपाध्यक्ष असतात. त्या प्रकरणाच्या संदर्भात त्यावेळी बोर्डाच्या बैठकीमध्ये त्यांनी विरोध केला होता की, नाही ? बोर्डाच्या ठरावाला त्यांची मान्यता होती काय ? याबाबतीत ज्यावेळी एखादी तक्रार येते त्यावेळी नुसते पत्र आले की, ते ग्राहय धरणे योग्य नाही. म्हणून श्री. आर.सी.सिन्हा यांची समिती नियुक्त केली होती. परंतु ते आपल्याच नागपूरच्या कामामध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांनी असमर्थता व्यक्त केली. म्हणून ही चौकशी सेवानिवृत्त आय.ए.एस.अधिकारी श्री. बहादूर यांच्या मार्फत होईल. त्यांनी चौकशीचे काम सुरु केले आहे. ताबडतोब त्यांचा अहवाल येईल.

श्री. अनंत तरे : तीन महिन्यांपूर्वी श्री. आर.सी.सिन्हा यांच्याकडे चौकशी दिली होती. त्यांनी असमर्थता दर्शविल्यानंतर श्री. बहादूर यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांनी संमती दर्शविली आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : त्यांनी चौकशीचे काम सुरु केलेले आहे. साधारणपणे महिना दीड महिन्यामध्ये अहवाल येईल.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे प्रकरण स्वयंस्पष्ट आहे. शासनाची परवानगी न घेता भूखंड वाटप केले. म्हणजे भूखंड वाटपास शासनाची परवानगी लागते असे असताना फाईलच पाठविली नाही आणि वाटप केले. त्यामध्ये काही चौकशी केली नाही. जादा एफ.एस.आय. देऊन टाकला. किती एफ.एस.आय. द्यावयास पाहिजे याचा नियम आहे. त्या ठिकाणी जे आय.ए.एस. अधिकारी होते ते ही शिफारस करतात. यामध्ये भारतीय जनता पक्षाने किंवा कोणी आमदाराने आरोपपत्र दिले असे नाही. त्या ठिकाणी काम करणाऱ्या आय.ए.एस. अधिकाऱ्याने तेथील कार्याचा रिपोर्ट शासनाकडे पाठविला. या रिपोर्टमध्ये हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचा किंवा सरकारचा असा उद्देश नसेल की, चौकशी समिती स्थापन करुन कोणाला तरी वाट मोकळी करावयाची, मार्ग काढावयाचा किंवा वेळ काढावयाचा असे त्यांच्या मनात नसेल. परंतु असे केल्यामुळे नकळत का होईना ज्यांनी हे केले त्यांना वेळ मिळणार आहे आणि त्यांच्यावर कारवाई होणार नाही. ती कारवाई टाळली जाणार आहे.. मुख्य सचिवांकडे हा अहवाल आल्यानंतर त्यांनी यावर समिती नेमण्याची गरज नाही. मुख्य सचिवांनी त्या अहवालाची दोन चार तासात तपासणी करुन ते सरकाला ॲक्शन टेशन रिपोर्ट ताबडतोब देऊ शकतात. नाही तर हे टाळले जाईल. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावता कामा नये. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे. मुख्य सचिवांनी ताबडतोब चौकशी करावी आणि आपल्याला रिपोर्ट द्यावा आणि आपण कारवाई करावी. ज्या प्रकरणामध्ये पुष्कळ टर्म्स अँड रेफरंसेस असतात त्या ठिकाणी चौकशी समिती नेमली जाते. या ठिकाणी आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी रिपोर्ट दिलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5657....

श्री.विलासराव देशमुख : त्यांनी मुख्य सचिवांना पत्र लिहिले आणि त्या सर्व प्रकरणांचा डिटेल अहवाल त्या पत्रासोबत नाही. तेव्हा अशाप्रकारे गंभीर स्वरुपाच्या तक्रारी त्या संस्थेचे व्हाइस प्रेसिडेंट करतात तेव्हा तितक्याच गंभीरपणे शासनाने कार्यवाही केलेली आहे. यामध्ये कोणालाही पाठिशी घालण्याचे कारण नाही. त्यामध्ये कागदपत्रांचा पुरावा आहे, कोणालाही पाठिशी घालण्याचा उद्देश नाही. परंतु त्यांनी केलेले आरोप कोणत्या मन:स्थितीत केले, असे काय कारण घडले की, ज्यामुळे त्यांना सरकारला असे ताबडतोब लिहावे लागले ? याबाबतची प्रत्यक्षात चौकशी सुरु झालेली आहे. यासाठी फार अवधी लागणार नाही, आपण त्यांना तीन महिन्यांचा अवधी दिलेला आहे. कोणावरही अन्याय होऊ नये, उलट एकतर्फी निर्णय घेतला तर अन्याय होण्याची शक्यता असते. कोणावरही अन्याय होऊ नये हा आपला उद्देश बरोबर आहे. म्हणून त्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर याबाबत निर्णय होईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या दुरुस्ती मंडळाबाबत वारंवार चर्चा होत असल्यामुळे काही लोकांना हा विषय लाईटली वाटत असेल. मी मा.मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला आहे की, एखाद्या विकासकाला एनओसी मिळाल्यामुळे अतिरिक्त गाळे मिळतात. त्यानुसार गेल्या 3 वर्षात 150 अतिरिक्त गाळे मिळाले आणि पुनर्रचित इमारतीमध्ये 335 गाळे मिळाले आहेत.

श्री.विलासराव देशमुख : मला वाटते की, मा.सदस्यांचा प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.मधुकर चव्हाण : या प्रश्नाशी संबंधित नसेल, पण शासनाला हे टाळावयाचे असेल आणि तेथे किळसवाणी होणा-या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष होत आहे, आपण दुर्लक्ष करीत आहात असे माझे मत नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, म्हाडाचा हा गैरकारभार आहे. म्हाडाच्या अंतर्गत हे दुरुस्ती मंडळ येते. म्हाडाच्या अंतर्गत 9 दुरुस्ती मंडळे आहेत. म्हाडा ही काही दुसरी संस्था नाही. मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचित मंडळाची चौकशी या कमिटीकडून करण्यात येईल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, त्या पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांपुरती सीमित अशी ही चौकशी समिती आहे.

2...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5657....

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याची संधी मिळाली, त्याचे कारण असे की, थोडेसे विषयांतर झाले आहे. मूळ जो विषय आहे तो म्हाडाच्या भ्रष्टाचारासंबंधीचा आहे. आपण म्हणता हे खरे आहे की, दुरुस्ती मंडळ हा म्हाडाचा भाग आहे. आपण जे सांगितले त्याच्यामध्ये भ्रष्टाचाराचा उल्लेख नाही म्हणून विषयांतर झाले असे मी म्हणालो. म्हाडातील कोणतेही अधिकारी कायद्याप्रमाणे एखादा प्लॉट एखाद्याला व्यक्तिगतरित्या देऊ शकतात काय ? जर व्यक्तिगत कोणाला प्लॉट दिला गेला तर तशी कायद्यात तरतूद आहे काय ? त्याची माहिती आम्हाला उपलब्ध करुन दिली तर बरे होईल. जर अशी तरतूद नसेल आणि प्लॉट दिला गेला तर त्याच्यावर म्हाडा कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.विलासराव देशमुख (बसून) : भ्रष्टाचारासंबंधीचा हा प्रश्न नाही. चौकशीसंबंधी मा.सदस्यांचा प्रश्न आहे काय ?

श्री.मधुकर सरपोतदार : भ्रष्टाचाराचा संबंध आहे म्हणून प्रश्न विचारला आहे.

श्री.विलासराव देशमुख (बसून) : यामध्ये भ्रष्टाचाराचा विषय नाही. जे पत्र दिले आहे त्या पत्रात चौकशी अहवाल आहे, आपण त्याबाबत प्रश्न विचारु शकता.

श्री.मधुकर सरपोतदार : भ्रष्टाचारासंबंधी एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी श्री.आर.सी.सिन्हा यांना नेमले, परंतु त्यांना वेळ नसल्यामुळे पहिले तीन महिने वाया गेले आहेत. आता श्री.बहाद्दूर आलेले आहेत. त्यांनी वेळेत चौकशी पूर्ण केली नाही तर तिसरा माणूस नेमणार काय ? त्याची व्याप्ती व तातडी विचारात घेतली नाही तर हा भ्रष्टाचार पचविण्यासाठी आपण लोकांना संधी देता असा त्याचा अर्थ होईल. यादृष्टीकोनातून या श्री.बहाद्दूर यांच्याकडे ही चौकशी कधी सोपविली आणि ही चौकशी कधी पूर्ण होईल आणि त्याचा अहवाल आम्हाला कधी मिळेल ?

श्री.विलासराव देशमुख : चौकशीचे काम सुरु झालेले आहे, त्यांना 3 महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. साधारणपणे एक ते दीड महिन्याच्या आत हा अहवाल शासनाकडे येईल.

------

3....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

**मुंबईच्या विज ासासाठी सीआरझेड 2 व 3 चे ियम शिथील ज रज्याबाबत**

**(6) * 6438 श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोजेंद्र ज वाडे , श्री. राजेंद्र जै, श्री. वसंतराव चव्हाज , डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया जा, श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जजनाथ शेवाळे तारांजि त प्रश्ि ज्र मांज 1889 ला दिांज 16 मार्च, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : स-मा-ा-ीय मुय मंत्री पुढील ोष्टींचा ुलासा रतील ाय :-

(1) मुंबईच्या विज ासासाठी सीआरझेड-2 व 3 चे ियम शिथिल ज रज्या संदर्भात जेंद्र शासाच्या पर्यावरज व व विभाजाज डूि ज रज्यात येत असलेली ज ार्यवाही पूर्ज झाली आहे ज ाय,

(2) असल्यास, उक्त प्रश्ी जोजती ज ार्यवाही जेली वा त्याुसार पुढे जोजता िर्जय घेतला वा घेज्यात येत आहे,

(3) सल्यास, विलंबाची सर्वसाधारज ज ारजे ज ाय आहेत, तसेच उक्त प्रश्ी लवज रात लवज र माय़ता मिळावी यासाठी जोजते प्रयत जेले वा ज रज्यात येत आहेत ?

**श्री.राजेश टोपे, विलासराव देशमुज यांच्याकरिता**: (1) ाही.

(2) व (3) जेंद्र शासाच्या पर्यावरज व व विभाजाज डू शिल एव्हारमेंटल पॉलिसी 2004 मध्ये माजविज्यात आलेल्या हरज ती/सूचा प्रस्तांवावर अद्याप िर्जय घेज्यात आलेला ाही. त्यामुळे सदर बाब जेंद्र शासाच्या िर्जयावर अवलंबू राहील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, लोकसंख्येचा वाढता भार, जागेची कमतरता आणि त्यामुळे मुंबईच्या विकासासाठी सीआरझेड-2 व 3 चे नियम शिथिल करण्याच्या संदर्भात केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाकडून करण्यात येणारी कार्यवाही पूर्ण झाली आहे काय असा मी पहिला प्रश्न विचारला होता त्याला नाही असे उत्तर देण्यात आले आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 13:45

(ता.प्र.क्र. 6438..... (प्रा. जोगेंद्र कवाडे...)

मुंबईच्या विकासासाठी सीआरझेड-2 व 3 चे नियम शिथिल करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने कोणती कारवाई केली आहे ? असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? केन्द्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाकडून नॅशनल एन्व्हीरॉन्मेण्टल पॉलिसी 2004मध्ये मागविण्यात आलेल्या हरकती, सूचना प्रस्तावावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसून हा निर्णय किती कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे : नवी मुंबई आणि मुंबई या दोन्ही शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सीआरझेड-2 आणि सीआरझेड-3 हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. त्यादृष्टीकोनातून 2002मध्ये राज्य शासनाने सुखथनकर समिती गठित करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले. 2002मध्ये सुकथनकर समितीने आपला अहवाल दिल्यानंतर त्या अहवालामध्ये समितीने सेस बिल्डिंग, एसआरएसच्या बिल्डिंग, हेरिटेज बिल्डिंग तसेच म्हाडाचे असलेले अनेक प्रकल्प या सर्व प्रकल्पांना सीआरझेड-2च्या नियमामध्ये शिथिलता द्यावी अशी विनंती केलेली आहे. ज्या काही ठिकाणी केन्द्र शासनाने क्लिअरन्स दिलेला होता अशा गोराई, मुलुंड इत्यादी ठिकाणी विकास कामांना मंजुरी देण्यात आलेली असून तेथे विकास कामे चालू आहेत. परंतु समितीच्या अहवालामध्ये जी शिथिलता मागितलेली आहे ती अद्याप मान्य केलेली नाही. ती मान्य होण्याच्या दृष्टीने शासनाच्यावतीने सातत्याने प्रयत्न चालू आहेत. मा.मुख्यमंत्र्यांनी केन्द्रीय पर्यावरण मंत्रालयाशी अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. या सीआरझेडच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी केन्द्राने स्वामीनाथन समिती नेमली. मध्यंतरी सुनामीची घटना घडल्यामुळे हे काम थांबलेले आहे. सुखथनकर आणि स्वामीनाथन या दोन्ही समित्यांनी सीआरझेड-2च्या नियमांमध्ये शिथिलता करुन घेतली तर विकासाचे बरेचसे प्रश्न मार्गी लागू शकतील. खासदारांच्या बैठकीमध्ये देखील मा. मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाचा वारंवार उल्लेख केलेला आहे. पर्यावरण आणि वन खात्याकडून याबाबतीत प्रयत्न व्हावेत अशा प्रकारच्या सूचना मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आहेत. राज्य शासन देखील याबाबतीत प्रयत्नशील आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.6438...)

श्री. अनंत तरे : हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मुंबईतील बोरिवली पासून कुलाब्यापर्यन्त कोळीवाड्याची जी गावठाणे आहेत त्याठिकाणी राहाणा-या कोळी बांधवांना त्यांच्या घरांची दुरुस्ती करता येत नाही किंवा पुनर्बांधणी करता येत नाही. ही गावठाणे वगळावित अशी सुकथनकर समितीने शिफारस केलेली आहे. तेव्हा यासंदर्भात शासन तातडीने कारवाई करील काय ?

श्री. राजेश टोपे : मी सुरुवातीलाच सांगितले की, मुंबईच्या विकासाच्या दृष्टीकोनातून हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. त्यादृष्टीने शासन सकारात्मक भूमिका घेऊन प्रयत्नशील आहे. खासदारांच्या बैठकीमध्ये सातत्याने हा प्रश्न मांडलेला आहे. तसेच नगर विकास विभागाकडून देखील प्रयत्न चालू आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 13:50

ता.प्र.क्र.6438...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबई शहराच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. गेल्या पंधरा वर्षापासून राज्य सरकार या विषयाच्या बाबतीत केंद्र शासनाबरोबर पत्रव्यवहार करीत आहे. 1980 या वर्षी हा कायदा आलेला आहे. स्वामिनाथन कमिटी असेल, त्सुनामी लाट असेल, राज्य सरकारच्या शिफारशी असतील हे सगळे गौडबंगाल आहे. या ठिकाणी माननीय राज्य मंत्र्यांनी "काही प्रमाणात" असा उल्लेख केलेला आहे. काही प्रमाणाची स्थिती अशी आहे की, आधीचा जो प्लॉट आहे त्यास क्लिअरन्स आहे. रस्त्याच्या इकडे आलेले प्लॉट ते अडकवून ठेवले आहेत. सर्व विषयांच्या बाबतीत वेगवेगळे कन्सल्टंट आहेत. सी.आर.झेड. स्पेशल कन्सल्टंट, फॉरेस्ट स्पेशल कन्सल्टंट, पर्यावरण स्पेशल कन्सल्टंट असे वेगवेगळे कन्सल्टंट निर्माण झालेले आहेत. दिल्लीच्या चाललेल्या कारभारात देखील कन्सल्टंट शिवाय फाईल पुढे जात नाही. कारण कन्सल्टंट तेथे गेल्यानंतर आवश्यक ती चर्चा करतात. नंतर त्यातून मार्ग निघतो. येथे केस टू केस अशा केसेस सुटून राहिल्या आहेत. सरकार देखील केस टू केस शिफारशी करीत आहे. केस टू केस ते निर्णय घेत आहेत. समोरच्या लोकांचे काम होत आहे. मागच्या लोकांची कामे अडकून पडली आहेत. कारण कागदपत्रे ते पाठवित नाहीत. आजच्या प्रचलित पध्दतीमध्ये वजनदार जी कागदपत्रे आहेत ती सादर केली गेली तर ते प्रकरण निकाली निघते.स्वामिनाथन कमिटी, सुखटणकर समिती आम्ही ऐकतो आहोत. प्रश्न असा आहे की, याबाबतीमध्ये ब्लँकेट पॉलिसी अवलंबिली गेली पाहिजे. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर सांगू इच्छितो की, यातल्या ब-याच केसेस केस टू केस सुटत आहेत. बाकी लोकांच्या केसेस तशाच प्रलंबीत आहेत. आमदारांच्या सोसायटीचा प्लॉट या कायद्यात अडकून पडला आहे. तो का राहिला त्याचे कारण असे आहे की, तुम्ही वजनदार कागदपत्रे संबंधिताना पाठवित नाही. तुम्ही कन्सल्टंट नेमून केस टू केस गेला नाहीत. सभापती महोदय, या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्र्यांबरोबर बैठक घ्यावी. गोवा सरकारने आपले प्रश्न अशा पध्दतीने सोडवून घेतलेले आहे. गुजरात राज्याने काही प्रमाणात हे प्रश्न सोडवून घेतले आहेत. केरळ राज्याने देखील काही प्रश्न सोडवून घेतले आहेत. परंतु महाराष्ट्रात मात्र याबाबतीत छळणे सुरु आहे. महाराष्ट्राला समुद्राचा चांगला किनारा लाभलेला आहे. त्या किना-यावर हॉटेल्स बांधू शकत नाही अशी परिस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भामध्ये केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्र्यासमवेत बैठक घ्यावी. त्या

2...

श्री.नितीन गडकरी...

बैठकीत आग्रह करावा. जशी जोर लावून केंद्र शासनाकडून इतर प्रकरणे सोडवून घेतली तसा जोर या प्रश्नासाठी देखील माननीय मुख्यमंत्र्यांनी लावावा. या अडचणीतून जनतेला मुक्त करावे अशी माझी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या सी.आर.झेड.च्या क्लिअरन्सच्या संदर्भामध्ये मी पूर्वी मुख्यमंत्री असताना व आता मुख्यमंत्री असताना अनेक संबंधित केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा केलेली आहे. पूर्वी या विभागाचे मंत्री टी.आर.बालू होते. आता त्यांच्या जागेवर श्री. राजा हे आलेले आहेत. गुजरात, गोवा, केरळ राज्यास याबाबतीत लवकर न्याय मिळाला. मुंबईमध्ये हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत खूप अडचणी आहेत. या मुंबई शहरामध्ये पर्यावरणवादी मंडळी मोठया प्रमाणात आहेत. पर्यावरणवादींचे मोठया प्रमाणात खटले न्यायालयात प्रलंबीत आहेत. यासंदर्भातील कुठलाही निर्णय करावयाचा असेल तर न्यायालयाच्या आदेशाची वाट पहावी लागते. मधल्या काळात कोर्टाने काही निर्णय दिलेले आहेत. त्यामुळे पुढचे निर्णय घेण्यास मोठे अडथळे येत आहेत. हाय टाईड लाईन पासून 500 मीटर. हाय टाईड लाईन कोण ठरविणार ? हाय टाईड लाईन आपण सांगितल्या प्रमाणे तज्ज्ञ ठरवितात. तेथून 500 मीटर क्लोज लाईन साईड अशी जी काही व्याख्या आहे. त्याप्रमाणे आपण सांगितल्या प्रमाणे केस टू केस यासंबंधीचा विचार होऊ शकतो. चारकोपमधील झ ाोपडपट्टयांची दुरुस्तीचे काम बरीच वर्षे पडून होते. आपण ते काम करु शकत नाही. या ठिकाणी सांगितले गेले त्याप्रमाणे कोळीवाडयातील एखाद्या घराची दुरुस्ती करावयाची असेल तर दिल्ली पर्यन्त ती फाईल मंजुरीसाठी पाठवावी लागते. हा कायदा अतिशय क्लिस्ट झालेला आहे. चैत्यभूमी सुशोभीकरणाचे काम आपण नुकतेच हाती घेतलेले आहे त्यास केद्र सरकारने विशेष बाब म्हणून मान्यता दिली आहे आणि सी.आर.झेड.मधून ते प्रकरण बाजुला काढले आहे. त्यामुळे चैत्यभूमीचा विकासाचा प्रश्न मार्गी लागला आहे. सी.आर.झेड.च्या कायद्यामुळे संपूर्ण मुंबईतील विकासाची कामे थांबली आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांना सांगू इच्छितो की, आपण सूचना केल्याप्रमाणे संबंधित केंद्रीय मंत्र्यांना यासंदर्भातील बैठक मुंबई येथे घेण्याची विनंती करण्यात येईल. मुंबईत बैठक घेण्याचे निश्चित झाल्या नंतर कोकणातील तसेच मुंबईतील जे आमदार आणि खासदार आहेत त्यांना या बैठकीस एकत्रितपणे बोलावू.

यानंतर श्री. कानडे...

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6438 पुढे सुरु...

श्री. विलासराव देशमुख .....

किमान विकासाला हे नियम कसे अडचणीचे ठरतात आणि केस टू केस प्रकरणांमुळे कशा अडचणी निर्माण होतात हे त्या बैठकीमध्ये आपण मांडू. अशा प्रकारची बैठक लवकरात लवकर दिल्लीतील मंत्र्यांची तारीख मिळवून मुंबई येथे घेऊ आणि यासंदर्भातील सगळी प्रकरणे त्यांच्यासमोर ठेवून या प्रश्नावर व्यापक चर्चा करण्याची गरज आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सीआरझेड च्या कायद्यामुळे मुंबईचा विकास खुंटतो आहे हे आता मा.मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी सांगितले. सीआरझेडचा कायदा असताना सुध्दा या मुंबई शहरामध्ये मढ-आयलंड,नवी मुंबई इ.ठिकाणी तसेच समुद्र किना-याच्या बाजूला शेकडो अनधिकृत बांधकामे सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन करण्यात आलेली आहेत. मोठमोठया लोकांनी तसेच फिल्म स्टारनी बंगले बांधले आहेत. याबाबतची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे काय ? असल्यास ती माहिती काय आहे ते सभागृहामध्ये सांगावे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारे सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन बांधकाम झालेले असेल तर त्यासंदर्भात वेळोवेळी मुंबई महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेकडे याची माहिती असते. सीआरझेडचे उल्लंघन करुन किती बांधकामे झालेली आहेत याची माहिती शासनाकडे असण्याचे कारण नाही. यासंदर्भात महानगरपालिकेला सूचना आहेत आणि त्यानुसार वेळोवेळी महानगरपालिका अशा प्रकारची कारवाई करते.

----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उेंद्र शासाची मदत घेताना मान्य केलेल्या अटींचे पालन न केल्याबाबत**

**(७) * ५६८५ श्री. रमेश निकोसे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे तारांकित प्रश्न क्रमांक १७९९ ला दिनांक १७ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने लागू केलेल्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात कृषी विद्यापीठातून अंमलात आणतांना ८०% रक्कमेची थकबाकी केंद्र शासनाकडून घेताना मान्य केलेल्या अटींचे राज्य शासनाने पालन केले नाही व निधी मिळवितांना केंद्र शासनाची फसवणूक करण्यात आली यासाठी जबाबदार असलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करणारे एक निवेदन दिनांक १९ मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान ॲकेडेकिम स्टाफ असोसिएशन या प्राध्यापक संघटनेने कुलसचिव डॉ. पंजाबराव कृषि विद्यापीठ यांचेमार्फत मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांना सादर केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) िर्जय झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील.,श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१), (२) व (३) हे जरे ाही. सदर दिनांक १९ मे, २००५ च्या निवेदनाद्वारे असोसिएशन ऑफ ॲकेडमिक स्टाफने राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत शिक्षक/ प्राध्यापक/ संशोधकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे ऐवजी ६२ वर्षे करण्याबाबत मागणी केली असून यासंबंधीचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे.

. श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, ता.प्र.क्र. 5685..

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये आपल्या अनुमतीने मी दुरुस्ती करु इच्छितो. प्रश्न क्र. 1,2 आणि 3 च्या संदर्भात उत्तरामध्ये हे खरे नाही असे म्हटले आहे त्याऐवजी हे खरे आहे असे वाचावे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, दिनांक 19 मे,2005 रोजी अॅकेडेमिक स्टाफ असोसिएशन यांनी निवेदन दिले आहे. त्यामध्ये केवळ सेवानिवृत्तीच्या वयाचाच प्रश्न निर्माण केला होता आणि निवेदनात कोणकोणत्या बाबी होत्या याचा खुलासा करावा.

श्री. राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, जे निवेदन आले आहे त्यामध्ये जवळजवळ 10 वेगवेगळया गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने सेवानिवृत्तीचे वय 58 ऐवजी 60 किंवा 62 पर्यंत करण्यात यावे अशी एक मागणी आहे. त्याचप्रमाणे ज्या अधिका-यांनी सेवानिवृत्तीचे वय वाढवून घेण्याचे काम करावयाला पाहिजे होते ते केले नाही त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली अशा दोन प्रमुख मागण्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5685 पुढे सुरु...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, उत्तरामध्ये हे खरे नाही असे म्हटले आहे.ते तरी खरे आहे काय असे मी विचारणार होतो परंतु त्यांनी उत्तर दुरुस्त केले आहे. उत्तरामध्ये दुरुस्ती केली म्हणजे त्यांनी हे मान्य केले की फसवूणक केली आहे.कारण त्यांनी होय म्हटले म्हणजे मान्य केले.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, निवेदन मिळाले काय हा प्रश्न होता. निवेदन मिळाले हे खरे आहे.

प्रा.बी.टी..देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाच्या भाग 1,2 आणि 3 च्या संदर्भात हे खरे आहे असे उत्तर आता दिले आहे. म्हणजे केंद्र शासनाची फसवणूक केलेली आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, प्रश्न क्र. 2 आणि 3 मा.सदस्यांनी वाचला तर लक्षात येईल की यामध्ये खरे आहे किंवा नाही असा कुठेच उल्लेख नाही. यामध्ये चुकीच्या गोष्टी घडलेल्या आहेत काय याबाबतीत हे खरे आहे असे कुठेच म्हटलेले नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्र.क्र.1,2 आणि 3 च्या संदर्भात हे खरे आहे असे उत्तर दिले आहे.काय खरे आहे तर केंद्र शासनाला खोटे अंडरटेकींग देऊन 80 टक्के अनुदान मिळविले हे खरे आहे. निवेदनामध्ये आरोप करण्यात आला आहे तो आरोप खरा आहे किंवा नाही हे शासनाने सांगावे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे. आरोप खरे नाहीत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, यासोबत सहपत्र तीन जोडले आहे हे खरे आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5685..

श्री.राणा जगजितसिंह पद्‌मसिंह पाटील : हे जरी खरे असले तरी त्याच्या पुढे आणखी दोन गोष्टी आहेत ....

प्रा.बी.टी.देशमुख :या ठिकाणी जर - तरचा भाग नाही. पैसे घेत असतांना सहपत्र जोडलेले आहे.केन्द्र सरकारकडून 80 टक्के ॲरिअर्स घेत असतांना असे सह पत्र जोडले होते की, सर्व अटींचे पालन केलेले आहे. तेव्हा या निवेदनाच्या सोबत हे सहपत्र जोडलेले आहे किंवा नाही ?

श्री.राणा जगजितसिंह पद्‌मसिंह पाटील : हे पत्र जोडलेले आहे. त्याचबरोबर दिनांक 6 जानेवारी 2000 रोजी राज्य शासनाने केन्द्र शासनाला पत्र पाठविले होते. त्यामध्ये कोणत्या अटी मान्य करण्यात येणार आहेत यासंबधीचा शासन निर्णय झालेला असून त्याची प्रतसुध्दा पाठविण्यात आलेली होती. त्यानंतर आपल्याला 80 टक्के पैसे मिळतात व तशा प्रकारची मागणी करण्यात आली होती.शासन निर्णयामध्ये सेवा निवृत्तीच्या अटीचा उल्लेख केला होता..

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर यांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास मी परवानगी देत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिली आहे त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मागच्या वर्षी बुलढाणा जिल्हयात दुबार पेरणी झाली होती. त्यासबंधी महाराष्ट्र शासनाने शेतक-यांसाठी काही मदत जाहीर केली होती. त्यामध्ये शेगाव तालुक्यामध्ये जवळजवळ 22 हजार शेतकरी अफेक्टेड झाले होते व त्यांना 1 कोटी 50 लाख रुपयांची मदत शेगाव तालुक्यासाठी जाहीर करण्यात आली होती व त्या रकमेचे वाटप शेगावमध्ये झाले होते.हे वाटप करीत असतांना कॉग्रेसचे अखिल भारतीय सरचिटणीस श्री. मुकूल वासनिक व त्यांचे पिताश्री श्री.बाळकृष्ण वासनिक यांच्या नावानेसुध्दा. संबंधित कृषी अधिका-यांनी चेक काढले होते. श्री.मुकूल वासनिक यांच्या नावाने 0.80 हेक्टर जमीन दाखवून त्यांना अल्पभूधारक ठरविण्यात आले होते .त्याचबरोबर श्री.बाळकृष्ण वासनिक यांनासुध्दा अल्पभूधारक ठरविण्यात आले होते श्री.मुकूल वासनिक यांच्या नावाने 088620 क्रमांकाचा 800 रुपयांचा चेक काढण्यात आला होता व त्यांच्या नावावर सात बाराच्या उताऱ्यावर जी जमीन दाखविण्यात आली होती ती पडीक जमीन होती .अशा प्रकारे या पडीक जमिनीवर दुबार पेरणी झ ाली आणि नुकसान झाले म्हणून चेक काढण्यात आला होता परंतु याची माहिती श्री.मुकूल वासनिक यांना माहीत नाही. तसेच श्री.बाळकृष्ण वासनिक यांनासुध्दा ते माहीत नव्हते. असे असतांना शेगाव पंचायत समितीचे माजी सभापती यांच्या मार्फत हा चेक पाठविण्यात आला होता.या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की जाणीवपूर्वक सकारी अधिकारी असे प्रकार करुन सारकारला अडचणीत आणत असले पाहिजेत. मागच्या वेळीसुध्दा अमरावतीमध्ये सेतू प्रकल्पाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या नावाने आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या नावाने पासबुक काढण्यात आले होते. दारुचे लायसेन्स महात्मा गांधी यांच्या नावानेसुध्दा दिले गेले होते.आता सुध्दा श्री.मुकूल वासनिक आणि श्री.बाळकृष्ण वासनिक यांच्या नावाने चेक काढण्यात आले आहेत. चेक मिळावा यासाठी शेतक-यांना सरकारी कार्यालयात खेटे मारावे लागतात आणि श्री.मुकूल वासानिक व श्री बाळकृष्ण वासनिक यांची मेहरबानी आपल्यावर व्हावी म्हणून त्या कृषी अधिका-यांनी त्यांच्या धरपोच चेक पाठवून दिले आहेत .ही गंभीर बाब असून त्याची चौकशी करण्यात आली पाहिजे अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

नतर श्री.सुंबरे

नंतर श्री.सुंबरे

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटले त्याप्रमाणे श्री.मुकुल वासनिक किंवा त्यांच्या पित्याने अशी कोणतीही मागणी केलेली नव्हती ...

श्री. पांडुरंग फुंडकरे : होय, सभापती महोदय, त्यांनी अशी कोणतीही मागणी केलेली नव्हती आणि 7-12 च्या उताऱ्यानुसार तेथे श्री.मुकुल वासनिक यांचा कारखाना आहे. शिवाय ती जमीन पडिक आहे आणि असे असताही त्या जमिनीवर दुबार पेरणी दाखविली आहे ...

**सभापती** : शासनाने याची नोंद घ्यावी इतकेच मी सांगतो.

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, अतिशय गंभीर असा प्रश्न सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे उपस्थित केलेला आहे म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, याबाबत पूर्ण चौकशी केली जाईल आणि ज्यांने कोणी हा उद्योग केला असेल त्याचेवर कारवाई केली जाईल.

**सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी औचित्त्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी देत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मी येथे आमदारांशी निगडित असा विषय औचित्त्याच्या मुद्याच्या स्वरूपात मांडणार आहे. आमदार निवास, विशेष करून मनोरा आमदार निवासामध्ये सध्या जे पाणी दिले जाते त्याचा पुरवठा टँकरने केला जातो. तेथील उपहार गृहातील पदार्थांचा दर्जा देखील घसरलेला आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसामध्ये आमदार आणि त्यांचे बरोबर असलेली मित्रमंडळी वा कार्यकर्ते यांच्यापैकी जवळपास 8 ते 10 लोकांना गॅस्ट्रो सदृश्य लागण झालेली आहे. त्यामुळे तेथे जो पाण्याचा पुरवठा केला जात आहे तो कमीत कमी टँकरने होऊ नये याबाबत शासनाने काळजी घ्यावी.

**सभापती** : शासनाने याची नोंद घ्यावी.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, याबाबत काळजी घेतली जाईल.

**सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी परवानगी देत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, परवाच्या दिवशी या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अशासकीय ठरावाद्वारे राज्यातील क्रीडा म्हणजे खेळ आणि खेळाडू या संबंधात चर्चा उपस्थित केली असता पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुला संबंधात, तेथील एकूणच दुर्व्यवस्थे

...... आरआर 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आव्हाड ....

संबंधात चर्चा झाली होती. सभापती महोदय, या बालेवाडी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फ्लोअरींग करोडो रुपये खर्च करून तयार करण्यात आलेले आहे. ते संपूर्ण फ्लोअरींग लाकडाचे करण्यात आलेले आहे. सबंध भारतामध्ये इतरत्र कोठेही असे फ्लोअरींग उपलब्ध नाही. परंतु आता तेथील ते फ्लोअरींग काढून तेथे व्हॉलीबॉलचे खांब लावण्याचा प्रयत्न चालला असल्याची माहिती आताच मला मिळाली आहे. बालेवाडीतील संबंधित लोक या गोष्टीला विरोध करून संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना असे करू नये म्हणून विनवणी करीत आहेत. परंतु आपल्या शासनाचे काही अधिकारी मात्र त्यांना सांगत आहेत की, आम्ही आता हे फ्लोअरींग काढत असलो तरी तुम्हाला आम्ही ते परत लावून देऊ. दोन दिवसासाठी आम्हाला येथे व्हॉलीबॉलच्या स्पर्धा घेण्यासाठी खांब लावू द्यात. सभापती महोदय, करोडो रुपयांचे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फ्लोअरींग आहे पण आपण अशा प्रकारे निष्काळजीपणे त्याची वाताहात करू लागलो तर आपल्याकडील स्पोर्टस् आणि स्पोर्टस्मन कधीच पुढे येणार नाहीत. तेव्हा आपण हस्तक्षेप करून तेथील हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फ्लोअरींग काढले जाऊ नये अशी काळजी घ्यावी इतकीच मी आपल्याला या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो आहे.

**सभापती** : राज्य मंत्री डॉ. देशमुख यांनी या बाबतीत लक्ष घालावे आणि बालेवाडी येथील हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल आहे त्यातील प्रत्येक गोष्ट आंतरराष्ट्रीय दर्जाची बनविण्यात आलेली आहे हे लक्षात घेऊन त्याची प्रतिष्ठा राखावी.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, निश्चितपणे यामध्ये लक्ष घालून तेथील प्रतिष्ठा राखली जाईल.

**सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांना मी परवानगी देत आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक 28 जुलै रोजी होणार आहे. त्यासाठी निवडणुकीची प्रक्रिया देखील सुरू झालेली आहे. परंतु महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 मध्ये बदल करण्यात येतील आणि महाराष्ट्रातील 14 विद्यापीठांच्या अधिसभांच्या निवडणुका रद्द करून तेथे शासनाच्या वतीने सदस्य नियुक्त केले जातील असे वक्तव्य नुकतेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी केलेले आहे. सभापती महोदय, अशा प्रकारचा बदल झाला

..... आरआर 3 ..



KBS/KGS/MAP. श्री.गायकवाड नंतर --- 14:05

तर अधिसभेच्या निवडणुका रद्द करून शासनातर्फे तेथे सदस्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार असतील तर त्यामुळे पदवीधर आणि शिक्षक तसेच प्राचार्य यांचा निवडीचा जो अधिकार आहे, हा लोकशाहीचा अधिकार आहे, तो रद्द होईल. त्यामुळे शिक्षण ज्यांच्यासाठी असते, ते विद्यार्थी आणि शिक्षक यांना या निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधीच मिळणार नाही. त्यामुळे विद्यापीठांच्या अधिसभेच्या निवडणुका रद्द करून त्या ऐवजी शासन नियुक्त सदस्य येणे या बाबीकडे मी या सदनाचे या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधू इच्छितो आणि अशा प्रकारे काही आपण करू नये अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपणही याबाबतीत जातीने लक्ष द्यावे अशी मी आपणास विनंती करतो.

**सभापती** : शासनाने याची दखल घ्यावी.

डॉ. सुनील देशमुख : याची दखल घेण्यात येईल.

**सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची मी परवानगी देतो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मी एका महत्त्वाच्या विषयाबाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित करू इच्छितो. गेल्या तीन वर्षापासून मराठवाड्यामध्ये मंत्रिमंडळाची बैठक झालेली नाही. त्यासाठी अजून शासनाला मुहूर्त मिळालेला नाही. निवडणुकीच्या वेळेस आचार संहितेचे कारण दाखवून होणारी मंत्रिमंडळाची बैठक पुढे ढकलण्यात आली, ती अजूनही घेतली गेलेली नाही. आता सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री स्वत: उपस्थित आहेत. म्हणून त्यांचे समोर मी ही बाब मांडू इच्छितो. त्यांना विनंती आहे की, मराठवाड्याची अपेक्षा असलेली ही मंत्रिमंडळाची बैठक हवेप्रमाणे इकडे तिकडे न ढकलली जाता 17 सप्टेंबर हा जो मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन आहे त्या दिवशी निश्चितपणे दरवर्षी घेतली जावी आणि ती बैठकही केवळ एक दिवस उपचारा पुरती न घेता 3 दिवसांची बैठक घेतली जावी की ज्यामध्ये सगळ्या विषयांची सविस्तर चर्चा करता येऊ शकेल. तेव्हा ही बैठक घेतानाही त्याची रितसर घोषणा देखील विधीमंडळामध्ये केली जावी.

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक अतिशय चांगली अशी सूचना केली आहे. 17 सप्टेंबर हा दिवस आमच्या मराठवाड्याचा मुक्ती संग्राम दिन असतो. त्या दिवशी ही बैठक निश्चितपणे घेतली जाईल.

..... आरआर 4 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना मी परवानगी देत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये शासनाने असे जाहीर केले होते की, मुंबईतील डान्स बार बंदीचे विधेयक आम्ही आणू. ...

( यानंतर श्री. जागडे .... एसएस 1 ...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नीलम गो-हे ....

अधिवेशन सुरु होऊन 10 दिवस उलटून गेले आहेत. वर्तमानत्रातून आम्ही असे वाचले आहे की, डान्सबारबाबतचे विधेयक या अधिवेशनात आणले जाणार आहे. परंतु त्यांचा उल्लेख आजच्या बिजीनेसमध्ये नाही. आता दोन दिवसात हे अधिवेशन संपणार आहे. माननीय मुख्यमंत्री या सदनात आहेत. या विधेयकाच्या बाबतीत जनतेच्या भावना तीव्र असल्यामुळे या विधेयकाबाबत या सदनात केव्हा चर्चा होणार आहे तसेच या विधेयकाचे भवितव्य काय आहे ? या खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी केला तर बरे होईल.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, विधानसभेत हे विधेयक मांडण्यात आले आहे. त्या ठिकाणी विधेयक मंजूर झाल्यानंतर या सदनात चर्चेला येणार आहे. तसेच या अधिवेशनातच हे विधेयक मंजूर होणार आहे.

**सभापती** : आज मी अपवाद म्हणून पाच औचित्याच्या मुद्यांवर माननीय सदस्यांना बोलण्यास परवानगी दिली आहे. औचित्याच्या मुद्दांना जर परवानगी द्यावयाची असेल तर विशेष उल्लेख बंद करावे लागतील. म्हणून या बाबतीत मला सभागृहातील सर्व पक्षांच्या गटनेत्यांशी चर्चा करणे आवश्यक आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकआयुक्तांचे दिनांक 20 मे 2000, 17 मे 2001, 24 ऑक्टोबर 2001, 19 डिसेंबर 2001, 20 फेब्रुवारी 2002 व 29 ऑक्टोबर 2002 तसेच उप लोकआयुक्तांचे दिनांक 17 डिसेंबर 2002 चे दोन, 20 नोव्हेंबर, 2003 चे दोन व 29 डिसेंबर, 2003 विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक इ ापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लोकआयुक्तांचे दिनांक 20 मे 2000, 17 मे 2001, 24 ऑक्टोबर 2001, 19 डिसेंबर 2001, 20 फेब्रुवारी 2002 व 29 ऑक्टोबर 2002 तसेच उप लोकआयुक्तांचे दिनांक 17 डिसेंबर 2002 चे दोन, 20 नोव्हेंबर, 2003 चे दोन व 29 डिसेंबर, 2003 विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा सन 2001-2002 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा सन 2001-2002 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आश्वासनाची यादी सभागृहासमोर ठेवणे**

श्री. सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2005 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दिनांक 14 मार्च 2005 ते दिनांक 16 एप्रिल 2005 या कालावधीत मंत्री, राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण 845 आश्वासनाची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विधानपरिषदेच्या सन 2005 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दिनांक 14 मार्च 2005 ते दिनांक 16 एप्रिल 2005 या कालावधीत मंत्री, राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण 845 आश्वासनाची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे आश्वासनाची यादी छापावी. )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवणे**

श्री. सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन 1986 चे तिसरे अधिवेशन ते सन 2004 चे पाचवे अधिवेशन या कालावधीत विधानपरिषद सभागृहात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनावरील कार्यवाहीच्या माहितीची एकूण 187 विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन 1986 चे तिसरे अधिवेशन ते सन 2004 चे पाचवे अधिवेशन या कालावधीत विधानपरिषद सभागृहात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनावरील कार्यवाहीच्या माहितीची एकूण 187 विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : सोबत जोडलेली निवेदने छापावीत. )

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना.**

**सभापती :** माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर व इतर यांनी " अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात चिंताजनक अवस्थेतील कुपोषित बालकांच्या उपचाराबाबत तेथील वैद्यकिय अधिकारी व परिचारीका बेजबाबदारपणे वागत असल्यामुळे रुग्णांचे होत असलेले हाल " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व इतर यांनी " दिनांक 15.7.2005 रोजी उत्थन जिल्हा ठाणे येथे उच्चभ्रू वर्गासाठी असलेल्या रामरत्न विद्यामंदिर या शाळेत व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे एका विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. जयंत पाटील व इतर यांनी " विदर्भातील अनेक जिल्ह्यात गेल्या 24 तासात झालेल्या मुसळधार पावसाने 12 जणांचा मृत्यू होऊन 24 जण जखमी होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक व इतर यांनी " दिनांक 3.6.2005 रोजी मॅफको कंपनी बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे कर्मचा-यांवर कोसळलेले संकट " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

( यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती...**

माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी "दिनांक 19.7.2005 रोजी दहिसर चेकनाक्यावर गुजरात मधून आलेल्या हजारो लिटर दूधात आरोग्यास घातक असलेला कॉस्टीक सोडा आढळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "मच्छीमारांना देण्यात येणाऱ्या डिझेल वरील व्हॅट कर रद्द करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी "वरळी ते नरिमन पॉईंट सागरी पूलाच्या प्रकल्पाबाबत होत असलेला संशयास्पद व्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी "फर्ग्युसन कॉलेज पुणे येथील ग्रंथालयाच्या जुन्या मौल्यवान ग्रंथाच्या जळीत प्रकरणी कुठलीही चौकशी न करता सागर गाडवे या विद्यार्थ्यास कॉलेजमधून काढून टाकणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 22.2.2005 रोजी आंबे तालुका पंढरपूर जि. सोलापूर येथील उषा जगताप या विवाहितेचा सासरच्या मंडळींनी केलेल्या खून प्रकरणाचा अद्याप तपास न लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 च्या सूचनेसंबंधी</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी माझ्या नावावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. नागपूर महानगरपालिकेमध्ये 165 कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आली. या पदांवर सहा वर्षे काम केल्यानंतर महानगरपालिकेने त्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकले आहे. ते कर्मचारी आता कोर्टामध्ये गेले असून कोर्टाने त्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचा निर्णय दिला. कोर्टाने निर्णय दिलेला असतांना सुध्दा नागपूर महानगरपालिका त्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यास तयार नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे कुटुंब उध्वस्त झाले आहे. त्यासंबंधी शासनाकडून निवेदन झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना दाखल केल्यास मी ती प्राधान्याने घेण्याची व्यवस्था करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ठाणे जिल्हा सहनिबंधकांनी सुमारे 50 कोटींचा शोधून काढलेला भ्रष्टाचार.

मु.शी. : ठाणे जिल्हा सहनिबंधकांनी सुमारे 50 कोटींचा शोधून काढलेल्या भ्रष्टाचाराबाबत सर्वश्री.विनोद तावडे, नितीन गडकरी, अशोक मोडक, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री .विनोद तावडे, नितीन गडकरी, अशोक मोडक, मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी "ठाणे जिल्हा सहनिबंधक यांनी 2001 आणि 2003 या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर विभागातील सुमारे 50 कोटी रुपयांचा शोधून काढलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात संबंधित मजूर संस्थेची चौकशी केली आहे काय? व चौकशीनंतर पुढे कोणती कारवाई केली आहे?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या प्रकरणी चौकशी चालू आहे. महानगरपालिकेने पत्र दिले आहे त्यामध्ये त्यांनी किती संस्थांनी अशापध्दतीची कामे केली आहेत त्याची यादी दिली आहे. मूळ फेडरेशनचे जे फोर्जड लेटर असते त्यावर कामे दिली जातात. ते पत्र अजून दिलेले नाही. त्यामुळे पुढील कारवाई थांबलेली आहे. येत्या 15 दिवसात संपूर्ण चौकशी होऊन कारवाई केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : एका मजूर संस्थेने आपल्या नोंदणी क्रमांकाच्या आधारे बनावट सहया केल्याचे प्रकरण आहे. हे प्रकरण तुमच्या सहज लक्षात येईल. ही मजूर सहकारी संस्था ज्यांच्या नावावर काढली आहे त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. त्याची आपण चौकशी कसली करता? या बनावट सहया त्या मजूर सहकारी संस्थांनी केल्या आहेत की नाहीत?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : बनावट सहया केलेला एकही कागद अजून समोर आलेला नाही. श्री. मुजुमदार यांनी अशाप्रकारे बोगस कामांचे वाटप झाले असल्याबाबत ठाणे सहनिबंधकांकडे तक्रार केली. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात आला. या बाबतीत नगरपालिकेकडून जे मूळ पत्र किंवा फोर्जड पत्र असते ते खात्याकडे दिले गेले नाही. ते पत्र मिळाल्याबरोबर ताबडतोब कारवाई केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 93 ची सूचना लागल्यानंतर एवढया मोठया मजूर सहकारी संस्थेच्या बाबतीत भिवंडी महानगरपालिका अजूनपर्यंत शासनाला माहिती कां देत नाही? तुमच्या रेकॉर्डवर काही येत नाही हे योग्य आहे काय? या ठिकाणी 93 ची सूचना लागल्यानंतर महानगरपालिकेकडे जावून माहिती घेणे हे शासनाचे काम नाही काय? सभापती महोदय, नाहीतर आपण हे नियम 93 वरील निवेदन स्थगित करावे. महानगरपालिकेमध्ये जे काही घडले त्याची माहिती मिळाली नाहीतर आम्हाला प्रश्न विचारुन काय उपयोग आहे? महानगरपालिका तुम्हाला कां माहिती देत नाही?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : मी आता सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकेने कामांची यादी दिली. फेडरेशनने ती यादी तपासली असता त्यामध्ये साधारणपणे 1 कोटी 46 लाखांची कामे फेडरेशनने दिलेल्या पत्रामध्ये नाहीत. फेडरेशनने दिलेले पत्र वेगळे आहे. त्या व्यतिरिक्त संस्थेने जी कामे केली आहेत त्यासंबंधी फोर्जड पत्र असो किंवा मूळ पत्र असो, ते डी.डी.आर. कडे प्राप्त झ ााल्याशिवाय पुढील कारवाई करता येत नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर . . . .

शेवटी कार्यवाहीसाठी पुरावे लागतात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ते तुम्हाला कागदपत्रे का देत नाहीत ? याबाबतीत तुम्ही एवढे हतबल का झालेले आहात ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याबाबतीत महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार सुरु आहे. 15 दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण हे निवेदन राखून ठेवावे. महानगरपालिकेमध्ये दीड कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, तेथे गडबड घोटाळा झालेला आहे. याठिकाणी आम्ही या विषयासबंधात नियम 93 अन्वये सूचना दिली. त्याबाबतीत आपण शासनाला निवेदन करण्याचे आदेश दिले. अशा वेळी शासनाने महानगरपालिकेकडून माहिती घेऊन ती येथे द्यावयास हवी होती. माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, पत्रव्यवहार सुरु आहे. म्हणजे हे सर्व टाळण्याचा प्रकार आहे. आपण अशा लोकांना संरक्षण देण्याचे कारण काय आहे ?

**सभापती** : सहकार विभागाच्या संबंधातील माहिती जर कुठून मिळत नसेल आणि ती कुठेतरी दडविली जात असेल किंवा ती कुठेतरी नष्ट होण्याची शक्यता असेल तर सहकार कायद्याखाली तरतूद आहे की, या बाबतीत असिस्टंट रजिस्टार पोलिसांना कळवितो आणि मग आपण ती कागदपत्रे सहज उपलब्ध करु शकतो. अशा पध्दतीचा अवलंब करुन याबाबतची कागदपत्रे मिळविणार आहात का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सरकार कोणालाही पाठिशी घालत नाही आणि याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, भिवंडी नगरपालिकेकडून 25-4-2005 रोजी पत्रान्वये माहिती आलेली आहे. माहिती आली नाही असे नाही. ती माहिती आल्यानंतर चौकशी अधिका-यांनी दि.12-7-2005 च्या पत्रानुसार ठाणे जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थेला भिवंडी महानगरपालिकेकडून जी कामे दिलेली आहेत, त्याची तपासणी करीत आहेत आणि त्या तपासणीचा त्यांच्याकडून अहवाल यावयाचा आहे. भिवंडी महानगरपालिकेने . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी वेगळे सांगितले. त्यांनी असे सांगितले की, फेडरेशनने दिलेली यादी आहे,त्यातील 40 कामे यात जुळतच

. . . .2 यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

नाहीत. म्हणजे सकृतदर्शनी यात गडबड झाल्याचे मान्य केले आहे आणि ते रेकॉर्ड हे आणू शकत नाहीत. फक्त त्यांनी कामाची यादी आणली असेल.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, प्रश्न एवढाच आहे की, भिवंडी महानगरपालिके कडून जी माहिती हवी होती, ती माहिती दि.25-4-2005 च्या पत्राव्दारे प्राप्त झाली असता, चौकशी अधिकारी दि.12-7-2005 ठाणे जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था यांना भिवंडी महानगरपालिकेने जी कामे दिलेली आहेत, त्या कामाच्या शिफारस पत्राच्या सत्यप्रतीची चौकशी करीत आहेत. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी सांगत आहेत त्याप्रमाणे प्रकरण गंभीर आहे. म्हणून त्याची दखल शासनाने योग्य पध्दतीने घेतलेली आहे. याची चौकशी पूर्ण करुन यामध्ये जे कोणी दोषी असतील, कारण बहुतेक वेळा असे होते की, मजूर सहकारी संस्थेचा उपयोग, ज्या कारणासाठी आपण या मजूर सहकारी संस्था निर्माण केलेल्या आहेत, त्याच्यासाठी होत नाही ही गोष्ट आपल्याला मान्य केली पाहिजे. त्यामुळे केवळ मजूर संस्था आहे म्हणून काम लवकर मिळते आणि मग त्याची फारशी चौकशी करावी लागत नाही यासाठी एक अस्त्र म्हणून या संस्था वापरल्या जात आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय येथे आहेत ही चांगली गोष्ट आहे. मुळातच दि.27 जानेवारी 2005 रोजी श्री.निलेश मुजूमदार या व्यक्तीने तक्रार केलेली आहे. अशा वेळी असा पायंडा निर्माण करण्याची वेळ आली आहे की, चौकशीसाठी काही डेड लाईन असावी ? काही विशिष्ट मुदत असावी ? याठिकाणी उत्तरे देखील परस्पर विरुध्द दिली आहेत. आपण जे सांगितले ते बरोबर आहे. कारण कोकण विभागाच्या सहनिबंधकांनी, ठाणे जिल्हयांच्या सहनिबंधकांनी यात काहीतरी गौडबंगाल आहे, यात काहीतरी पाणी मुरत आहे हे मान्य केले आहे. हे मान्य केल्यावर येथे नियम 93 अन्वये सूचना दिली आणि त्याबाबतीत आपल्या कडून निवेदन अपेक्षित होते. पण दुर्दैवाने हे प्रकरण अजिबात पुढे गेलेले नाही हे आपणही मान्य कराल. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा की, यामध्ये जो विलंब झाला आहे, त्याची कारणे काय आहेत ? दुसरा प्रश्न असा की, जर 40 कोटी रुपयांची कामे मंजूर करुन घेतली असतील, मुळात याला एवढा विलंब का लागला याची कारणमिमांसा झाली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे मला 100 टक्के खात्री वाटते की, जर असाच विलंब लागला तर ती कागदपत्रे गहाळ होतील आणि ही समस्या आणखी जटील होऊ शकते. तेव्हा आपण याबद्दल कोणती दक्षता घेणार आहात ?





असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, कामे वाटपाच्या संदर्भात सांगावयाचे तर तेथील डी.डी.आर. हा त्या कमिटीचा अध्यक्ष असतो आणि खरे म्हणजे कामाच्या संदर्भातील माहिती सहनिबंधकांकडे डी.डी.आर.मार्फत उपलब्ध होऊ शकते. कारण कोणती कामे कोणाला द्यावयाची याचा निर्णय महानगरपालिका घेत नाही. तर तो निर्णय डी.डी.आर.घेतो. म्हणून कामे वाटपाच्या बाबतीत अमुक कामे अमुक सोसायटीला द्या असे पत्र डी.डी.आर.देत असतो.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे.. 14:25

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु...

डी.डी.आर. महानगरपालिकेकडे ते देतात ही वस्तुस्थिती आहे. म्हणून महानगरपालिकेने कोणाला कामे दिली याबाबतची सगळी माहिती डी.डी.आर. यांच्याकडून उपलब्ध करुन घेऊ शकतो. डी.डी.आर. यांच्याकडे कामांची यादी उपलब्ध होऊ शकते, त्या पध्दतीने कार्यवाही केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : साधरणत: कामाची यादी कमिटीमार्फत होते. या कमिटीचे अध्यक्ष डी.डी.आर. असतात आणि इतर फेडरेशनचे चेअरमन सदस्य असतात, कार्यकारी अभियंता आणि लेखा परीक्षक हे सदस्य असतात. या समितीसमोर महानगरपालिकेची कामे येऊन त्या कामांचे वाटप झालेले आहे. त्याप्रमाणे कामे न देता महानगरपालिकेने डायरेक्ट कामे दिलेली होती काय ?

श्री.जयप्रकारश दांडेगावकर : त्याची चौकशी चालू आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले त्याप्रमाणे चौकशीनंतर डी.डी.आर.यांनी दिलेली कामे आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेने कामे दिलेली आहेत की नाहीत हे कळेल.

श्री.जयंत प्र.पाटील :महानगरपालिकेला कामे देण्याचा अधिकारच नाही. डी.डी.आर. यांच्याकडूनच कामे वाटप होतात.

श्री.विलासराव देशमुख : हे आदेश सहकार खात्याने दिलेले आहेत. शेवटी त्यांचे उत्तर दुरुस्त करण्यासाठीच मी आहे.

श्री.नितीन गडकरी : मग मी अधिक माहिती देतो. श्री.अनिल मुंबईकर आणि श्री.संभाजी यादव या दोघांविरुध्द क्रिमिनल प्रोसिजर कोड खाली कारवाई सुरु झालेली आहे. ही माहिती लपविण्याचा प्रयत्न होत आहे, हे बरोबर नाही. तीन वर्षामध्ये 50 कोटी रुपयाचे प्रकरण झालेले आहे. महानगरपालिका, राजकीय प्रतिनिधी यांनी केलेला घोटाळा याबाबत बोलतो. अर्धवट माहिती देऊन आजची वेळ निभावून नेली जात आहे. पण मुख्यमंत्री महोदय, हे सगळे प्रकरण गंभीर आहे. त्या माणसांना एक प्रकारचे अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळते, ही गोष्ट योग्य होणार नाही. कारण की, हे प्रकरण 50 कोटीचे आहे. यामध्ये अनेक लोक गुंतलेले आहेत त्यांची माझ्याकडे नावे आहेत. मंत्री महोदय सांगतात की रजिस्टारकडे सगळी माहिती आहे परंतु महानगर पालिकेला त्यांनी अजूनही कागद दिलेले नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदय जे सांगतात ते बरोबर आहे. डी.डी.आर. यांच्या पत्राप्रमाणे कामाचे वाटप झालेले आहेत काय? किती सोसायट्यांना कामे दिलेली आहेत, या बाबतची चौकशी सुरु आहे व त्या चौकशी अहवालाची वाट पहातो आहोत. मला वाटते, हे प्रकरण गंभीर आहे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही, कोणाला पाठीशी घालण्याचे कारण नाही. म्हणून ताबडतोबीने चौकशी करुन त्याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. या प्रकरणी नेमकी काय कारवाई केली याबाबत सदनालासुध्दा माहिती मिळाली पाहिजे, या भूमिकेचा मीही आहे.

--

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये मागासवर्गीय शिक्षकांची भरती न करणे.

**मु.शी.** : रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये मागासवर्गीय शिक्षकांची भरती न करणे, याबाबत मा.सदस्य श्री.रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मा.सदस्य श्री रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक,वि.प.स. यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये मागासवर्गीय शिक्षकांची भरती न करणे, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील मागासवर्गीय शिक्षकांच्या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे ते गोलमाल करणारे आहे. हे उत्तर दिशाभूल करणारे आहे. मला या संदर्भातील पार्श्वभूमी सांगितले पाहिजे.10 मार्च 2000 च्या शासन निर्णयानुसार शिक्षण सेवकांसाठी भरती सुरु झाली. रायगड जिल्हापरिषदेने 1700 रिक्त पदे भरण्याच्या संदर्भाने जाहिरात दिली, वेगवेगळ्या एजन्सीकडून उमेदवाराची नावे मागविली आणि मुलाखती घेऊन यादी तयार केली. ही यादी तयार झाल्यानंतर शासनाने या यादीला स्थगिती दिली. त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर हे प्रकरण सुनावनीसाठी आले. या खंडपीठाने 10 मार्च 2000 च्या शासन निर्णयाप्रमाणे तयार करण्यात आलेल्या यादीप्रमाणे शिक्षकांना नेमणुका द्याव्यात अशाप्रकारचा आदेश दिलेला होता, हे खरे आहे काय ?

यानंतर कु.थोरात.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KGS/ MAP/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार..... 14:30

श्री. रणजित कांबळे :सभापती महोदय,"होय".

श्री. रामनाथ मोते : उच्च न्यायालयाने त्याच यादीतील शिकक्षकांना नेमणूक देण्याचे आदेश दिलेले असतांना जिल्हा परिषदेने परत एकदा इंटरव्हयूचे आदेश काढून त्या यादीतील शिक्षकांना नेमणूक न देता नवीन शिक्षकांची यादी कोणत्या आधारावर तयार केली?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माझे आगोदरचे उत्तर थोडे चुकले आहे. ट्रेड आणि अनट्रेंड शिक्षक घ्यावयाचे काय?यासंबंधात हायकोर्टमध्ये प्रश्न असा होता. हायकोर्टाच्या निर्णयानुसार फक्त ट्रेंड शिक्षकांची नियुक्ती आपण करु शकतो. त्यामुळे त्यानंतर पुन्हा एकदा इंटरव्हयूचे आदेश काढावे लागले.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पुन्हा इंटरव्हयूचे आदेश काढल्यानंतर ट्रेंड शिक्षकांना नियुक्ती दिली काय? उरलेले जे शिक्षक होते ते अनट्रेंड शिक्षक होते काय?

श्री. रणजित कांबळे : जे शिक्षक डी.एड. क्वालिफाईड आहेत, त्यांना घेऊ शकतो असे आदेश हायकोर्टाने दिलेले आहेत. त्याप्रमाणे 42 शिक्षकांची नियुक्ती झाली. त्यानंतर आता नवीन इन्टव्हर्यु बोलावली आणि ती इन्टव्हर्यू झालेली आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की," 42 प्रशिक्षित उमेदवारांना नेमणुका देऊन उर्वरित 668 अमेदवारांना नेमणुका देण्याची प्रक्रिया पुढील प्रमाणे सुरु केलेली आहे."उर्वरित 668 उमेदवार अप्रशिक्षित आहेत काय?

श्री. रणजित कांबळे : 668 रिक्त पदे आहेत. त्यासंदर्भात जी नियुक्ती होणार आहे ती फक्त डी.एड.झालेले शिक्षक आहेत त्यांचीच नियुक्ती होणार आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, त्या नियुक्तीला शालेय शिक्षण विभागाने स्थगिती कां दिली? हे मागासवर्गीय शिक्षक असतील व प्रशिक्षित शिक्षक मिळत नसतील तर अशा वेळी शालेय शिक्षण विभागाने त्या भरतीला स्थगिती कां दिली? श्री. दिवाकर रावतेसाहेब या ठिकाणी प्रत्येकवेळी प्रश्न विचारात की, विद्यार्थ्यांना लेखन, वाचन येत नसेल तर मग हे शिक्षक काय करतात? या ठिकाणी 668 शिक्षक चार वर्षापासून नियुक्त केले नसतील तर त्या मुलांना लेखन व वाचन कसे येईल? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, तपासून सांगतो.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, शासनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावा यासाठी माझा प्रश्न असा आहे की, जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांची निवड करतांना डी.एड.चे पर्सेंटेज बघितले जाते. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व आता त्यामध्ये रायगडसुध्दा आहे. आदिवासी जिल्हयांमध्ये डी.एड. क्वालिफाईड उमेदवार पर्सेंटेजमध्ये बसत नाहीत. त्यामुळे त्या ठिकाणी मुंबई किंवा पुण्यातील संस्कृत शिक्षक गडचिरोली, गोंदियामध्ये भरले जातात. म्हणून मी मागच्यावेळी सुध्दा प्रश्न विचारला होता की, ही भरती करतांना त्या त्या जिल्हयातील उमेदवांरासाठी काही पर्सेंटेज दिले जाईल काय? त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय, श्री. आर.आर.पाटील यांनी उत्तर देतांना "होय, या संदर्भात निश्चित विचार करु". असे म्हटले होते. आजही हा विचार करण्यासारखी ही बाब  आहे. शिक्षकांच्या नियुक्त्या करतांना त्या त्या जिल्हयाला प्राधान्य देऊन त्या नियुक्त्या केल्या जातील काय? आणि त्या जिल्हयाला काही पर्सेंटेज दिले जाईल काय?

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक ठिकाणच्या संस्थांची ही मागणी आहे हे खरे आहे.मी यासंदर्भात आजच माननीय शिक्षण मंत्र्यांशी बोललो आहे. त्यांची सूचना अशी आहे की,महाराष्ट्रात ही शिक्षक भरती एकाच दिवशी ठेवली तर अशा प्रकारचा प्रश्न येणार नाही. त्याप्रमाणे ही शिक्षक भरती करण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, पहिली यादी जी तयार झाली ती 10 मार्च, 2000 च्या जी.आर.नुसार तयार झाली. मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी डी.एड. उमेदवार मिळाले नाहीत म्हणून त्या राखीव प्रवर्गातील अप्रशिक्षित उमेदवार नेमले. त्याला स्थगिती देण्यात आली. यासंदर्भात कोर्टाने जो आदेश दिला तो मी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "We direct that at the first instance all those candidates who were in the first select list prepared as per the impugned provisions of clasue 13 of Shikshan Sevak Scheme shall be issued appointment orders and in case there are any further vacancies in the concerned Zilla Parishad, the candidates selected pursuant to selction process undertaken as per government resolution dated 12 July, 01, shall be issued appointment orders strictly as per merit list..." आता त्यांनी परत भरती केली आहे. आता या ठिकाणी चुकीचे आणि देशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. 668 शिक्षक घेतले त्यामध्ये 475 शिक्षक मागासवर्गीय आणि अप्रशिक्षित आहेत. असे शिक्षक नेमलेले आहेत. मग या 620 मध्ये असे शिक्षक का नेमत नाही ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यामध्ये कायदेशीर बाब तपासून आम्ही निर्णय घेऊ.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले की, यामध्ये कोर्टाने निर्णय दिलेला आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, कोर्टाचा अवमान होणार नाही यादृष्टीने दखल घेऊ आणि कायद्यामध्ये जी तरतूद आहे त्याप्रमाणेच आम्ही करणार.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ. शी.** : पुणे जिल्हयातील भीमाशंकर (तीर्थक्षेत्र) विकासाअंतर्गत रस्त्याच्या कामाच्या बाबतीत निविदा मागविण्यात होणारी दिरंगाई.

**मु. शी.** : पुणे जिल्हयातील भीमाशंकर (तीर्थक्षेत्र) विकासाअंतर्गत रस्त्याच्या कामाच्या बाबतीत निविदा मागविण्यात होणारी दिरंगाई याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( पर्यटन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे यांनी "पुणे जिल्हयातील भीमाशंकर (तीर्थक्षेत्र) विकासाअंतर्गत रस्त्याच्या कामाच्या बाबतीत निविदा मागविण्यात होणारी दिरंगाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

RDB/ SBT/ MHM/

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, भीमाशंकर येथील 25 किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी ऑगस्ट महिन्यामध्ये 90 लाख रुपये मंजूर केले परंतु अद्यापही ते काम सुरु झाले नाही. या ठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, वरील कामाच्या निविदा विक्रीचा कालावधी 30.8.2004 ते 12.3.2005 असा होता. 1 कोटीचे काम कंत्राटदाला फोन करुन ठरलेल्या लोकांना मिळण्यासाठी कसा खटाटोप केला याचे दृश्य यामध्ये दिसते. यामध्ये असे म्हटले आहे की, निविदा विक्रीचा कालावधी सहा महिन्यांचा होता. जगामध्ये कोठेही निविदा विक्रीसाठी सहा महिन्यांचा कालावधी देत नाही. तो कालावधी का दिला ? त्या ठिकाणी दुसऱ्या वेळी आपण निविदा मागविल्या आणि त्या सुध्दा अडीच महिन्यानंतर मागविल्या. पहिल्या निविदेची मर्यादा 12.3.2005 ला संपली. यामध्ये एक कोटीचे काम होते. या कामाची अर्जेन्सी होती. कामाला मंजुरी दिली होती. निधी सुध्दा ऑगस्ट महिन्यामध्ये वितरित केला होता. परंतु निविदा मागविण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागण्याचे कारण काय ? महाराष्ट्रामध्ये एक कोटीचे काम घेण्यास कोणीही कंत्राटदार तयार नाही ही बाब मला कळत नाही. मी व्यक्तिगत चौकशी केली तेव्हा असे उत्तर देण्यात आले की, कोणीही काम करण्यास पुढे आले नाही. माझा प्रश्न असा आहे की, सहा महिन्यांचा कालावधी का दिला ? कोणीही निविदा देण्यास तयार नाही हे तुमच्या लक्षात आल्यानंतर मग शासन अडीच महिने का थांबले ? याबाबतीत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पहिली जी टेंडर प्रोसेस केली त्यामध्ये 25.8.2004 रोजी टेंडर काढले. तीन कंपन्या फॉर्म घेऊन गेल्या परंतु कोणत्याही कंपनीने फॉर्म भरुन टेंडरमध्ये भाग घेतला नाही. त्यानंतर 31.5.2005 ला रिटेंडर केले.

श्री. मधुकर चव्हाण : सहा महिन्यांचा कालावधी का लागला ?

श्री. सुरेश शेट्टी : या टेंडर प्रोसेसमध्ये टेंडर फॉर्म ऑगस्ट 2004 मध्ये घेऊन गेले. तीन लोक फॉर्म घेऊन गेले. त्यावेळी टेंडरची शेवटची तारीख 23 मार्च, 2005 होती. कोणीही टेंडर भरले नाही. त्यानंतर 31.5.2005 ला रिटेंडर केले. दोन महिन्यामध्ये रिटेंडर केले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

आता टेंडरची सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली आहे आणि आठ दिवसामध्ये वर्क ऑर्डर देणार आहोत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निविदा मागविण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी का देण्यात आला ? कोणाला रिंग करुन कॉन्ट्रॅक्ट देण्यासाठी हा कालावधी दिला होता काय ? हा अवधी सहा महिने का देण्यात आला, नियमाप्रमाणे सहा महिन्यांचा कालावधी देता येतो काय ? कोण येत आहे काय, कोण येत आहे काय, टक्केवारी देतो का, यासाठी इतका कालावधी दिला होता काय ?

श्री.सुरेश शेट्टी : मा.सदस्य म्हणत आहेत ते चूक आहे, टेंडर सिंडिकेट वगैरे काही नाही. दोन्ही वेळेस टेंडर्स 4-4 वर्तमानपत्रातून खुली जाहिरात देवून मागविली होती. यामध्ये पारदर्शक प्रकिया पार पाडलेली आहे. यामध्ये कोणताही गोंधळ झालेला नाही, या कामाचे आठ दिवसामध्ये वर्क ऑर्डर इश्यू करणार आहोत.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मा.सदस्य म्हणत आहेत ते योग्य आहे. कारण येथे असे म्हटले आहे की, "कामाच्या निविदा विक्रीचा कालावधी दि.30.8.2004 ते दि.12.3.2005 असा हा कालावधी आहे." केवळ निविदा देण्यासाठीचा हा कालावधी सहा महिन्याचा आहे तो अनावश्यक आहे या मताशी सरकार सहमत आहे. खरे म्हटले तर पुढील प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. वर्क ऑर्डर देण्यापर्यंत प्रकरण आलेले आहे. परंतु हा सहा महिन्याचा कालावधी दिला होता त्याची अवश्य चौकशी करु, कारण निविदा देण्यासाठी 6-6 महिने देणे योग्य नाही असे माझे मत आहे. ज्या विभागाने सहा महिन्याचा कालावधी दिला असेल त्याची चौकशी करु.

-----

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अलिबाग तालुक्यातील भातशेती खरेदी करताना दलालामार्फत झालेले बोगस व्यवहार.

**मु.शी.** : अलिबाग तालुक्यातील भातशेती खरेदी करताना दलालामार्फत झालेल्या बोगस व्यवहारासंबंधी सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अलिबाज तालुक्यातील (जि.रायजड) मौजे सारळ, हाशिवरे, सो□जाठा, माजुळे, □ारंजीजार, रामजोठा येथील अ□ेज शेतज्यांची भातशेती जरेदी जरता□ा दलालामार्फत झालेले बोजस व्यवहार, ज्यांच्या □ावे जमि□ी जरेदी जरज्यात आल्या ते सुमारे 36 इसम ज्या ठिजाजी वास्तव जरतात असे दाजवले ते त्या ठिजाजी वास्तव्यास □सजे, जरेदी व्यवहारात अपूर्ज व्यवहार ठेवजे, अ□ेज शेतज्यां□ा अ□ामत रजमेपोटी देज्यात आलेले चेज □ वटजे, दि□ांज 4 फेब्रुवारी, 2005 रोजी तलाठी सजा रांजजजार व हाशिवरे येथे झालेले व्यवहार, अपूर्ज जरेदी जत असतां□ा ते 7/12 उताऱ्यावरील □ोंद फिरविज्याजरीता दाजल जरजे, याबाबत संबंधित शेतज्यां□ा वृत्त समजताच दि□ांज 21 फेब्रुवारी, 2005 रोजी शेतज्यां□ी संबंधित तलाठी सजां□ा जावू□ हरजती दाजल जरजे, तसेच यासंबंधी लोजप्रतिि□धी□ी दि□ांज 21 फेब्रुवारी, 2005 रोजी जिल्हाधिजारी रायजड, अलिबाज यां□ा पत्र देवू□ या प्रजरजांची चौजशी जरज्याबाबत माजजी जरजे, बोजस जरेदी व्यवहार व त्या अ□ुषंजा□े जरेदी जत जरता□ा एज जरेदीदार श्री. मि□ेशभाई म□ोहरलाल शहा, मुंबई यांचा पत्ता अलिबाज मांडवी मोहल्ला दाजवू□ शहा यां□ी एजा दलालामार्फत बोजस □ावे पवार, बदाजे, □िजम इत्यादी दाजवू□ त्यांच्या □ावे जरेदी जरजे व श्री.मि□ेशभाई शहा यां□ी वरील इसमाचे अजत्यारी दाजवू□ जेमचंद शर्मा, चरजजित सिंह व श्री.ढपाळ यां□ा विजजे, परंतू अद्यापही जरेदी जरज्यात आलेली जमी□ मूळ मालजांच्या □ावे असू□ तशी 7/12 उताऱ्यावर □ोंद असजे, तसेच मौजे सारळ येथील सर्व्हे □ं. 283 ही जमी□ □ोंदजीजृत जरेदी जता□ा श्री.संजीव □ारायज □ायर यां□ी विजत घेजे, त्या जमि□ीवरील मूळ मालजाचे □ाव

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.जयंत प्र.पाटील......

जमी□ होता अजत्यारी म्हजू□ श्री.मि□श शहा यांचा भाऊ □जील म□हरलाल शहा यां□ी विष्जू प्रसाद ढपाळ यां□ा विजजे, यासंबंधी झालेल्या जरेदी जताची वेळ रात्रौ 8 वाजू□ 6 मि□टे 15 सेजंद अशी जरेदी जतात दाजविजे, रजिस्टर जरेदी जतामध्ये जरेदीदारांचा फोटो संजजजीय असजे व जमि□ीची विज्री जरजा-याचे फोटो संजजजीय □सू□ पासपोर्ट आजारांचा फोटो जरेदी जतावर चिजटवजे, अशा पध्दती□ जमी□ जरेदीचे अ□ज बोजस व्यवहार या परिसरात घडजे, या सर्व प्रजारात शेतजऱ्यांची दलाल, महसूल जाते आजि दुय्यम □बंधज, अलिबाज यांच्याजडू□ फसवजूज होजे, त्यामुळे या परिसरातील शेतजऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असू□ शेतजऱ्यांचा शासजीय यंत्रजेवरील विश्वास उडजे, सबब शास□ा□ याबाबत जेलेली व जरावयाची उपाययोज□ा आजि शास□ाची प्रतिज्रिया."

श्री.विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील मौजे माणकुळे, सारळ, हाशिवरे, सोनकाठा, नारंगीखार आणि रामकोठा या भागामध्ये 2000 एकर जमीन बोगस नावाने खरेदी केली आहे, ज्या व्यक्ती या पृथ्वीलावर अस्तित्वातच नाहीत त्यांच्या नावावर या जमिनी खरेदी केल्या आहेत. बोगस फोटो कागदपत्रांवर लावले गेले. मी आणखी नावे देवू शकेन. 1994 साली खरेदी केलेल्या जमिनींचे फेरफार केले नाहीत. परंतु गेल्या दोन महिन्यापूर्वी असा फेरफार करण्याचा प्रयत्न तहसील कार्यालयातून होत आहे यासाठी मी आमदार म्हणून तहसीलदारांना पत्र दिले आणि हे फेरफार करण्याची कार्यवाही ताबडतोब थांबवावी अशी मागणी केली होती. या व्यवहारामध्ये अलिबाग शहरामधील जे पत्ते दाखविले आहेत ते बोगस आहेत. या देशातील कायद्याप्रमाणे फक्त जम्मू व काश्मीरमधील माणूस किंवा व्यक्ती ही हिंदुस्थानामध्ये बाकीच्या ठिकाणी जमीन खरेदी करु शकत नाही. नेपाळच्या म्हणजे परदेशातील लोकांचीही यामध्ये नावे आहेत म्हणून हया सर्व खरेदीच्या व्यवहारातील कागदपत्रे, दस्तऐवज शासन रद्द करणार आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मुळामध्ये हा जो व्यवहार त्या भागामध्ये झालेला आहे आणि त्यासंबंधी संबंधित मा.सदस्यांनी त्याची तक्रार केलेली आहे म्हणून 144 प्रकरणांपैकी 22 प्रकरणांबाबत शासनाने नोटिसा दिलेल्या आहेत. मा.सदस्यांनी मांडलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. त्या भागातील जमिनीला भविष्यामध्ये अधिक किंमत मिळण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन असे व्यवहार अनेक भागामध्ये होऊ लागले आहेत. आपला मूळ कायदा असा आहे की, जमीन खरेदी करणारा शेतकरी असावयास पाहिजे. परंतु खरेदीचे व्यवहार करीत असताना त्यासंबंधीचा पुरावा मागितला जात नाही. त्यामुळे ते व्यवहार पूर्ण होतात आणि नावावर जमीन करण्याचा प्रसंग येतो त्यावेळी तो शेतकरी आहे की नाही याची चौकशी होते. याप्रकरणाची आम्ही जरुर उच्चस्तरीय चौकशी करु. त्यासंदर्भात चुकीचे व्यवहार झाले असतील तर ते सर्व व्यवहार आम्ही रद्द करु. परंतु मुळामध्ये यापुढच्या काळामध्ये जो जमीन खरेदी करणार आहे त्याच्याकडे 7/12 आहे की नाही, हे पाहूनच व्यवहार केले जातील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अलिबागमध्ये 1994 मध्ये गुरुजी नावाचे हॉटेल उभे राहिले. ते लोक संपूर्ण रजिष्ट्रारचे ऑफिसच घेऊन गेले. संगणक, स्टॅम्प वगैरे सगळे घेऊन गेले.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 14:45

(श्री. जयंत प्र. पाटील पुढे सुरु...)

त्या ठिकाणी ऑफिस उघडून रात्री 12.00 वाजेपर्यन्त दस्तऐवज रजिस्टर करण्याचे काम चालू होते. तेव्हा ज्या अधिका-यांनी दस्त ऐवज रजिस्टर केलेली आहेत त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे की नाही ?

श्री. विलासराव देशमुख : चौकशी नंतर जे जे कोणी दोषी आढळतील त्यांच्या विरुध्द कारवाई केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : हे सर्व प्रकरण मी वाचलेले आहे. एकंदरीत हे प्रकरण सरळ नाही. नील फायनान्स सर्व्हिसेस नावाची कंपनी आहे. त्यांनी चेक देऊन हे व्यवहार केलेले आहेत. शासन आपल्या दारी याप्रमाणे हॉटेलमध्ये बसून, शिक्के मारुन हे व्यवहार झालेले आहेत. गेल्या काही वर्षापासून नवी मुंबई आणि मुंबई परिसरामध्ये, मुंबई मेट्रोपोलिटन ऐरियामध्ये मोठ्या प्रमाणावर जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार सुरु झालेले आहेत. जमीन विकत घेतली जाते. रेडिरेकनरनुसार त्या जमिनीची किंमत जास्त असते म्हणून नंतर ती जमीन म्हाडाला विकली जाते. अशा मोठ्या लॅण्ड स्कॅण्डलच्या घटना घडलेल्या आहेत आणि त्याची कागदपत्रे माझ्याकडे आलेली आहेत. हे लॅण्ड स्कॅण्डल अधिका-यांच्या संगनमताने होत आहे. या व्यवहारातील काही माणसे लापता आहेत, काही माणसे अस्तित्वात नाहीत. नससिंगराव हे एक अशा प्रकरणातील आरोपी आहेत. हे सर्व प्रकरण एकट्या महसूल खात्याच्या चौकशीचे नाही. यामध्ये क्रिमिनल प्रोसिजर कोड प्रमाणे फसवणुकीचे अनेक प्रकार घडलेले आहेत. त्यामुळे हे प्रकरण पोलिसांकडे देऊन सी.आय.डी.मार्फत इन्व्हेस्टिगेशन करण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणी 420 कलम लागेल. तेव्हा या प्रकरणी पोलिसांकडून चौकशी करुन काय कारवाई केली याची माहिती सभागृहासमोर ठेवावी अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख : या प्रकरणी जे व्यवहार झालेले आहेत त्याची मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रथम चौकशी करु. त्या चौकशीमध्ये काही आक्षेपार्ह आढळले तर पुढे पोलिसामार्फत देखील चौकशी करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. नितीन गडकरी : या प्रकरणी 36 लोक असे आहेत की, ते अस्तित्वातच नाहीत. माझ्याकडे या 36 लोकांच्या नावांची यादी आहे. हे 36 लोक पृथ्वीवर अस्तित्वात नाहीत. श्री. नूर जहाँगीर सय्यद हा जमिनीची किंमत ठरवून शेतक-यांना पैसे देण्याचे काम करीत होता. फसवणूक झालेल्या शेतक-यांनी दिनांक 21.2.2005 रोजी दोन्ही तलाठी सजांना जाऊन फेरफार व नावे समाविष्ट करण्याबाबत हरकती दाखल केल्या. या प्रकरणामध्ये क्रिमिनल कॉन्स्पीरसी आहे. या प्रकरणामध्ये मुंबईतील मोठे लॅण्ड माफिया सामील झालेले आहेत. या माफियांना कळत न कळत संरक्षण मिळते. म्हणून या माफियांना एक्स्पोज करुन त्यांच्यावर क्रिमिनल प्रोसिजर कोड प्रमाणे कारवाई करावी. मागील वेळेस मी सभागृहामध्ये नाफ्ता आणि रॉकेलच्या संदर्भात खोटे सी फॉर्म कसे भरले जातात ते उघड केले होते. हे जमीन व्यवहाराचे प्रकरण देखील अतिशय गंभीर आहे. या प्रकरणी महसूल विभागाकडून एका महिन्यात रिपोर्ट घेऊन त्यामध्ये सर्व गोष्टी समोर आल्यानंतर पोलिसांकडे हे प्रकरण देऊन संबंधितांवर कारवाई करावी आणि त्याची माहिती सभागृहाला द्यावी अशी माझी मा.मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख : मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्या प्रमाणे ही गोष्ट शासनाने गांभीर्याने घेतलेली आहे. मुळामध्ये जमिनीच्या रजिस्ट्रेशनसंबंधीच्या ज्या काही अटी आणि शर्थी आहेत त्या अजून सुस्पष्ट नाहीत. महाराष्ट्रामध्ये, जो शेतकरी आहे त्यालाच जमिनीच्या खरेदीचे व्यवहार करता येतात. जो शेतकरी नाही त्याला जमीन खरेदी करता येत नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 14:50

श्री. विलासराव देशमुख...

असा आजचा नियम आहे. तो शेतकरी आहे की नाही याचा पुरावा रजिस्ट्रेशनच्या वेळेला मागितला जात नाही. उद्या मला जमीन घ्यावयाची असेल तर किमान माझ्याकडे 7/12 चा उतारा मागितला गेला पाहिजे.आज ती व्यवस्था नसल्यामुळे कुठलेही डाक्युमेंट कोणाच्याही नावावर रजिस्टर केले जात आहे. रजिस्टर करणे एवढाच त्यामागचा मुख्य उद्देश असल्यामुळे आजच्या नियमाप्रमाणे त्याला कुठल्याही डाक्यूमेंटची मागणी करण्याचे आपल्याकडे नियम नाहीत. म्हणून आम्ही आता असा नियम कंपलसरी करतो आहोत की, कोणा एखाद्या व्यक्तीला जमीन खरेदी करावयाची असेल त्याच्या नावावर किमान अर्धा एकर किंवा 20 गुंठे तरी जमीन असली पाहिजे. त्यासंबंधीचा पुरावा त्याने दिला तरच जमिनीचा व्यवहार रजिस्टर केला जाईल. अशी अट आता आम्ही प्रस्तावित करीत आहोत. आपण सांगितल्याप्रमाणे महिन्याभरात यासंबंधीची चौकशी पूर्ण करु. त्यात काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या तर पोलीस विभागामार्फत देखील चौकशी केली जाईल.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रादेशिक रुग्णालयास आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून निधी उपलबध करुन देण्यास मान्यता देणे

**मु. शी.** : नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रादेशिक रुग्णालयास आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून निधी उपलबध करुन देण्यास मान्यता देणे यासंबंधी सर्वश्री.नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,सागर मेघे,जगदिश गुप्ता,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" कॅन्सर रिलिफ सोसायटीव्दारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रादेशिक रुग्णालय,नागपूर गेल्या 30 वर्षापासून सुरु असणे,या रुग्णालयात महाराष्ट्राबरोबरच मध्यप्रदेश,छत्तीसगड,या राज्यातून उपचारासाठी रुग्ण दाखल होणे,या रुग्णालयास केंद्र शासनाने प्रदेशिक कर्करोग केंद्राचा दर्जा दिलेला असून राज्य शासनाने दुसरे प्रादेशिक केंद्र म्हणून मान्यता देणे,उक्त संस्थेस आधुनिकीकरण व विस्तारीकरणासाठी राज्य शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त न होणे, मध्यप्रदेश राज्यातील योगीराज हॉस्पीटल व मेडीकल डायग्नोस्टिक सेंटर,नर्सिंग सेंटरच्या विस्तारीकरण व बांधकामासाठी लोकप्रतिनिधींनी स्थानिक विकास निधीतून निधी उपलब्ध करावा अशा प्रकारचे आदेश मध्यप्रदेश शासनाने दिनांक 3 मार्च 2003 रोजी निर्गमित केलेले असणे,त्याच धर्तीवर राज्य शासनानेही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रादेशिक रुग्णालयास आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून निधी उपलब्ध करुन देण्यात मान्यता देण्यात यावी अशी मागणी तत्कालीन विरोधी पक्षनेते यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राव्दारे करणे, याप्रकरणी अद्यापपर्यन्त कोणतीही कारवाई न झाल्यामुळे या रुग्णालयाच्या आधुनिकीकरणास व विस्तारीकरणास अडथळे निर्माण होणे, मध्यप्रदेश शासनाचे धर्तीवर या रुग्णालयास मदत करण्यास आमदारांच्या स्थानिक

3..



ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 14:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकास निधीतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कॅन्सर रिलीफ सोसायटी व्दारा संचलित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रादेशिक रुग्णालय,नागपूर हे गेल्या 30 वर्षापासून सुरु आहे. या रुग्णालयात महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या राज्यातील रुग्ण येतात. केंद्र शासनाने या रुग्णालयास प्रादेशिक कर्करोग केंद्राचा दर्जा दिलेला आहे. विभागीय आयुक्त याचे अध्यक्ष आहेत. नागपूरचे पालकमंत्री श्री. चतुर्वेदी साहेब या ठिकाणी बसलेले आहेत त्यांना या रुग्णालयाची पूर्ण माहिती आहे. या ट्रस्टचे अध्यक्ष आणि ट्रस्टींना सोबत घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे की, विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड येथील कॅन्सर झालेल्या रुग्णांना मुंबईतील टाटा रुग्णालयात येणे अडचणीचे होते. हे रुग्ण मुंबईत आल्यानंतर त्यांना राहण्याची व्यवस्था नसते, अनेक अडचणी या रुग्णांना मुंबई शहरात येतात. या रुग्णालयाचा 8 कोटी रुपयांचा एक्स्पांशन प्लॅन आहे. ज्यामुळे गरीब रुग्णांना सोयी सवलती उपलब्ध होणार आहेत. या एक्स्पांशन प्लॅनच्या कामाकरिता विदर्भातील आमदारांना आपल्या आमदार निधीतून विशेष बाब म्हणून निधी देण्याकरिता परवानगी द्यावी अशी मी विनंती केलेली होती. मध्यप्रदेशच्या सरकारने अशा प्रकारे योगीराज हॉस्पीटल व मेडीकल कॉलेज डाग्नोस्टिक सेंटर यासाठी हा निधी वापरण्याची परवानगी दिलेली आहे. या ठिकाणी शासन अशा प्रकारची परवानगी देईल काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, ही खाजगी सेवाभावी संस्था आहे. माजी विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्या प्रमाणे हे काम विशेष बाब म्हणूनच करावे लागणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना जे निवेदन प्राप्त झाले होते. ते निवेदन आम्ही नियोजन विभागाकडे पाठविले आहे. आमदारांना स्थानिक विकास निधी शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येत असतो. परंतु तो निधी अटी व शर्तीच्या अधीन राहूनच वितरीत केला जातो. नवीन कामे, विकास कामे, रस्ते, पाणी, बांधकामे इत्यादी कामांसाठी हा निधी वापरला जातो. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्या बाबीचा लवकरात लवकर विचार केला जाईल.

डॉ.दीपक सावंत : ज्या ज्या वेळी आमदार निधीचा प्रश्न येतो त्यावेळी अडचण सांगण्यात येते. मुंबई शहरातील जे.जे.रुग्णालय, शासकीय रुग्णालये, महानगरपालिकेची रुग्णालये, यांना ज्यावेळी आमदार निधी देण्याचा प्रसंग येतो. त्या प्रत्येक वेळी विशेष बाब म्हणून प्रकरण सादर-

5...



डॉ.दीपक सावंत...

करावे लागते. ते प्रकरण नियोजन विभागाकडे जाते. अशा प्रकरणास एक-एक वर्ष मंजुरी मिळत नाही. यासंदर्भात जी काही नियमावली तयार केलेली आहे त्या नियमावलीत किती दिवसात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फेरबदल करण्यात येणार आहे ? अशा प्रकारे निधी देण्यासाठी परवानगी आपण कधीपर्यन्त द्याल याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी

डॉ.विमल मुंदडा : माझ्याकडे सार्वजनिक विभाग आहे तेवढयापूरती माहिती मी या ठिकाणी सांगितली आहे. हा नियोजन विभागाचा विषय आहे. आपल्या भावना नियोजन विभागास कळविण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा आग्रह मी समजू शकते. शासनाला या संबंधी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. आपल्या सूचना बाबतची माहिती नियोजन विभागास कळविण्यात येईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 14:55

लक्षवेधी सूचना पुढे सुरु....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्या हॉस्पीटल्सचा मा.सदस्य डॉ.सावंत यांनी उल्लेख केला ती सरकारी हॉस्पीटल्स आहेत. महानगरपालिकेची किंवा राज्य शासनाची हॉस्पीटल्स आहेत. ज्याठिकाणी सरकारची मालकी नसते त्याठिकाणी निधी द्यावयाचा असेल तर शासनाचे नियम आहेत ते बरोबर आहेत. ज्याठिकाणी सरकारची किंवा महानगरपालिकेची मालकी आहे आणि जी शासनाच्या धोरणाप्रमाणे चालतात आणि ज्याला शासन जबाबदार आहे अशा हॉस्पीटल्सना स्थानिक विकास निधीतून निधी देण्यासाठी परवानगीची गरज नाही. नागपूरचे कॅन्सर हॉस्पीटल असो,जे.जे.असो जी सरकारी हॉस्पीटल्स आहेत ज्याठिकाणी 7/12 उता-यावर महाराष्ट्र शासनाची जमीन आहे त्याठिकाणी आमदार निधीतून पैसे देण्यास अडचण नाही. सरकारने स्पष्ट उत्तर दिले पाहिजे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, स्थानिक विकास निधीतून विशेष बाब म्हणून पैसे देण्याचा विषय नियोजन विभागाकडून हाताळला जातो. ही बाब तपासून बघावीच लागेल. प्रस्ताव नियोजन विभागाला पाठवून देऊ.

**सभापती** : आमदारांचा स्थानिक विकास निधी आहे त्यावर नियोजन विभागाकडून नियंत्रण होते. नियोजन विभागाचे यासंदर्भातील जे नियम आहेत त्या बरहुकुम निधी दिला जातो. यासंदर्भात विशेष बाब म्हणून मान्यता घेण्याबाबत मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिले ते तांत्रिकदृष्टया बरोबर आहे. नियोजन विभागाला हा प्रस्ताव रेफर केला तर नियोजन विभागाशी चर्चा करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, तुकडोजी महाराज हॉस्पीटल सरकारचे नाही. नियोजन विभागाच्या गाईड लाईन्स प्रमाणे ज्याठिकाणी सरकारची मालकी असते त्याठिकाणी आमदार आपला निधी देऊ शकतो. हाप्रश्न पूर्णपणे मंत्रीमहोदयांच्या अखत्यारितील आहे. सरकारी हॉस्पीटल्सच्या संदर्भात माजी मंत्री श्री. खानविलकर आणि आता श्री. सुरेश शेट्टी यांनी स्थानिक विकास निधीतून पैसे देण्याबाबत आवाहन केले होते. आम्ही त्याप्रमाणे पैसे दिलेले आहेत. सरकारची मालकी असल्यामुळे आरोग्य विभागाने नियोजन विभागाला फाईल पाठविण्याची गरज नाही.

**सभापती** : आरोग्य मंत्र्यांचे मत आहे की,आमची हरकत नाही. नियोजन विभागाकडून जी यादी येते त्यातील मार्गदर्शक तत्वानुसार त्यामध्ये सरकारी हॉस्पीटल्सचा अंतर्भाव होणे गरजेचे आहे.

20-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3B -2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु..

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, शासकीय रुग्णालयांच्या बाबतीत कोणतीही हरकत नाही. परंतु आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा हा प्रश्न आहे. शासकीय रुग्णालयांच्या बाबतीत निधी देण्यासाठी अडचण नाही पण ती विशेष बाब म्हणून करुन घ्यावी लागेल इतकेच. यासंदर्भात विशेष बाब म्हणून करण्याची आवश्यकता नाही असे नियोजन विभागाला सांगण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटलचा हा प्रश्न आहे. हा नियोजन विभागाशी संबंधित आहे असे आता सांगितले. मुंबईच्या टाटा कॅन्सर हॉस्पीटलनंतर विदर्भातील हे एकमेव हॉस्पीटल आहे. याठिकाणी मध्यप्रदेशमधून सुध्दा पेशंट येत असतात. मा.श्री. गडकरी साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत मा.मुख्यमंत्र्यांना सुध्दा निवेदन दिले होते. मुख्यमंत्र्यांनी प्रधान सचिव नियोजन यांच्याकडे पाठविले. प्रस्ताव मागितला तसेच जिल्हाधिका-यांकडून प्रस्ताव आलेला आहे. आरोग्य मंत्री विदर्भातील या कॅन्सर हॉस्पीटलला खास बाब म्हणून निधी देण्यासंबंधी नियोजन विभागाशी लवकरात लवकर चर्चा करुन विदर्भातील जनतेला न्याय देतील काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, "होय".

---

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईत इंग्रजी व मराठी शालेय पुस्तकांचा तुटवडा
**मु.शी.**: मुंबईत इंग्रजी व मराठी शालेय पुस्तकांचा तुटवडा यासंबंधी श्री.संजय दत्त,श्रीमती सुधा जोशी,सर्वश्री नतिकोद्दीन खतिब,सुधीर सावंत,सुधाकर गणगणे,पांडुरंग फुंडकर,रामनाथ मोते,प्रतापराव सोनवणे,जगदिश गुप्ता,श्रीमती संजीवनी रायकर,सर्वश्री श्रीकांत जोशी,मधुकर चव्हाण,अनंतर तरे,शरद पाटील,जी.एल अैनापुरे, जयंत पाटील,श्रीमती नीलम गो-हे,सर्वश्री प्रमोद नवलकर,विलास अवचट,डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करतो.

मुंबईत इंग्रजी माध्यमाच्या शाळा दिनांक 13 जून,2005 रोजी सुरु होऊनही दुकानात इंग्रजी माध्यमाची जवळपास 75 टक्के पुस्तके उपलब्ध न होणे,तसेच मराठी माध्यमाचीही जवळजवळ 20 टक्के पुस्तके किउपलब्ध न होणे,यामुळे दुकानदारांना पालकांना दोन दिवसात पुस्तके येतील अशी खोटी आश्वासने देऊन परत पाठवावे लागत असणे,एप्रिल 2005 रोजी पुस्तकांची ऑर्डर पाठयपुस्तक महामंडळाला देऊनही पुस्तके उपलब्ध न होणे,यामुळे पुस्तकांच्या दुकानासमोर पुस्तकांसाठी मोठयाच मोठया रांगा लागल्याचे दिसून येणे,परिणामी पुस्तकाअभावी विद्यार्थ्यांची मोठी पंचाईत होणे,तसेच पालकांमध्ये चिंता निर्माण होणे,तातडीने पुस्तके उपलब्ध करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही,उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या निवेदनाच्या सुरुवातीला असे सांगण्यात आले आहे की, " राज्यामध्ये कमी पडणा-या या इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकाची 5 लाख 65 हजार जादा प्रतीची छापाई करुन त्या दिनांक 20 जून 2005 रोजी विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत." त्यानंतर शेवटून दुस-या परिच्छेदात असे म्हटलेले आहे की,". मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली ते बारावीच्या पुस्तकांच्या खुल्या विक्रीसाठी पाठयपुस्तक मंडळाच्या नऊ भांडारातून पाठय पुस्तकाच्या प्रती सुरुवातीपासूनच पुरेशा संख्येने उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत."

श्री.हसन मुश्रीफ : सुरुवातीचा उल्लेख हा इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकाच्या संदर्भात असून नंतरचा उल्लेख हा मराठी माध्यमांच्या पुस्तकाच्या संदर्भातील आहे.

श्री.संजय दत्त : इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळेत प्रत्येक इयत्तेमध्ये किती मुले शिकत आहेत याची आकडेवारी शिक्षण खात्याकडे उपलब्ध असूनही त्याप्रमाणात पुस्तके न छापण्याचे कारण काय आहे ? यानतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की,पुस्तके वाचून मुलांची बुध्दी वाढते. मुलांच्या बुध्दीची काळजी घेण्याऐवजी रद्दीची काळजी घेतल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे याला जबाबदार रद्दीची काळजी घेणारे शिक्षण खात्यातील अधिकारीच आहेत तेव्हा त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पहिली,नववी पाचवी आणि अकरावीच्या इयत्तेतील अभ्यासक्रम पुढच्या वर्षी बदलणार आहे. त्यामुळे पुस्तके कमी छापण्यात आली होती हे खरे आहे.परंतु निवेदन वाचले तर आपल्या लक्षात येईल की, दिनांक 15 जून ते 23 जून 2005 या पाच दिवसात पहिली, पाचवी आणि नववीच्या इंग्रजी माध्यमातील पुस्तके कमी पडली होती. परंतु ताबडतोबीने 5 लाख 65 हजार पुस्तके छापून घेतली आणि ती विक्रीसाठी उपलब्ध करुन दिली होती.फक्त पाच दिवस या पुस्तकांचा तुटवडा निर्माण झाला होत. आज अशी परिस्थिती आहे की सर्व माध्यमांची सर्व पुस्तके उपलब्ध आहेत आणि पुस्तके उपलब्ध नाहीत असे एकही दुकान नाही.

श्रीमती सुधा जोशी :पाठयपुस्तक विक्रेत्यांचे असे म्हणणे आहे क, एप्रिल महिन्यापासून पुस्तकांची ऑर्डर देऊन पाठयपुस्तक महामंडळाच्या डेपोतून आम्ही पुस्तके मागवतो त्यापमाणे यंदाही पुस्तके मागितली आहेत. परंतु सुरुवातीपासून जवळजवळ 60 टक्के पुस्तकांचा तुटवडा जाणवत आहे. जून महिन्यात शाळा सुरु होत असतांना 500 प्रती मागितल्या नंतर 100 प्रती

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.कानडे

श्रीमती सुधा जोशी...

मिळतात .असे पुस्तक विक्रेते म्हणत आहेत.आताच माननीय मंत्रिमहोदयांनी असे सागितले की पुस्तक विक्रेत्यांकडे सगळी पुस्तके उपलब्ध आहेत. तेव्हा पुस्तक विक्रेत्यांच्या स्तरावर पुस्तके उपलब्ध आहेत काय ? विक्रेत्यांच्या स्तरावर पुस्तक उपलब्धतेबद्दलची आज काय स्थिती आहे ?सर्व माध्यमांची, सर्व इयत्तांची, सर्व पुस्तके पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत असे उत्तरात म्हटलेले असले तरी महिन्यापूर्वी पुस्तकाचा तुटवडा होता तेव्हा आज विक्रेत्यांकडे पुरसा पुस्तकांचा साठा पोहोचून तो साठा विद्यार्थ्यापर्यन्त पोहोचला आहे काय ? उत्तर देत असतांना त्यासबंधीची शहानिशी केली होती काय ?तसेच या वर्षी 2006-2007 या वर्षापासून इयत्ता पहिली, पाचवी,नववी या इयत्तांचा अभ्यासक्रम बदलणाार आहे असे निवेदनात सांगितले आहे. तेव्हा या वर्षी या चार इयत्तांसाठी किती पुस्तकांची आवश्यकता आहे याचा आढावा घेण्यात आला होता काय ? जर आढावा घेण्यात आला असेल तर लक्षावधी पुस्तके कमी पडण्याची कारणे काय आहेत ?

**( सभापती स्थानी :माननीय उपसभापती )**

नंतर श्री.सुंबरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे केवळ इंग्रजी माध्यमाची पुस्तके सुरूवातीस आपल्याला कमी पडली होती पण तीही नंतर लगेचच आपण उपलब्ध करून दिलेली आहेत. सुरूवातीस 70 टक्के एप्रिल-मे महिन्यात, 29 टक्के जून महिन्यात आणि 1 टक्का पुस्तकांची विक्री जुलै महिन्यामध्ये झालेली आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्व माध्यमांतील एकही पुस्तक बाजारात कमी पडणार नाही अशी व्यवस्था आपण केलेली आहे. वेगवेगळ्या ठिकाणी शाळा सुरू होण्याच्या तारखा वेगवेगळ्या आहेत पण तरीही केवळ भांडारातून दुकानापर्यंत पुस्तके पोहोचण्यासच जो वेळ लागतो तो सोडला तर कोठलेही पुस्तक मिळत नाही अशी परिस्थिती राज्यामध्ये सध्या नाही.

श्रीमती संजीवनी रायकर : आपण 5 लाख पुस्तकांच्या प्रती इंग्रजी माध्यमातील छापल्या आहेत काय ?

श्री. हसन मुश्रीफ : होय, इंग्रजी माध्यमातील पुस्तके आपण इतक्या मोठ्या संख्येने छापली आहेत. सुरूवातीस मुंबईसह सगळ्याच शहरांमध्ये इंग्रजी माध्यमाकडे जाणारा कल जास्त आहे आणि त्यामुळे सुरूवातीस आपला अंदाज चुकला होता पण नंतर आपण ती सर्व व्यवस्था केलेली आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षांपासून शाळा सुरू होण्याच्या काळामध्ये दुकानांतून पाठ्यपुस्तके उपलब्ध नसण्याचे प्रकार वाढत चालले आहेत. तेव्हा यामध्ये पुस्तक विक्रेते वा त्यांचे काही रॅकेट कार्यरत आहे काय ? कारण विद्यार्थ्यांची संख्या आणि छापलेल्या पुस्तकांची संख्या याची आपल्याला पूर्ण माहिती असते तसेच शाळा सुरू होण्याच्या तारखा देखील आपल्याला माहीत आहेत. परंतु तरीही पहिल्या 15 दिवसात पाठ्य पुस्तके मिळण्यामध्ये सगळीकडेच गोंधळ सुरू असतो. तेव्हा या पाठ्यपुस्तकांच्या बाबतीत एखादी पुस्तक पेढी वा सुरक्षित पेटी निर्माण करण्यासारखा उपाय आपण करणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यामध्ये कोठलेही रॅकेट वगैरे काहीही नाही. मात्र या बाबतीत ग्लोबल टेंडर्स काढण्याचे आदेश उच्च न्यायालयाचे असल्याने त्या दृष्टीने प्रक्रिया पूर्ण करण्यामध्ये काहींसा विलंब झालेला होता आणि त्यामुळेच परराज्यामध्ये आपण ही पुस्तके छापण्यास दिली. अर्थात त्यामध्ये ती पुस्तके आणण्यामध्ये अडचण झाली पण त्यात बचतही मोठ्या प्रमाणात आपली झाली हे मला आवर्जून सांगितले पाहिजे. परंतु पाठ्य पुस्तके मिळण्यामध्ये,

...... 3डी 2 ...

श्री. मुश्रीफ .....

आपला सुरूवातीस अंदाज चुकल्याने, जो काही पाच दिवसांचा विलंब आणि तो देखील केवळ मुंबर्ठमध्येच झालेला आहे. बाकी सर्व ठिकाणी वेळेवर पुस्तके उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मुलांना शिकण्यापेक्षा त्या पुस्तकांची रद्दी होईल असेच प्रयत्न पाठ्य पुस्तक मंडळाने केलेले आहेत. म्हणून माझा प्रश्न या संदर्भात असा आहे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनीही सांगितल्याप्रमाणे आपली जेवढी विद्यार्थी संख्या होती ती लक्षात घेऊन आपण पुस्तके छापावयास पाहिजे होती ती का छापली नाहीत ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, इंग्रजी माध्यमाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्यामुळे सुरूवातीस आपला त्याबाबतचा अंदाज चुकला आणि त्यामुळे केवळ पाचच दिवस पुस्तके पुरवठा करण्यामध्ये विलंब झालेला आहे मात्र लगेचच ती उपलब्ध करून देण्यात आली हे मी सांगितले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जी काही या संबंधात माहिती मिळाली आहे ती योग्य नाही. मी स्वत: अनेक दुकानांतून याचा अनुभव घेतलेला आहे की, त्यांचेकडे अनेक पुस्तके त्यावेळी उपलब्ध नव्हती. याबाबतीत मी दोन उदाहरणे आपल्याला देऊ शकेन. याबाबतीत मी मंत्री महोदयांना विनंती करीन की, आपण माझ्याबरोबर आल्यास मी आपल्याला अनेक दुकानांतून दाखवून देऊ शकेन की, त्या ठिकाणी काही विषयांची पुस्तके आजही मिळत नाहीत. ...

श्री. हसन मुश्रीफ : माझी आपल्याबरोबर येण्याची तयारी आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, 6 वी इयत्तेचे लोअर लेव्हल इंग्रजीचे पुस्तक अद्याप पर्यंत मार्केटमध्ये उपलब्ध झालेले नाही. तसेच इयत्ता 9 वी साठी पर्यावरण हा विषय सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार सक्तीचा करण्यात आला आहे. हा निर्णय दोन वर्षापूर्वीचा आहे. परंतु तरीही अजूनदेखील या विषयाची पुस्तके बाजारात उपलब्ध नाहीत. तरी आपण याबाबत खुलासा करू शकता काय ?

प्रा. वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या पर्यावरणाच्या विषयाच्या पुस्तका बाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे पुस्तक खूप मोठे होऊ लागले होते त्यामुळे ते कमी करण्यामध्ये काही वेळ लागला. मात्र तेही आपण लगेचच उपलब्ध करून दिले आहे.

*****

.... 3डी 3 ...



KBS/MHM/SBT. श्री.गायकवाड नंतर --- 15:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील सर जे.जे.समूह रूग्णालयातील शवागाराची असलेली दुरावस्था.

**मु.शी.** : मुंबईतील सर जे.जे.समूह रूग्णालयातील शवागाराची असलेली दुरावस्था याबाबत सर्वश्री गुरूनाथ कुलकर्णी, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, वसंतराव काळे, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, सदाशिवराव पोळ यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

----

श्री. गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" मुंबईतील भायखळा भागातील सर जे.जे.समूह रूग्णालयातील शवागाराच्या वातानुकूलित यंत्रणेत गेल्या दोन वर्षांपासून बिघाड झालेला असून ती उत्तमरित्या कार्यान्वित नसणे, त्यामुळे शवागारात व आवारात पूर्णपणे दुर्गंधीयुक्त वातावरण निर्माण होणे, शासनाचा निधी उपलब्ध असतानाही तो शवागाराच्या डागडुजीवर व इतर सुखसोयीवर जाणीवपूर्वक खर्च न करण्याचे व्यवस्थापनाचे आडमुठे धोरण, दुर्गंधीयुक्त ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हातमोजे व मास्क सुद्धा न मिळणे, शवागाराची म्हणावी तशी स्वच्छता राखली न जाणे, दुर्गंधीयुक्त वातावरणात सतत राहिल्याने तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, व्यवस्थापनाच्या ढिल्या कारभाराविषयी कर्मचाऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाने केलेली वा करावयाची उपाय योजना. "

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.....3डी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, लेकुरे उदंड जाहली .. मुंबईमध्ये नव्याने जन्म घेणाऱ्या बालकांचे प्रमाण वाढलेले आहे तसेच मरणाऱ्यांची संख्याही देखील वाढलेली आहे. त्यातही नैसर्गिकरित्या मरण, अपघाती मृत्यू इत्यादी प्रकाराने ही संख्या वाढत असते. ही मुंबईची परिस्थिती असताना मुंबईतील जे.जे.रूग्णालयामध्ये असलेल्या शवागारामध्ये मुडदे ठेवण्यास आज जागा नाही. या संदर्भात येथे जे उत्तर आलेले आहे त्यामध्ये 45 मुडदे ठेवण्यासाठी एक शवागार आहे आणि दुसरे शवागार 18 मुडदे ठेवण्याच्या क्षमतेचे आहे पण तेही बंद आहे. कारण तेथील वातानुकूलित यंत्रणा कार्यरत नाही. ...

( यानंतर श्री. जागडे .... 3इ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुळकर्णी.....

तेथील कामगारांना आवश्यकत त्या सर्व गोष्टी पुरविल्या जात नाहीत. तेथील शवागराबाहेरील परिस्थिती अतिशय खराब आहे. त्या ठिकाणी दोन मिनीट सुध्दा उभे राहत येत नाही. त्या ठिकाणी सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सभापती महोदय, जे. जे. रुग्णालयात 9 एक्सरे मशिन्स आहेत. त्यातील फक्त दोन मशिन्स चालू आहेत आणि 7 मशिन्स बंद आहेत. तेव्हा या रुग्णालयातील जी यंत्रणा बिघडलेली आहे, ती सर्व यंत्रणा ताबडतोबीने दुरुस्त करण्यात येणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभांपती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुळकर्णी यांनी जे.जे.रुग्णालयातील शवागारांचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. त्या ठिकाणी दोन शवागरे आहेत. एकाची कॅपसीटी 45 आहे, तर दुस-याची 18 आहे. यातील एका शवागरातील एअरकंडीशन मशिन खराब झाले आहे. त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने साडेसात लाख रुपये मंजूर केले आहे. ते एअरकंडीशन मशिन आता त्वरीत दुरुस्त करण्यात येणार आहे. तसेच त्या ठिकाणी दोन कॅबिनेट नवीन बनवून घेत आहोत. सभापती महोदय, जे. जे. हॉस्पीटलचा सध्याचा लोड फॅक्टर 45 ते 50 चा आहे. त्यामुळे ही दोन्ही शवागरे पुरेशी आहेत. एक्सरे मशिनच्या दुरुस्तीबाबत जे. जे. हॉस्पीटलच्या डिनला सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. तीन लाख रुपयाच्या दुरुस्तीपर्यन्तचे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत. जे. जे. हॉस्पीटलमधील ओ.पी.डी. च्या रिन्युएशनसाठी 32 लाख रुपये आपण खर्च केले आहेत. त्या ठिकाणी आपण नवीन लिफ्ट बसविली आहे. जे. जे. हॉस्पीटल हे मुंबईतील महत्वाचे हॉस्पीटल असल्यामुळे त्याकडे शासन विशेष लक्ष देत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी अनावश्यक माहिती देत आहेत. जे. जे. हॉस्पीटलची कॅपसिटी 45 आहेत. आता या ठिकाणी असलेल्या एअर कंडीशन मशिनचे काम केव्हा पूर्ण होणार आहे ? तसेच ही दोन्ही शवागरे केव्हा उपलब्ध होणार आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एका शवागरातील एअर कंडीशन मशिन नादुरुस्त झाले आहे. त्यासाठी पैसे मंजूर केले आहेत. या बाबतचे टेंडर सुध्दा काढण्यात आले आहे. हे काम लवकरात लवकर म्हणजे एक महिन्यात पूर्ण होईल. त्यामध्ये काहीएक अडचण नाही. माननीय सदस्य माझ्याबरोबर त्या ठिकाणी येणार असतील तर त्या बाबतची पाहणी आपण करु शकू.

20-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3 E 2

ASJ/ SBT/ MHM/ 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी जी माहिती दिली आहे, ती दुर्देवी आहे. माननीय मंत्रिमहोदय त्या ठिकाणी गेले तर एक मिनीटदेखील थांबणार नाहीत. रोज येथील शवागारात 40 ते 50 मृतदेह येत असतात. सभापती महोदय, ब्लू स्टार या कंपनीस 9.6.2004 रोजी हे काम दिले होते. तसेच सदर अंदाजपत्रात दि. 1.7.2004 रोजी मंजूरी दिली असतानाही या वातानुकुलीत यंत्रणेची दुरुस्ती झालेली नाही. याचा अर्थ ज्यांच्यावर हे काम सोपविले आहे, त्याकडे कोणीही पाहत नाही. त्याची कोणालाही गरज वाटत नाही. अशा परिस्थितीत हे सर्व काम चालले आहे. म्हणून हे काम लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे ? हे काम लवकरात लवकर होण्यासाठी कोणाला सत्याग्रह किंवा आंदालन करावे लागेल काय ?

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले आहे की, हे पैसे मंजूर झाले आहेत व टेंडर काढले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : तरमग ही तारीख 2004 ची कां आहे?

श्री. सुरेश शेट्टी : ब्लू स्टार कंपनीने हे युनिट दुरुस्त होणार नाही असे सांगितले. त्यामुळे नवीन ए.सी. कॅबिनेट खरेदी करण्यासाठी टेंडर काढले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : जर ते युनिट दुरुस्त होणार नाही तरमग या ठिकाणी खुलासा कां केला? या सदनाची दिशाभूल करण्याचे काम आपण कशासाठी करता?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सद्याचे चालू असलेले ए.सी. मशीन हे कमीत कमी 20 ते 25 वर्षे जुने होते. त्यांच्या मेंटेनन्सचा कॉंट्रॅक्ट ब्लू स्टार कंपनीकडे होता. त्यांनी ते मशीन तपासल्यानंतर ते दुरुस्त होऊ शकत नाही असे सांगितले. त्यामुळे नवीन ए.सी. युनिट स्वतंत्रपणे खरेदी करण्यासाठी पैसे मंजूर झाले आहेत. तसेच, हे ए.सी. युनिट आपल्याला मार्केटमध्ये तयार मिळत नाही तर ते बनवून घ्यावे लागते. ते युनिट स्वतंत्रपणे बनविण्यासाठी वेळ लागतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी ही माहिती देण्याची गरज नाही. ए.सी. युनिटची बांधणी करण्यासाठी काय करावे लागते याची आम्हाला कल्पना आहे. मला अनेक वेळा त्या शवागारामध्ये जाण्याचा प्रसंग आला आहे. तेव्हा आपण याठिकाणी विचार करुन उत्तर दिले पाहिजे. आपण या ठिकाणी नवीन बांधणी करीत आहोत, नवीन यंत्राची ऑर्डर दिलेली आहे, हे काम इतक्या वर्षामध्ये पूर्ण होईल अशाप्रकारचे निवेदन यावयास पाहिजे होते?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एक महिन्यात हे काम पूर्ण होईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पी.डब्लू.डी. इलेक्ट्रिक डिपार्टमेंट, पी.डब्लू.डी. सिव्हिल डिपार्टमेंट, पाणीपुरवठा, ड्रेनेज सिस्टीम वगैरे कामे 100 एजन्सींकडे सोपविण्याऐवजी ही सर्व कामे एकाच एजन्सीकडे देण्याच्या दृष्टीने एक कॉंपिटंट प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट किंवा ऑथॉरिटी नेमून लवकरात लवकर त्यांच्याकडे आपण स्वतंत्र अधिकार देणार काय? कारण आज संपूर्ण हॉस्पिटलमध्ये 100 प्रकारच्या एजन्सी काम करीत असतात. त्याऐवजी एकाच सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करुन त्याला आपण सर्व अधिकार देण्याचा विचार करणार काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : माननीय सदस्यांनी फार महत्वाचा प्रश्न विचारला आहे. दोन वर्षापूर्वी माननीय मंत्रिमहोदयांबरोबर बसून यासंबंधी मी सुध्दा चर्चा करीत होतो. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जेवढे हॉस्पिटल्स आहेत त्या प्रत्येक ठिकाणी काही ना काही अडचणी निर्माण होतात. त्या हॉस्पिटलमधील संपूर्ण ॲडमिनिस्ट्रेशन सिस्टीम आपल्याला बदलावी लागेल. सद्याचे जे डीन आहेत ते ॲकॅडमिक मधील अधिकारी आहेत, ते प्रशासक नाहीत. आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, हॉस्पिटलच्या मॅनेजमेंटमध्ये स्पेशलायझेशन केलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती प्रत्येक हॉस्पिटलच्या ठिकाणी करण्यात येईल. व त्यांच्याकडे ॲडमिनिस्ट्रेशन व मेंटेनन्सचे अधिकार देण्यात येतील. तसेच, सद्या जे सुपरिटेंडेंट आहेत ते हेल्थ डिपार्टमेंटमधून आले असून त्यांना परत पाठविण्याच्या दृष्टीने पूर्ण तयारी केलेली आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दरवर्षी पावसाळी अधिवेशनामध्ये वैद्यकीय महाविद्यालयीन प्रवेशासंबंधी प्रश्न उपस्थित होत असतो. या ठिकाणी उत्तर देखील गोल गोल दिलेले आहे. यामध्ये मूळ मुद्दयाला बगल देऊन बाकीचे सर्व सांगितले आहे. या राज्यात 12 खाजगी वैद्यकीय महाविद्यालये आहेत, आणि 15 दंत वैद्यकीय महाविद्यालये आहेत. यामध्ये 50 टक्के व्यवस्थापन कोटा आणि 50 टक्के शासकीय कोटा पकडला तर एम.बी.बी.एस. साठी 1170 आणि डेंटलसाठी 1230 जागांकरिता मारामारी सुरु आहे. दरवर्षी शिक्षण शुल्क समितीने ठरविलेली फी खाजगी वैद्यकीय महाविद्यालये मान्य करीत नाहीत. ही महाविद्यालये नेहमी शासनाच्या विरुध्द बंड पुकारतात आणि शासनाला आव्हान करतात, धमकी देतात की, "नाहीतर आम्ही ही वैद्यकीय महाविद्यालये बंद करुन टाकू".

(यानंतरसौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

आणि शासन त्यांच्यासमोर शरणागती पत्करते. हा गेल्या तीन वर्षापासूनचा इतिहास आहे. अशा वेळी पालक आणि विद्यार्थ्यांनी काय करावयाचे ? सुरुवातीला जहागीरदार समिती नेमली होती. मग स्वत: श्री.जहागीरदार यांनी राजीनामा दिला. त्यानंतर पंडित समिती नेमण्यात आली आणि या समितीने एम.बी.बी.एस.साठी 3 लाख रुपये आणि दंत महाविद्यालयासाठी 2 लाख रुपये फी निश्चित केली. तरी देखील या फी मध्ये खर्च भागत नाही असे खाजगी महाविद्यालयांचे म्हणणे आहे. अशा वेळी शासन त्यांना चर्चा करण्यासाठी बोलवित आहे. ज्या शासनाकडून त्यांनी जमीन घेतली, परवानगी घेतली, त्याच शासनाला त्यांना बोलावून सांगावे लागते की, आमचे विद्यार्थी घ्या. यासारखे मेडिकल एज्युकेशनचे दुर्दैव कोणते असेल ? याबाबतीत शासनाने नेमके कोणते धोरण आखलेले आहे ? माझा प्रश्न असा आहे की, याठिकाणी ज्या तारखा दिलेल्या आहेत, त्यावरुन असे वाटते की, शासनाला पूर्ण कल्पना होती की, खाजगी महाविद्यालयाचे लोक कोर्टामध्ये जाणार आहेत. पण तत्पूर्वी शासनाने सर्वोच्य न्यायालयात कॅव्हेट दाखल का केला नाही ? याठिकाणी निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "बहुतांशी महाविद्यालयांकडून सदर विद्यार्थ्यांमार्फत रिपोर्टींग करुन घेण्यात येत आहे." तेव्हा ज्यांचे रिपोर्टींग झालेले आहे, अशा विद्यार्थ्यांना 100 टक्के प्रवेश देण्याच्या बाबतीत शासन गॅरंटी देत आहे का ? तशा प्रकारचे आश्वासन देत आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंबंधी अगोदर या सदनामध्ये चर्चा झाली होती आणि विधानसभेमध्ये देखील चर्चा झाली होती. आता पुन्हा याठिकाणी या विषयावर लक्षवेधी सूचना आलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेबांनी प्रश्न विचारताना सांगितले की, शासनाने या खाजगी संस्थांना बोलावून घेतले. पण शासनाने कोणत्याही संस्थांना बोलाविलेले नाही. जस्टीस पंडित कमिटी नेमण्यात आली होती. त्यांनी फी ठरविण्याच्या संबंधातील आपला अहवाल दिलेला आहे आणि तो आपण सभागृहाच्या पटलावर देखील ठेवला होता. शासनाचे धोरण क्लीअर आहे की, पंडित कमिटीने जी फी ठरविलेली आहे, त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. आमची ॲडमिशन प्रोसेस ही पहिल्या राऊंडमध्ये 14 जुलै ते 21 जुलैपर्यंत होणार असून, दुसरी राऊंड 24 ऑगस्ट ते 31 ऑगस्टपर्यंत होणार आहे. आमच्या डायरेक्टर, मेडिकल एज्युकेशन यांनी ॲडमिशनसाठी जे शेडयुल जाहीर केले आहे, ते आम्ही स्ट्रीकली फॉलो करणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,आपण रिपोर्टींग झालेल्या विद्यार्थ्यांना 100 टक्के

. . . .3 जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

प्रवेश देण्याचे आपण मान्य करीत आहात का ? जर शासनाने खाजगी महाविद्यालयांच्या लोकांना बोलविले नव्हते असे माननीय मंत्री महोदय सांगत असतील तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात अशा प्रकारची बैठक झाली असे माझी माहिती आहे. हे खरे आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, खाजगी संस्था चालकांनी माननीय मुख्यमंत्र्यांची वेळ मागून घेतली होती आणि त्यांच्याकडे ते चर्चा करण्यासाठी आले होते. पंडित कमिटीने जी फी ठरविलेली आहे, त्यासंबंधात त्यांनी माननीय मुख्यमंत्री साहेबांना सांगितले की, आम्हाला ही फी परवडत नाही आणि तशा प्रकारचे लेखी निवेदन त्यांनी माननीय मुख्यमंत्री साहेबांना दिलेले आहे. आम्ही दोन्ही सभागृहामध्ये सांगितले आहे की, महाराष्ट्र शासनाचा यासंबंधी काहीही रोल नाही. पंडित कमिटी फी फिक्सेशनसाठी नेमलेली कमिटी आहे . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, यामध्ये महाराष्ट्र शासनाचा काही रोल नाही. मग महाराष्ट्र शासन या विद्यार्थ्यांना वा-यावर सोडणार आहे का ? मग तुम्ही 50 टक्के जागा भरण्याच्या बाबतीत . . . .

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला असता तर बरे झाले असते. मला असे सांगावयाचे आहे की, फी ठरविण्याच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाचा काही रोल नाही. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे पंडित कमिटी नेमली. त्या कमिटीने आपला रिपोर्ट दिला आहे. त्याच्यात काही चेंज करावयाचे असतील तर खाजगी संस्था चालकांना कोर्टात जावे लागेल. आमच्याकडे येऊन आम्ही त्याबाबतीत काहीही करु शकत नाही हे दोन्ही सभागृहात सांगितले आहे. पंडित कमिटीने जी फी जाहीर केली आहे, ती त्यांना स्ट्रीकली फॉलो करावी लागेल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी रिपोर्टींगच्या बाबतीत प्रश्न विचारला. तर 173 विद्यार्थ्यांनी रिपोर्टींग केले आहे आणि त्यापैकी 62 विद्यार्थ्यांनी डेंटलसाठी ॲडमिशन घेतली आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे... 15:25

श्री.सुरेश शेट्टी (पुढे चालू...

याबाबत आमचे डायरेक्टर मॉनिटर करत आहेत. आम्ही जे शेडयुल डिक्लेअर केले ते शेडयुल स्ट्रीक्टली फॉलो करणार आहोत.

श्री.विलास अवचट : मंत्री महोदयांनी सांगितले की, पंडित समितीने दिलेल्या निकषाप्रमाणे आम्ही त्यांना स्पष्ट सांगितले आहे. असे असतांना देखील खाजगी संस्थाचालकांनी सांगितले की ही शुल्कवाढ केली नाही तर आमची कॉलेजे बंद करु. या संदर्भात आरोग्य विभागाच्या सचिवांनी स्पष्ट सांगितले की, अशाप्रकारे खाजगी संस्थाचालकांनी मेडिकल कॉलेजेस बंद केली तर ती कॉलेजे आम्ही ताब्यात घेऊ. त्याप्रमाणे आतापर्यन्त आपण किती खाजगी मेडिकल कॉलेजेस ताब्यात घेतली ? दुसरा प्रश्न असा की, निवेदनामध्ये "खाजगी महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी निवड झालेले विद्यार्थी गेले असता, बहुतांशी महाविद्यालयांकडून सदर विद्यार्थ्यांमार्फत रिपोर्टिंग करुन घेण्यात येते", असे म्हटलेले आहे, म्हणजे काय ? ते कोर्टात गेल्यानंतर मग आपण रिपोर्टिंग करणार आहात काय ? याबाबतचे स्पष्टीकरण करावे.

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी संस्था चालकांनी शासनाला धमकी दिल्याचे सांगितले. परंतु शासनाकडे येऊन कोणी धमकी दिलेली नाही. महाराष्ट्रात या संस्था चालविण्याचा त्यांचा तो निर्णय होता, परंतु संस्था बंद करण्याचा त्यांना निर्णय घेता येणार नाही, कारण शासनाचे आणि मेडिकल कौन्सिलचे त्याबाबतीत काही नियम आहेत. त्या नियमाप्रमाणे त्यांना मेडिकल कॉलेज बंद करावे लागेल.

श्री.विलास अवचट : संस्था चालकांनी याबाबत धमकी दिली नाही असे आपण म्हणता, परंतु सचिवांनी त्या संबंधाने वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट केलेले आहे.

श्री.सुरेश शेट्टी : वर्तमानपत्रातील स्टेटमेंटवरुन उत्तर देऊ शकत नाही. परंतु कॉलेजमध्ये किती ॲडमिशन्स झालेली आहेत, त्याबाबतच्या रिपोर्टिंगच्या संदर्भात आमचे डायरेक्टर मॉनिटरींग करीत आहेत. परंतु सर्व खाजगी संस्था चालक आम्हाला येऊन भेटले, त्यावेळेस कॅबिनेट मंत्र्यांसोबत मीही होतो. त्यावेळी त्यांनी आम्ही ॲडमिशन प्रोसेस चालू ठेवणार आहोत, ॲडमिशन प्रोसेसमध्ये कोणताही अडथळा आणणार नाही, अशाप्रकारचे आश्वासन दिलेले आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, कधी कधी विद्यार्थी आणि पालक यांची दया येते. या सगळया प्रकरणात विद्यार्थ्यांची आणि पालकांची अवहेलना होते. आता ते सर्वोच्च न्यायालयात गेलेले आहेत. या ठिकाणी दोन उत्तरे दिलेली आहेत. एका उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ SBT/ MAP/

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु....

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार समिती गठीत केलेली आहे. दुसऱ्या उत्तरामध्ये असेही म्हटलेले आहे की, "असोसिएशननी फीच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्याचे सरकारी वकिलांनी कळविले". या दोन उत्तरापैकी कोणते खरे उत्तर आहे ? समिती गठीत केली त्याचा निर्णय मान्य करणार काय ? हा एक प्रश्न आणि ज्यांनी रिपोर्टिंग केले, त्या विद्यार्थ्यांची आपण फी घेतलेली आहे काय, याबाबत उत्तर द्या.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, हा विषय थोडा कॉम्प्लीकेटेड आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने, पालकांच्या दृष्टीने आणि राज्यातील सगळयाच वैद्यकीय शिक्षणाच्या दृटीने गंभीर विषय आहे. या विषयाच्या संदर्भाने चर्चा करत असतांना, एकच बाजू पाहून चालणार नाही तर सगळ्या बाजू पाहिल्या पाहिजेत. मेडिकल कॉलेजची फी हे केंद्र सरकार ठरवत होते, त्यानंतर उन्नीकृष्णन यांचे जज्जमेंट आले. त्या आधारे फ्री सीट, पेमेंट सीट आणि मॅनेजमेंट सीट अशाप्रकारचे स्ट्रक्चर आले आणि त्याप्रमाणे फी ठरवायला सुरुवात केली. पै फाऊंडेशनच्या संदर्भामध्ये सुप्रीम कोर्टाच्या इलेवन जज्जेसनी ज्यावेळेस आपले जज्जमेंट दिले, त्यावेळेला या खाजगी शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्ता देण्याच्या संदर्भामध्ये भूमिका सुप्रीम कोर्टाने घेतली. हे करत असतांना ती फी त्यांनी ठरवावी या संदर्भामध्ये काही भूमिका घेतली आणि राज्य सरकारला एक मॅकॅनिझम तयार करायला सांगितले. राज्य सरकारने एक कमिटी नेमली. परंतु ती कमिटी संस्थाचालकांना मान्य नसल्यामुळे त्यापैकी काही संस्थाचालक राज्य सरकारच्या विरोधात सुप्रीम कोर्टामध्ये गेले. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने दोन समित्या निर्माण केल्या. एक प्रवेश नियंत्रण समिती आणि दुसरी फी फिक्सेशन समिती. प्रवेश नियंत्रण समितीने प्रवेशातील पारदर्शकता पहावी आणि फी फिक्सेशन कमिटीने फी ठरविण्याचे काम करावे. या फी फिक्सेशन समितीचे अध्यक्ष हे डायरेक्ट हायकोर्टाने नेमावेत आणि अध्यक्षांनी बाकीच्या सभासदांची निवड करावी, अशाप्रकारची भूमिका ठरली.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार..... 15:30

श्री. दिलीप वळसे-पाटील....

एकदा ती कमिटी तयार झाली. त्यांनी या सगळया कॉले्जचे हिशेब तपासले आणि कोणाला तीन लाख, कोणाला अडीच लाख, कोणाला 80 हजार अशा प्रकारची फी ठरवून दिली. ही फी ठरवून दिल्यानंतर, या राज्यातील संस्थाचालकांनी अशी भूमिका घेतलेली आहे की, तुमच्या सरकारी कॉलेजमधील, शेवटी कॉस्ट ऑफ एज्युकेशन आहेच. बी.ए.ची कॉस्ट किती? बी.कॉमची कॉस्ट किती? बी.एस्सीची कॉस्ट किती? आज तसे पाहिले तर बी.ए.ची कॉस्ट दहा हजार रुपये आहे. बी.कॉमची कॉस्ट पंधरा हजार रुपये आहे. सायन्सची अठरा हजार रुपये कॉस्ट आहे. इंजिनियरिंगची चोवीस हजार रुपये कॉस्ट आहे. मेडिकल कॉलेजची कॉस्ट साधारणत: अडीच लाखाच्या आसपास आहे. आता इश्यू असा आहे की, संस्था चालक एका टोकाची भूमिका घेऊ शकतील, शासन दुस-या टोकाची भूमिका घेऊ शकेल.तो प्रश्न वेगळा आहे. परंतु यातून प्रवेश होणार का? कॉलेजस सुरु होणार कां? विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार कां? हा प्रश्न आहे. दरम्यानच्या काळात संस्थांचालकांनी अशी भूमिका घेतली की, आम्ही कॉलेजस चालविणार नाही, आम्ही प्रवेश प्रक्रिया करणार नाही. सरकारला पाहिजे तर सरकारने आमची कॉलेजस ताब्यात घ्यावीत आणि सरकारला काय चालवायची असतील ती चालवावीत. आज सरकारच्या अस्तित्वातील जी कॉलेजस आहेत त्यांचीही वस्तुस्थिती आपल्याला माहीत आहे. फायनान्शियली आपण किती अडचणीमध्ये आहोत, त्या कॉलेजसमध्ये किती सुविधा उपलब्ध आहेत इत्यादि सगळया गोष्टी आपल्याला माहीत आहेत. अशा वेळेला ही कॉलेजस सरकारने ताब्यात घेणे आणि ती चालविणे याच्यामध्ये काही स्वारस्य नाही. याच्यातून काही तरी सोल्यूशन निघाले पाहिजे. हे सोल्यूशन निघण्याच्या संदर्भात संस्था चालकांचे सातत्याने हे म्हणणे होते की, कुठल्याही परिस्थितीमध्ये शासनाने यामध्ये हस्तक्षेप करावा. त्यावेळी शासनाने त्यांना संगितले की, सुप्रिम कोर्टाने निर्माण केलेली ही समिती आहे. क्वॉझी ज्युडिशियल ॲथॉरिटी आहे. त्यांनी दिलेल्या निर्णयामध्ये मंत्री म्हणून किंवा सचिव म्हणून आम्हाला हस्तक्षेप करणे शक्य नाही. तुम्हाला बेटर फोरम हायकोर्ट आहे. तुमचा जो काय ग्रिव्हन्स असेल तर तो तुम्ही त्या समिती समोर अपील करून मांडा. किंवा हायकोर्टात जाऊन तुम्हाला काय अपील करावयाचे ते अपील करा आणि त्यातून मार्ग काढा. गेले दोन वर्षे फी जास्त वाढली. राज्य सरकारने त्यामध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका घेतली, हा शासनाचा दोन वर्षाचा अनुभव आहे.

3I-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

आता एक नवीन परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामध्ये कर्नाटक शासन आणि कर्नाटकमधील संस्थाचालक एकत्रितपणाने सुप्रिम कोर्टात गेले आहेत. आणि सुप्रिम कोर्टाने आता पुन्हा एकदा टी.एम.पै फाऊंडेशनपेक्षा आणखीन काही तरी वेगळा निर्णय दिलेला आहे. महाराष्ट्रातील संस्थाचालक कोर्टात गेलेले आहेत.परंतु हे सगळे होत असतांना, ज्यावेळेला प्रवेशासंबंधीचे टाईमटेबल शासनाने जाहीर केलेले आहे, त्यावेळेला संस्था चालकांना या गोष्टीची स्पष्ट सूचना देण्यात आलेली आहे की, वाटेल त्या परिस्थितीमध्ये तुम्हाला हे प्रवेश थांबविता येणार नाहीत. 18 ते 25 या तारखेपर्यंत हे प्रवेश करणे गरजेचे आहे. फी काय असावी, याच्या संदर्भातील निर्णय कोर्टामध्ये व्हावा. समितीच्या समोर व्हावा, योग्य त्या प्लॅटफॉर्मवर व्हावा. याच्या संदर्भामध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांची बाजू घेण्याची वेळ आली तर सरकारने गेले दोन वर्षे यासंदर्भातील भूमिका घेतलेली आहे. आपण सांगत आहात की, आज सरकार शांत आहे, स्वस्थ आहे याचा अर्थ सरकारचे नियंत्रण नाही किवा सरकार सगळे नियंत्रण सोडून द्यायला निघाले आहे असा नाही. कुठल्याही संस्थां चालकांना कॉलेज बंद करीत असतांना महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ॲक्टमधील ज्या तरतुदी आहेत, त्या तरतुदीप्रमाणे किमान एक वर्षे आधी सरकारला नोटीस द्यायला पाहिजे. तरच त्यांना ती संस्था बंद करता येईल. अन्यथा अशी संस्था बंद करता येणार नाही. परंतु आता विद्यार्थी त्या ठिकाणी गेले, त्यांचे एनरोलमेंट करुन घेतले आणि प्रवेश दिला नाही यामुळे विद्यार्थी रस्त्यावर आले, पालक रस्त्यावर आले. लॉ ॲन्ड ऑर्डरचा प्रश्न निर्माण झाला. फी परवडली नाही. या सगळया गोष्टीकडे सरकार लक्ष ठेवून आहे. मला या सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, सरकारने जी प्रवेश प्रक्रिया सुरु केलेली आहे, ती प्रवेश प्रक्रिया सुरु करीत असतांना एम.बी.बी.एस.मध्ये प्रवेश घेणा-या 173 उमेदवारांनी आता पर्यंत रिपोर्ट केलेला आहे की, त्यापैकी 62 लोकांनी फी भरुन ऑलरेडी ॲडमिशन घेतलेले आहे. डेन्टलला 158 उमेदवारांनी रिपोर्ट केलेला आहे. पैकी 19 लोकांनी ॲडमिशन घेतलेले आहे. (अडथळा) पंडित समितीने ठरवून दिलेली फी भरुन त्या विद्यार्थ्यंनी प्रवेश ऑलरेडी घेतलेले आहेत. त्यामुळे संस्था चालकांनी बाहेर काय भूमिका घेतलेली आहे हे मला माहीत नाही. परंतु प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे आणि सुरु झालेल्या प्रवेश प्रक्रियेमध्ये रिपोर्ट करुन घेणे, त्यांना शासनाने 25 तारखेपर्यंतचा जर कालावधी दिलेला असेल तर सरकारसुध्दा 25 तारखेपर्यंत त्याची वाट बघेल. आणि 25 तारखेला त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाचे निकष कॉलेजसनी पाळणे बंधनकारक आहे काय? असल्यास हे निकष पाळतांना प्रती विद्यार्थी येणारा खर्च हा 6 लक्ष रुपये प्रती वर्षी आहे हे खरे आहे काय?

यानंतर श्री.बरवड.....

अSुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कमलकिशोर कदम ....

शासनाला याची माहिती आहे काय ? तिसरा प्रश्न असा की, उन्नीकृष्णनच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने जो निवाडा दिला तो निवडा देत असताना उन्नीकृष्णनची जी सरासरी फी 1 लाख 47 हजार रुपये येत होती ती फी कमी आहे आणि त्या फीमध्ये वैद्यकीय महाविद्यालय चालू शकत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने स्वत:च्या निकालपत्रात म्हटलेले आहे हे खरे आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या गाईडलाईन्स आहेत. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया ही एक परफॉर्मन्स बघणारी किंवा क्वालिटी ॲश्युअर करणारी बॉडी आहे आणि त्यांनी घालून दिलेल्या ज्या गाईडलाईन्स आहेत तसेच इंजिनिअरींगच्या बाबतीत ए.आय.सी.टी. ने घालून दिलेल्या ज्या गाईडलाईन्स आहेत त्या सर्व शिक्षण संस्थांना बंधनकारक आहेत. त्यांनी जी मानके दिलेली आहेत त्या मानकांच्या आधारे येणारा जो खर्च आहे तो खर्च निश्चित करुन देण्यात आलेला आहे. उन्नीकृष्णनच्या संदर्भात जज्जमेटमध्ये काय म्हटले आहे यासंदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांनी भूमिका मांडलेली आहे. या सगळया भूमिका आपणा सगळयांच्या समोर आहेत. ते सर्व रेकॉर्डवर आहे. त्यावर मी आणखी काही भाष्य करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : यावेळी जी प्रवेश परीक्षा झाली त्या प्रक्रियेमध्ये आमच्या परिचयातील अनेक विद्यार्थी विद्यार्थीनी होत्या. अनेक महाविद्यालयांनी शेवटच्या क्षणी जाहीर केले की, ते स्वत:ची स्वतंत्रपणे परीक्षा घेणार आहेत. इंटरनेटवर माहिती विचारुन सुध्दा अचानक परीक्षा घेणार आहोत याची माहिती खूप लोकांना वेळेवर देण्यात आली नाही. त्यामध्ये साधा निकष होता. त्यांनी सांगितले की, "आप चिन्ता मत करो, आप को फीस का पता हो जाएगा, तब अपने आप पास हो जाओगे." म्हणजे ती सी.ई.टी. त्यांची नसून ही मनी एंट्रन्स टेस्ट आहे असे स्पष्ट झाले. अनेक लोकांनी प्रवेश घेतलेला आहे. काही लोक काही प्रमाणात फी देण्यास तयार आहेत. अगदी 10 लाख रुपये देऊ शकणार नाहीत पण दोन तीन लाख रुपये देऊ शकतात...

डॉ. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आरोप करीत असताना उदाहरणे सांगून, नावे सांगून आरोप केले पाहिजेत. कोण गेले, कोणी म्हटले हे सांगितले पाहिजे. मोघम आरोप करुन सर्व संस्थांना एकाच मापाने मोजण्याचा प्रयत्न करु नये.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, भारती विद्यापीठामध्ये हे घडलेले आहे. आम्ही आमची सी.ई.टी. घेतो किंवा ही सी.ई.टी. आम्ही घेणार आहोत हे विद्यार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी विनाअनुदानित महाविद्यालयांवर आहे असे मला वाटते. एका बाजूला शासन म्हणते की, माहितीची पारदर्शकता असली पाहिजे. सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. काही सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, दरवर्षी सी.ई.टी. घेतात. आम्ही स्वत:ची स्वतंत्रपणे सी.ई.टी. घेणार आहोत असे कोणत्या महाविद्यालयाने कोणत्या वेळेला जाहीर केले याबाबतचह माहिती घ्यावी व ती सभागृहासमोर मांडावी. आपण जो तपशील मागितला तो लेखी निवेदनाव्दारे आपल्यासमोर मांडू शकेन. आयत्यावेळी अनेक महाविद्यालयांनी सांगितले की, आम्ही आता नव्याने आमची सी.ई.टी. सुरु केलेली आहे. आपण एका बाजूला सांगता की, प्रवेश नियंत्रण करणारी कमिटी तयार करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना याची माहिती वेळेवर मिळण्याच्या दृष्टीने प्रत्येक जण त्या महाविद्यालयाकडे स्वतंत्रपणे संपर्क करतात पण लोकांना जर माहिती पाहिजे असेल तर त्यांनी कोणत्या कॉलेजमध्ये कधी जाऊन भेटावयाचे याबाबतीत गाईडन्स करणारी यंत्रणाच नाही. त्यामुळे लोकांची बेहाल परिस्थिती आहे. मला यामध्ये अतिशय संवेदनाहीनतेचा मुद्दा दिसतो. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांकडून सांगितले जाते की, नेहमीच अशा परीक्षा घेतात. अशी परीक्षा घेतली तरी ती कधी घेतली जाणार आहे याची माहिती विद्यार्थ्यांना वेळेवर मिळणे योग्य आहे की नाही ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या राज्यामध्ये चार प्रकारच्या संस्था आहेत. एक म्हणजे डिम्ड युनिव्हर्सिटीज आहेत. त्यानंतर अल्पसंख्यांक संस्था आहेत. खाजगी संस्था आहेत तसेच शासकीय संस्था आहेत. या चारही संस्थांचे प्रवेश कसे करावयाचे, त्यासाठी काय प्रोसीजर ॲडॉप्ट करावयाची याबाबतीत सुप्रीम कोर्टाने गाईडलाईन्स ठरवून दिलेल्या आहेत. त्यामध्ये तुम्हा आम्हाला हस्तक्षेप करण्यास वाव नाही. तरी सुध्दा अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून राज्याचे वैद्यकीय शिक्षण संचालक यांच्याकडे ही सर्व माहिती उपलब्ध असते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 15:40

श्री.दिलीप वळसे-पाटील....

आणि यासंबंधी वैद्यकीय शिक्षण संचालक यांना अधिक सतर्क करण्यात येईल. त्यांना यासंबंधीची सर्व माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात विशेष टेबल तयार करण्यास सांगितले जाईल आणि एखादा टेलिफोन नंबर पब्लिश करण्यास सांगितले जाईल, वेब साईटवर सर्व माहिती टाकावी आणि सर्वसाधारण लोकांना ही माहिती देण्यात यावी असे सांगितले जाईल आणि त्याप्रमाणे व्यवस्था केली जाईल.

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. गरीब विद्यार्थ्यांच्या हितासाठी सातत्याने ही चर्चा होत आहे. उन्नीकृष्णच्या निकालामध्ये 50 टक्के जागा मोफत आणि 50 टक्के जागा पेमेंटवर होत्या. आता गरीब वर्गाला हे शिक्षण घेणे महागडे झाले आहे अशाप्रकारची चर्चा सुरु आहे आणि हे खरे आहे. यातील जो हरवलेला मुद्दा आहे तो मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. गुणवत्तेच्या नावाखाली लान्सर गाडया घेऊन येणा-या विद्यार्थ्यांची सोय केली जात आहे. गरीब विद्यार्थ्यांची व्याख्या करण्याची व्यवस्था सरकारने केली आहे काय ?

**उपसभापती** : मा.सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, गरीब कोणाला म्हणावयाचे, त्याचा आर्थिक स्तर ठरविला आहे काय ? गुणवत्तेच्या नावाखाली पैसेवाल्या माणसांची मुले मोफत शिक्षण घेत आहेत. सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांच्यावतीने मी भावना व्यक्त करीत आहे तेव्हा कृपया आपण मला रोखू नये. माझा प्रश्न असा आहे की, आजपर्यंत गुणवत्तेचा बडेजाव करुन श्रीमंतांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. वास्तविक ख-या अर्थाने ग्रामीण भागातील, झोपडपट्टीत राहणा-या कष्टकरी वर्गातील विद्यार्थी उन्नीकृष्णनच्या निकालामुळे या शिक्षणापासून बाहेर फेकले गेले आहेत त्यांच्यासाठी काय व्यवस्था करणार आहे ? की गुणवत्तेच्या नावाखाली 18 हजार रुपयांमध्ये मोठमोठया कारमधून येणा-या आणि आलिशान बंगल्यामध्ये राहणा-या पालकांच्या मुलांना शिक्षण देणार आहात ? ही निव्वळ धूळफेक आहे त्यादृष्टीकोनातून मी प्रश्न विचारत आहे. या निर्णयामुळे गरीब विद्यार्थी बाहेर फेकला गेला आहे त्याला पुढील वर्षात प्रवेश देण्यासाठी काही व्यवस्था करणार आहात काय ? गरीब विद्यार्थ्यांना मोफत अथवा अल्प फीमध्ये शिक्षण मिळण्यासाठी सरकार आर्थिक निकष ठरविणार आहे काय आणि धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

20-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3K-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या राज्यामध्ये आर्थिकदृष्टया मागासलेला कोणाला म्हणावे, सामाजिकदृष्टया मागासलेला कोणाला म्हणावे यासंबंधी राज्यशासनाच्या गाईड लाईन्स अतिशय सुस्पष्ट आहेत. त्या वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतात. गेल्या दोन वर्षामध्ये राज्यसरकारने गोरगरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी निर्णय घेतला, यावर्षासाठी धोरण निश्चित झालेले नाही. त्याचे कारण असे की, आपले जे बजेट आहे ते नीड बेस बजेट असल्यामुळे या सर्व बाबी ठरल्याशिवाय आणि निकष ठरल्याशिवाय यासंबंधी निर्णय घेता येणार नाही.

------

3....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनाबाबतची अधिक माहिती पटलावर ठेवणे.

श्री.धर्मरावबाबा अत्राम ( महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2004 च्या दुस-या अधिवेशनातील लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासन क्रमांक 260 च्या पूर्ततेबाबतच्या कार्यवाहीची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.15 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.45 ते 4.15 पर्यन्त मध्यंतर)

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** :शालेय पाठ्यपुस्तकातून सन 1857 च्या पहिल्या स्वातंत्र्ययुध्दाचा उठाव वा अप्रायझिंग म्हणून होत असलेला उल्लेख.

**मु. शी.** शालेय पाठ्यपुस्तकातून सन 1857 च्या पहिल्या स्वातंत्र्ययुध्दाचा उठाव वा अप्रायझिंग म्हणून होत असलेला उल्लेख याबाबत डॉ.अशोक मोडक,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य डॉ.अशोक मोडक यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□-संबंधीची सूच□ मांडतो.

" शालेय पाठ्यपुस्तकातून सन 1857 च्या पहिल्या स्वातंत्र्ययुध्दाचा उठाव वा अप्रायझिंग म्हणून होत असलेला उल्लेख."

सभापती महोदय,महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांसाठी जी शालेय पाठ्यपुस्तके आहेत, त्या पाठ्यपुस्तकांमध्ये 1857 चा स्वातंत्र्य समराचा उल्लेख, 1857 चा उठाव या नावाने होतो आहे. मी यासंबंधात विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. इयत्ता 10 वी चे पुस्तक आहे त्याचे नाव " साम्राज्यवाद व भारतीय स्वातंत्र्यलढा" असे आहे. त्या पुस्तकातील प्रकरण क्रमांक 6 चे शिर्षकच "1857 चा उठाव" असे आहे. वास्तविक पाहता या प्रकरणाचे उठावासंदर्भातील चर्चा किंवा विवेचन लेखकाने केले आहे ते जरी लक्षात घेतले तरी असे लक्षात येईल की, हा उठाव तथाकथीत होता, ख-याअर्थाने भारतव्यापी होता. तेथूनच भारताच्या स्वातंत्र्य युध्दास सुरुवात झाली. वाक्य मोठे उदबोधक आहे. हा उठाव भारतीय राष्ट्रवादाला उत्तेजन देणारा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

डॉ.अशोक मोडक...

ठरला.उठावाचा बिमोड करतांना इंग्रजांनी सुडबुध्दी दाखविल्यामुळे भारतीय जनता दुखावली. त्यामुळे इंग्रजा विरुध्दच्या असंतोषात भर पडली. 1857 च्या उठावाने स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा दिली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी "पहिले स्वातंत्र्ययुध्द" या शब्दात 1857 च्या उठावाचा गौरव केला आहे. इयत्ता 8 वी चे पुस्तक आहे. त्यात सुध्दा प्रकरण सहावे आहे. शिर्षक "1857 चा राष्ट्रीय उठाव" असेच आहे. सभापती महोदय, केवळ दोन वर्षांनी या पहिल्या स्वातंत्र्य युध्दाचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव भारतात आपण साजरा करणार आहोत.अनेकांनी असे स्वप्न रंगविले आहे की, भारत आणि पाकिस्तान या दोघांनी एकत्र येऊन या स्वातंत्र्य समराचा हा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करावा इतके भारत वर्षाच्या इतिहासास महत्व आहे.आपले दुर्दैव असे आहे की, आपण पुढच्या पिढीसमोर, विद्यार्थ्यांसमोर काय मांडत आहोत. एक विद्यार्थी मेरीटमध्ये उत्तीर्ण झाला म्हणून त्या विद्यार्थ्याचा सत्कार करण्यासाठी मी त्याच्या शाळेत गेलो होतो. त्या विद्यार्थ्यांचे भाषण ऐकल्यानंतर त्या विद्यार्थ्याच्या शिक्षकास विचारले की, या विद्यार्थ्याने असा उल्लेख कसा काय केला. तर शिक्षकांनी सांगितले की, पाठ्यपुस्तकात तसे लिहीले आहे. त्या विद्यार्थ्याला कशाला दोष देता. जे "आडात आहे ते पोह-यात येणार ." मंत्री महोदय, आपण शिक्षणाचा कार्यभार बघता ही बाब कृपा करुन लक्षात ठेवा. अंदमान-निकोबार प्रशासनाने गेल्या दोन वर्षात एक अतिशय दर्जेदार पुस्तक प्रसिध्द केले आहे. त्या पुस्तकाचे नाव " दि अनसंग हिरोज" असे आहे. 1857 च्या स्वातंत्र्य युध्दात जे कैदी म्हणून अंदमानला पकडले गेले, त्याचे प्रत्येकाचे नाव,निशाणी, त्यांचे उत्तम रेकॉर्ड आपल्याला त्या पुस्तकात पहावयास मिळते. ते पुस्तक ज्यांनी वाचले त्यांनी मला सांगितले की, त्या कैद्यांचे वंशज आजही महाराष्ट्राच्या खेडयापाडयात आहेत. सर्वार्थाने जो स्वातत्र्ययुध्दाचा पहिला प्रसंग संपूर्ण भारतावर ओढवला होता. त्याची कृपा करुन "उठाव","अप्रायझिंग", "बंड" या शब्दांनी हेटाळणी करु नका अशी माझी विनंती आहे. माननीय मंत्री महोदयांनी याबाबतची गंभीर दखल घ्यावी व त्याबाबतीत उचित बदल करावा अशी विनंती करुन मी माझे बोलणे संपवितो.

----------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पशुसंवर्धन खात्याअंतर्गत मागासवर्गीयांची भरती

**मु.शी.**: पशुसंवर्धन खात्याअंतर्गत मागासवर्गीयांची भरती याबाबत प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य प्रा. शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील(पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन खात्याअंतर्गत पशुधन पर्यवेक्षक वर्ग-3 या पदासाठी सरळसेवा मागासवर्गीय अनुशेष भरती मोहिमेअंतर्गत 31 मार्च,2003 रोजी 109 पदांचा अनुशेष शिल्लक असल्याने जाहिरात देऊन राज्यातील सर्व जिल्हा स्वयंरोजगार कार्यालयामार्फत 850 लोकांची नांवे मागवून दि. 105.2003 ते 6.6.2003 रोजी मुलाखत पूर्ण केली असणे,नंतर मा.न्यायालयाच्या आदेशानुसार फेर मुलाखती घेऊन (फेब्रुवारी व मार्च 2004) प्रक्रिया पूर्ण केली असणे,दि. 10.6.2004 रोजी 61 उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द केली जाणे,निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची कागदपत्रे जात पडताळणी प्रमाणपत्र तपासून घेऊन तेथून पुढे 1 वर्ष सर्व निवड झालेल्या उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केलेला नसणे,वरील सर्व प्रक्रिया पूर्ण करुन पात्र उमेदवारांना अचानक दि. 10.6.05 रोजी संपूर्ण् निवड प्रक्रिया रद्द झाल्याचे पात्र उमेदवारांना पत्राद्वारे कळविले. त्यामुळे त्यांचेवर व त्यांच्या कुटुंबियांवर आलेली उपासमारीची पाळी .त्याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन पात्र उमेदवारांना न्याय देण्याची आवश्यकता त्याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची भूमिका याबाबत शासनाने दखल घ्यावी म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे.

---

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाड औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांतून सोडण्यात येणारे दूषित पाणी

**मु.शी.**: महाड औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांतून सोडण्यात येणारे दूषित पाणी याबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रायगड जिल्हयातील महाड औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांतून बाहेर टाकले जाणारे रसायनमिश्रित सांडपाणी गांधारी आणि सावित्री नदीच्या पात्रात मोठया प्रमाणात सोडल्याने या नदीच्या पात्रातील हजारो मासे माहे जुलै 2005 च्या दरम्यान वा त्या सुमारास मेल्याचे उघडकीस येणे,सांडपाणी वाहून नेणा-या वाहिन्यातील एअर व्हॉल्व्ह आणि प्लॅश लाईनमधून पाण्याची गळती सुरु झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली जाणे,परिणामी परिसरातील ग्रामस्थांना,श्वसन,घसा,डोकेदुखी,चक्कर,मळमळणे सतत सर्दी होण्यासारख्या रोगांना सामोरे जावे लागत असणे,नदीतून येणारी तीव्र दुर्गंधी,झ-यामुळे प्रदुषित झालेल्या पाणवठयामुळे जगणे हराम झालेल्या महाडवासियांनी प्रदुषित पाण्यात उभे राहून आंदोलन छेडण्याचा दिलेला इशारा,याकडे आरोग्य खात्याचे होत असलेले दुर्लक्ष,सांडपाणी सोडणा-या कारखान्यांवर कडक कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत विशेष उल्लेखाद्वारे ही सूचना मांडीत आहे.

सभापती महोदय,रायगड जिल्हयामध्ये गांधारी आणि सावित्री या दोन नद्या आहेत. पुढे रत्नागिरी जिल्हयामध्ये चिपळूण तालुक्यात वाशिष्ठी नदी आहे. या दोन नद्यांमधील पाणी दूषित करण्याचे काम कारखान्यांद्वारे होत आहे. सावित्री नदीच्या पाण्यावर मासेमारी आणि भाज्यांचे उत्पादन शेतकरी घेतात. औद्योगिक विकास व्हावा म्हणून हे कारखाने उभे करण्यात आले. परंतु हे रासायनिक कारखाने त्यातून निर्माण होणा-या मिश्रणावर प्रक्रिया न करता नदीच्या पात्रात पाणी सोडतात त्यामुळे महाड तालुक्यातील गांधारी आणि सावित्री या नद्यांचे पाणी दूषित झाले आहे. त्यामुळे गावक-यांनी या नदीच्या पात्रात उभे राहून आंदोलन केले होते. या पाण्यामुळे रोगाचा

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

प्रादुर्भाव होत आहे. विशेषत: काही विशिष्ट रासायनिक द्रव्यांमुळे हाडांची अनैसर्गिक वाढ होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे या नदीच्या पाण्यावर मूग,पावटा,हरभरा अशी पीके येथील गरीब शेतकरी घेत आहे. त्याचेही नुकसान होत आहे. यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आहे. एक वेळ पिण्यासाठी पाणी वापरले जात होते. परंतु पिण्याच्या पाण्यामध्ये सगळे प्रदुषण युक्त रसायन सोडून शासनाने त्याची गंभीर दखल घेतली नाही ही अतिशय निषेधार्ह बाब आहे. कृपया कारखान्यांनी पक्रिया करुनच पाणी नदीमध्ये सोडावे आणि शेतकरी व गरीब लोकांना दिलासा द्यावा त्याचप्रमाणे रोगापासून संरक्षण करावे.

----

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या अनागोंदी कारभाराबाबत.

**मु.शी.**: महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या अनागोंदी कारभाराबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

एखादी संस्था नावारुपास येण्यास वेळ लागतो, मात्र -हास सुरु झाला की तिचे अस्तित्व संपुष्टात येण्यास वेळ लागत नाही. त्यामुळे घसरणीची जाणीव झाली की ती रोखण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. असेच लक्ष देण्याची गरज आहे, ती महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाकडे ! राज्याच्या यशस्वी सार्वजनिक उपक्रमांपैकी हे एक महामंडळ होते. 1965 मध्ये स्थापना झाल्यापासून 2000 सालापर्यंत महामंडळ कायम नफ्यात राहीले. नंतर मात्र त्याची घसरण सुरु झाली.

पाच खत कारखाने, दोन जंतुनाशकांचे कारखाने तसेच कृषी अवजारांचे उत्पादन करणारा कारखाना, असा या महामंडळाचा व्याप असून राज्यातील शेतक-यांच्या गरजा भागविण्याचे काम महामंडळ करते. पण गेली तीन-चार वर्षे महामंडळाची घसरण सुरु आहे. 1998-99 मध्ये 432 कोटी रुपयांवर असलेली महामंडळाची उलाढाल 1999-2000 मध्ये 472 कोटी रुपयांवर गेली. त्यानंतर मात्र उतरती कमान सुरु झाली आणि 2000-01 मध्ये 441 कोटी, 2001-02 मध्ये 424 कोटी आणि 2002-03 मध्ये 332 कोटी एवढी उलाढाल कमी झाली. या घसरणीबरोबर महामंडळ तोटयात गेले.

मधल्या काळात महामंडळाच्या विक्रीबाबतच्या धोरणाचे उल्लंघन करुन काही अधिका-यांनी मालाची विक्री केली होती. त्यात महामंडळाचे चार ते पाच कोटी रुपये अडकले आहेत. याबाबत काही अधिका-यांवर कारवाई झाली असली तरी वरीष्ठ अधिका-यांनी मात्र साळसुदपणे स्वत: सुटका करुन घेतली. वेळप्रसंगी दोषी अधिका-यांच्या मालमत्तांवर टाच आणून हे पैसे वसूल करण्याचा प्रयत्न व्हायला हवा, पण तसे झाले नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी.......

महामंडळाच्या कारखान्यांत इंधन म्हणून फर्नेस ऑईलचा उपयोग केला जातो. असे खरेदी केलेले 40 लाखांचे फर्नेस ऑईल वर्धा कारखान्यात प्रत्यक्षात पोहोचलेच नव्हते. त्याचे पैसे मात्र देण्यात आले. ही बाब तब्बल आठ वर्षांनी उघडकीस आली. याबाबत पोलिस केस झाली असली तरी फर्नेस ऑईलचे झाले काय, याचा गुंता उलगडू शकलेला नाही. "एसएसपी" च्या उत्पादनासाठी जालना येथील एक प्लॅन्ट महामंडळाने विकत घेतला होता. पण तोही चार वर्षे बंद आहे. आता तो वापरात आणायचा तर पुन्हा 40-50 लाख रुपये खर्चे करावे लागतील. याची जबाबदारी कुणाची तेही शोधायला हवे. महामंडळाचा पनवेल येथील खत कारखाना "मदर प्लॅन्ट" आहे. गेली दोन-तीन वर्षे तो बंद आहे. आश्चर्याची बाब म्हणजे हा कारखाना बंद करण्याच्या आधी त्याच्या आधुनिकीकरणासाठी एक कोटी रुपये खर्च करण्यात आले हाते. या प्रकाराची चौकशी करतानाच हा कारखाना नफ्यात आणण्यासाठी कर्मचारी संघाने दिलेल्या आराखडयाचाही विचार व्हायला हवा.

महामंडळाचा "नोगा कारखाना" कायम तोटयात राहिला आहे. येथे काही अधिकारी वर्षानुवर्षे ठाण मांडूण बसले असून त्यांना कधी तरी धक्का द्यायला हवा. त्याचबरोबर नोगाची उत्पादने मिळतील याची काळजी घ्यायला हवी. याबाबत कर्मचा-यांना रोख पैसे देऊन ही उत्पादने घ्यायची असली तरी ती मिळत नाहीत. दुधाच्या वितरणात असलेल्या "महानंदा" सारख्या संस्थेच्या माध्यमातून या उत्पादनांचे वितरण करता येईल का याचा विचार व्हायला हवा. विदर्भातील संत्रा उत्पादक शेतक-यांना खूश करण्यासाठी काटोळ व मोर्शी येथे दोन प्रकल्प उभारण्याचा भार महामंडळावर टाकण्यात आला. पण त्याचे तीन कोटी 45 लाख रुपये सरकारकडून महामंडळाला आजतागायत मिळू शकलेले नाहीत. सरकारी कर्मचा-यांना पाचवा वेतन आयोग लागू होवून सहा वर्ष झाली तरी त्यांच्या शिफारशी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या कर्मचा-यांना लागू होऊ शकलेल्या नाहीत. बढत्यांच्या बाबतीत अशीच कुंठितावस्था आहे. वरिष्ठांच्या बढतीचा प्रश्न आला की आपोआपच मार्ग निघतात. कर्मचा-यांनी बढतीची मागणी केली की मात्र जागा रिक्त नसल्याचे उत्तर मिळते. त्यामुळे एकूण महामंडळाच्या कारभाराची कृषीमंत्र्यांनी दखल घ्यावी. अशी कर्मचा-याची अपेक्षा आहे.

....6.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी......

सभापती महोदय, एखादी संस्था नावारुपास येण्यास वेळ लागतो परंतु गैरकारभारामुळे तिचे अस्तित्व संपुष्टात येण्यास वेळ लागत नाही. अशा प्रकारचा कारभार कृषी उद्योग महामंडळाचा आहे. निवेदनामध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. या महामंडळाचे 5 खत कारखाने,2 जंतुनाशक कारखाने तसेच अवजारे तयार करण्याचे कारखाने आहेत. या महामंडळाची 1965 मध्ये स्थापना  झाल्यानंतर 2000 सालापर्यंत हे महामंडळ फायद्यात होते. त्यानंतर काही घोटाळे बाहेर आल्यानंतर या महामंडळाची घसरण सुरु झाली. अनेक लोक बेरोजगार झाले. राज्य शासनाने या सार्वजनिक उपक्रमामध्ये गंभीरतेने लक्ष घालावे आणि निवेदनाच्या माध्यमातून जे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत त्याची गंभीर दखल घ्यावी अशी मी विनंती करतो.

----

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : वडाळा येथील ट्रक टर्मिनलला पायाभूत सुविधा पुरविणे

मु.शी.: वडाळा येथील ट्रक टर्मिनलला पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी सस्था ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

"नवी मुंबई हे मुंबईचे जोड शहर म्हणून निर्माण झाले आहे आणि अनेक घाऊक मंडया आणि छोटे मोठे व्यवसाय तेथे स्थलांतरित झाले आहे. मुंबईचा वाहतूक प्रश्न आणि प्रदूषणाचा विळखा या समस्यांवर उपाय म्हणून दक्षिण मुंबईतील अवजड वाहनांची वाहतूक नियंत्रित करण्यात येऊन वडाळा येथे भारवाहक तळ - ट्रक टर्मीनलचा महत्वाकांक्षी प्रकल्प साकारण्यात आला.

शासनाच्या हेतू विषयी सहमती दर्शवून माल वाहतूकदारांच्या संघटनांनी दक्षिण मुंबईतून स्थलांतरित होण्याची तयारी केली. 1997 साली अंदाजे 400 वाहतूकदार स्तलांतरित झाले त्याकरिता त्यांना अनेक तडजोडी स्वीकाराव्या लागल्या. त्यातच शासनाच्या भाडेपट्टी, भूभाडे महानगरपालिकेचे विविध कर आणि स्टॅम्प डयुटी इत्यादी जाचक अटीमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. वास्तविक वाहतूकदारांचे स्थलांतर हे एक प्रकारे पुनर्वसन होते आणि एखाद्या प्रकल्पग्रस्त विस्थापितांना मिळणा-या सवलती शासनाने स्वत:हून देणे गरजेचे होते. त्यामुळे सुरुवातीलाच संघर्षाला तोंड फुटले, आर्थिक नुकसानीमुळे वाहतूकदारांनी काहीसा असहकार केला परंतु नंतर शहराच्या हितासाठी व शासनाला सहकार्य देण्यासाठी त्यांनी सहकार्य दिले. भारवाहक तळाचा पहिला टप्पा काही अडचणीमुळे शासनाला पूर्ण करणे शक्य झाले नाही म्हणून पुढील 3 टप्पेच नव्हे तर पहिल्या टप्प्याच्या अनेक पायाभूत सुविधा, दिवाबत्ती,रस्ते,सफाई, पाणीपुरवठा इत्यादी रखडल्या. कदाचित आर्थिक नुकसान भरुन काढण्यासाठी आर.टी.ओ.कार्यालयाला भाडयाने जागा देणे, रेडिमिक्स क्रॉकीट व ॲस्फॉल्ट प्रकल्पांना भाडेपट्टीने जमिनीचे पट्टे दिले अग्निशामक दल, पोस्ट ऑफिस, बॅक, टेलिफोन एक्सचेंजच्या इमारती रिकाम्या अवस्थेत राहिल्या.

एम.एम.आर.डी.ए. आणि मुंबई महानगरपालिका यांच्यात मेळ नसल्यामुळेच वडाळा भारवाहक तळाची अशी दैन्यावस्था झाली आहे. खरे तर हा भारवाहक तळ म्हणजे आर्थिक दृष्टीने

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

फायदेशीर ठरला असता. जर शासनाने त्याचे व्यवस्थित संयोजन केले तर आतापर्यन्त खर्च झालेल्या शेकडो कोटी रुपयांची भरपाई होऊन राज्याच्या तिजोरीत तितक्याच निधीची प्रतिवर्षी भर पडेल. अनेक मंत्री आणि अधिका-यांनी, उपभोक्या वाहतूकदारांना या पूर्वीही अनेक आश्वासने दिली .मात्र निर्णय कोणताच झाला नाही व सर्व प्रश्न तसेच अनिर्णित राहिले.

मुंबई शहराची वाहतूक समस्या, प्रदूषण आणि विविध अन्य समस्यांमुळे वडाळा ट्रक टर्मिनलच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी व उभारणी करण्यात आली. गत दहा वर्षाच्या काळात ते उद्देश का सफल झाले नाहीत ? माल वाहतूक पुरवठा करणा-या या महत्वाच्या व्यवसायात गुंतलेल्या आणि त्यांच्यावर अवलंबून असणा-या अन्य अनेक व्यावसायिकांच्या हिता बरोबर, शासनाच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर न पडता प्रचंड नुकसान का होत आहे ? वडाळा ट्रक टर्मिनलचे प्रश्न खरोखर गंभीर आहेत याची जाणीव असल्यामुळेच माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले आणि महिनाभरात ठोस निर्णय घेतला जाईल अशा प्रकारे त्यांनी आश्वासन दिले होते.मुंबई शहरा बाहेर मिळणा-या इंधनाच्या दरात मोठी तफावत आहे. इंधनाच्या दरामध्ये समानता हवी या मागणीचा विचार करणे आवश्यक आहे.टर्मिनलच्या मूळ आराखडयाप्रमाणे पाणी,दिवा बत्ती, स्वच्छता, वाहनतळ (पार्किग), वाहन दुरुस्ती व्यवस्था, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था या सुविधांची तातडीने अंमलबजावणी व्हावी, मूळ आराखडयाप्रमाणे येथे पोलीस बीट चौकी ऐवजी परिपूर्ण पोलीस ठाणे निर्माण झाले त्यामुळे वाढलेली जनतेची वर्दळ,त्याचे व्यवस्थापन व्हावयाला हवे.

बेस्ट बसचा केवळ एकच मार्ग आहे. त्यातही "विश्राम थांबा " नसल्यामुळे व्यावसायिक आणि त्यांचे महिला - पुरुष कर्मचारी यांची गैरसोय, ऑटो रिक्षाची मागणी लक्षत घेणे गरजेचे आहे. नियंत्रण कक्ष म्हणून उभारलेल्या प्रवेशव्दाराचा वापर गत दहा वर्षात योग्यप्रकारे होत नाही तसेच अवजड वाहनांच्या येण्या जाण्यावर प्रतिबंध, ती अडचण दूर करण्याकरिता किमान तीन ठिकाणी प्रवेशमार्ग असण्याची आवश्यकता, ट्रक टर्मिनल मध्ये असलेल्या आर.टी.ओ. कार्यालय, पोलीस ठाणे, पेट्रोल पंप, हॉटेल्स आणि या सर्व व्यावसायिकांचे ग्राहक विविध मालाचे पुरवठादार यांच्या अपु-या व्यवस्थेमुळे होणा-या अडचणीचे सर्वेक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेऊन शासनाने या प्रश्नांचा गांभीर्याने विचार करुन होणारे

3...


VTG/ MHM/ प्रथम श्री.कानडे 16=25

नुकसान टाळावे. ज्या उद्दिष्टासाठी ट्रक टर्मिनल निर्माण केले ते उद्दिष्ट सफल होण्यासाठी अत्यंत तातडीने कार्यवाही करावी .सदर विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छितो.धन्यवाद

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4...

## पृ.शी/मु.शी : सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**उपसभापती** :पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे.कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्याच्या पूरक मागण्यांवरील चर्चा आज दिनांक 20 जुलै, 2005 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनव्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांनी भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही. हे सदस्यांना सांगावयास नको. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपा धान्यात घ्यावे.माझ्याकडे एकूण 24 सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. त्यांची भाषणे झाल्या नंतर माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर होणार आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण अत्यंत मर्यादित स्वरुपात आणि इतर सदस्यांना बोलण्याची संधी प्राप्त होईल या दृष्टीने करावे. एवढी मी आपल्याला सूचना करतो.

### विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

**उपसभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेसाठी घेण्यात येतील

1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-2,ए-3,ए-4,ए-5,ए-6 व ए-7,सी-1,सी-2,सी-4 ,सी-6,एफ-2,एफ-5,जे-1,क्यु-3
2) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1,बी-4,बी-5,बी-9
3) ग्राम विकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागणी क्रमांक एल-2,एल-5
4) परिवहन,बंदरे व विमुक्त , भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयाचे कल्याण मत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-3,एन-3,ए-4
5) उद्योग, खनिकर्म,सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-7,एन-2,एन-4

5...



6) राज्य उत्पादन शुल्क,पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-2,के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

7) शालेय शिक्षण,क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक इ-2,इ-3ए

8) पशुसंवर्धन,दुग्ध विकास,मत्स्यव्यवसाय व औकाफ मत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-4,डी-5,डी-6,डी-9

9) कृषी ,जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-2ए डी-3,आय-5,एल-1,एल-3,एल-7

10) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एन-1,एन-3

11) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-5,टी-6,

---

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या सुरूवातीलाच माझा एक हरकतीचा मुद्दा मी येथे उपस्थित करू इच्छितो. आम्हाला आमच्या पीजन होलमधून खर्चाची पूरक विवरणपत्रे मिळाली आहेत. आताही आपण नियम सांगताना चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांनी पृष्ठ क्रमांक आणि बाब क्रमांक यांचा उल्लेख करून आपले विचार मांडावेत असे सांगितले आहे. आज आपल्या समोर सामान्य प्रशासन विभाग आणि गृह विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी आहेत. परंतु या विभागाची काही माहितीच या आम्हाला देण्यात आलेल्या पूरक विवरणपत्रामध्ये नाही. ती माहिती नसेल तर मी या चर्चेमध्ये बोलू शकणार नाही. मला या विभागांच्या पुरवणी मागण्यांवर बोलावयाचे आहे. ....

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आमच्याकडे असलेल्या पुस्तिकेमध्ये आजच्या सर्व विभागांच्या पुरवणी मागण्यांबाबतची माहिती आलेली आहे. ...दुसरे असे की, आज सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचा वाढदिवस आहे. तेव्हा मी आपल्यामार्फत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो. तसेच त्यांना सांगू इच्छितो की, आपण दुसरे पुस्तक पाहिल्यास त्यामध्ये त्यांना पाहिजे असलेल्या सर्व विभागांच्या पुरवणी मागण्यांबाबतची माहिती मिळेल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त माझ्या कडून देखील हार्दिक शुभेच्छा. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कदाचित आपल्या कडील पुस्तिकेमध्ये आपण म्हणता त्याप्रमाणे त्या त्या विभागाची माहिती आली नसेल. पण बाकी सर्व पुस्तकांमध्ये ती माहिती आलेली आहे. तेव्हा आपण दुसरे पुस्तक घेतल्यास आपल्याला ती माहिती मिळू शकेल.

तरी आता मी सन्माननीय विरोधी पक्षनेता यांना या चर्चेला सुरूवात करण्यास सांगतो.

....... 3पी 2 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. या पुरवणी मागण्यांमधील बाब क्रमांक 21 व 22, पृष्ठ क्रमांक 15, तसेच बाब क्रमांक 23 व 26, पृष्ठ क्रमांक 15, 17 व 19 या संबंधात मला या ठिकाणी बोलावयाचे आहे. पोलीस प्रशासनाच्या दर्जामध्ये वाढ करण्यासाठी अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार भारत सरकारने 2002 ते 2005 या कालावधीसाठी 18,17,80,000 रुपये इतकी रक्कम दिली आहे. .... सभापती महोदय, आज सभागृहामध्ये गृह खात्याच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा होत आहे. पण या ठिकाणी गृह विभागाचे कोणीही मंत्री, राज्यमंत्री उपस्थित असल्याचे दिसत नाही. तर मग या विभागाच्या चर्चेला उत्तर कोण देणार आहे ? गृह विभागाचे मंत्री आणि राज्यमंत्री असे दोन दोन मंत्री असताना त्या पैकी एकाने तरी सभागृहामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. ...

**उपसभापती** : खालच्या सभागृहामध्ये मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही गेलेले आहेत. आपण भाषण सुरू ठेवावे, नंतर ते येथे येऊन उत्तर देतील. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे असे चालणार नाही. कालही असेच झालेले होते आणि आज आताही असेच होत आहे. हे योग्य नाही. पुरवणी मागण्यांवरील चर्चा आहे. तेव्हा विभागाच्या दोन पैकी एका मंत्र्यांनी तरी येथे उपस्थित राहणे आवश्यक असते. वाटल्यास, आपण त्यासाठी 10 मिनिटे सभागृहाची बैठक तहकूब करावी. ...

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मी 4.45 वाजेपर्यंत स्थगित करतो.

सभागृहाची बैठक 4.32 ते 4.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.

( यानंतर श्री. जागडे .... 3क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री नाहीत, तेव्हा सभागृहाची बैठक आणखी 15 मिनिटांकरिता स्थगित करावी.

श्री. जयंत प्र. पाटील : उद्या सकाळी मागण्यांवर चर्चा करावी.

श्री. अरविंद सावंत : उद्या सकाळी मागण्यांवर चर्चा करावी.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : मी सभागृहाची बैठक 5.00 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक सुरु झाल्यानंतर सभागृहाच्या कामकाजाची माहिती देण्यात येईल.

( सभागृहाची बैठक 4.47 ते 5.00 वाजेपर्यन्त स्थगित )

--

( यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:00

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)**

पृ.शी./मु.शी.: सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु)

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, अजूनही गृह विभागाचे मंत्री महोदय येथे उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : कॅबिनेट मंत्री आहेत. आपल्यासमोर आज खूप कामकाज आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गृह विभागाच्या संबंधातील पान क्र. 15,17,19 वरील बाब क्र. 21,22,23 व 26 बाबत बोलावयाचे आहे. बाब क्र.21 मध्ये पोलीस प्रशासनाची दर्जावाढ करणे. यामध्ये असे म्हटलेले आहे की,"अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार, भारत सरकारने 2002 ते 2005 या कालावधीसाठी राज्यातील पोलीस प्रशासनाची दर्जावाढ करण्यासाठी रुपये 18,17,80,000 एवढी रक्कम दिली आहे. या रकमेपैकी रुपये 16,91,46,000 इतक्या रकमेचा वापर करण्यात आला आहे. भारत सरकारने रुपये 1,26,34,000 एवढया उर्वरित रकमेस पुनर्मान्यता दिली असून, ती रक्कम अर्थसंकल्पात तरतुदीत करण्याची आवश्यकता आहे." बाब क्र. 22 पदे निर्माण करण्यासंबधातील आहे. काल पोलीस महासंचालकांनी जे स्टेटमेंट केले आहे, ते मी वाचले. त्यांनी असे म्हटलेले आहे की, पोलीस खात्यात 11 हजार पदे भरावयाची आहेत. यामध्ये पोलीस, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण, पोलीसांना प्रोत्साहन देणे या बाबी अंतर्भूत केलेल्या आहेत. पोलिसांच्या दर्जात वाढ झाली पाहिजे, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, रिक्त पदे भरली पाहिजेत याबद्दल कोणाचेही दुमत असू शकत नाही. पोलिसांच्या कामकाजाच्या दर्जामध्ये वाढ झाली पाहिजे. यापूर्वीच्या काळात महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या पोलीस खात्याची संपूर्ण जगात प्रसिध्दी होती. पण गेल्या पाच-सहा वर्षात पोलीस खात्याच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. गेल्या 3-4 वर्षात राज्यात दरोडेखोरीच्या प्रकरणात, बलात्काराच्या प्रकरणात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. आघाडी शासनाच्या 3-4 वर्षाच्या काळात . . . .

श्री.गुरुनाथ कुलकर्णी(खाली बसून) : तीन-चार नाही, सहा वर्षाच्या काळात.

. . . .3 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कुलकर्णीसाहेब, मी गेल्या तीन-चार वर्षाच्या काळासंबंधी बोलत आहे. या कालखंडात गुन्हेगारी कमी झालेली नाही. उलट याचा आलेख वाढत गेला आहे आणि गेल्या दोन-तीन महिन्यात गुन्हेगारीच्या एवढया घटना झाल्या आहेत की, हा आलेख शेअर बाजारातील निर्देशांकाप्रमाणे उच्चांक गाठत आहे. राज्यात दरोडेखोरीचे प्रमाण किती आहे हे जाणुन घेण्यासाठी आता आकडेवारी पाहण्याची गरज राहीलेली नाही, एवढी सातत्याने याच्या संख्येत वाढ होत आहे. मराठवाडयातील बीड,जालना,औरंगाबाद,परळी,नांदेड तसेच विदर्भातील अकोला, अमरावती येथे प्रचंड प्रमाणात दरोडेखोरीचे प्रकार वाढलेले आहे. एकही महिना असा गेला नाही की, या जिल्हयांमध्ये 5 ते 10 दरोडेखोरीच्या घटना झाल्या नाहीत. दरोडेखोरांचे साहस एवढे वाढलेले आहे की, गेवराईचे माजी आमदार श्री.बदामराव पंडित यांच्या घरी सुरक्षा रक्षक असतानाही दरोडा पडला आणि त्यामध्ये तेथील सुरक्षा रक्षक ठार झाला. अशा प्रकारची ही एकच घटना नाही तर बुलढाणा जिल्हयात, ज्या शहरात मी राहतो त्या खामगावमध्ये राठी कुटुंब होते. गेल्या दोन वर्षापूर्वी रात्री 12.00-12.30 वाजता दरोडेखोर त्यांच्या घरात घुसले आणि त्यांनी 17 ते 18 लाखाचा माल चोरुन नेला आणि राठी पिता-पूत्राची निघृणपणे हत्या झाली.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू..

सभापती महोदय, दोन वर्षाच्या कालावधी निघून गेला परंतु अजूनही त्या दरोडेखोरांचा पत्ता लागला नाही. त्यामध्ये दोन माणसांचे जीव गेले, अजूनही दरोडेखोर पकडले नाहीत. या प्रकरणी काहीतरी थातूरमातूर, काही तरी शोध लावला असे होईल, म्हणून 15 दिवसापूर्वी कोणता तरी आरोपी पकडून, तो राठी हत्याकांडातील आहे, असे भासविले जात आहे. मागच्या आठवडयामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरामध्ये श्री.वाघवाडी नावाच्या इसमाच्या घरावर दरोडा घालून 10 लाखाचा माल चोरीस गेला. अकोला शहरामध्ये देखील दोन-तीन महिन्यापूर्वी असाचा मोठा दरोडा पडला परंतु अजूनही तपास लागलेला नाही. राज्यात दरोडेखोऱ्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. रोज कोठे ना कोठे दरोडे पडतात. जवाहिऱ्याच्या पेढीवर दरोडा पडणे, बँकेची कॅश मधेच गाडी अडवून पळवून नेणे, अशा प्रकारच्या घटना राज्यामध्ये चालू आहेत. पोलिसांची कार्यक्षमता वाढविण्याबद्दल दुमत नाही. परंतु एकंदरीत पोलिसांच्या मानसिकतेमध्ये दिवसेंदिवस बदल होत आहे, गुन्हेगारी वाढत चाललेली आहे, मुंबईमध्येच नव्हे तर महाराष्ट्राला धक्का देणारी ही बाब आहे. घाटकोपरच्या बॉम्बस्फोटाचा निकाल लागला त्यामध्ये एकाही आरोपीला शिक्षा झालेली नाही. म्हणजे पोलिसांनी आरोपींना कशाप्रकारे पकडले गेले, कशाप्रकारे त्यांची चौकशी केली, कशाप्रकारे गुन्हा दाखल केला, हा संशोधनाचा विषय आहे. म्हणूनच गुन्हेगारी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. एकप्रकारे गुन्हेगारांना प्रोत्साहन पोलिसांकडून, शासनाकडून दिले जाते की काय अशाप्रकारची शंका जनतेच्या मनात निर्माण व्हायला लागलेली आहे. जवाहिऱ्याच्या पेढीवर, बँकांच्या कॅशवर दरोडा टाकला जात नाही तर एस.टी.च्या गाड्या, खाजगी गाड्या अडवून लुटमार केली जात आहे. आजची पुरवणी मागणी ही पोलिसांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी केलेली आहे. परंतु पोलीस दलाची कार्यक्षमता कशाप्रकारे आहे,याचे उत्तम उदाहरण मी देतो. गेल्या डिसेंबरमध्ये विषारी दारु प्यायल्यामुळे 81 माणसांचा मृत्यू ओढविला, मुंबईतील सातरस्त्या भागामध्ये अशाप्रकारचे दारुकांड झाले, त्यामध्ये 13 लोकांचे बळी गेलेले आहेत. विशेषत: सातरस्ता भागामधील दारु विक्रोळी येथे नेल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्याचप्रमाणे सध्या मुंबई शहरामध्ये बांधकाम क्षेत्रामध्ये झपाट्याने वाढ होत आहे. बिल्डर्सच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाची उलाढाल वाढत आहे. यामध्ये गुन्हेगार सक्रीय झालेले आहेत.

2..

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू..

बांधकाम क्षेत्राकडे गुन्हेगार वळलेले आहेत. छोटा राजन टोळीतील मंडळींचा अत्याधुनिक शस्त्रसाठा मुंबईच्या गुन्हा अन्वेषण विभागाचे उप आयुक्त श्री.प्रदीप वर्मा यांनी पकडला. त्यांनी चांगले काम केलेले आहे. मुंबईतील जनतेला पोलिसांबद्दल थोडा विश्वास वाटायला लागला अशाप्रकारचे चित्र निर्माण झाले. गुन्हेगारी समजू शकतो, दरोडा समजू शकतो परंतु राज्यामध्ये छत्रपती शिवरायांच्या नावाने राज्य चाललेले आहे, शिव छत्रपती हे अवतारी पुरुष म्हणून जन्माला आले होते. जर त्यांच्या तत्वानुसार राज्य चालते. असे असताना, या राज्यामध्ये महिलांवर बलात्काराचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढत चाललेले आहे. गेल्या दोन तीन महिन्यातील बातम्यांवर नजर टाकली तर या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. मरिन ड्राईव्हवर एक घटना घडली. मरिन ड्राईव्हपासून शासनाचे मंत्रालय एक कि.मी.वर देखील नाही. सरकारच्या नाकावर टिच्चून, सरकारच्या पोलीस हवालदाराने, अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने मरिन ड्राईव्ह पोलीस चौकीमध्ये नेवून भर दुपारी तिच्यावर बलात्कार केला, हे कशाचे लक्षण आहे? हे काय चालले आहे ?

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार..... 17:10
श्री. पांडुरंग फुंडकर...

पोलिसांची कुठली कार्यक्षमता वाढविणार आहात.?शासनाचा पोलिसांवर वचक राहिलेला नाही, हे याचे दृश्य चित्र आहे. मरीन ड्राईव्हची ही घटना घडते ना घडते तोच तिस-या दिवशी, साहेब आपल्याच मतदारसंघात व्यंकटपूर नावाचे गाव आहे. व्यंकटपूरमध्ये काय घडले? या व्यंकटपूरमध्ये एक परकीरवार कुटुंब राहते. शंकर परकीरवार त्याचे नाव आहे. संध्याकाळच्या वेळी श्री. मगरे नावाचा पोलीस उपनिरीक्षक या परकीरवारच्या घरी गेला, आणि त्याच्या पत्नीला विचारले की,तुझा पती कुठे आहे? त्यावेळेला या परकीरवारच्या पत्नीने त्याला सांगितले की, माझे पती बाजूलाच डयुटीवर गेलेले आहेत. घरात 12 वर्षाचा मुलगा आहे. हया मगरेने त्या मुलाला सांगितले की,
तुझ्या वडिलांना बोलावून आण. तो मुलगा आपल्या वडिलांना बोलावण्यासाठी बाहेर गेला आणि या नराधमाने घरात घुसून त्या महिलेची छेडखानी करायला सुरवात केली. सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर दुस-याच दिवशी मी त्या घटनास्थळी जाऊन आलो, ती हकीकत या ठिकाणी सांगितली पाहिजे. त्या ठिकाणी जाऊन मी त्या माऊलीचे प्रत्यक्ष स्टेटमेंट घेतले. त्याची सी.डी.
माझ्याजवळ आहे. त्या माऊलीने सांगितले की, सायंकाळी 7.00 वाजता ही घटना घडली. बाजूलाच सरपंचाचे घर आहे. तिच्या मुलाला बाहेर पाठविले आणि तो पोलीस उपनिरीक्षक श्री. मगरे तिच्या घरात घुसला. तिच्या अंगावरचे ब्लाऊज फाडले, तिची साडी ओढण्याचा प्रयत्न केला, तिच्या अंगावर झडप घालण्याचा प्रयत्न केला. परंतु डोंगरद-यात राहणारी ही महिला काटक होती. तिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. 15 मिनिटे तिची आणि त्या पोलीस उपनिरीक्षकाची झटापट चालू असतांना त्या महिलेचा पती घरी आला आणि ज्यावेळी तिच्या पतीने ती झटापट बघितली त्यावेळी त्या पति-पत्नीने मिळून प्रतिकार करण्यास सुरुवात केली. ज्यावेळेला त्या पति-पत्नीचा प्रतिकार व्हायला लागला त्यावेळी त्या उपनिरीक्षकांने कमरेचे पिस्तुल काढले आणि त्या श्री. शंकर परीकरवारच्या पायावर गोळी झाडली. त्यानंतरही तो ऐकत नाही असे पाहून त्या पोलीस उपनिरीक्षक श्री. मगरेने पोलीस स्टेशनमधून पोलीस घेऊन यावयास सांगितले. दारुच्या नशेत धूंद असलेले 10 पोलीस तेथे पोहचले. हा शंकर परकीरवारला रिंगणात उभे केले आणि त्याच्या पेकाटात गोळया झाडल्या.  बायकोवर बलात्कार करुन देत नाही म्हणून एका गरीब मणसाची, गरीब मजुराची हत्या करणार ..................................................................

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/     प्रथम श्री. किल्लेदार.....     17:10

श्री. पांडुरंग फुंडकर...

असाल तर पोलिसांचे मनोधैर्य कुठे चालले आहे याचे मनन करा.चिंतन करा.शासनाचे पोलीस कुठल्या स्टेजला चाललेले आहेत?पेकाटात प्गोळया घालून तो थांबला नाही. तो परकीरवार पाणी मागत होता पण त्याला पाणी पाजले नाही. त्याच्या पत्नीला उडवा, मुलाला उडवा असे म्हटले म्हणून त्याची बायको आणि मुलगा बाजूच्या सरपंचाच्या घरी लपून बसले होते. त्या परकीरवारला पाणी प्यायला दिले नाही. त्याला दवाखान्यात नेण्याची व्यवस्था केली नाही. आधी त्याला बैलगाडीत टाकले, नंतर जीपमध्ये टाकले. त्याच्या बायकोने सांगितले मला सोबत येऊ द्या. त्याच्या बायकोला सोबत नेले नाही. 7 वाजता ही घटना घडल्यानंतर रात्री 11.00 वाजता त्या व्यकंटपूरवरुन अहेरी नावे गाव जवळपास पाच कि.मी.वर आहे. त्या पाच कि.मी. वर रात्री 11 वाजता त्याला नेण्याचा पोलिसांनी विचार केला. त्याला त्वरित नेल असते तर तो शंकर परीकीरवार वाचला असता.सभापती महोदय, घटना ऐकून अंगावर शहारे येतात अशा पध्दतीची घटना व्यंकटपूरला घडली, मरीनड्राईव्हला घडली. ठाण्याला घडली. अंबरनाथला घडली. नागपूरला घडली. यवतमाळला घडली. अशा त-हेच्या किती घटना सागांव्यात. या घटनांचा एक बंचच माझ्याजवळ आहे. बलात्काराची प्रकरणे या राज्यात वाढत चाललेली आहेत. बलात्कार कोण करते? सभापती महोदय, हा बलात्कार कोणी केला? ज्यांच्या हाती आमच्या संरक्षणाची जबाबदारी आहे तेच जर आमच्यावर झडप घालायला लागले, तेच जर महिलांवर बलात्कार करावयाला लागले तर न्याय कोणाकडे मागावयाचा? मंत्रिमहोदयांनी याचे उत्तर द्यावे की, या राज्यातील गरीब जनतेने न्याय कोणाला मागावयाचा?म्हणून तुमच्या राज्यात महिला सुरक्षित नाहीत. सर्वसामान्य माणूस सुरक्षित नाही. तुमच्या राज्यामध्ये कुठलाही नागरीक सुरक्षित नाही. संध्याकाळनंतर महिलांनी घराच्या बाहेर जावयाचे की नाही याचाही विचार करावा लागेल. पोलिसांचे बलात्कार जसे वाढले आहेत, तसे आता पोलिसांचे बघून गुंडांनी बलात्कार करण्यास सुरुवात केली आहे. मी ज्या गावात राहतो त्या गावात गरीब विधवा 29 वर्षाची नर्स आहे. तिच्या घरी आठ नराधमांनी जाऊन तिच्यावर सामुहिक बलात्कार केला.

यानंतर श्री. बरवड...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

जे गुंड आहेत त्यांचे बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. पोलिसांचे बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. मग तुम्ही महिलांचे रक्षण कसे करणार ? याचे उत्तर या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पैसे मागत असताना शासनाने दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे. अशा पध्दतीने पोलीस प्रशासन किडत चालले आहे. पोलीस प्रशासनासंबंधी जनतेचा विश्वास राहिलेला नाही. गरीब माणसाला पोलीस स्टेशनमध्ये न्याय मिळत नाही. क्रिमिनल्स आणि गुंड मात्र पोलीस स्टेशनमध्ये फौजदाराच्या बाजूला जाऊन बसतात असे चित्र निर्माण झाले आहे. सज्जन आणि सर्वसामान्य माणसाला पोलीस स्टेशनचा धाक वाटावयास लागला आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलिसांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ झाली पाहिजे याबद्दल दुमत नाही परंतु आपण हे दुरुस्त करणार आहात काय ? आपण विधानसभेच्या माध्यमातून पुरवणी मागण्या सादर करतो परंतु त्या मागण्या सादर करीत असताना या राज्यातील जनतेला आपण संरक्षणाची हमी देणार की नाही ? राज्यातील महिलांना त्यांच्या अब्रूच्या संरक्षणाची हमी आपण देणार की नाही ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे. केवळ थातुरमातुर उत्तर देऊन, थातुरमातुर गुन्हे दाखल करुन हा प्रश्न मिटणार नाही. विधानसभेमध्ये श्री. शंकर परकीरवार यांचा विषय उपस्थित झाला. त्याचे घर उध्वस्त झाले. ते घर आतापर्यन्त निराधार होते. त्या घटनेला तीन महिन्यांचा कालावधी होऊन सुध्दा आजपर्यन्त त्या विधवा महिलेला कोणतीही मदत जाहीर केली नव्हती. पण मागच्या आठवडयात विधानसभेमध्ये प्रश्न आला त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी घोषणा केली. अशा ज्या उध्वस्त झालेल्या महिला आहेत, ज्या निराश्रित झालेल्या महिला आहेत त्यांच्या पुनर्वसनाचा विचार शासन करणार की नाही ? महाराष्ट्रामध्ये असे जे बलात्काराचे प्रकार घडतात, ज्या महिला निराधार होतात, निराश्रित होतात अशांच्या मदतीला शासन धावून जाणार की नाही ? श्री. शंकर परकीरवार यांच्या पत्नीला 2 लाख रुपयांची मदत जाहीर केल्याचे सांगितले. पण तीन महिन्याचा कालावधी गेल्यानंतर आपण मदत केली. पाच दिवस त्या फौजदारावर गुन्हा दाखल झाला नव्हता. ज्यावेळी विरोधी पक्ष म्हणून आम्ही त्या ठिकाणी गेलो आणि मागणी केली त्यानंतर त्या पोलीस फौजदारावर गुन्हा दाखल झाला. अन्यथा गुन्हा दाखल झाला नसता अशी स्थिती आहे. पोलिसांची कार्यक्षमता वाढली पाहिजे, पोलिसांना प्रोत्साहन दिले पाहिजे हे खरे आहे. पोलीस खात्यावर आज



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

जो लोड आहे तसेच त्यांना 12-12, 14-14 तास डयुटी करावी लागते त्यासाठी पोलिसांच्या संख्येमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. बाबा आदमच्या काळात ठरवून दिलेली पोलिसांची जी संख्या आहे त्यामध्ये वाढ झालेली नाही. ही वाढ झालीच पाहिजे पण वाढ होत असताना दर्जा सुधारला पाहिजे. एकेकाळी पोलीस खात्याचे जे नाव होते ते वैभव परत एकदा पोलीस खात्याला प्रस्थपित करुन देण्यासाठी शासनाकडून जे प्रयत्न व्हावयास पाहिजे ते प्रयत्न कमी पडत आहेत. यामध्ये कशी वाढ करणार आणि त्यांचा दर्जा कसा सुधारणार याचा खुलासा या ठिकाणी केला पाहिजे एवढी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील बोलतील. सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेवून आपले भाषण दिलेल्या वेळात पूर्ण करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, आपण आम्हाला मार्गदर्शन करावे. प्रत्येक सन्माननीय सदस्याने किती मिनिटे बोलणे योग्य राहील ? शेवटी भाषण करणाऱ्या सन्माननीय सदस्यांना वेळच शिल्लक राहात नाही. आम्ही वेळेची मर्यादा पाळण्यास तयार आहोत.

**तालिका सभापती** : प्रत्येक सन्माननीय सदस्याला बोलण्यासाठी पाच मिनिटांचा वेळ दिला तर चालेल काय ? आपण एकूण सहा मिनिटांची मर्यादा ठरवू.. पाच मिनिटानंतर मी घंटा वाजवीन. सहाव्या मिनिटाला प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, सुरुवातीला मी पृष्ठ क्रमांक 36, बाब क्रमांक 49 बाबत बोलणार आहे. पणन महासंघाकडून महाराष्ट्राच्या बाजार पेठेतील कृषी उत्पादने विदेशात जागतिक पातळीवर नेण्यासाठी परदेश दौरे केले जातात. त्या दौऱ्यामध्ये कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांचा समावेश होण्याची आवश्यकता आहे. आतापर्यन्त पणन महासंघाने जे परदेश दौरे केलेले आहेत त्यातून काहीही रिटर्न मिळालेले नाही. त्यामध्ये फक्त दौरे झालेले आहेत आणि पणन महासंघावर मोठया प्रमाणात त्याच्या खर्चाचा बोजा पडलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 17:20

श्री.जयंत प्र.पाटील...

महाराष्ट्रातील जी 4 कृषी विद्यापीठे आहेत त्यामध्ये चांगले शास्त्रज्ञ आहेत. कोकण कृषी विद्यापीठामध्ये मी या सभागृहाचा प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे, त्याचप्रमाणे मा.सदस्य डॉ.अशोक मोडकही आहेत. कोकण कृषी विद्यापीठातील आमचे शास्त्रज्ञ संयुक्तरित्या परदेशामध्ये दौ-यावर गेले तर बाजारपेठेला गती देण्याचे काम निश्चितपणे होईल असे मला वाटते.

यानंतर मी बाब क्रमांक 51, पान क्र.36, मत्स्यव्यवसाय विभागावर माझे विचार मांडू इच्छितो. शासनाने छोटया तळयांना प्रोत्साहन दिलेले आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेततळी करण्याची कामे मोठया प्रमाणावर सुरु केलेली आहेत. परंतु आज आपल्याकडे मत्स्यबीज आवश्यक तेवढया प्रमाणामध्ये उपलब्ध नाही. कारण त्याठिकाणी मत्स्यबीजाचे उत्पादन होत होते त्या काठालगतच मॅनग्रोव्हची मोठया प्रमाणावर तोड होत आहे आणि ज्या काठावर व नद्यांमध्ये मत्स्यबीजचे उत्पादन होत होते त्याठिकाणी प्रदूषण मोठया प्रमाणावर झाल्यामुळे आणि तेथे केमिकल शिरल्यामुळे आज मत्स्य उत्पादन होत नाही. त्यामुळे मत्स्यबीज केंद्रे या राज्यामध्ये निर्माण होण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी मोठे अनुदान देण्याची आवश्यकता आहे. कारण एक मत्स्यबीज केंद्र उभे करावयाचे असेल तर 1.5 कोटी रुपये खर्च येतो. म्हणून शासनातर्फे सबसिडी दिली पाहिजे जेणे करुन ही अडचण दूर होईल. आज आपल्याला आंध्र प्रदेश, पश्चिम बंगालमधून मत्स्यबीज आणावे लागते. पण ते स्थानिक लोकांकडून मत्स्य उत्पादन करणा-या मच्छिमारांकडून उपलब्ध कसे होईल यादृष्टीने काम झाले पाहिजे.

बंदर विभागाच्या बाब क्र.31, पान क्र.22 वर मी माझे माझे विचार मांडत आहे. सध्या जी जलवाहतूक सुरु आहे त्याचे आधुनिकीकरण झाले पाहिजे यासाठी शासनाने पाठपुरावा केला पाहिजे. सध्या छोटया छोटया जेटीज आहेत किंवा ज्याठिकाणी जल वाहतूक होते त्या बोटी लाकडी आणि 50 वर्षापूर्वीच्या आहेत. नुरा, घारापुरी याठिकाणी वर्षातून 3-4 वेळा हया बोटी समुद्रामध्ये भरकटत लांब खोलवर जातात. त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता आहे. नामदार हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत की, ज्या बोटींना 20 वर्षे झालेली आहेत त्यांना प्रवासी

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.जयंत प्र.पाटील....

वाहतुकीची परवानगी नाही. ज्याप्रमाणे मोटारगाडयांसाठी शासनाने कालमर्यादा ठरविली आहे त्याप्रमाणे बोटींसाठीही कालमर्यादा ठरविलेली आहे परंतु त्या आदेशांची अंमलबजावणी होत नाही ती झाली पाहिजे. बंदरांचा विकास करण्यासाठी अनेकांना परवानगी दिलेली आहे परंतु अद्याप एकाही बंदराचा विकास झालेला नाही. 10-10 वर्षे जागा देऊनही बंदर झालेले नाही. यासाठी एक कालमर्यादा ठरविली पाहिजे, तुम्हाला परवानगी दिल्यानंतर 4-5 वर्षामध्ये खाजगी स्वरुपामध्ये ते विकसित केले पाहिजे. त्यादृष्टीकोनातून खाजगी लोकांवर निर्बंध घातले पाहिजेत. यानंतर मी बाब क्र.142, पान क्र.125, खार भूमि विभागावर बोलणार आहे. सध्या खार भूमि योजना चालू आहे त्या योजनेचा पुनर्विचार केला पाहिजे. खार भूमिसाठी म्हणावी तशी तरतूद बजेटमधून होत नाही म्हणून बांधकाम विभाग आणि खार भूमि विभाग यांनी एकत्र येऊन किना-यावरील रस्ते आहेत ते नाबार्डच्या माध्यमातून घेण्यात येतात ते शेतीसाठी केले पाहिजेत. असे असताना ते बाकीच्या भागामध्ये केले जात आहेत. म्हणून किना-यावरील रस्ते केले तर खार भूमिचा प्रश्न कायम स्वरुपी निकालात निघू शकतो. बाकीचे रस्ते खार भूमि बंधा-यातून बांधले तर रस्त्यांचा प्रश्न सुटू शकेल. अलिबागमध्ये 500 एकरमध्ये असा प्रयोग करण्यात आला आहे आणि तो 100 टक्के यशस्वी झ ालेला आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 17:25

(श्री. जयंत प्र. पाटील...

ग्राम विकास विभागाच्या पृ.क्र.151 वरील बाब क्रमांक 179 वर बोलत असताना मी शासनाला सांगू इच्छितो की, ग्रामपंचायतीच्या आणि जिल्हा परिषदेच्या ज्या निवडणुका होतात त्या निवडणुकांसाठी जे जातीचे दाखले मागितले जातात त्या जातीच्या दाखल्यांचे व्हेरिफिकेशन हे नॉमिनेशनच्या वेळीच झ्ंाले पाहिजे. निवडणूक हा विषय राज्य निवडणूक आयोगाचा आहे हे मला माहीत आहे. परंतु ह्या ज्या निवडणुका घेतल्या जातात त्याचा खर्च शेवटी राज्य शासनालाच करावा लागतो. बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करावी लागते. अनेक वेळा असे होते की, निवडणुका झाल्यानंतर जातीच्या दाखल्यांचे व्हेरिफिकेशन झाल्यामुळे अनेक निवडणुका रद्द होऊन त्या पुनश्च घ्याव्या लागलेल्या आहेत. तेव्हा शासनाने निवडणुकीसाठी नॉमिनेशन भरण्यापूर्वी जातीच्या दाखल्याचे व्हेरिफिकेशन झाले पाहिजे जेणे करुन पुन्हा निवडणूक घ्यावी लागणार नाही, अशा प्रकारची शिफारस राज्य निवडणूक आयोगाला करावी अशी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : तालिका सभापती महोदया, सामान्य प्रशासन विभागाच्या पृ.क्र. 5वरील बाब क्रमांक 2 मध्ये मतदारांना छायाचित्र असलेली ओळखपत्रे देण्यासाठी 10 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. माझी एवढीच माहिती आहे की, ही जी ओळखपत्रे दिली जातात त्यांचा निवडणुकीमध्ये कधीच वापर केला जात नाही. केवळ शोभेसाठी ही ओळखपत्रे देण्याचा शासनाचा उद्देश आहे काय ? ही ओळखपत्रे नसतील तर निवडणुकीच्या वेळी मतदान करता येणार नाही अशा प्रकारच्या सूचना विभागामार्फत दिल्या जाणार आहेत काय यासंबंधीची माहिती दिली जावी. नाही तर अनाठायी खर्च करतोय असे होईल.

बाब क्रमांक 9 मध्ये "दांडी मार्च" यात्रेचा 75 वा वर्ष दिन साजरा करण्यासाठी 24 लाख 51 हजार रु.ची तरतूद केलेली आहे. दांडी मार्च हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे काय ? अशा कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या बजेटमध्ये तरतूद करता येते काय ? हा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून साजरा केला असेल तर मग ठराविक पक्षाच्या लोकांनाच बोलावून ही दांडी यात्रा काढली गेली हे कितपत योग्य आहे ? तेव्हा या प्रश्नांचा मा. मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

पृ.क्र. 7 वरील बाब क्रमांक 12मध्ये हैदराबाद स्वातंत्र्य चळवळीत रझाकाराकडून ज्यांचा छळ झाला होता त्या बाधित कुटुंबासाठी 2 कोटी 70 लाखाची तरतूद केलेली आहे. किती वर्षापूर्वी त्यांच्यावर छळ झाला होता आणि ही बाधित कुटुंबे शासनाने शोधून काढलेली आहेत काय असा प्रश्न निर्माण होतो.

पृ.क्र. 7 वरील बाब क्रमांक 14 मध्ये अल्पसंख्यांकांसाठी नागरी सेवा स्पर्धात्मक परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमासाठी 36 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. हा काय प्रकार आहे ? एका ठराविक अशा अल्पसंख्यांक वर्गासाठी अशा प्रकारे स्पर्धात्मक परीक्षा का घेतल्या जातात ? सर्व समाजातील लोकांसाठी अशा प्रकारे स्पर्धात्मक परीक्षा का घेतल्या जात नाहीत याचा मा.मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

पृ.क्र. 8 वरील बाब क्रमांक 16मध्ये "छत्रपती शिवराय" या हिंदी दूरदर्शन मालिकेला वित्तीय सहाय्य देण्यासाठी 50 लाखाची तरतूद केलेली आहे. छत्रपती शिवरायांवर दूरदर्शन मालिका तयार केली जात आहे ही चांगली गोष्ट आहे. ही चित्रपट-मालिका पूर्ण करण्यासाठी किती वर्षे लागतील ? महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच या चित्रपट मालिकेसाठी तरतूद का केली नाही ?

..3..



MSS/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 17:25

(श्री. मधुकर सरपोतदार...)

कृषि विभागाच्या पृ.क्र. 35 वरील बाब क्रमांक 48मध्ये थकीत अर्थसहाय्याच्या मागण्यांसाठी 10 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या निधीचा वापर कशा पध्दतीने केला जाणार आहे याची माहिती संबंधित विभागाने द्यावी.

शालेय शिक्षण विभागाच्या पृ.क्र. 43 वरील बाब क्रमांक 61मध्ये अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांचा विकास व विस्तार-अतिरिक्त तुकड्या सुरु करणे यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांचा विकास करीत आहात तसेच अतिरिक्त तुकड्या सुरु करीत आहात ही चांगली गोष्ट आहे. अशा किती तुकड्या तयार केलेल्या आहेत ? ह्या तुकड्या तयार केल्या नंतर 10वी पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधीची काय स्थिती आहे? कनिष्ठ महाविद्यालये, शाळा यासाठी लागेल तो खर्च शासनाने करावा. विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी शालेय शिक्षण विभागाची असून हा विभाग आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडील असा विश्वास मी या निमित्ताने व्यक्त करतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदया, पृष्ठ क्रमांक 161, बाब क्रमांक 187-मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी 30 कोटी रुपयांची पूरक मागणीच्या माध्यमातून तरतूद करण्यात आलेली आहे. ही योजना कशा पध्दतीने कार्यान्वीत होणार आहे ? या योजनेसाठी आतापर्यन्त किती तरतूद प्राप्त झाली आहे व प्रत्यक्षात किती तरतूद खर्च झालेली आहे? त्याच प्रमाणे 30 कोटी रुपयांची तरतूद प्राप्त झाल्यानंतर ही तरतूद किती गृहनिर्माण संस्थांना देण्यात येणार आहे ? खरोखरच मागासवर्गीयांना या योजनेचा लाभ मिळणार आहे काय ? या सर्व प्रश्नांना माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदया, पृष्ठ क्रमांक 177, बाब क्रमांक 216- राज्यातील विडी कामगारांसाठी असलेल्या सहकारी गृहनिर्माण योजनेसाठी अर्थसहाय्य करण्यासाठी 9 कोटी रुपयांची पूरक मागणीच्या माध्यमातून तरतूद करण्यात आलेली आहे. विडी कामगारांना घरे उपलब्ध करुन द्यावीत म्हणून अनेक वेळा आंदोलने करुन देखील त्यांना घरे उपलब्ध करुन दिली गेली नव्हती ही वस्तुस्थिती आहे. 9 कोटी रुपयांची तरतूद प्राप्त झाल्यानंतर विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना कशा पध्दतीने राबविली जाणार आहे याचा देखील खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

सभापती महोदया, पृष्ठ क्रमांक 47, बाब क्रमांक 62- हुडकोकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याकरिता जळगाव महानगरपालिकेला कर्जे उपलब्ध करुन देण्यासाठी 4 कोटी 33 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. जळगाव महानगरपालिका ही सर्व गोष्टींनी गाजलेली आहे. या महानगरपालिकेचा कारभार अतिशय वाईट आहे. या महानगरपालिकेच्या कारभारावर तुफानी हल्ले होत आहेत. अशी परिस्थिती असताना या महानगरपालिकेस 4 कोटी 33 लाख रुपये कर्ज म्हणून शासन देत आहे ही दुर्देवाची बाब आहे. अशा महानगरपालिकेस शासन का म्हणून कर्ज उपलब्ध करुन देत आहे याचा देखील माननीय नगरविकास मंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती महोदया, पृष्ठ क्रमांक 47, बाब क्रमांक 63- कत्तलखाने इत्यादीच्या आधुनिकीकरणाकरिता महानगरपालिकांना केंद्रीय अनुदाने देण्यासाठी 5 कोटी 79 लाख 90 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात कत्तलखान्यांची परिस्थिती अतिशय-

2..



श्री.मधुकर सरपोतदार..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भयानक आहे. ज्या शहरात कत्तलखाने आहेत त्या ठिकाणी स्वच्छता असली पाहिजे. परंतु स्वच्छतेचे पालन कुठेही केले जात नाही ही बाब मला खेदाने नमूद करावी लागत आहे. ज्या ठिकाणी कत्तलखाने असतील त्या ठिकाणी स्वच्छता ठेवली गेली पाहिजे. त्यासाठी पुरेशा पाण्याची तसेच इतर सोयी-सुविधांची देखील व्यवस्था त्या ठिकाणी केली गेली पाहिजे. आपण जी पूरक मागणी सादर करुन तरतूदीची मागणी केलेली आहे ती तरतूद कोणत्या कामासाठी खर्च करण्यात येणार आहे याचा देखील खुलासा होणे गरजेचे आहे. हा निधी कशा प्रकारे वापरला जाणार आहे याची देखील माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

सभापती महोदया, पृष्ठ क्रमांक 151, बाब क्रमांक 179-यशवंत ग्रामसमृध्दी योजनेसाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या योजनेची महाराष्ट्रातील प्रगती काय आहे? ही तरतूद प्राप्त झाल्यानंतर त्या तरतूदीचे वितरण कशा पध्दतीने केले जाणार आहे? ही तरतूद कशा पध्दतीने वापरली जाणार आहे? ही योजना राज्यात किती टक्के यशस्वी झालेली इत्यादी प्रश्नांबाबतची माहिती माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी द्यावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 151, बाब क्रमांक 18.- यात्रा स्थळांचा विकासाकरिता 18 कोटी 78 लाख 46 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 17:35

श्री. मधुकर सरपोतदार ...

ही कोणती यात्रास्थाने आहेत याचा उल्लेख केलेला नाही. कोणती यात्रास्थाने सुशोभित करणार आहात त्याचप्रमाणे त्याठिकाणी कोणत्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देणार आहात याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. पृष्ठ क्र.177 गृहनिर्माणासंबंधातील बाब आहे. राज्यातील विडी कामगारांच्या बाबतीत मी बोललो आहे. याबद्दलची सविस्तर माहिती सभागृहाला देण्यात यावी अशी माझी विनंती आहे. पृष्ठ क्र. 211 आदिवासी विकास विभागाच्या संदर्भातील मागणी आहे. यामध्ये भूमिहिन आदिवासींच्या कुटुंबांना जमीन देण्याकरिता रु. 5 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. अशा ज्या योजना आखल्या जातात त्या केवळ कागदावरच राहतात आणि आदिवासींना त्याचा फायदा मिळत नाही. निधी उपलब्ध करुन दिला जातो परंतु प्रत्यक्षात त्या आदिवासींपर्यंत तो पोहोचत नाही. आदिवासींची जी गेल्या 50 वर्षापूर्वीची परिस्थिती होतीच तीच परिस्थिती आज सुध्दा आहे. त्यांच्या राहणीमानात फरक पडलेला नाही. शिक्षणापासून ते वंचित आहेत. आरोग्यामध्ये सुधारणा झालेली नाही. आजही आदिवासी बालके मृत्यूमुखी पडत आहेत. आपल्यासारख्या एका जबाबदार मंत्र्यांकडे हे खाते देण्यात आलेले आहे. परंतु आदिवासींचे हाल पाहिल्यानंतर मनाला वेदना होतात. दोन दिवसापूर्वी शिक्षण विषयावर चर्चा करताना 71 कोटी रुपयांची तरतूद शाळांसाठी करावी लागली. आदिवासींच्या शाळांसाठी जेवढा म्हणून निधी लागेल तेवढा शासनाने उपलब्ध करुन द्यावा. या समाजाला वर आणणे,त्याची प्रगती करणे आणि त्यासाठी सुख-सोयी उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी आहे आणि ती पार पाडलीच पाहिजे. सभापती महोदया, बाब क्र.248 ,पृष्ठ क्र. 211 आदिवासी जिल्हयांमध्ये आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी यासंदर्भातील ही बाब आहे. यासाठी सुध्दा 30 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या मागणीद्वारे शासन आदिवासींना आरोग्याच्या कोणत्या सुख-सोयी उपलब्ध करुन देणार आहे याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. हा निधी कसा खर्च केला जाणार आहे याची माहिती द्यावी. सगळया आदिवासींना बरोबर घेऊन काम केले पाहिजे. ज्याप्रमाणे मंत्रीमहोदय आपण याठिकाणी येऊ शकला त्याचप्रमाणे इतरही आदिवासी पुढे आले पाहिजेत आणि त्यादृष्टीने प्रयत्न होण्याची खूप आवश्यकता आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्र. 233 आणि बाब क्र.267 यामध्ये ग्रेड 4 ची बालके आहेत त्यांच्यासाठी रुग्णालयामध्ये उपचार करण्याची ही योजना आहे. ही योजना भ्रष्टाचारात बुडालेली आहे. बालकांचे जे हाल होत आहेत त्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

डॉ. मिळत नाहीत. जी औषधे या मुलांसाठी खरेदी केली जातात ती गायब होतात. या पार्श्वभूमीवर ही योजना तपासून बघण्याची आवश्यकता आहे. डॉ. दीपक सावंत आणि डॉ. नीलम गो-हे यांनी स्वत: या भागांना भेटी दिल्या आहेत. त्यांच्या पाहणीत या योजनेतील औषधे गायब झाल्याचे आढळून आले आहे. आदिवासींच्या मुलांना सुखसोयी मिळत नाहीत. या परिस्थितीमध्ये शासन सुधारणा करणार आहे किंवा नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, गृह खात्याविषयी मा.श्री. पांडुरंग फुंडकर बोलले आहेत. पोलिसांचे आपापसातील टोळीयुध्द आणि त्यावर मात कशी करावयाची हा चिंतेचा विषय आहे. मुंबईतील आणि एकूणच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था अतिशय भयानक आहे. पोलिसांसाठी काही योजना शासन राबवीत आहे. या योजना पोलिसांच्या भल्यासाठी होत नाहीत. बलात्कार आणि चो-यांचे प्रमाण वाढलेले आहे. पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतर सुध्दा अधिकारी चोरी झालेल्या ठिकाणी जात नाहीत. सोने-चांदीच्या व्यापा-याने पोलीस स्टेशनला तक्रार केली तर सोने-चांदी कुठून आणली ते सांग आणि मग तक्रार कर असे सांगतात. म्हणजे चोराला संरक्षण आणि ज्याची चोरी झाली त्याला डरकावणे सुरु आहे. याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पोलीसांमध्ये सुध्दा कर्तृत्व आहे. पोलिसांचा परफॉर्मन्स सगळाच वाईट आहे असे नाही. परंतु या विभागाकडे खूप दुर्लक्ष होत आहे. काही पोलिसांनी अरेरावी सुरु केलेली आहे. मा.गृहमंत्र्यांनी एक योजना काढली होती. ज्यांची शरीरयष्टी चांगली आहे त्यांना बक्षिस देण्याची योजना होती. माझा प्रश्न आहे की आतापर्यंत किती पोलिसांच्या शरीराची मापे घेण्यात आली आणि त्यामध्ये किती बांधेसूध पोलीस आढळून आले ? ही योजना तपासून पाहिली काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..

केवळ पोलिसांना प्रोत्साहन मिळावे यासाठी हा निधी जाहीर करण्यात आला आहे काय ?या व्यतिरिक्त पोलिसांच्या कर्तव्याच्या बाबतीत आणि त्या कर्तव्याची चांगल्याप्रकारे तामिली व्हावी याही बाबतीत लक्ष देण्याची गरज आहे. आज पोलिसांचे फिजिकल ट्रेनिंग बंद झालेले आहे. तेव्हा पोलिसांचे फिजिकल ट्रेनिंग पुन्हा सुरु करण्यात आले पाहिजे तसेच या पोलीस दलात योग्य ती सुधारणा घडवून आणली पाहिजे. पोलीस हे जनतेचे ख-या अर्थाने मित्र आहेत ते जनतेचे शत्रू नाहीत .परंतु आज  पोलीस हे बदमाशांचे मित्र आहेत असे चित्र निर्माण झाले आहे त्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे तसेच पोलीस हे जनतेचे ख-या अर्थाने मित्र आहेत ते जनतेचे शत्रू नाहीत असे चित्र निर्माण झाले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ( नामनियुक्त ) :सभापती महोदया, विविध खात्याच्या मंत्र्यांच्या ज्या पूरक मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या आहेत त्यावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 3, पान नंबर 5 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे महाराष्ट्र लोक सेवा अयोगाच्या मार्फत ज्या स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात त्यांच्यासाठी 3 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत ज्या परीक्षा घेतल्या गेल्या आणि उमेदवारांची जी निवड केली गेली त्यामध्ये मध्यंतरी घोळ झाला होता.त्यामुळे आपल्या राज्याला काळिमा फासण्याचा तो प्रकार होता असे मला दु:खाने म्हणावेसे वाटते.लोकसेवा आयोगाच्या मार्फत ज्या परीक्षा घेण्यात येतात त्यामध्ये उर्दू, हिन्दी, इंग्रजी, मराठी अशा विविध भाषा असतात परंतु त्या मध्ये पाली आणि प्राकृत या भाषांचा समावेश नाही. केन्द्रीय लोकसेवा आयोगामार्फत ज्या परीक्षा घेण्यात येतात त्यामध्ये पाली आणि प्राकृत या भाषांचा समावेश करण्यात आला आहे परंतु दुर्देवाने महाराष्ट्र लोक सेवा आयोगामार्फत ज्या परीक्षा घेण्यात येतात त्यामध्ये पाली आणि प्राकृत या भाषांचा समावेश केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती करावयाची आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ज्या स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात त्या परीक्षांमध्ये या दोन्ही भाषांचा समावेश करण्यात यावा.

सभापती महोदया यानंतर मला बाब नंबर 13 व 14,पान नंबर 7 संबंधी बोलावयाचे आहे नागपूर येथे हज हाऊस बांधण्याकरता हज समितीला सहाय्यक अनुदान देण्यासाठी 2 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. तसेच बाब क्रमांक 14 मध्ये अल्पसंख्यकासाठी नागरी सेवा स्पर्धात्मक प्रशिक्षण कार्यक्रम या साठी 36 लाख रुपयांची पूरक मागणी केली आहे याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो आणि माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 17,पान नंबर 8 संबंधी बोलावयाचे आहे नागपूर येथील कार्गो हब प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यासाठी 45 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे तिचे मी समर्थन करतो. नागपूरच्या औद्योगिक विकासासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हया प्रकल्पासाठी निधी कमी पडता कामा नये व निधी अभावी हा प्रकल्प रखडता कामा नये यासाठी शासनाने दक्षता घ्यावी अशी मला या निमित्ताने सांगावयाचे आहे

सभापती महोदया, यानतर बाब क्रमांक 20 पान नंबर14 संबंधी मला बोलावयाचे आहे. आतंकवाद विरोधी पथकाची स्थापना करण्यासाठी 21 लाख 64 हजार रुपयांची पूरक मागणी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.कवाडे ....

करण्यात आली आहे. पोलीस विभागात विविध पदे निर्माण करण्यासाठी,त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना आर्थिक सुविधा देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे त्या मागणीचे मी समर्थन करतो. सभापती महोदया, या पूरक मागण्यांवर बोलत असतांना मला एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, या राज्यामध्ये महिलावर बलात्कार होण्याचे प्रकार वाढत आहेत.त्यांच्यावरील अन्याय व अत्याचाराच्या संख्येत वाढ होत चालली आहे. तेव्हा या संदर्भात पोलीस विभागाच्या कामात योग्य ती सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. पोलीस हे आपले फ्रेन्डस आहेत अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली पाहिजे व त्या दृष्टीने त्यांनी काम केले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. अशा प्रकारची मानसिकता पोलीस विभागात निर्माण झाली तर पोलिसांबाबत जनतेंमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. सुनील मोरे नावाच्या एका हवालदाराने मरीन लाईन्स परिसरातील एका पोलीस चौकीमध्ये दारु पिऊन एका मुलीवर बलात्कार केला होता हा प्रकार सपूर्ण पोलीस दलाला काळिमा फासणारा आहे असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते.असा प्रकार पुन्हा घडता कामा नये असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. गडचिरोली जिल्हयात श्री.शंकर पेरुलिया या व्यक्तीला पोलीस अधिका-याने ठार मारले . या व्यक्तीच्या पत्नीवर बलात्कार करण्याचा या पोलीस अधिका-याने प्रयत्न केला होता तेव्हा त्याने विरोध केला म्हणून संबंधित पोलीस अधिका-याने गोळया घालून त्याचा मुडदा पाडला होता. हा प्रकार सुध्दा पोलीस विभागाला काळिमा फासणारा आहे. असा प्रकार पुन्हा घडता कामा नये.पोलिसांचे काही आर्थिक समस्या आहेत तसेच काही सामाजिक समस्या आहेत आणि त्यातून आतंकवाद निर्माण होत असतो. तेव्हा या आर्थिक आणि सामाजिक समस्याचे भान पोलीस विभागाने ठेवणे अत्यंत आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MAP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 17:45

प्रा. कवाडे ....

सभापती महोदया, बाब क्रमांक 20 संबंधात आणखी एक गोष्ट मला सांगाविशी वाटते. आतंकवाद हा बंदुका हातामध्ये घेऊन पसरविला जात असतो. विशेषत: भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद मोठ्या प्रमाणात आलेला आहे. परंतु या राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये दलितांवर होणारे अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील दलित तसेच अल्प संख्यांक समाजाच्या लोकांमध्ये भय निर्माण झालेले आहे. त्यांच्या मनातील ते भय नाहिसे करण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ? त्यांच्या मनातील हे भय दूर केले नाही तर आज जो नक्षलवाद काही जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे तो वाढल्याशिवाय राहणार नाही. दलितांवरील सामाजिक अत्याचार, बहिष्कार, मारहाण, बलात्कार यासारखे प्रकार घडत आहेत ते थांबले नाहीत तर संपूर्ण राज्यामध्ये त्या निमित्ताने प्रक्षोभ होऊन राज्यातील शांतता व सुव्यवस्था धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही आणि त्या दृष्टीने आपण काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदया, त्यानंतर पृष्ठ 19 वरील बाब क्रमांक 26 संबंधात मी बोलणार आहे. आपल्याला माहिती आहे की, सध्या पोलिसांमध्ये एक अत्यंत निराशेची, वैफल्याची भावना वाढीस लागली आहे. अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी बेपत्ता झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून वाचावयास मिळतात. केवळ आर्थिक दुरावस्थेमुळे पोलीस कर्मचारी व अधिकारी बेपत्ता झालेले आहेत. तेव्हा अशा काळामध्ये पोलिसांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीकोनातून देखील शासनाने प्रयत्न केले पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे. ...

( वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते.)

सभापती महोदया, मी आताच तर माझ्या भाषणाला सुरूवात केलेली आहे. अजून अनेक मुद्दे मला या ठिकाणी मांडावयाचे आहेत. ...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : आपण बोलावयास लागल्यापासून पाच मिनिटे होऊन गेली आहेत. तशी मी काहीशा उशीरानेच बेल वाजविली आहे. ..

प्रा. जोगेंद्र कवाडे : ठीक आहे. मी दोन तीन मुद्यांवरच बोलतो ...

**तालिका सभापती** : म्हणजे त्यासाठी देखील आपल्याला 3-4 मिनिटे लागतील ... तेवढा वेळ आपल्याजवळ नाही, आपण त्वरित आपले भाषण संपवावे.

.....4ए 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, आपण वाटल्यास सभागृहाची वेळ वाढवून घ्यावी ..

**तालिका सभापती** : आपण वाढवून घेतलेली वेळही कमी पडते आहे. तेव्हा आपण आपले भाषण त्वरित संपवावे ही विनंती.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, पृ.135, बाब क्रमांक 161 - राज्यामध्ये जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती लवकर निकाली काढण्यासाठी जलद न्यायालये स्थापन करण्यासाठी जी मागणी या ठिकाणी सरकारने केलेली आहे तिचे मी समर्थन करतो. परंतु ही जी प्रलंबित प्रकरणे आहेत त्यामध्ये विशेष करून दलितांवर होणाऱ्या अत्याचारांची प्रकरणे आहेत. दलितांवरील अत्याचार थांबविण्यासाठी म्हणून जो ॲट्रॉसिटी ॲक्ट आपण केला आहे त्या कायद्याखाली येणारी अशी अनेक प्रकरणे आहेत पण ती अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत किंबहुना ती प्रलंबित ठेवली जातात त्यामुळे त्या प्रकरणांचा निकाल लवकर लागू शकत नाहीत परिणामत: दलितांना न्याय मिळू शकत नाही. तेव्हा या बाबतीत आपण अधिक काळजी घेण्याची, विशेष दखल घेण्याची गरज आहे.

त्यानंतर पृष्ठ 139, बाब क्रमांक 167 या पूरक मागणी संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, शासनाच्या विरोधामध्ये अनेक प्रकरणे न्यायालयामध्ये प्रलंबित असतात. त्यामध्ये विशेष प्रकारच्या तरतुदीची मागणी येथे करण्यात आलेली आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु महाराष्ट्र सरकारने आपल्याकडे अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना न्याय मिळावा म्हणून आरक्षणाचा कायदा पास केला. त्या कायद्यात मागासवर्गीयांना पदोन्नतीचा लाभ अधिक मिळावा म्हणून आरक्षणाची तरतूद केलेली आहे. परंतु सवर्णांपैकी काही लोक त्या विरोधात कोर्टामध्ये गेले आणि त्यांनी कोर्टाकडून त्यावर स्टे मिळविला आहे. त्यामुळे मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीवर परिणाम झालेला आहे. सभापती महोदया, आपल्या विधी व न्याय विभागामध्ये अनेक मोठमोठे कायदा तज्ज्ञ आहेत, वकील आहेत, परंतु हायकोर्टामध्ये जाऊन या स्टे विरोधी अपील करून तो स्टे काढून घेण्याविषयी कोणताही प्रयत्न झालेला दिसत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ...

( वेळ संपल्याची घंटी 2-3 वेळा वाजविण्यात येते..)

सभापती महोदया, मी एकच मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ 161 वरील बाब क्रमांक 187 या संबंधात मी बोलू इच्छितो. मागासवर्गीयांच्या गृहनिर्माण संस्थांना जे आर्थिक सहाय्य दिले जाते त्यासाठी 30 कोटीची पुरवणी

...... 4ए 3 ....



KBS/MAP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 17:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागणी येथे केलेली आहे. परंतु मागासवर्गीयांच्या गृहनिर्माण संस्थांना कोणत्याही प्रकारे चांगलासा कर्ज पुरवठा केला जात नाही. त्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. तसेच बाब क्रमांक 192 मध्ये अनुसूचित जातीच्या तसेच नवबौद्धांना सैनिक आणि पोलीस दलामध्ये भरती होण्याचे दृष्टीने भरती पूर्व प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक पोलीस मुख्यालयामध्ये प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे अनुसूचित जातीच्या, मागासवर्गीयांतील बौद्ध समाजातील तरूणांना सैन्य दलामध्ये भरती होण्यासाठी प्रशिक्षणाची सोय होईल म्हणून मी या तरतुदीबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. त्या नंतर मला या ठिकाणी विडी कामगारांच्या बाबतीतही बोलावयाचे आहे. ...

( यानंतर श्री.जागडे .... 4बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जोगेंद्र कवाडे.....

माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे. माझी माय सुध्दा विडी कामगार होती. तिने विडी वळण्याचे काम करुनच मला शिकविले. मी या ठिकाणी पान क्र. 177 वरील बाब क्र. 216 वर बोलत आहे. आज या विडी कामगारांमध्ये दलित समाजाचे लोक आहेत, ओ.बी.सी. समाजाचे लोक आहेत, आदिवासी समाजाचे लोक आहेत. अत्यंत उपेक्षित असा हा दुर्बल घटक आहे. त्या घटकाकडे या राज्य शासनाचे तसेच केंद्र शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. आता या विडी कामगारांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य करण्यासाठी या ठिकाणी तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये केंद्र शासनाचे 50 टक्के आणि राज्य शासनाचे 50 टक्के अशी रक्कम मिळणार आहे. या ठिकाणी शासनाने जी 9 कोटी रुपयाची मागणी केली आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--

..2..

श्री. विनोद तावडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, मी पान क्र. 10 वरील बाब क्रमांक 17 वर बोलणार आहे. पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण या विषयावर बोलत आहे. माहितीच्या अधिकाराखाली मला पोलीस आयुक्तांकडून जी माहिती मिळाली ती मी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. 2004-2005 या वर्षात पोलिसांची रक्त तपासणी केली असता 50 पोलीस दारु पिऊन कामावर हजर होते, असे दिसून आले आहे. त्याप्रमाणे 15 पोलिसांची विभागीय चौकशी सुरु आहे. 14 पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे. अशा परिस्थिती असेल तर या शासन या बाबत काय करणार आहे, हे आम्हाला समजण्याची गरज आहे. सभापती महोदया, दुसरी बाब अशी आहे की, गेल्या 5 वर्षात 185 पोलिसांना एडसची लागण झ ाली आहे. त्यामध्ये फक्त एका पोलिसाला ब्लड ट्रान्सफ्युजनमुळे एडस झाला आहे. बाकीच्या 184 पोलिसांना वेश्यागमनामुळे एडस झाला आहे. त्यामुळे आता पोलिसांच्या फिटनेसच्या दृष्टीने आपण कोणती काळजी घेणार आहांत ? म्हणून या बाबतचा आपणाला केव्हातरी विचार करावा लागणार आहे. सभापती महोदय, मी आता जो विषय मांडत आहे, तो पोलीस, कामगार आणि महिला व बालकल्याण विभागाशी संबंधीत आहे. महाराष्ट्र शासनाच्या कामगार खात्याने मान्य केले आहे की, राज्यात एकूण 25 हजार बाल कामगार आहे. 14 नोव्हेंबर रोजी ज्या दिवशी बालदिन असतो, त्या दिवशी या सर्व बाल कामगारांना मुक्त करण्यात येईल. आता या 25 हजार बाल कामगारांना मुक्त करण्यास किती दिवस लागणार आहेत ? याचा शासनाने विचार केला आहे काय ? आज जी मुले सुधारगृहात जातात, त्या सुधारगृहात योग्य प्रकारची सोय नसल्यामुळे ही मुले भिंतीवरुन उड्या मारुन पळून जातात. म्हणून मला या ठिकाणी शासनाला असे सांगावयाचे आहे की, ज्या काही घोषणा करावयाच्या असतील विचार करुन कराव्यात. माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी डान्सबार बंद करण्याची घोषणा केली. आता त्या घोषणेचे काय होत आहे, याची आपणाला कल्पना आहे. सभापती महोदय, दुस-या राज्यातील बाल कामगार आपल्या सुधारगृहात असतील आणि त्यांना त्यांच्या राज्यात पाठवावयाचे असेल तर प्रत्येक बाल कामगारांसाठी दोन पोलीस दिले पाहिजेत असे कायद्याने बंधन आहे. आज परिस्थिती अशी आहे की, 50 बाल कामगारांची एक बॅच आपल्या दुस-या राज्यात पाठवावयाची असेल तर दोन पोलीस सुध्दा देता येत नाहीत. म्हणून या बाबत कामगार विभाग, महिला व बालकल्याण विभाग तसेच गृह विभाग यांनी एकत्र बसून योग्य तो विचार करुन या बाबतची व्यवस्था करावी लागेल.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदया, मी शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. कृषि व पशुसंवर्धन विभागाच्या पान क्रमांक 39 वरील बाब क्रमांक 58 कडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. आज मुंबईच्या आझाद मैदानावर 1 लाख मच्छिमारांचा मोर्चा आला होता. या राज्यामध्ये पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार होते त्यावेळी माननीय श्री. शरद पवार हे मुख्यमंत्री होते. आणि कै. श्री. राजारामबापू पाटील हे त्यावेळचे मंत्री होते. त्यांचे चिरंजीव आज या राज्याचे अर्थमंत्री आहेत. राज्यामध्ये व्हॅट लागू झाला त्यामधून मच्छिमारांसाठी लागणाऱ्या डिझेलच्या विक्रीकरामध्ये सूट देण्यात आली नाही. त्यामुळे आज मच्छिमार समाज प्रचंड व्यथित झालेला आहे. माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत हे त्या मोर्चामध्ये होते, ते या विषयावर स्पष्टपणे बोलतील असे मला वाटते. माननीय मंत्री श्री. अनिस अहमद हे त्या मोर्च्यामध्ये आले आणि त्यांनी सांगितले की, हा कर रद्द करण्यास आमची तयारी आहे. परंतु माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांची तयारी नाही. हे त्यांनी सांगितलेले वाक्य खरे आहे की खोटे आहे हे माननीय सदस्य कर्नल सावंत यांनी याठिकाणी सांगावे. त्यांचे भाषण ई टीव्ही चॅनेलने शूट केले आहे. हे अधिवेशन चालू असतांना कॉंग्रेसचे एक मंत्री राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मंत्र्यांवर टीका करतात. मी करामध्ये सवलत देण्यास तयार आहे परंतु राज्याचे अर्थमंत्री तयार नाहीत असे सांगतात. "मै तुम्हारे साथ घेराव करने के लिए आऊँगा !" अशाप्रकारचे वक्तव्य त्यांनी केले. माननीय कर्नल सुधीर सावंत यांना राज्याच्या अर्थमंत्र्यांना एक्सपोज करण्यासाठी त्यांनी मत्स्योद्योग मंत्र्यांना मोर्चाच्या ठिकाणी आणले होते काय? मी त्यांना सांगितले की, या संबधीचा निर्णय हा राज्याच्या अर्थमंत्र्यांनी व मुख्यमंत्र्यांनी एकत्रितपणे घ्यावयाचा असतो. परंतु त्या ठिकाणी मंत्रिमहोदयांनी उघडपणे आपले मत व्यक्त केले. माझे या बाबतीत प्रामाणिक मत आहे की, डिझेलच्या विक्री करामध्ये सूट दिली गेली पाहिजे. आपण कोकणातील आहात. माननीय श्री. मधु दंडवते साहेबांनी कोकणामध्ये एक्साईज डयुटीमध्ये सूट दिली होती. त्यानंतर माननीय श्री. राम नाईक साहेबांनी त्या सवलतीमध्ये वाढ केली. नारळी पोर्णिमेनंतर पुन्हा मच्छिमारी सुरु होईल. अधिवेशन सुरु असतांना मा. मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री हे मच्छी खात असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द होतात. ती मच्छी पकडून आणणाऱ्यांचा आपण काहीतरी विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी आताच पृष्ठ क्रमांक 39 वरील बाब क्रमांक 58 संबंधी डिझेलवर लावल्या जाणाऱ्या व्हॅटमध्ये सूट देण्यासंबंधीचा विषय मांडला आहे. जवळ जवळ 13 कोटी रुपयांची ही मागणी या पुरवणी मागण्यांव्दारे या सभागृहामध्ये करण्यात आली आहे. जवळ जवळ 150 कोटी रुपये व्हॅटमधून सूट देण्यासाठी वर्षाला लागणार आहेत. या विषयावर मंत्रिमहोदयांबरोबर अनेकदा बैठक घेऊन चर्चा झ ाली आहे. परंतु या विषयामध्ये अजून तोडगा निघत नाही. मुळात आपण हा विषय लक्षात घेतला पाहिजे. 150 कोटी रुपयांची ही सूट जवळ जवळ 25 वर्षे डिझेलच्या विक्रीकरामध्ये दिली जात होती. त्यामुळे व्हॅट लागल्यामुळे आपण नवीन काही करीत आहोत अशातला भाग नाही. व्हॅट लागल्यानंतर त्यामध्ये सूट देणे आवश्यक आहे. आता सांगण्यात येते की, व्हॅटमध्ये सूट देण्याची कायद्यामध्ये तरतूद नाही. ज्यावेळी आपण व्हॅटमध्ये सूट देतो त्यावेळी केंद्र सरकारकडून आपल्याला पैसे मागता येणार नाही. मुळात विक्री करामध्ये अगोदर सूट होती, आणि व्हॅट लागल्यामुळे ती परिस्थिती बदलत नाही. व्हॅटमध्ये सूट देण्याचा राज्य सरकारला पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे ती सूट देण्यात यावी. अशाप्रकारची मागणी त्या मोर्चामध्ये मी केली आहे. त्या मोर्चामध्ये पूर्ण महाराष्ट्रातील मच्छिमार आले होते व त्यांच्या भावना तीव्र होत्या. त्यामुळे त्यांची मागणी आपण मान्य करावी अशी विनंती या प्रसंगी मी करतो.

सभापती महोदया, जलसंधारण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 152 वरील बाब क्रमांक 182 च्या संदर्भात कोकणातील जल संधारणाच्या विकासाकडे आपण लक्ष दिले की नाही माहीत नाही. याचे कारण कोकणातील परिस्थिती वेगळी आहे. कोकणामध्ये प्रचंड पाणी असून सुध्दा उन्हाळयामध्ये पिण्यासाठी पाणी मिळत नाही अशी परिस्थिती आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत . . . .

कारण त्या जमिनीमध्ये पाणी रहात नाही आणि तेथे अंडरग्राऊंड वॉटर रिचार्जच्या कार्यक्रमाबद्दल कोणी सर्व्हेही केलेला नाही. तेव्हा याबाबतीत विचार केला पाहिजे. कोकणामध्ये मोठमोठी धरणे बांधण्याची आवश्यकता आहे, असे नाही. काही ठिकाणी छोटे बंधारे आणि अंडरग्राऊंड वॉटर रिचार्जचे कार्यक्रम करण्याची आवश्यकता आहे. कारण 20 फूटावरील पाणी आता 100 फूटापर्यंत खाली गेलेले आहे. पण यासाठी काहीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, पशु संवर्धनाच्या बाबतीत सांगावयाचे तर फिशरीज युनिर्व्हसिटी वेगळी करण्यात आली आहे आणि ती नागपूर येथे नेण्यात आली आहे. म्हणजे समुद्र पश्चिमेला आणि युनिव्हर्सिटी पूर्वेला अशी स्थिती आहे. आज कोकणात सिंधुदूर्ग, रत्नागिरी भागात फिशरीजच्या संबंधात ट्रेंनिंग कॉलेजची गरज आहे. पण याची युनिव्हर्सिटी नागपूरला गेल्यामुळे व तेथील सर्व इक्वीपमेंट आणि प्राध्यापक यांची ट्रान्सफर झाल्यामुळे आज रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये प्रशिक्षण देण्याची व्यवस्था उपलब्ध नाही, असे मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला आहे. पण तेथे रहाण्याची सोय नाही. मग तेथे पर्यटक कसे येणार ? यासंदर्भात माननीय मंत्री महोदय बरेच प्रयत्न करीत आहेत. पण मघाशी म्हटल्याप्रमाणे जोपर्यंत तेथे रहाण्याची सोय होत नाही, तोपर्यंत तेथे पर्यटक कसे येणार आणि तो जिल्हा पर्यटन जिल्हा कसा होणार ? कै.माधवराव शिंदे यांनी 1993 मध्ये जाहीर केले होते आणि आज त्याला 13 वर्षे झाली. पण तेथे पर्यटकांना रहण्याची सोय नाही. ती करण्यासाठी तेथील सहकारी संस्थांनी एकत्र येऊन गाव तेथे पर्यटकांसाठी निवासगृहे बांधण्याची योजना केलेली आहे. या सहकारी संस्थांनी यासंबंधात काही प्रकल्पही हाती घेतलेले आहेत. त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने तातडीने लक्ष द्यावे. कारण सी.आर. झेडच्यानियमामुळे समुद्र तटावर हॉटेल बांधण्याची शक्यता नाही. तसेच तेथे 500 कि.मी.हद्दीमध्येही हॉटेल बांधण्याची शक्यता नाही. परंतु तेथे बीचवर हॉटेल बांधल्याशिवाय पर्याय नाही, त्याशिवाय तेथे पर्यटक येणार नाहीत. म्हणून माझी अशी सूचना आहे की, तेथे उपलब्ध असलेल्या घरांमध्येच पर्यटकांसाठी निवासाची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी पर्यटन विभागाने पुढाकार घ्यावा.

. . . .4डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत . . . .

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र.18, पान क्र.13 संबंधात बोलावे तेवढे कमीच आहे. आज अशी परिस्थिती आहे की, मुंबईत कधी काय होईल ते सांगता येत नाही.लंडन मध्ये मेट्रो रेल्वेच्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाला पण त्यापेक्षा भयानक स्वरुपाचा बॉम्बस्फोट 1993 मध्ये मुंबईत झाला होता. आमचे पोलीस दल आणि त्याची रचना ही ब्रिटीश कालीन आहे. पोलीस दल हे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आहे, अंतर्गत सुरक्षेसाठी नाही. म्हणून याबाबतीत मुलभूत दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. पोलीस दलाने आपले सर्व लक्ष इंटेलिजन्स्वर केंद्रीत करावयास पाहिजे. दहशतवादी संघटनांचा मुकाबला करण्यासाठी आपण पोलीस दलाची रचना केली पाहिजे. सायबर क्राईम खूप प्रमाणात वाढलेला आहे. याच्या माध्यमातून आज हिंदुस्थानला बदनाम करण्याचा घाट घातला जात आहे. मध्यंतरी हरियाणामध्ये एक घटना घडली आणि ती लगेच संपूर्ण जगात प्रसिध्द करण्यात आली. आज आऊट सोर्सिंगमुळे आय.टी.उद्योगात खूप प्रगती झालेली आहे.परंतु याचा उपयोग भारताला बदनाम करण्यासाठी होत आहे. तसेच जी आर्थिक गुन्हेगारी आहे, त्याबाबत आमच्या डी.जी.यांनी जाहीर केले की, आर्थिक गुन्हेगारीचा मुकाबला करण्यासाठी वेगळे पथक करण्यात येईल. पण यासाठी प्रथम मानसिकता बदलली पाहिजे, प्रशिक्षणामध्ये बदल केला पाहिजे. पोलीस दलाचे रिऑर्गनायझेशन झाले पाहिजे, पण याकडे कधीही लक्ष दिले जात नाही. म्हणून घाटकोपरसारख्या घटना घडतात. कायदेशीर बाबीमध्ये पोलीस कमकूवत आहेत. पोलीस लोकांना पकडते पण त्याचा कन्व्हीक्शन रेट 15 टक्क्यापेक्षा कमी आहे. याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालावे अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ MAP/ KGS/ पूर्वी सौ.रणदिवे... 18:05

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, पूरक मागण्यांपैकी बाब क्रमांक 101 वर मी बोलणार आहे. गृह विभागामध्ये गुन्हा अन्वेषण आणि दक्षता यासाठी आतंकविरोधी पथक, त्याचबरोबर विशेष पोलीस महानिरीक्षक अशा 20 पदांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या देशामध्ये विविध प्रकारचे आतंकवाद आहेत. महिलांवरील अत्याचार, बलात्कार या विषयी बोलत असतांना एक अतिशय नव्याने चर्चिल्या जाणाऱ्या विचारप्रवाहाकडे मा.गृह राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधायचे आहे. उत्तर प्रदेशामध्ये इमराना या विवाहित मुलीवर तिच्या सासऱ्याने बलात्कार केला. त्यानंतर तेथील धर्मपीठाने निकाल दिला, त्याची चर्चा महाराष्ट्रामध्ये नव्हे तर काल अगदी दस्तुरखुद्द मुंबई शहरामध्ये मुल्ला-मौलवांच्या बैठका होतात. कुटुंबांतर्गत महिलेवर बलात्कार झाला असेल तर गुन्हेगारी संहितेच्याऐवजी शरियतनुसार दिलेला निर्णय कसा योग्य आहे, याबाबत उघडपणे होणारे समर्थन 'सहारा' या दूरदर्शन वाहिनीवरुन दाखविण्यात आले ते मी स्वत: पाहिलेले आहे. मुंबइर्मध्येच नव्हे तर महाराष्ट्राच्या अनेक ठिकाणी जुबानी तलाकच्याही पुढचे भयानक अशाप्रकारचे पाऊल म्हणजे सासऱ्यालाच पती मानावा. पतीबरोबर एकत्र रहाण्याची इच्छा असली तरी, पोलिसांमध्ये तक्रार केली असली तरी पोलिसांच्या तक्रारीपेक्षा शरियतचा कायदा कसा महत्वाचा आहे, या स्वरुपामध्ये उघडपणे समर्थन केले जात असेल तर प्रत्येक गल्लीबोळामध्ये अल्पवयीन मुस्लीम मुलीवर बलात्कार होऊन, त्यामध्ये पोलिसांनी किंवा गुन्हेगारी दंड संहितेने दखल घेऊ नये, आम्हीच शरियत कायद्यानुसार निर्णय घेणार, याला 'हा' म्हणारी उघड चर्चा आणि समर्थन सर्वत्र चालले आहे. समान नागरी कायदा हा जरी केंद्र सरकारचा विषय असला तरी देखील सी.आर.पी.सी. आणि भारतीय राज्यघटना याला अशापध्दतीने बलात्कार, अत्याचार या संदर्भामध्ये उल्लंघून शरियत कायदा बरोबर आहे, असे म्हणणे म्हणजे मुस्लीम धर्माची राजवट असणाऱ्या देशामध्ये चर्चा होते, तशी चर्चा आज महाराष्ट्रामध्ये देखील चाललेली आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण जे आतंकवाद विरोधी पथक केलेले आहे... वेगवेगळ्या प्रकारचा आतंकवाद आहे, तसे मुस्लीम स्त्रियांची प्रतिष्ठा, मानवी अधिकार आणि त्यांचा सन्मान यावर आक्रमण करणाऱ्या ज्या ज्या प्रवृत्ती आहेत, त्यामध्ये सु-मोटो स्वत:हून दखल घेतली पाहिजे. खास करुन त्यासाठी काही पदे निर्माण करावीत आणि अशाप्रकारे समर्थन करणाऱ्या ज्या ज्या शक्ती महाराट्रामध्ये आहेत त्यांना आपण समज दिली पाहिजे की, जिथे जिथे मुस्लीम महिलेवर बलात्काराचा प्रश्न येईल त्या ठिकाणी गुन्हेगारी दंडसंहितेनुसार त्याची दखल घेतली जाईल, कोणत्याही प्रकारे शरियत कसा मोठा आहे ही चर्चा चालवून घेतली जाणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4E-2

SKK/ MAP/ KGS/ MAP/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु......

दुसऱ्या एका गोष्टीच्या संदर्भाने मला मा.मंत्री महोदयांचे आभार मानावयाचे आहेत. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांवर बोलतांना काही मागण्या केलेल्या होत्या. त्यामध्ये पोलीस अधिकारी, महिला पोलीस कर्मचारी यांच्यासाठी 50 पोलीस ठाण्यात स्वच्छतागृहांची मागणी केलेली होती. त्याप्रमाणे निधीची तरतूद केली, असे लेखी पत्र अधिवेशनाअगोदर मला पाठविले, त्याबद्दल मंत्री महोदयांची आभारी आहे. त्याचबरोबर आर्थररोड तुरुंग आणि पोलीस लॉकअप येथील स्वच्छतागृहांच्या संदर्भात काही लोकांनी हायकोर्टामध्ये याचिका दाखल केलेली आहे. त्यावरदेखील जे उत्तर दिलेले आहे ते मला वर्तमानपत्रातून वाचावयास मिळाले. त्यासाठी देखील आपण तारतूद केलेली आहे. मला लिहिलेल्या पत्रामधील एक कोटीची तरतूद आणि वर्तमानापत्रामधून आलेली दोन कोटीची तरतूद केल्याचे सांगितलेले आहे. म्हणजे नक्की किती तरतूद स्वच्छतागृहासाठी झ ाालेली आहे, किती पोलीस ठाण्यांमधील कैद्यांसाठी ही व्यवस्था केलेली आहे, या संदर्भातील तपशील समोर आला तर चांगले होईल. आपण नवीन पोलीस चौक्या आणि पोलीस स्टेशानची निर्मिती केलेली आहे,ती गोष्ट महत्वाची आहे. सभागृहामध्ये मी मागणी केलेली होती की, कोठेवाडी येथे पोलीस चौकी उभी करावी. त्याची देखील दखल घ्याल, अशी मला आशा आहे.

सभापती महोदया, मला अजून एका प्रश्नाकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधायचे आहे की, एस.एम.एस.मधून अश्लील स्वरुपाची चित्रे गुपचूप घेऊन हजारो ठिकाणी त्याचे सर्क्युलेशन केले जात आहे. मा. उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी या संदर्भाने सदनामध्ये आश्वासन दिलेले होते की, 6 महिन्याच्या आत लवकरात लवकर महिला अत्याचार रोखणारा प्रभावी कायदा करु. डिसेंबरपासून सहा महिने होऊन गेले तरी याबाबतीत पुढे काहीच प्रगती झालेली नाही, त्याकडे देखील मी आपले लक्ष वेधते. माझ्याकडे जास्त वेळ नाही, परंतु आणखी एका महत्वाच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या संबंधित अशी मागणी आहे. सांगली जिल्ह्यात शेटफळ येथे ग.दि.माडुळकर यांचे स्मारक उभारण्यासाठी तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी स्वागत करते. मा.सभापती महोदया, माझी सभापती श्री.ना.स.फरांदे हे सभापती असतांना त्यांनी वारंवार नगर जिल्ह्यातील नेवासे येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या स्मारकाकडे लक्ष वेधले होते. जेव्हापासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ MAP/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु....

श्री.फरांदे सर सभापती पदावरुन मुक्त झाले, तेव्हापासून शसनाला पूर्णपणे ज्ञानेश्वर महाराजांचा विसर पडलेला दिसतो. त्यासाठी गेल्या दोन वर्षात एक पैसा देखील या बाबीवर खर्च केलेला नाही. त्याचबरोबर काल 18 जुलै रोजी अन्नाभाऊ साठे यांचा स्मृती दिन झाला.

यानंतर कु.थोरात......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार..... 18:10
डॉ. नीलम गो-हे....

काल 18 जुलै, 2005 रोजी श्री. अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतीदिन झाला. श्री. अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक सांगली जिल्हयात उभारावे अशी मातंग समाजाची अनेक वर्षापासून मागणी आहे. परंतु त्याला गती मिळालेली नाही. नगरविकास विभागाने 2 कोटी 80 लाख 33 हजार रुपयांची व्यवस्था जेथे जेथे जिल्हा मुख्यालये आहत तेथे तेथे तेथील नगरपालिकेच्या विकास कामासाठी केलेली आहे, त्याचे मी स्वागत करते. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्य विभागाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांयाठी सोईसुविधा पुरविण्यासाठी 30 कोटी रुपयांची सुविधा केलेली आहे, ती बाब स्वागतार्ह आहे. पण संरक्षक भिंतींबरोबर स्वच्छतागृहांसाठी तो पैसा वापरला गेला पाहिजे. कारण संरक्षक भिंत किती वेळा बांधली आणि किती वेळा पडली, हे कळणे फार अवघड असते. म्हणून स्वच्छतागृहांसाठी तो पैसा वापरला गेला पाहिजे. "देवराई" या चित्रपटावरुन वर्तमानपत्रामध्ये एक मोठा वाद पेटलेला आहे. तो सिझोफेनियावरील चित्रपट आहे की, पर्यावरणावरील चित्रपट आहे? माझी सांस्कृतिक कार्य विभागाला विनंती आहे की, हा शासनाने करावयाचा निर्णय नसला तरी कलाकार आणि चित्रपटांचे दिग्दर्शक यांच्यामध्ये ज्यावेळी वाद निर्माण होतो त्यावेळी काही मान्यवर समीक्षकांकडून शासनाने याबाबतच्या लोकांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब त्यामध्ये उमटेल अशा पध्दतीची काही यंत्रणा निर्माण करावी, जेणेकरुन कला क्षेत्राला जे एक वेगळे वळण मिळत आहे, त्यासंदर्भात शासनाने सुध्दा एक सुजाण आणि सुसंस्कृत शासनाची भूमिका बजावली असे म्हणता येईल. म्हणून सांस्कृतिक कार्य विभागाने "देवराई" या चित्रपटाच्या वादाबद्दल एक समिती नेमावी, अशी देखील मी मागणी करीत आहे. धन्यवाद.

------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदया, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 60, पृष्ठ क्रमांक 43. मला आठवते की, ज्यावेळी या देशामध्ये दलित लोकांना अस्पृश्य लोकांना शिक्षण मिळत नव्हते त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्येतिबा फुले यांनी मोठया गर्जना केल्या. राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये 1931 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बोलावण्यात आले. महात्मा गांधीं आणि या देशाचे नेते देखील त्या कॉन्फरन्सला गेले होते. त्या कॉन्फरन्समध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठणकावून सांगितले की, या देशात जर आम्हाला माणसासारखे वागवण्यात येणार नसेल, माणूस म्हणून आम्हाला जगण्याचा अधिकार नसेल, शिक्षणचा अधिकार नसेल तर आम्ही माणूस आहोत की नाही? त्यावेळी ब्रिटिश सरकार देखील, झुकले आणि सगळयाच जाती-धर्मासाठी ब्रिटिश सरकारने शिक्षण सक्तीचे केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आता 50 व्या वर्षामध्ये त्यामध्ये दोन बाबी निर्माण झाल्या आहेत. शहरी विभागातील संस्थांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळते. मोठे बिल्डर्स असतील, शाळेत जाणारे शिक्षक असतील, ऑफिसमध्ये काम करणारे बाबू लोक असतील ते सुध्दा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठविण्याचा प्रयत्न करतात. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमाच्या ज्या प्राथमिक शाळा होत्या त्या आता मोडकळीस येत आहेत. रिक्षा चालविणारा रिक्षाचालक देखील दोन दिवस जास्त रिक्षा चालविल परंतु तोही आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाता आले पाहिजे, संगणक शिकता आले पाहिजे, यादृष्टीने प्रयत्न करतो. अशा वेळी पाच-सात वर्षापासून 1993 नंतर येथे कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेचा फॉर्म्युला आला आणि तो फॉर्म्युला संपूर्ण महाराष्ट्रात लावण्यात आला. खेडेगावात देखील तो फॉर्म्युला लावण्यात आला आणि कयम विनाअनुदान तत्वावरील शाळा देण्यात आल्या. जे शेतकरी आपल्या मुलांना गुरांना पाहण्यासाठी पाठवित होते ते फी कुठून देणार? त्या शाळामधील शिक्षकांना पगार दिला जात नाही. काही संचालकांनी आपली शेती विकून शाळा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अध्यक्ष महोदया, आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करावयाची आहे की, शिक्षण विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. महात्मा गांधी म्हणत असत की, माझा आत्मा खेडयामध्ये आहे. आता या आत्म्याचाच खून होत आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ....

खेडयामध्ये जी गरीब माणसे जगतात ती माणसासारखे जगत नाहीत. त्या ठिकाणी दुष्काळ निर्माण होतो. 350 लोकांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या मुलांना फी भरुन शाळेत शिकावयास जा असे सांगणे म्हणजे शिक्षणासाठी लंडनला पोहोचण्यास सांगण्यासारखे आहे. मी विनंती करतो की, ज्या ठिकाणी मागासवर्गीय वाडया असतील त्या ठिकाणच्या मराठी शाळा इंग्रजी माध्यमामध्ये आणण्याचा प्रयत्न करा. खेडेगावातील सर्व जातीधर्माच्या लोकांना प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत विना अनुदानाचा फॉर्म्युला काढून त्यांना काही टक्के तरी गँट द्यावी आणि त्या शाळा जिवंत ठेवाव्यात अशी मी विनंती करतो. इ.बी.सी.ची बिले तसेच शिक्षकांचे पगार आणि त्यांचे जे काही प्रश्न थांबलेले आहेत ते प्रश्न त्वरित सोडविण्यात यावेत.

सभापती महोदया, यानंतर गृह विभागाच्या बाब क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 15 यासंबंधी मला बोलावयाचे आहे. यासंदर्भात बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत त्यामुळे मला जास्त बोलण्याची आवश्यकता नाही. आपण 1950 नंतर आतापर्यन्त वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता पोलीस खाते कमी पडत आहे. पोलीस खात्यास ज्या सुविधा द्यावयास पाहिजे त्याबाबतीत शासन प्रयत्न करीत आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्यांचे पगार आणि भत्ते वाढवा, त्यांना चांगले ड्रेस द्यावे. त्यांना सर्व सोयी द्या. सभापती महोदया, एक अत्यंत दुःखाची घटना सांगतो. श्री. जनार्दन जाधव, राहणार वसई, जिल्हा ठाणे, याने आपली करुण कहाणी सांगितली. त्याच्या पत्नीचा आणि मुलांचा फोटो माझ्याकडे आहे. गेल्या सहा महिन्यांपासून ही मुले आणि त्यांची आई गायब आहेत. ती कोठे गेली, त्यांचे काय झाले याचा पत्ता नाही. तिचा नवरा पोलीस खात्याकडे जातो. पोलीस खात्याचा किंवा पळवून नेणाऱ्या माणसाचा काही संबंध असेल तर ते याबाबत काही सांगत नाहीत. तिचा नवरा इकडे तिकडे फिरत आहे. कोणी जर त्याला सांगितले की, अमूक व्यक्ती गरिबांची वाली आहे, त्याच्याकडे जा तर तो त्याच्याकडे जातो पण काही उपयोग होत नाही. त्या बाईचे नाव कुलकर्णी असे आहे. तिचा नवरा माझ्याकडे आला. तो म्हणाला माझी बायको जात असेल तर जाऊ द्या पण या फोटोमध्ये दाखविलेली माझी दोन मुले तरी मला मिळवून द्यावीत. मला याबाबत मदत करा. याबाबत मी पत्र लिहिले. सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील या ठिकाणी आता उपस्थित नाहीत. हे पत्र मी त्यांना देतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. रमेश निकोसे ....

सभापती महोदया, यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भातील पृष्ठ क्रमांक 163, बाब क्रमांक 196 बाबत मी बोलणार आहे. कर्मवीर लाहूजी साळवे जे म्हातंग समाजाचे होते त्यांच्या संबंधाने स्मारक उभे करण्याचे सरकारने ठरविले आहे त्याबद्दल सामाजिक न्याय मंत्र्यांना मी धन्यवाद देतो. परंतु 700 वर्षाच्या अगोदर या महाराष्ट्रामध्ये संत चोखामेळा होऊन गेले. विठ्ठलाच्या पायरीवर बसून "जन्म गेला उष्टे खाता, लाज नाही तुच्या चित्ता" असे म्हणत असत. हा क्रांतिकारक संत अजूनही विठ्ठलाच्या पायाशी आहे. संत चोखामेळा क्रांतिकारक होता. तो चेंगरुन मेला की, त्याला मारण्यात आले हे माहीत नाही. श्री. अर्जुनराव कस्तुरे समाजकल्याण मंत्री असताना एक कमिटी तयार करण्यात आली होती. त्या कमिटीचे निमंत्रक विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ना.रा.शेंडे होते. त्यावेळी त्यांच्या बुलठाणा गावामध्ये मेळावा भरविण्यात आला होता. चोखामेळा यांचा जन्म गेला असेल पण त्यांनी लिहिलेले अभंग वाचण्यासारखे आहेत. त्यांचे देखील एक स्मारक व्हावे आणि संत चोखामेळा अजूनही विठ्ठलाच्या पायाशी बसून भजन म्हणत आहेत याचा निनाद होऊ द्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, गृह विभागाच्या पान क्रमांक 14 आणि 15, बाब क्रमांक 20 आणि 21 च्या संदर्भात मी बोलणार आहे. यामध्ये आतंकवाद विरोधी पथकाची स्थापना करणे व पोलीस प्रशासनाची दर्जावाढ करणे यासंदर्भात पुरवणी मागणी करण्यात आली आहे. घाटकोपर येथे झालेल्या बॉम्बस्फोटातील आरोपी निर्दोष सुटलेले आहेत आणि त्यामुळे पोलीस खात्याची सगळी लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे एक काळ असा होता की, त्यावेळी पोलिसांचा दरारा होता तसेच एखाद्या गुन्हयाचा शोध घेऊन आरोपीला शिक्षा करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जात होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

त्याबद्दल अनेक प्रश्न निर्माण होत आहेत अशी आजची स्थिती आहे. हा खटला कसा होता ? ज्यांनी संघटितपणे बॉम्बस्फोटाचा कट केला, डॉ.मतीन याने जे.जे.हॉस्पिटलच्या वसतिगृहामध्ये कट केला, ज्याने गुजरातच्या दंगलीचा प्रतिशोध घेण्यासाठी येथे काही योजना आखल्या. म्हणजे पोलिसांनी कार्यक्षमतेने अतिशय चांगल्याप्रमाणे या कटाचा शोध लावणे आवश्यक होते. परंतु न्यायालयामध्ये आज काय झाले, पुरावा नाही म्हणून न्यायाधीशांनी त्यांना निर्दोष सोडून दिले आणि त्याची कारणे काय दिली ? यावर चर्चा करण्याचे कारण असे की, त्यानंतर झवेरी बाजार आणि गेटवे ऑफ इंडिया येथील बॉम्बस्फोटाच्या खटल्याचे निर्णय यानंतर लागणार आहेत. त्याची सुनावणीही झाली असेल, वर्तमानपत्रात काही गोष्टी येतील. "जनतेची स्मृती कमी असते म्हणून राज्यकर्ते निर्ढावलेले असतात" असे एक वाक्य आहे. आपण कितीही अन्याय केला, चुका केल्यातरी लोक ते लक्षात ठेवत नाहीत, परंतु ज्यांचे बळी गेले आहेत त्यांच्या घराच्या भिंतीवर त्या मृत व्यक्तींच्या फोटोकडे बघून सरकारच्या अकार्यक्षमतेबद्दल ती माणसे दररोज रडत असतात. त्याची दखल आपल्याला नसते कारण आपण लांब असतो. यामध्ये काय काय त्रुटी राहिल्या आहेत ? पंचनामा चुकीचा केला, पहिल्या आणि दुस-या दिवशी केलेल्या पंचनाम्यात फरक आहे. बॉम्बस्फोटातील आरोपी आम्ही चटकन पकडू शकतो आणि त्यासाठी हया आठ लोकांना पकडले होते आणि त्याच्यातून वाहवा मिळविली होती. आजकाल टी.व्ही.वर जाऊन स्वत:बाबत प्रसिध्दी मिळविण्याची अहंमहमिका लागलेली आहे. इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये कोठे बलात्कार झाला, कोठे आईने मुलाला मारले, कोठे खून झाले याबाबत संध्याकाळी 9 नंतर प्रत्येक वाहिन्यांमध्ये स्पर्धा लागलेल्या आहेत आणि यासाठी त्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. म्हणून प्रसिध्दी परान्मुख राहून काही खाती काम करीत असतात त्यातील हे एक खाते आहे. परंतु त्या बॉम्बस्फोटातील आरोपींना आम्ही कसे चटकन पकडू शकतो यासाठी त्यावेळी प्रयत्न केले गेले. यात सगळयात मोठया दैवदुर्विलास असा आहे की, ज्यांच्यावर आरोप होते, ज्यांनी बॉम्बस्फोट केले, ज्यांनी माणसे मारली, ज्यांनी सरकारला आव्हान दिले, ज्यांनी सरकारच्या अकार्यक्षमतेचे धिंडवडे काढले ते बाहेर आणि सुमारे 35 पोलीस अधिकारी आणि शिपाई आज अटकपूर्व जामीन मिळविण्याच्या प्रतिक्षेमध्ये आहेत. हे काय चित्र आहे ? म्हणजे आरोपी निर्दोष सुटून बाहेर आलेले आहेत, त्यांचे त्या विशिष्ट धर्माच्या वस्तीमध्ये स्वागत केले जात आहे, जणू काय ते कोठून तरी क्रांतीवीर आले आहेत आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण....

बेशरमपणे त्यांचे स्वागत केले जात आहे. ज्याला आपण म्हणतो की, ग्लोरिफिकेशन करणे तसे केले जात आहे, तोंडात पेढे भरविताना त्यांचे मिडियात फोटो सुध्दा येत आहेत. हे मी याठिकाणी स्पष्ट करतो की, हा त्यांचा दोष नाही. ख्वाजा युनुस हा समजा मेला असेल तर त्याच्या मरणाची चिंता करण्याचे कारण नाही. मानवतावाद ज्यांना कळत नाही त्यांनाच मानवतावाद असतो. परंतु तो खराच दोषी असेल आणि तो मृत पावला असेल तर पोलिसांनी ठामपणे समोर येऊन सांगितले पाहिजे होते की, पोलीस स्टेशनमध्ये किंवा अपघातामध्ये त्याचा मृत्यू झाला आहे. स्वत:ची अकार्यक्षमता लपविण्यासाठी आज तो मृत झालेला आहे की पळालेला आहे काही माहीत नसल्यामुळे हा जो खटला होता त्याच्यातील आरोपी सुटण्यासाठी मदत झालेली आहे. मा.गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांची त्यानंतर एक प्रतिक्रिया आलेली आहे. पत्रकारांनी मा.गृहमंत्र्यांना याबाबत विचारले असता आम्ही यासंबंधी अभ्यास करुन कायदा विभागाचा सल्ला घेऊन अपील करणार आहोत असे सांगितले. हा अभ्यास तुम्ही अगोदर का केला नव्हता, या बॉम्बस्फोटाचा कट रचला होता, त्यात माणसे मेली होती, बॉम्बस्फोट झालेला आहे, आरोपी निर्दोष सुटलेले आहेत, 45 माणसे जखमी झालेली आहेत, 7-8 माणसे अधू झालेली आहेत आणि तरीही हे लोक निर्दोष सुटलेले आहेत. याचा अर्थ दुसरे कोणीतरी दोषी आहेत. त्यांना तुम्ही पकडलेले नाही आणि हे जर दोषी असतील आणि तुमच्या चुकीच्या प्रेझेंटेशनमुळे निर्दोष सुटले असतील तर याठिकाणी किती भयानक स्थिती आहे याची कोणी चिंता केली आहे काय ? आणि आमचे श्री.आर.आर.पाटीलसाहेब गेले वर्षभर फुले, आंबेडकर यांचे येथे नाव घेऊन स्वत:ची पाठच थोपटत असतात, आमचा कारभार किती चांगला आहे याचे येथे वर्णन करीत असतात. त्यांनी डान्स बार हा प्रश्न प्रतिष्ठेला लावला आहे. त्यासाठी अध्यादेश काढतील. परंतु गेल्या वर्षभरातील त्यांची भाषणे काढली तर त्यामध्ये माझ ो खाते किती चांगले आहे, मी किती चांगला कारभार करीत आहे हेच सांगितलेले आहे. हे चांगल्या कारभाराचे लक्षण नाही. यापूर्वी कधीही घडलेले नव्हते आता आयएएस आणि आयपीएस अधिका-यांमध्ये आपापसात भांडणे सुरु झालेली आहेत. काही आयपीएस अधिकारी जेलमध्ये गेलेले आहेत, मी तेलगी प्रकरणातील म्हणत नाही, त्यानंतरच्या प्रकरणातील मी म्हणत आहे. सध्या रकानेच्या रकाने भरुन येत आहे की, कोणाचेतरी प्रमोशन अडविण्यासाठी कोणाला तरी गुंतविण्यात आलेले आहे.

नंतर श्री.शिगम.....

MSS/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

याबाबतीत कधी गांभीर्याने विचार केलेला आहे काय ? दोन दिवस किंवा दोन तास अधिका-यांना घेऊन कधी त्यांच्याशी चर्चा केलीत काय ? हे तुम्ही केलेले नाही म्हणून त्याचे हे सर्व परिणाम आहेत. म्हणून यावर गांभीर्याने विचार करायला पाहिजे. पोलीस खात्यातील काही अधिका-यांनी वृत्तपत्रांना मुलाखती दिल्या. त्यांनी मुलाखतीमध्ये असे सांगितले की, या खटल्यातील निर्णयामुळे आम्ही अजून हतबल झालो नाही. या खटल्याच्या निकाला विरुध्द आम्ही उच्च न्यायालयात जाणार आहोत. माझे जे कायद्याचे ज्ञान आहे त्यानुसार खालच्या कोर्टाची जी निर्णयाची चौकट असते, जे आरोपपत्र असते, त्या आरोपपत्रांची छाननी केली जाते. खालच्या कोर्टाचा निर्णय कसा चुकीचा होता, साक्ष कशी बरोबर घेतली गेली नाही, कोणता मुद्दा राहिलेला आहे काय, निर्णयामध्ये काही लूपहोल्स राहिले आहेत काय, उलट तपासणीमध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत काय या गोष्टींची छाननी केली जाते. नवीन आरोपपत्र सादर केले जात नाही. नवीन साक्षीदार उभे केले जात नाहीत. एकूण 148 साक्षीदार आहेत आणि 300 पानांचा आपण पुरावा सादर केलेला आहे. म्हणून अत्यंत गांभीर्याने या खटल्याच्या निर्णयाचा विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते. मी शेवटी एकच मुद्दा मांडतो की, कोणत्याही कटात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार कधीच नसतो. कट ठरविलेले असतात. गुन्हा ठरवून केला जातो. त्यामुळे गुन्हेगारांनी कमीत कमी पुरावे सोडलेले असतात. म्हणून अशा परिस्थितीजन्य पुराव्याच्या आधारावर आरोपपत्र सादर करणे अत्यंत आवश्यक होते.परंतु ते झाले नाही. म्हणून मला असे वाटते की, या पोटा कायद्याखाली आरोपपत्र सादर केल्यानंतर घाटकोपर बॉम्ब स्फोटमधील जे आरोपी निर्दोष सुटलेले आहेत त्यासंबंधी या खटल्याच्या निमित्ताने पोलीस खात्याने आपल्या कार्यक्षमतेबद्दल गांभीर्याने विचार करुन आपली कार्यक्षमता कशी वाढेल, आपली विश्वासार्हता कशी वाढेल यादृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. गृहनिर्माण विभागाच्या पृ.क्र.177वरील बाब क्रमांक 216वर मी बोलणार आहे. बिडी कामगारांच्या गृहनिर्माण योजनेसाठी 9 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. सभागृहामध्ये गृहनिर्माण खात्याचे मंत्री दिसत नाहीत. परंतु माझ्या मुद्यांची नोंद अन्य मंत्री महोदयांनी घ्यावी अशी माझी विनंती आहे. भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आहेत. परंतु मी फक्त एक दोन उदाहरणे याठिकाणी देणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळामध्ये गृहनिर्माणाच्या बाबतीत  एक मास्टर लिस्ट तयार केलेली असते. ज्यांच्या इमारती पुन्हा होत नाहीत अशा लोकांची एक यादी बनविली जाते आणि नवीन इमारतीमध्ये जे अतिरिक्त गाळे निर्माण होतात ते गाळे या मास्टर लिस्ट मधील लोकांना दिले जातात. दादर इस्टला प्रितम हॉटेल समोर राजगीर नावाची इमारत आहे. 1978 साली मुस्लिम महिला वारली. तिला 1997 साली व्हॅकेशन नोटीस देऊन जिवंत केले, तिला या राजगीर मधील 10-बी ही जागा दिली. मी त्यावेळी सभापती होतो. सगळे प्रकरण उघडकीला आल्यानंतर श्री. सी.डी.पाटील या अधिका-याला अरेस्ट करुन जेलमध्ये पाठविण्यात आले. आज त्याठिकाणी असा प्रकार केला गेला आहे की, खोटी व्हॅकेशन नोटीस तयार केली गेली. श्रीमती रमणी बोजा बंगेरा या महिलेला 800 चौ.फुटाचा फ्लॅट देण्यात आला. या प्लॅटची आज दादरमध्ये 45 लाख 60 हजार रु. इतकी किंमत आहे. हा फ्लॅट 60 हजार 40 रुपयास श्रीमती बंगेरा या महिलेला दिला. श्रीमती बंगेरा ही महिला अस्तित्वातच नाही. आता त्या फ्लॅटमध्ये आजच्या तारखेला रेड्डी नावाचे गृहस्थ रहात आहेत. या रिपेअर बोर्डामध्ये कशा प्रकारचा भ्रष्टाचार चालू आहे हे मी गेले दोन दिवस या सभागृहामध्ये सांगत आहे. दोन दिवसापूर्वी 93च्या सूचनेद्वारे अधिकारी एक एक लाख रुपये घेऊन भ्रष्टाचार करतात यासंबंधीचा प्रस्ताव दिला होता. आज लोक ट्रन्झीट कॅम्पमध्ये आहेत, मास्टर लिस्टमध्ये आहेत. असे असताना मागच्या तीन दिवसामध्ये एक एक लाख रुपये घेऊन 14 गाळ्यांची टाळी फोडून ते गाळे घुसखोरांना दिलेले आहेत. हे प्रकार करणा-यांचे नाव मी याठिकाणी जबाबदारीने घेत आहे. भाडेवसूलकार आणि मिळकत विभागातील अधिका-यांनी टाळी फोडली आणि ते गाळे घुसखोरांना दिले. असा हा जो भ्रष्टाचार या रिपेअर बोर्डमध्ये आणि गृहनिर्माण मंडळामध्ये बोकाळलेला आहे त्याची हे शासन दखल घेणार नसेल तर जे गरजू लोक आहेत ते उद्या या भ्रष्टाचार करणा-या अधिका-यांच्या कॅबिनमध्ये घुसतील आणि कायदा व सुव्यवस्थेचा नको तो प्रसंग निर्माण होईल. म्हणून रिपेअर बोर्डाच्या माध्यमातून जो भ्रष्टाचार चालू आहे तो रोखण्यासाठी शासनाने अतिशय गांभीयाने विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

नंतर श्री. गिते...

अध्रूधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MAP/ MHM/ KGS/ प्रथम श्री.शिगम 18:30

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री नतिकोद्दीन खतिब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित) :सभापति महोदय, मैं वर्ष 2005-06 की पूरक मांगों का समर्थन करने के लिए खड़ा हुआ हूं.

सामान्य प्रशासन विभाग - बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 7, मैं इस मांग के संबंध में महाराष्ट्र की लोकशाही आघाड़ी सरकार को मुबारकबाद देना चाहता हूं. क्योंकि इस सरकार के मुख्यमंत्री माननीय श्री विलासराव देशमुख जी ने नागरी सेवा स्पर्धात्मक परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम के अन्तर्गत अल्पसंख्यक समाज के बच्चों के लिए 36 लाख रुपये का प्रावधान किया है. इसी प्रकार से बाब क्रमांक 13 के अन्तर्गत नागपुर में हज हाऊस के निर्माण के लिए दो करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. माननीय मंत्री श्री अनिस अहमद जी की कोशिश की वजह से नागपुर में हज हाऊस के निर्माण के लिए दो करोड़ रुपये का प्रावधान हुआ है, इसलिए मैं उनको भी मुबारकबाद देता हूं.

महसूल एवं वन विभाग - बाब क्रमांक 44, पृष्ठ क्रमांक 30, के अन्तर्गत नैसर्गिक विपत्ति निवारण सहायता के लिए 75 करोड़ 92 लाख रुपये का प्रावधान किया गया है. मैं इस मांग के संबंध में यह कहना चाहता हूं कि, मेरे निर्वाचन क्षेत्र बालापुर से 20 किलोमीटर दूर स्थित एक गांव में चक्रवात (चक्रीवादळ) आया था, जिसमें दो व्यक्ति मारे गए थें और 4 जख्मी हो गए थें. इस घटना के कारण मृत व्यक्तियों के परिवार को मदद मिलनी चाहिए थी. लेकिन एक ही मृत व्यक्ति के परिवार को मदद मिली है. दूसरे मृत व्यक्ति के परिवार को मदद नहीं दी गई है. मदद न करने का कारण यह बताया गया कि, उस व्यक्ति की आयु 71 वर्ष थी. नैसर्गिक विपत्ति सहायता के अन्तर्गत 60 वर्ष से अधिक आयु के व्यक्ति के संबंध में मदद न करने का जो नियम बनाया गया है, उसे बदलने की जरुरत है. नैसर्गिक विपत्ति में जिस भी आयु के व्यक्ति मृत अथवा जख्मी होंगे, उन सब को सहायता मिलनी चाहिए, ऐसा मेरा अनुरोध है. इसलिए मेरी माननीय मंत्री जी से मांग है कि, वे इस नियम को दुरुस्त करें.

सभापति महोदय, बाब क्रमांक 43 के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगा कि, विकास के लिए जमीन संपादन करने के संबंध में कलेक्टर को पहले अधिकार दिया गया था...............

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : ज्यावेळी अशा प्रकारची सभागृहात चर्चा होत असते. तेव्हा या चर्चेत कोणते सभासद भाग घेतील, यासंबंधी पक्षाच्या प्रतोदांकडून नावे दिली जातात. विरोधी पक्षातील एक सदस्य बोलल्यानंतर सत्ताधारी पक्षातील सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाते. परंतु या ठिकाणी एकाच पक्षाच्या दोन,तीन सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येत आहे. ही प्रथा बरोबर नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील एकाही सदस्याला अजून बोलण्याची संधी दिली गेलेली नाही. आपण जी प्रथा सुरु केलेली आहे त्या प्रथेचे पालन कृपया झाले पाहिजे. परंतु या ठिकाणी पाहतो आहे की, प्रत्येक पक्षाच्या प्रतोदांकडून चर्चेत भाग घेणा-या सदस्यांची नावे माननीय सभापतींकडे कळविली जात आहेत आणि त्यांना बोलण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली जात आहे. विरोधी पक्षाचा एक सदस्य बोलल्या नंतर सत्ताधारी पक्षातील एका सदस्याला बोलण्याची संधी देण्याची जी प्रथा आहे ती पाळली जावी अशी माझी विनंती आहे.

श्री नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, मैं यह कह रहा था कि, जमीन संपादन के संबंध में पहले कलेक्टर को अधिकार दिया गया था लेकिन आज नहीं है. बालापुर में ग्रामीण अस्पताल बनाया जाना है. वहां शासकीय जमीन है. लेकिन कलेक्टर एवं कमिश्नर के द्वारा सिफारिश करने के बावजूद भी शासन के पास प्रस्ताव भेजा जा रहा है. इसलिए मेरी शासन से मांग है कि, इस प्रकार के जमीन संबंधी मामलों में कलेक्टर एवं कमिश्नर को फिर से अधिकार दिया जाए.

नगरविकास विभाग - बाब क्रमांक 67, पृष्ठ क्रमांक 48, इस मांग के अन्तर्गत नागरी क्षेत्र की दलित बस्तियों में सुविधा प्रदान करने हेतु प्रावधान किया गया है. यह अच्छी बात है कि दलित बस्त्यिों का विकास हो रहा है. मैं इस संबंध में यह कहना चाहूंगा कि आंबेडकर एवं वाल्मिकी आवास योजना बड़े शहरों के लिए लागू की गई है. लेकिन बी एवं सी क्लास की नगरपरिषद क्षेत्र के लिए यह योजना लागू नहीं की गई हैं. छोटे शहरों में सुविधा न मिलने के कारण लोग बड़े शहरों में आते हैं. इसलिए मेरी सरकार से मांग है कि बी एवं सी क्लास नगरपरिषद क्षेत्र में भी यह योजना लागू की जाए. ताकि वहां रहने वाले गरीब लोगों को भी मकान बनाकर दिए जा सके. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

............................ 4 के-1

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, आपल्या परवानगीने शासनाने सादर केलेल्या 5956 कोटी 89 लाख 83 हजार रुपयांच्या पूरक मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. बाब क्र.60,61 पृष्ठ क्र.43 यासंदर्भात बोलत असताना 1 जुलै रोजी संपूर्ण राज्यामध्ये खाजगी संस्थांनी शाळा आणि कॉलेज यांचा बंद पुकारला होता. शिक्षण संस्था चालक सहसा रस्त्यावर येत नाहीत. परंतु शासनाकडे 286 कोटी रुपयांची नॉन सॅलरी ग्रॅन्ट थकलेली आहे. त्यामुळे शाळा आणि कॉलेज चालविणे कठीण झालेले आहे. यासंदर्भात जी तरतूद पुरवणी मागण्यांद्वारे करण्यात आलेली आहे ती अत्यंत कमी आहे. राज्यातील खाजगी संस्था चालकांनी शासनाचे मोठया प्रमाणत काम केलेले आहे. म्हणून जो काही कमिटेड एक्सपँडीचर आहे तो सर्व शाळांना शासनाने तात्काळ द्यावा अशी मी विनंती करतो. बाब क्र.88,पृष्ठ क्र.74 यामध्ये न्यायाधिशांच्या निवासस्थाबाबत पूरक मागणी करण्यात आलेली आहे. त्याला माझा पाठिंबा आहे. परंतु त्यामध्ये निफाड तालुक्यातील अतिरिक्त जिल्हा न्यायाधिशाच्या निवासस्थानाचा समावेश करण्यात आला नाही. न्यायाधिशांसाठी आणि अधिका-यांसाठी जागा उपलब्ध झालेली आहे. संपादित करण्यात आलेली आहे. तरीसुध्दा प्लॅन आणि एस्टीमेट न झाल्यामुळे ही निवासस्थाने बांधण्यात आलेली नाहीत. ही निवासस्थाने तात्काळ बांधण्यात यावी अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, नाशिक जिल्हयामध्ये जोरदार पाऊस झ ाला आहे. बाब क्र.144,पृष्ठ क्र.126 यामध्ये नांदूर-मधमेश्वर प्रकल्पासाठी 1 कोटी 70 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. हे धरण पूर्णपणे गाळाने भरलेले आहे. त्यामुळे पूर आला की कालवा फुटतो आणि पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होते. या पुरामध्ये अनेक बळी गेलेले आहेत. नाशिकमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे सुध्दा पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यासाठी सरकारने मदत करणे गरजेचे आहे. बाब क्र. 183 आणि 265 यामध्ये गंगापूर धरण गाळाने भरलेले आहे. त्यामुळे 1300 घ.फू.पाणी कमी झालेले आहे. गंगापूर या धरणाला किकवी धरण हा पर्याय ठरु शकतो. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, किकवी धरण खास बाब म्हणून मंजूर करण्याचा सरकारने विचार करावा. सभापती महोदय, बाब क्र.216 आणि 177 विडी कामगारांना घरे देण्याबाबतीत 9 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पण त्यामध्ये नाशिक जिल्हयातील विडी कामगारांना वगळण्यात आलेले आहे. पुढील काळात या जिल्हयातील विडी कामगारांना प्राधान्याने निवासस्थाने बांधून देण्याबाबत शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो. सभापती महोदय,

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 18:35

डॉ. वसंत पवार ...

बाब क्र.238 यामध्ये रुग्णालयांना यंत्रसामुग्री पुरविणे आणि प्रा.आरोग्य केंद्रे बांधणे याचा समावेश आहे. नाशिक जिल्हयामध्ये सर्वात जास्त कुपोषित बालके आहेत. 3 आणि 4 ग्रेडच्या बालकांना चांगली ट्रीटमेंट मिळण्यासाठी यंत्रसामुग्री घेणे अत्यंत गरजेचे आहे म्हणून या मागणीला माझा पाठिंबा आहे. त्याचप्रमाणे नाशिकमध्ये सुपर स्पेशॅलिटी हॉस्पीटल आहे. त्यासाठी सुध्दा यंत्रसामुग्रीची आवश्यकता आहे. इमारत तयार झालेली आहे. परंतु यंत्रसामुग्री नसल्यामुळे हे सुपर स्पेशॅलिटी हॉस्पीटल अद्याप सुरु झालेले नाही. याची सुध्दा शासनाने तात्काळ दखल घ्यावी अशी मी शासनाला विनंती करतो.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ..

त्याचबरोबर बाब क्रमांक 280 पान नंबर 305 संबंधी मला बोलावयाचे आहे. सहकारी उपसा जल सिंचन योजनेसाठी अतिरिक्त अर्थसहाय्य देण्याकरता 5 कोटी 94 लाख 54हजार रुपयांची ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. गोदावरी नदीवर नाशिक, निफाड आणि सिन्नर या तीन तालुक्यात काही उपसा जल सिंचन योजना आहेत व त्यांना शासकीय मदतीची गरज आहे. आज या योजनेकडे विजेचे बिल थकलेले आहे. तसेच त्यांना जो काही तोटा आलेला आहे तो तोटा भरुन काढण्यासाठी या योजनांना मदत करण्याची आवश्यकता आहे त्यांनी घेतलेलया कर्जाच्या व्याजावरील दर जास्त असल्यामुळे त्या योजना बंद पडल्या आहेत. तेव्हा त्यांच्यासाठी पुढच्या काळात मदत करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.यानंतर बाब क्रमांक 304 पान नंबर 319 संबंधी मला बोलावयाचे आहे. अशासकीय कला संस्थाना सहाय्यक अनुदान देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या ठिकाणी क्रीडा, कला व सांस्कृतिक विभागाचे मंत्री उपस्थित आहेत. मला त्यांना एक विनंती करावयाची आहे की, आपण साहित्य सम्मेलनाकरता मदत करीत असतो. परंतु या राज्याचे सांस्कृतिक धोरण काय आहे हे अद्यापपर्यन्त सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली नाही.तेव्हा शासनाचे सांस्कृतिक धोरण काय आहे हे शासनाने लवकरात लवकर निश्चित करावे आणि हे सांस्कृतिक धोरण सभागृहाच्या पटलावर ठेवावे जेणे करुन महाराष्ट्र राज्यात चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण होऊ शकेल असे मला माननीय मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे. सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 318 पान नंबर 322 संबंधी मला बोलावयचे आहे. राज्यात 93 आय.टी.आय. आहेत व त्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त राज्यामध्ये खाजगी शैक्षणिक संस्थांनी सुरु केलेल्या आय.टी.सी. आहेत त्या आय.टी.सी.मध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या सॅलरीकरता ग्रॅन्ट देण्याची व्यवस्था करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. तेव्हा सॅलरी ग्रॅन्ट देण्याची व्यवस्था शासनाने करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.खाजगी संस्थांना काही तरी तदर्थ अनुदान देण्याची मी शासनाला विनंती करीत आहे.त्याचबरोबर नाशिक मध्ये इन्डस्ट्रीयल न्यायालय आणि कामगार न्यायालय यांच्या वेगवेगळया इमारती होणे ही काळाची गरज आहे. तेव्हा त्या प्रमाणे करण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करतो या ठिकाणी ज्या पूरक मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत त्याला मी पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (रायगड -रत्नागिरी - सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ):सभापती महोदय, या ठिकाणी ज्या पूरक मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.प्रथम मला बाब क्रमांक 2 पान नंबर 5 संबंधी बोलावयाचे आहे.मतदारांना छायाचित्र असलेली ओळखपत्रे देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.बोगस मतदाराच्या संदर्भात या सभागृहात यापूर्वी वारंवार चर्चा झालेली आहे परदेशातील किंवा बांगला देशातील ज्या कोणी व्यक्ती या ठिकाणी अनधिकृतपणे राहत असतील त्यांचा शोध घेण्यात यावा परंतु प्रत्यक्षात तसे न करता त्यांना मतदानाकरता ओळखपत्र देऊन कायम स्वरुपी मतदार करणार आहात काय ? माझी शासनाला अशी विनंती आहे की, हे कार्ड देत असतांना ती व्यकती खरोखर भारतीय आहे की नाही याची शहानिशा करुन घेतली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 33 पान नंबर 23 संबंधी बोलावयाचे आहे. मांढरादेवी येथे जी दुर्देवी घटना घडली होती तिची चौकशी करण्यासाठी एक आयोग स्थापन करण्यात आला होता आणि त्यासाठी 20 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.परंतु प्रत्यक्षात असे अपघात पुन्हा घडू नयेत यासाठी एक पैसा सुध्दा खर्च करण्यात आला नाही. अपघाताची चौकशी करण्यासाठी जो आयोग नेमण्यात आला होता त्यासाठी मात्र 20 लाख रुपयाची पूरक मागणी करण्यात आली आहे. हा आयोग कशाची चौकशी करणार आहे ?मांढरा देवीच्या यात्रेमध्ये 300 व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. असा प्रकार पुन्हा घडू नये यासाठी पैसे खर्च करावयास पाहिजे परंतु त्यासाठी काहीही पैसे खर्च करण्यात आलेले नाहीत.यासाठी नेमलेल्या आयोगाचे कार्यालय तेथील नोकरवर्ग आणि इतर खर्च भागविण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.या आयोगाने जरी आपला अहवाल शासनाला सादर केला तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. अनेक चौकशी आयोगाचे अहवाल बासनात बांधून ठेवण्यात आल्याची उदाहरणे देता येतील.एखादी घटना घडल्यानंतर त्यासंबंधी चौकशी आयोग नेमून काहीही उपयोग होणार नाही त्या ऐवजी अशी घटना घडू नये म्हणून अधिक पैशाची तरतूद करणे आवश्यक आहे असे मला वाटते. यानंतर बाब क्रमाक 58 पान नंबर 39 सबंधी मला बोलावयाचे आहे व्हॅट कायदा लागू करण्यात आला असल्यामुळे मच्छिमारांना डिझेल आणि इतर साधनामध्ये विक्री करात जी सवलत

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ....

दिली जात होती ती सवलत यापुढे दिली जाणार नाही. एक एप्रिल 2005 पासून व्हॅट कायदा अंमलात आला असून जून 15 पर्यन्त 13 कोटी रुपयाचे अनुदान शासनाने दिले आहे त्याबद्‌ल मी शासनाचा आभारी आहे ..

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तरे ......

माननीय मंत्री महोदयांना मी या निमित्ताने विनंती करीन की, हे 11 कोटी रुपये देत असताना त्यात जो प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे त्याचाही शोध आपण घेणार आहात की नाही, तो शोध आपण घ्यावा. याबाबतीत नेहमीच राजकारण केले जाते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य कर्नल सावंत यांनी तसेच अन्य सदस्यांनीही सांगितले आहे. आता आमचे मच्छिमार बांधव या मागणी साठी मोर्चा घेऊन आलेले आहेत. गेले कित्येक दिवस, वर्षे ही सवलत त्यांना दिली जात होती. आपण कापसाला भाव देण्यासाठी, ऊसाला भाव देण्यासाठी, धानाला भाव देण्यासाठी पैसे खर्च करतो त्याच प्रमाणे मत्स्य शेती करणारा हा जो मच्छिमार बांधव आहे, मच्छिमार शेतकरी आहे त्यालाही दोनशे कोटी रुपये मिळावेत याकरिता आमचे मच्छिमार बांधव मोर्चा घेऊन आलेले आहेत. याबाबतीत जो तारांकित प्रश्न येथे आला होता त्यावर आपण उत्तर दिले आहे की, हा प्रश्न विचाराधीन आहे म्हणून. आता 15 ऑगस्ट पासून पुन्हा मच्छिमारीला सुरूवात होणार आहे. अशा वेळी आपण त्यांना माफी दिली नाही तर हा उद्योग की ज्यातून स्वयंरोजगार निर्माण होतो आहे, परकीय चलन आपल्याला मोठ्या प्रमाणात मिळते आहे, तो उद्योग बंद पडणार आहे आणि त्यामुळे स्वयंरोजगाराचा प्रश्न निर्माण होणार आहे त्याच बरोबर परकीय चलन देखील आपल्याला मिळणार नाही. तेव्हा याबाबतीत शासनाने मच्छिमारांच्या हिताचा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे हे मला आवर्जून सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, त्यानंतर पृष्ठ 135-136, बाब क्रमांक 161 व 162 या पुरवणी मागणी संदर्भात मला बोलावयाचे आहे. या ठिकाणी आम्ही अनेकदा वारंवार मागणी केलेली आहे की, ठाण्यामध्ये एक सहकार न्यायालय व्हावे म्हणून. तसे ते झालेही, त्यासाठी या विधीमंडळाने पैसा मंजूर केला, तो पैसाही खर्च आपण केलेला आहे. पण खंत ही आहे की, आपण या विधीमंडळामध्ये मागणी मंजूर करतो, अर्थसहाय्य मंजूर करतो आणि त्यातून सहकार न्यायालय उभे राहिले पण त्यावेळी या ठिकाणचा एकाही लोकप्रतिनिधीला बोलाविण्यात आले नव्हते, त्या समारंभाचे साधे आमंत्रण देखील लोकप्रतिनिधींना देण्यात आले नव्हते. न्याय संस्था वेगळी आहे तशीच आपले विधीमंडळ देखील वेगळे आहे. आपले इतर जे शासकीय उपक्रम होतात तेव्हा लोकप्रतिनिधींना बोलाविले जाते. परंतु या ठिकाणी सहकार न्यायालयाचे उद्घाटन झाले तेव्हा कोठल्याही लोकप्रतिनिधींना, स्थानिक नेत्यांना बोलाविण्यात आले नाही. ही गोष्ट योग्य झाली नाही. याची दखल शासनाने घ्यावी असे मला वाटते.

..... 4एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तरे .....

सभापती महोदय, त्यानंतर पृ. 182, बाब क्रमांक 218 या संदर्भात बोलताना मला असे सांगावयाचे आहे की, आपण लातूरला 400 बेडस् चे मोठे हॉस्पिटल करणार आहात. ही चांगली गोष्ट आहे. या निमित्ताने मी आपल्याला सांगू इच्छितो की, कोकणातील आम्हा सगळ्याच आमदारांची मागणी आहे की, रायगड जिल्ह्यातून ते मोठे रस्ते जातात, राष्ट्रीय महामार्ग क्र.4 तसेच मुंबई-गोवा हा महामार्गही जातो. या रस्त्यांवर अनेक ठिकाणी अपघात होतात पण त्या रस्त्यांवर कोठेही मोठे हॉस्पिटल नाही. त्यामुळे अपघातग्रस्तांना एक तर मुंबईला तरी न्यावे लागते किंवा कोल्हापूरला तरी न्यावे लागते. तेव्हा रायगड जिल्ह्यामध्ये रस्त्यांवर होणारे मोठे अपघात लक्षात घेऊन एक मोठे हॉस्पिटल होण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शासनाने विचार करावा असे मला वाटते.

त्यानंतर बाब क्रमांक 180, पृ.151 - या ठिकाणी यात्रा स्थळांचा विकास करण्यासाठी तरतूद आपण केलेली आहे. माझी या निमित्ताने आपल्याला विनंती आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळून 50 वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण माझ्याबरोबर लोणावळ्याजवळील कार्ला येथील एकविरा देवीच्या मंदिराला भेट देण्यास या. मी आपल्याला तेथे देवीच्या दर्शनासाठी घेऊन जातो. तेथे आजवर शासनाचा एक पैसा देखील खर्च झालेला नाही. तेव्हा आपण तेथील भाविकांच्या सोयीसाठी काही करता आले तर अवश्य करावे अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

त्यानंतर मला आदिवासी विभागाच्या पूरक मागण्यांसबंधात बोलावयाचे आहे. आतापर्यंत आपण आदिवासींसाठी काही केलेले नाही. आदिवासी मंत्री म्हणून पहिल्यांदा सन्माननीय श्री.पिचड साहेब होते ते गेले आणि आता सन्माननीय डॉ. गावित साहेब आले. ....

**( सभापतीस्थानी - श्रीमती सुधा जोशी )**

( यानंतर श्री.जागडे ..... 4एन 1 ...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे.....

न्यायाने चालणारे हे राज्य आहे, असे नेहमीच सांगितले जाते. अनुसूचित जमातीसाठी 50 वर्षाची वास्तव्याची अट टाकण्यात आली आहे. ही अट काढून टाकण्यात येईल, असे नागपूर अधिवेशनात माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते. असे असतानाही ही अट अजून काढून टाकण्यात आली नाही. जात पडताळणी समिती ही कोण खरा आहे आणि कोण खोटा आहे, हे ठरवीत असते. माझे असे म्हणणे आहे की, महादेव कोळी समाजाला शासनाच्या योजनांचा फायदा होऊ नये, म्हणून 50 वर्षाच्या वास्तव्याची अट या समाजासाठी टाकण्यात आली आहे. ती काढून टाकण्यात यावी, अशी मागणी या निमित्ताने करीत आहे. सभापती महोदय, चौकशी समितीमध्ये जी माणसे आहेत, त्यामध्ये किती खरी आणि किती खोटी आहेत ? श्री. गोविंद घारे हे किती खोटे आहेत, हे मी यापूर्वीच सांगितले आहे. मी पुन्हा या निमित्ताने अशी मागणी करीत आहे की, या समाजासाठी जी 50 वर्षाची वास्तव्याची अट आहे ती शिथील करावी. इतर समाजासाठी शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी वॅलिडीटी सर्टिफिकेट लागत नाही. म्हणून अनुसूचित जमातीबाबत शासनाने हा जो काही निर्णय घेतला आहे, तो आपण बदलणार आहात की नाही ? महाराष्ट्रातील जवळ जवळ 80 लाख अनुसूचित जमातीच्या लोकांना शासनाने न्याय देण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुळकर्णी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, 2005-2006 च्या पूरक मागण्यांना समर्थन देत असताना मी फक्त दोन-तीन गोष्टींचा उहापोह या ठिकाणी करणार आहे. मी सुरुवातीला पान क्र. 39 वरील बाब क्र. 58 वर बोलणार आहे. मच्छीमारांना पुरविलेल्या हायस्पीड डिझेल विक्रीकराच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. वॅट 1 एप्रिल 2005 पासून अंमलात आल्यानंतर यापूर्वी मच्छीमार लोकांना जी सवलत दिली जात होती, ती आता मिळणार नाही. अशा प्रकारचे धोरण शासनाने घेतलेले आहे. माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी या गोष्टीचा उल्लेख केला आहे. राज्यामध्ये निरनिराळ्या विभागात जी जी पिके येतात, त्या पिकांना संरक्षण देण्याचे आणि शेतक-यांना मदत करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. महाराष्ट्राचा कोकणाचा समुद्र किनारा 730 कि.मी. लांबीचा आहे. या समुद्र किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मच्छीमारी केली जाते. त्यापासून हजारो कोटी रुपये परकीय चलन मिळत असते. या मागणीच्या माध्यमातून मच्छीमारांना तात्पुरती व्यवस्था म्हणून 9 जून 2005 पर्यन्त हायस्पीड डिझेलवरील विक्रीकराच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्याचे शासनाने ठरविले आहे.

श्री. अनंत तरे : यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे.

श्री. गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, माझ्या दृष्टीने एक अतिशय महत्वाची बाब आहे. आपण मच्छीमारांना डिझेलमध्ये जी सवलत शासनाकडून दिली जात होती, ती सवलत कायम स्वरुपी मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी पान क्र. 92 वरील बाब क्र. 119 वर बोलणार आहे. मासेमारी बंदर बांधण्यासाठी या ठिकाणी तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, या देशाचे कृषी मंत्री माननीय नामदार श्री. शरद पवारसाहेबांना या सभागृहाच्या माध्यमातून धन्यवाद देऊ इच्छितो. माननीय पवारसाहेबांनी रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व बंदराची पाहणी केली आहे. त्या त्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतलेल्या आहेत. यापूर्वी या बंदराकडे कोणीही पाहणी केली नव्हती. सभापती महोदय, या मागणीच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात अर्नाळा येथे आणि रत्नागिरी जिल्ह्यात हर्णे व साक्रीनाटे येथे बंदर बांधण्याचे ठरविले आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

रायगडमध्ये दोन बंदरे घेतली आहेत. देवगडमध्ये आनंद प्रकल्प गेली कित्येक वर्षे होता. त्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. रत्नागिरी जिल्हयामध्ये मीरा बंदर आहे, ते बारमाही करण्याचा कार्यक्रम केंद्र सरकारने निश्चित केला आहे व त्यासाठी निधी उपलब्ध केला आहे. मालवण तालुक्यामध्ये सर्जेकोट बंदर दुर्लक्षित राहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ला बांधीत असतांना त्यांच्या युध्द नौका या बंदरामध्ये जात असत. तेव्हा या सर्जेकोट बंदराची आज अत्यंत वाईट अवस्था आहे. मध्यंतरी त्या बंदराला भेट देण्यासाठी व पहाणी करण्यासाठी मी गेलो होतो. या बंदराचा विकास करण्यासाठी राज्य सरकारने निर्णय घेऊन 9 जुलै 2004 रोजी जी.आर. काढला. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील सर्जेकोट या मच्छिमारी बंदराचा विकास करण्यासाठी किनारा अभियंता यांनी सादर केलेल्या 3 कोटी 23 लक्ष 40 हजार 805 रुपयांच्या अंदाजपत्रकास व आराखडयास राज्य सरकारची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे, आणि कंसामध्ये "वित्तीय बाब वगळून" असे म्हटले आहे. म्हणजे डब्यामध्ये लाडू भरायचे आणि सोबत एक चिठ्ठी द्यायची. आणि दुसऱ्या लांबच्या नातेवाईकाकडे तो लाडूचा डबा पाडवायचा. लाडू घेऊन जाणाऱ्या माणसास ज्यावेळी भूक लागते त्यावेळी तो डब्यातील लाडू खाऊन टाकतो. आणि ज्यावेळी तो रिकामा डबा व चिठ्ठी नातेवाईकांस देतो त्यावेळी नातेवाईक त्याला विचारतात की, या डब्यातील लाडू कुठे आहेत? त्यावेळी तो माणूस "लाडू चिठ्ठीमध्ये आहेत, भूक लागल्यामुळे डब्यातील लाडू मी खाऊन टाकले" असे सांगतो. अशाप्रकारचा हा शासनाचा जी.आर. आहे. वित्तीय तरतूद वगळून आपण प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सभागृहामध्ये वित्त विभागाचे मंत्रिमहोदय जर उपस्थित असतील तर त्यांनी या 3 कोटी 22 लाख रुपयांच्या मंजूर केलेल्या योजनेसाठी नागपूरच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीव्दारे तरतूद करावी व या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी आग्रहाची मागणी करतो.

सभापती महोदया, राज्यामध्ये कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी 7 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. आज महाराष्ट्रामध्ये कुठेही कृत्रिम पाऊस पाडण्यात आलेला नाही. त्यामुळे आज राज्याच्या ज्या भागामध्ये पाऊस पडलेला नाही त्या भागामध्ये कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयोग केला तर त्या भागात थोडाफार पाऊस पडेल. त्यासाठी शासनाने केलेली तरतूद स्तुत्य आहे असे मी या निमित्ताने आपल्या निदर्शनास आणतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदया, पान क्रमांक 125 वरील बाब क्रमांक 142 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयात नवीन 8 खार जमिनी योजना हाती घेण्यासाठी 40 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मालवण तालुक्यात 5 प्रकल्प, वेंगुर्ल्यामध्ये 2 प्रकल्प व देवगडमध्ये 1 प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. यासंबंधी पूर्वी झालेल्या चर्चेमध्ये माननीय पणन मंत्र्यांना विनंती केली होती की, या तीन योजनांचा अंतर्भाव संपूर्ण खार भूमी विकास योजनेमध्ये करावा. मालवण तालुक्यातील देवबागला संरक्षक भिंती बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. आज देवबागची परिस्थिती बघितली तर त्सुनामी लाटांमुळे देवबागचे जास्त नुकसान झाले आहे. त्या ठिकाणी आपण जर भेट दिली तर आपल्याला आश्चर्य वाटेल की, एका बाजूला खाडी आहे, दुसऱ्या बाजूला समुद्र आहे आणि मध्यभागी चिंचोळा जमिनीचा पट्टा आहे. या भागामध्ये त्सुनामी लाटांचे संकट पुन्हा निर्माण झाले तर त्या ठिकाणी असलेल्या स्मशान भूमीपासून जवळपास दोन ते तीन मैलाचा भूभाग समुद्र गिळून टाकेल. अशीच परिस्थिती मालवण तालुक्यातील तळाशील या गावामध्येही निर्माण झाली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

एका बाजूला खाडी आहे आणि एका बाजूला समुद्र आहे. जेव्हा समुद्राला भरती येते तेव्हा त्याचे पाणी गावात शिरते. त्यामुळे गावातील स्मशानभूमी, तेथील झाडे उध्वस्त झाली आहेत. देवगड तालुक्यातील दोन-तीन भाग हे क्रॉनिक आहेत. त्यामुळे या तीन भागांचा या योजनेअंतर्गत समावेश करावा. सभापती महोदय, मी जास्त वेळ घेऊ इच्छित नाही.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांचा वेळ संपलेला आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, बाब क्र.325, पान क्र.333 बाबत सांगावयाचे आहे. दूरदर्शनवर बातम्यांच्या अगोदर या सभागृहाच्या कामकाजाचे समालोचन केले जाते आणि त्यासाठी येथे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद करण्यात आली आहे. लोकसभा असेल किंवा राज्यसभा असेल, त्याठिकाणी प्रश्नोत्तराच्या तासापुरतेच दूरदर्शनच्या माध्यमातून किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारण केले जात नाही. तर दिवसाच्या कामकाजाचे प्रसारण केले जाते. त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या या दोन्ही सभागृहामध्ये एक तासाचा प्रश्नोत्तराचा तास असतो. अशा वेळी संपूर्ण दिवसभर याठिकाणी काय चर्चा चालू आहे याचेही प्रक्षेपण करण्यात यावे. दूरदर्शन प्रमाणे इतरही अन्य वाहिन्या आहेत. उदाहरण द्यावयाचे तर ई-टी.व्ही., अल्फ टी.व्ही इ.आणि त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणात स्पर्धा सुरु असते. तेव्हा दूरदर्शनप्रमाणे अन्य वाहिन्यांकडेही याबाबतचे काम देण्यात यावे. केवळ विधीमंडळातील कामकाजाच्या समालोचनापुरता मर्यादित वेळ असता कामा नये. दोन्ही सभागृहामध्ये अन्य ज्या चर्चा होतात, त्याचेही प्रक्षेपण झाले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.326 बाबतही मला बोलावयाचे आहे. विधीमंडळाच्या परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्यासाठी 60 लाखाची तरतूद केली आहे. लोकशाही आघाडीचा संयुक्त जाहीरनामा काढण्यात आला होता, तेव्हा त्यामध्ये 100 कोटी रुपयांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक चांगले स्मारक मुंबई शहरामध्ये समुद्रात उभे करण्याबाबत जाहीर केले होते. त्या संदर्भात जर याठिकाणी तरतूद केली नसेल तर 100 कोटीचे छत्रपती शिवाजी महाराजांचे चांगले स्मारक मुंबईच्या समुद्रात मरीन लाईन्स् किंवा अन्य भागात उभे करण्यासाठी सुध्दा नागपूर येथील अधिवेशनामध्ये पूरक मागणी मांडण्यात यावी आणि तो कार्यक्रमही अंतर्भूत करावा अशी विनंती करतो आणि याठिकाणी ज्या पूरक मागण्या मांडण्यात आल्या आहेत, त्याचे समर्थन करतो आणि सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि आपली रजा घेतो.

20-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4P-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांवर माझे मत मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.6, पान क्र.6 यामध्ये दिवंगत ग.दि.माडगुळकर यांच्या स्मारकाच्या बांधकामासंबंधीच्या खर्चाबाबत तरतूद केली आहे.यानिमित्ताने मला सभागृहाला एक आठवण करुन द्यावीशी वाटते की, तीन वर्षापूर्वी कै.बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकासाठी 20 लाख रुपयांचा निधी घोषित केला होता. पण दोन वर्षामध्ये तो निधी दुस-या कामासाठी वळविण्यात आला आणि ज्याठिकाणी हे स्मारक होणार होते, तेथे आता उकीरडा झालेला आहे. याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्र.21, पान क्र.15 यामध्ये पोलीसांचा दर्जावाढी साठी तरतूद केली आहे. यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. पण मरीन ड्राईव्ह येथील बलात्काराचे प्रकरण झाले, त्याच्या पाठोपाठ ठाणे रेल्वे स्थानकावर एका महिलेचा विनयभंग केल्याचे प्रकरण झाले किंवा कल्याण येथे एका लहान मुलीवर बलात्कार केल्याचे प्रकरण झाले, त्यानंतर सांगली येथे खारचुंडी गावामध्ये एका महिलेचा विनयभंग केल्याचे प्रकरण झाले होते. अशा प्रकारे रक्षकच जर भक्षक झाले तर कसे होणार ? हा प्रश्न आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु...

पोलीस दलाचा दर्जा वाढविणार आहेत त्यादृष्टीने योग्य पावले आहेत. परंतु त्यांची मानसिकता तपासून पहाण्याची आवश्यकता आहे. रविवारी मुंबईमध्ये 4 तासात तीन महिलांच्या सोनसाखळयांची चोरी, अशाप्रकारच्या मथळयाखाली वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे. मरीन लाईन ड्राईव्हवर बलात्काराचे प्रकरण झालेले आहे,हे आपणास माहीत आहे. रविवारी पहिली घटना शिवाजी पार्क येथे सकाळी 6-30 वाजता मॉर्निंग वॉकसाठी गेलेली श्रीमती वंदना तुळशीदास राणे हिच्या गळ्यातील एका अज्ञान चोरट्याने सोन्याची साखळी खेचून पलायन केले, त्या दिवसाची दुसरी घटना सकाळी 7-15 वाजताच्या सुमारास वडाळा येथे घडली. श्रीमती नजमा कुळकर्णी या महिला सकाळी हनुमान मंदिराच्या कठड्यावर बसलेल्या असताना मोटरसायकलवरुन आलेल्या दोघा चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील दोन सोनसाखळ्या खेचून पलायन केले. तिसरी त्याच दिवशी माटुंगा येथेच घटना घडली. वर्षा जेडा यांची मारुती गाडी दादर टी.टी. सिग्नलजवळ थांबली असता एका अज्ञात चोरटयाने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून पलायन केले. दुसरी एक बातमी छापून आलेली आहे की, "पोलीसांच्या तावडीतून आरोपीचे पलायन" त्या बातमीमध्ये म्हटलेले आहे की,"भायखळ्यातील एका चोरीप्रकरणी हवा असलेला आरोपी चंद्रपाल ऊर्फ विजय चंद्रभाल वानखेडे याला माझगाव येथील महानगर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात नेले जात असताना बंदोबस्तावरील पोलीस शिपायाला झटका देऊन तो पळून गेला." अशाप्रकारे पोलीस रक्षण करत असतील तर ते भक्षक वाटतात. त्यांच्या हातातून गुन्हेगार निसटतात. वर्सोवा येथे महिलेवर सामुहिक बलात्काराचे प्रकरण झालेले आहे, त्याबाबतही बातमी आलेली आहे. त्याबाबत काहीही कारवाई होत नाही.

त्यानंतर बाब क्रमांक 33, पान क्रमांक 23 वर सातारा जिल्हा मांढरदेवी येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी 20 लाख रुपयाच्या रक्कमेच्या तरतुदीची मागणी केलेली आहे. परंतु त्या ठिकाणी धड रस्ता नाही, पिण्याच्या पाण्याची सोय नाही, त्या ठिकाणच्या पायऱ्या व्यवस्थित नाहीत असे असतांना जी दुर्दैवी गोष्ट घडीली त्याचे कारण शोधून त्यावर उपाययोजना करण्यापेक्षा चौकशीवरच खर्च अधिक केला जात आहे. त्याची चौकशी केली पाहिजे परंतु त्यासाठी 20 लाख रुपये खर्च केलेले आहे, त्यातून काय निष्पन्न होणार आहे, याची आपल्याला माहिति आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु...

त्यानंतर बाब क्रमांक 36, पान क्रमांक 24, कारागृहामध्ये मोबाईल जॅमर यंत्रणा बसविण्यासाठी तरतूद केलेली आहे. जॅमर बसविल्यानंतर मोबाईल चालत नाही असे सांगितले जाते. परंतु आपल्याकडे जॅमरची यंत्रणा असूनही अनेक सन्माननीय सदस्यांचे या सभागृहामध्ये मोबाईल वाजत असतात. म्हणजे जामरची यंत्रणा असूनही सक्षम नाही, असाच त्याचा अर्थ होतो, याबाबतीतही विचार व्हावा.

त्यानंतर बाब क्रमांक 37, पान क्रमांक 24, पोलीस विभागाच्या जुन्या निवासी व अनिवासी इमारतीच्या दुरुस्तीसाठी तरतूद केलेली आहे ती चांगली गोष्ट आहे. निवासी इमारतींची दुरुस्ती झाली पाहिजे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

त्यानंतर महसूल व वन विभागाची बाब क्रमांक 44, पान क्रमांक 3, नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय्य निधीसाठी तरतूद केलेली आहे. चालू वर्षात जुनच्या शेवटच्या आठवडयातील जोरदार पावसामुळे पाचगणीजवळ भिलार गावात जमिनीला भेगा पडून जमीन धसलेली गेलेली , पूर्ण गाव स्तलांतरित केलेले आहे. पुन्हा अशीच घटना आठ दिवसांनी पाचगणी परिसरामध्येच एका गावामध्ये झालेली आहे. त्या ठिकाणी पालकमंत्री पहाणी करण्यास आले होते त्यांनी तीन कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. परंतु मला या निमित्ताने सांगावेसे वाटते की, अजूनही दोन महिने पावसाळा शिल्लक आहे ज्या ठिकाणी अतिवृष्टी होते त्या ठिकाणची भूगर्भ शास्त्रज्ञांकडून पहाणी करुन आधीच संकटाची चाहूल लोकांना कळली तर बरे होईल.

त्यानंतर बाब क्रमांक 45, पान क्रमांक 30, वनांच्या रक्षणासाठी 14 कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. वनांचे रक्षण केले तर पर्यावरणाचा समतोल साधला जाणार आहे परंतु आपण जी 14 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. वनामध्ये मोठ्याप्रमाणावर अवैध वृक्षतोड होत असते, त्याची तस्करी होत असते. यावर पूर्णपणे नियंत्रण बसेल यादृष्टीने जबाबदारी घ्यावी.

यानंतर बाब क्रमांक 47,पान क्रमांक 35 पांढऱ्या लोकरी माव्याने बाधित अशा शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य केलेले आहे. खरे म्हणजे हे वित्तीय सहाय्य शेतकऱ्यांना केव्हा मिळणार आहे, त्याचबरोबर ही मदत बाधित शेतकऱ्यांना मिळते काय, हेसुध्दा तपासून पहाण्याची गरज आहे. याबाबतचा जो सर्व्हे हा शेतामध्ये जाऊन केला पाहिजे, परंतु शेतामध्ये जाऊन सर्व्हे होत नाही. ग्रामसेवक किंवा सरपंचाच्या घरी, पाटलाच्या घरी बसून सर्व्हे होतो, हे बरोबर नाही. तेव्हा बाधित शेतकऱ्यांना मदत मिळत नाही.

SKK/ MHM/ SBT/

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु....

त्यानंतर बाब क्रमांक 51. पान क्रमांक 36 महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान नागपूर,येथील इमार दुरुस्तीच्या कामाकरिता तरतूद केलेली आहे. विद्यापीठाची इमारत धोकादायक आहे म्हणून सुरक्षिततेचा विचार केलेला आहे. सातारा जिल्ह्यामधील शिरवळ म्हणून गाव आहे त्या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेची आदर्श विद्या मंदिर ही शाळा आहे. दहा वर्षापूर्वी शिक्षण अधिकाऱ्यांनी रिपोर्ट दिलेला आहे की,

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे.. ...

ही इमारत धोकादायक आहे, येथे शाळा भरवू नये. आज दहा वर्षे झाली, मी स्वत: ती इमारत पाहिल्यानंतर शिक्षणमंत्र्यांशी बोलले होते. त्यावेळी शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण अधिका-यांना सांगितले होते. शिक्षण अधिका-यांनी त्या इमारतीची पाहणी केली आणि पत्र पाठविले की, ती इमारत धोकादायक आहे. त्या ठिकाणी शाळा भरवू नये. जर ती शाळा भरवली तर त्याला मुख्याध्यापक जबाबदार राहतील. याला मुख्याध्यापक जबाबदार कसे? त्या बाबतीत पर्याय शोधायला पाहिजे. त्यानंतर परत मी शिक्षण मंत्र्यांना सांगितले की, मुख्याध्यापकांना अशा प्रकारचे पत्र आलेले आहे.त्यावेळी त्या मख्याध्यापकांनी ही माहिती आमदारसाहेबांना दिली म्हणून त्यांची बदली केली. हे बरोबर आहे काय?

बाब क्रमांक 66 पान क्रमांक 48. मराठवाडा यात्रास्थळांच्या विकासासाठी वित्तीय सहाय्य. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. कोणकोणत्या यात्रास्थळांचा विकास करण्यात येणार आहे, याचा उल्लेख येथे झाला असता तर बरे झाले असते. त्यामध्ये मांढरदेवीचा उल्लेख आहे काय? याची मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये माहिती द्यावी.

बाब क्रमांक 67 पान क्रमांक 48. दलित वस्त्यांमध्ये सुविधा पुरविण्याकरिता नागरी स्थानिक संस्थांना अतिरिक्त अनुदाने. कोणत्या नागरी संस्थांना हे मदत अनुदान दिले आहे व ते खर्च झाले आहे काय? किती दलित वस्त्यांमध्ये सुविधा पुरविल्या गेल्या, याचा आढावा उत्तरामध्ये घेण्यात यावा.

बाब क्रमांक 108,109,111 पान क्रमांक 85. अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय यांच्या कल्याणासाठी भांडवली खर्च. राज्यात विविध ठिकाणी असलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींच्या शासकीय वसतिगृहांच्या इमारत बांधकामासाठी या ठिकाणी तरतूद केलेली आहे. मागासवर्गीयांच्या कल्याणसाठी नवीन आश्रमशाळा उघडणे असे म्हटले आहे. त्यामध्ये दहेल,केवडी, मोकस, मोरखी इत्यादी अक्कलकुवा तालुक्यातील गावांची नावे दिली आहेत. आश्रमशाळांची श्रेणीवाढ दिलेली आहे. अतिदुर्गम भागात नव्याने आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याच्या निर्णयावर खरे म्हणजे आधी सखोल चर्चा होणे गरजेचे होते. आधी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे....

वेगवेगळया सर्व्हेक्षणाच्या माध्यमातून मांडलेल्या मतांची पडताळणी करुनच हा निर्णय घ्यायला पाहिजे होता. कारण मागच्या वेळी मी आश्रमशाळांची व वसतिगृहांची परिस्थिती याठिकाणी मांडलेली होती.तेव्हा याचा उहापोहही मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये करावा.

बाब क्रमांक 163, पान क्रमांक 136. इचलकरंजी, अतिरिक्त व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालयाची स्थापना करण्यासाठी तरतूद केलेली आहे. आज आपण बघतो की, राज्यात महिलांवरील अन्याय, अत्याचार वाढलेले आहेत. अशा वेळी त्या त्या जिल्हयात महिलांसाठी विशेष न्यायालयांची स्थापना व्हावी, अशी मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत. किमान न्याय मागण्यासाठी तरी महिलांना दूर जावे लागू नये. शिवाय आर्थिक चणचण असतेच. शासनाने याकडेही लक्ष द्यावे.

बाब क्रमांक 117, पान क्रमांक 150. ग्रामविकास व जलसंधारण विभाग. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत वाहतूक व वितरण या करिता तरतूद केलेली आहे. कामाच्या बदल्यात धान्य देण्यात येते पण हे धान्य पुरेशा कोटयात त्या रोजगाराला मिळते काय? खरे म्हणजे मिळत नाही. धान्य फक्त तेथपर्यंत पोहचले की काम झाले काय? त्या धान्याचे वितरण योग्य रीतीने होते काय? तसेच कशा प्रकारचे धान्य दिले जाते, याची पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

बाब क्रमांक 190 पान क्रमांक 162.लातूर येथे विभागीय समाजकल्याण कार्यालय स्थापन करणे. याठिकाणी 6 लाख रुपये तरतूद केलेली आहे. या ठिकाणी समाजकल्याण मंत्री बसलेले आहेत. मला त्यांना आठवण करुन द्यायची आहे की, नांदेडचे विशेष समजकल्याण अधिकारी श्री. अनिल शेंदारकर यांच्याबद्दल सांगितले होते की, भाग्योदय संस्थेमध्ये जाऊन त्यांनी महिलांचा विनयभंग केला होता.त्यावेळी मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, आम्ही त्यांना ताबडतोब सस्पेंड करु. पण त्यांना सस्पेंड तर केले नाहीच. ते नांदेड जिल्हापरिषदेमध्ये विशेष समाजकल्याण अधिकारी होते. आता ते नांदेडच्या जिल्हापरिषदेमध्ये समाजकल्याण अधिकारी म्हणून काम करीत आहेत. त्या संस्थेतील शेळके नावाच्या महिला कर्मचा-यांना महिलांचा विनयभंग करणारे जातीवाचक शब्द उच्चारलेले आहेत. त्यांच्या मोबाईलमधून त्या संस्थेमधील महिलांचे फोटो घेतलेले आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ....

त्यांना तुम्ही सस्पेंड करणार होता परंतु त्यांना सस्पेंड न करता दुसरीकडे नेमणूक दिलेली आहे. मागे तदर्थ समिती गठीत करु असे आश्वासन देण्यात आले होते. ती बाब मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छिते. ती समिती गठीत झालेली नाही.

सभापती महोदया, यानंतर मी बाब क्रमांक 201, 202 आणि 203 च्या संदर्भात बोलणार आहे. यामध्ये बहिरे आणि मुके यांच्यासाठी कार्ये करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य याबाबत पुरवणी मागणी केलेली आहे. यानंतर मी आदिवासी विकास विभागाबद्दल दोन मिनिटे बोलणार आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी** ) : मागच्या अधिवेशनामध्ये तदर्थ समितीच्या बाबतीत आश्वासन दिले होते. अजूनही ती समिती झालेली नाही. खरे तर त्या आश्वासनाची पूर्तता व्हावयास पाहिजे.

श्रीमती कांता नलावडे : मागे महिला आमदारांची तदर्थ समिती नेमली होती....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, मागे बर्डी येथील आश्रमशाळेमध्ये आदिवासी मुलीचे लैगिक शोषण झाले होते त्याबाबतची तक्रार सभागृहामध्ये मांडल्यावर सर्वपक्षीय महिला सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने वेगवेगळया आदिवासी आश्रमशाळांची पाहणी करुन त्याबाबतीत काय कार्यवाही करावयाची त्याबद्दल शासनाला अहवाल दिला होता. त्याबाबतीत काही प्रमाणात प्रगती झालेली आहे. तरी सुध्दा कमिटी झाल्यानंतरच्या काळामध्ये 20 तक्रारी नोंदविल्या गेल्या. या मुलींचे संरक्षण आणि पुनर्वसन व्हावे तसेच दिलेल्या योजनांचा पाठपुरवा सातत्याने होणे आवश्यक आहे. विधानसभेत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि इतर महिला सन्माननीय सदस्यांनी आपल्याला विनंती केली होती. आमची शासनाला विनंती आहे की, महिला तदर्थ समिती गठीत करुन आदिवासी आश्रमशाळांच्या पाहणीसाठी त्या समितीची मदत घेतली तर चांगले होईल.

**तालिका सभापती** : त्याची कार्यकक्षा वाढविली तरी हरकत नाही. त्याची आवश्यकता आहे.

श्रीमती कांता नलावडे : आज महाराष्ट्रामध्ये महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. सभापती महोदया, आपण यासंदर्भात शासनाला निदेश द्यावेत.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : कार्यकक्षा वाढवावी असे मी म्हटले आहे आणि ते निदेशच आहेत.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदया, आदिवासी आरोग्य सेवेच्या बाबतीत मला बोलावयाचे आहे. अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यातील काही गावांची नावे यामध्ये दिलेली आहेत. या ठिकाणी चुकीची नावे आलेली आहेत ती दुरुस्त करावीत अशी मी विनंती करतो. मांडवा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आणि प्राथमिक आरोग्य पथक हे एकाचवेळी कसे कार्यान्वित राहणार याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. जी केंद्रे ठरविलेली आहेत त्याचे काय निकष लावलेले आहेत याचेही उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. लोकसंख्या किंवा दोन केंद्रातील अंतर तसेच एका ग्रामपंचायतीमध्ये किती केंद्रे असावीत यापैकी कोणते निकष लावले याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. आदिवासींसाठी पाटबंधाऱ्याच्या काही योजना केलेल्या आहेत. मुळातच हा आराखडा तयार करताना आणि मंजूर करताना सरकारला घाई झाली होती की काय असे लक्षात येते. यामध्ये आधी तरतूद आणि नंतर सर्व्हेक्षण असा उलटा प्रकार तर झालेला नाही ना ? उपसा सिंचन योजनांचे सर्व्हेक्षण झाले पाहिजे परंतु त्या ठिकाणी ते झालेले नाही. साठवण बंधाऱ्यांचे सर्वेक्षण सुध्दा अपूर्ण आहे. आराखडयात दर्शविल्याप्रमाणे कात्री जवळील नदीवर व माकडकूंड येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याचे नमूद केले आहेत. प्रत्यक्षात कात्री जवळीत नदीवर बांधल्या जाणाऱ्या बंधाऱ्याचे नुकतेच सर्वेक्षण झाले आहे तर माकडकूंड येथे अद्याप सर्वेक्षण देखील झालेले नाही. मग या ठिकाणी तरतूद कशी काय केली ? या अतिशय महत्वाच्या विषयाचे नियोजन अधिक काळजीने करण्याची गरज आहे. सभापती महोदया, अनेक मुद्दे या ठिकाणी मांडावयाचे होते. जे प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी व्यवस्थित उत्तर द्यावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

---

**तालिका सभापती** : आपण पंधरा मिनिटांच्या वर वेळ घेतलेला आहे. खास बाब म्हणून आपल्याला हा वेळ दिलेला आहे. यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए.अझिज बोलतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

डॉ. एम. ए. अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 38, पृष्ठ क्रमांक 28 याबाबत मला बोलावयाचे आहे. यामध्ये दोन बाबींच्या संदर्भात शासनाने पूर्तता केलेली आहे. यामध्ये श्री. शेख यांची एक वैयक्तिक केस आहे. त्यासंदर्भात 1 लाख 50 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यानंतर एका मोटार अपघातातील क्लेमच्या बाबतीत पूर्तता केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज....

मला आश्चर्य याचे वाटते की, वक्फ मंडळाच्या ज्या जागा आहेत त्यासाठी राज्यशासनाने जी रक्कम वक्फ मंडळा ाला द्यावयाची आहे त्याची पूर्तता या पूरक मागण्यांमध्ये करण्यात आलेली नाही. शासनाने 5996 हेक्टर जागा संपादित केलेली आहे आणि शासनाने हा पैसा वक्फ मंडळाला रिफंड करावयाचा होता त्याची पूर्तता केलेली नाही. त्याचप्रमाणे लावणीचे 11,71,613 रुपये देणे आहे त्याचाही उल्लेख केलेला नाही. राज्य वीज मंडळाने वक्फ मंडळाला 40 लाख रुपये देणे आहे त्याचीही पूर्तता करण्यात आलेली नाही. मा.महसूल मंत्री याठिकाणी उपस्थित नाहीत, मा.वक्फ राज्यमंत्री येथे आहेत. परंतु राज्य वक्फ मंडळ हे महसूल खात्याच्या नियंत्रणाखाली आहे. मा. वक्फ राज्यमंत्र्यांना यामध्ये जास्त काही करता येण्यासारखे नाही. त्यामुळे मा.महसूल मंत्री याठिकाणी उपस्थित असणे आवश्यक होते. मी गेल्या अधिवेशनामध्ये वक्फ मंडळासाठी 1.90 कोटी रुपयांची मागणी केली होती. शासनाने आनंदनगर येथील नागनाथ मंदिरासाठी 12 कोटी रुपये मंजूर केले आहेत. परंतु वक्फ मंडळासाठी 1.90 कोटी रुपये देण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला होता त्याच्यावर विचार करण्यात आलेला नाही. माझ्या मागणीची मा.वक्फ राज्यमंत्र्यांनी दखल घ्यावी असे यानिमित्ताने सांगत आहे. महाराष्ट्रामध्ये वक्फ मंडळ आहे याची महाराष्ट्र शासनाला कल्पना आहे की नाही हे मला माहीत नाही. मी हा प्रस्ताव 2002 सालापासून शासनाकडे पाठविलेला आहे. परंतु आजपर्यंत त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही. मा.महसूल मंत्री आणि मा.वक्फ राज्यमंत्र्यांना कळकळीची विनंती आहे की, त्यांचा याचे उत्तर द्यावे. शासनाने या मंडळाचेही पैसे दिलेले नाहीत. पण वक्फ मंडळाला शासनाने जी मदत करावयाची आहे ती सुध्दा केलेली नाही. आज देशामध्ये अन्य राज्यातील वक्फ मंडळांना ती राज्यसरकारे भरघोस मदत करीत आहेत. आंध्र प्रदेश सरकारने त्यांच्या वक्फ मंडळाला 3 कोटी 40 लाखाची मदत केली आहे, उत्तर प्रदेश सरकारने 2.50 कोटीची मदत केली आहे. परंतु महाराष्ट्र सरकारने या मंडळाला एकही पैसा दिलेला नाही. महाराष्ट्र शासनाच्या या वागणूकीबद्दल शासनाने सभागृहामध्ये खुलासा करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 19:25

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, गृह विभागाच्या पृ.क्र.20 वरील बाब क्रमांक 28 मध्ये नाशिक येथील न्याय सहायक विज्ञान प्रयोगशाळेकरिता 12 लाख रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यामध्ये मुंबई, नागपूर, पुणे, संभाजीनगर याठिकाणी अशा न्याय सहायक विज्ञान प्रयोगशाळा अस्तित्वात आहेत. या प्रयोगशाळांचा रोल अतिशय महत्वाचा आहे. कारण राज्यामध्ये खून, मारामा-या, बलात्कार यासारखे गुन्ह्यांचे प्रमाण फार वाढलेले आहे. विशेषत: मरीन ड्राइव्ह सारखे जे बलात्कार आहेत त्यामध्ये न्याय सहायक प्रयोगशाळांचे महत्व फार मोठे आहे. मरील ड्राईव्ह येथे घडलेल्या बलात्कार प्रकरणाचे सॅम्पल दुर्दैवाने कलकत्ता याठिकाणी पाठवावे लागले. या सॅम्पला रिपोर्ट काय आला त्याबाबतची माहिती अद्याप सभागृहाला दिलेली नाही. वास्तविक आपल्या राज्यातील या प्रयोगशाळांचा अनेक लोक फायदा घेत असतात. शासनाच्याच रिपोर्टमध्ये असे म्हटलेले आहे की, बिहार, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश अशा राज्यातून आपल्या प्रयोगशाळेमध्ये नमुने तपासणीसाठी येतात. मात्र आपल्याच राज्यातील नमुन्याचे निदान आपल्या प्रयोगशाळेतून होत नाही. आपल्या प्रयोगशाळांतून 6 ते 7 भागामध्ये नमुन्यांचे निदान केले जाते. टॉक्सीकॉलॉजी, बायोलॉजी, सेरेलॉजी, फिजॉलॉजी, जनरल ॲनालिटिक्स आणि बॅलिस्टिकी टेस्ट, फोटोग्राफी अशा प्रकारे नमुन्यांचे निदान केले जाते. मी याठिकाणी आकडेवारी देऊ इच्छितो. आपल्याकडे या वर्षअखेरीस 92172 प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा निर्णय लागला नाही तर खटल्यामध्ये कशी मदत होईल ? 92172 खटल्यांचा निर्णय प्रलंबित असेल तर आपल्या प्रयोगशाळा किती कार्यक्षम आहेत याचा आपणास अंदाज येईल. मी 2003 पासूनची आकडेवारी सभागृहाला सादर करतो. 2003मध्ये 1 लाख 31 हजार प्रकरणे प्रलंबित होती. 2004मध्ये 77920 प्रकरणे प्रलंबित होती आणि 2005मध्ये अदांजे 92 हजार 197 प्रकरणे प्रलंबित आहेत. आता प्रयोगशाळांसाठी केलेली तरतूद ही अतिशय तुटपुंजी आहे. आज ज्या 8 फिरत्या प्रयोगशाळा आहेत त्यांची परिस्थिती काय आहे हे मा.मत्री महोदयांनीच सभागृहाला सांगावे. जेथे बॉम्बस्फोट होतात त्या जागेवर जाऊन नमुने घ्यावे लागतात. या प्रयोगशाळांमध्ये 166 पदे आहेत. या पदांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. नाशिक येथील प्रयोगशाळेसाठी 35 पदे आहेत. नागपूर आणि पुणे येथील प्रयोगशाळांतील पदांच्या संख्येत वाढ करण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.दीपक सावंत...)

आदिवासी विकास विभागाच्या पृ.क्र.226 वरील बाब क्रमांक 266मध्ये संवेदनशील आदिवासी जिल्ह्यांमध्ये चालू असणा-या मार्ग व पुलाच्या बांधकामासाठी 10 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद कशी तुटपुंजी आहे हे मी आकडेवारीवरुन सिध्द करुन दाखवितो. ठाणे जिल्हा हा कुपोषणाच्या बाबतीत संवेदनशील जिल्हा असल्याचे आपण मानतो त्याठिकाणी रस्त्याची 83 कामे प्रस्तावित केलेली आहेत.  रायगड जिल्ह्यामध्ये पूल आणि रस्त्यांची 24 कामे प्रस्तावित केलेली आहेत. नंदूरबार जिल्हा हा कुपोषणाच्या बाबतीत अतिसंवेदनशील जिल्हा असून त्या जिल्ह्यामध्ये रस्त्यांची 64 कामे प्रस्तावित केलेली आहेत. मेळघाट हा देखील कुपोषणाच्या बाबतीत खूप संवेदनशील असा भाग मानला जातो. त्याठिकाणी 24 रस्त्यांची कामे प्रस्तावित केलेली आहेत. गडचिरोलीमध्ये 112 आणि चंद्रपूरमध्ये 108 कामे प्रस्तावित केलेली आहेत. सभापती महोदया, शोकांतिका अशी आहे की, ज्या जिल्हयामध्ये कुपोषण नाही अशा पुणे, अहमदनगर आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये देखील कुपोषणांतर्गत कामे घेतलेली आहेत. कोणताही विषय घेऊन आपल्या भागामध्ये कामे करायची आणि ज्या भागामध्ये ख-या अर्थाने गरज आहे तिकडे मात्र दुर्लक्ष करायचे ही शासनाची वृत्ती योग्य नाही. मोखाडा सारख्या भागामध्ये बेटक्याचीवाडी याठिकाणी गेल्यावर्षी कुपोषणाने बळी गेले. त्याठिकाणी आजही रस्ता नाही. बेटेवाडी हा भाग असा आहे की, तेथील लोकांनी पुढच्या पावसाळ्यासाठी आजच अन्नधान्य साठवून ठेवलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ श्री.शिगम 19:30

डॉ.दीपक सावंत...

बेटवाडी हे गाव बेट म्हणून ओळखले जाते. पावसाळयात या गावाचा पूर्णपणे संपर्क तुटत असतो. कुपोषणाचे नाव घेऊन बाकीच्या जिल्हयात रस्त्यांच्या कामासाठी तरतूद का केली याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. सभापती महोदय, बाब क्रमांक 267, पृष्ठ क्रमांक 233- जी गेड 3 व ग्रेड 4 ची बालके रुग्णालयात उपचार घेत आहेत अशा बालकांच्या पालकांना दर दिवशी 40 रुपये देण्याच्या योजनेसाठी 1 कोटी 21 लाख 75 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मी मागच्या अधिवेशनात देखील शासनाला विनंती केली होती की, शुक्रवारी रुग्णालयात दाखल झालेल्या बालकाच्या पालकास सोमवारी पैसे दिले जातात. या बालकांच्या पालकांना रोज पैसे मिळाले नाहीत तर ते दोन वेळचे जेवण सुध्दा करु शकत नाही. इतकी गरिबीची परिस्थिती त्या पालकांची असते. रुग्णालयात दाखल झालेली कुपोषित बालकांच्या पालकांना दररोज पैसे उपलब्ध करुन देण्यात यावेत अशी मी पुन्हा माननीय मंत्र्यांना विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

--------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदया, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 8- मंत्र्याकरिता 20 नवीन मोटारगाडया खरेदी करणे यासंबंधीची आहे. मंत्र्यांकरिता 20 नवीन मोटारगाडया खरेदी करण्यासाठी 1 कोटी 20 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मंत्र्यांच्या मोटारगाडया जुन्या झाल्या होत्या काय ? त्यांच्या जुन्या गाडयांचे काय झाले ? त्या गाडयांच्या लिलाव करण्यात आला आहे काय ? नवीन गाडया खरेदी करण्याची आवश्यकता होती काय ? या सर्व प्रश्नांच्या बाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती महोदया, बाब क्रमांक 11- पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ प्रतिष्ठान, औरंगाबाद यांना सहाय्यक अनुदान देण्यासंदर्भातील हा विषय आहे. सहाय्यक अनुदान देण्यासाठी 10 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ प्रतिष्ठान,औरंगाबबद यांना त्यांच्या सामाजिक कार्यक्रमाकरिता आणि फर्निचर सेट संगणक इत्यादी खरेदी करण्यासाठी हे अनुदान देण्यात येत आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. चांगल्या कामासाठी शासनाने सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे त्याबद्दल शासनाचे मी अभिनंदन करते. सभापती महोदया, बाब क्रमांक 12- हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीत रझाकाराकडून छळ झालेल्या ग्रामस्थांना वित्तीय सहाय्य करणे. यासाठी 2 कोटी 70 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीत रझाकाराकडून अत्याचार झालेल्या उस्मानाबाद जिल्हयातील देवधानोरा,चिलावाडी व नांदगाव या तीन गावातील 135 ग्रामस्थांना प्रत्येकी 2 लाख रुपयांचे वित्तीय सहाय्य देण्याचे ठरविण्यात आले आहे. या 135 ग्रामस्थांचा पूर्वी शोध घेतला गेला नव्हता काय ? आता या ग्रामस्थांचा शोध लागलेला आहे तर या ग्रामस्थांना मागच्या कालावधीतील फरक शासनाकडून दिला जाईल काय? याचा देखील माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. सभापती महोदया, बाब क्रमांक 13- नागपूर येथे हजहाऊस बांधण्यासाठी हज समितीला सहाय्यक अनुदान देण्यासाठीची ही मागणी आहे. यासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मुस्लीम धर्मीय समाजातील लोक हज येथे जातात त्यांना आर्थिक सहाय्य दिले जाते. आपले हिंदू धर्मीय लोक मान सरोवर तसेच अमरनाथ यात्रेस जातात त्या यात्रेकरुंना देखील आर्थिक मदत दिली गेली पाहिजे. त्यासाठी शासनाकडून योग्य ती दखल घेतली जाईल काय याचा देखील खुलासा या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी केला पाहिजे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 16- "छत्रपती शिवराय" या हिंदी दूरदर्शन मालिकेला वित्तीय सहाय्य करण्यासबंधीची मागणी आहे. यासाठी 50 लाख रुपयांचे अर्थसहाय्य निर्मात्याला-

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर..

देण्यात येणार आहे. आपल्या राज्यात अनेक चांगली शिवप्रेमी मंडळी आहे. त्यांची मदत घेतली तर छत्रपती शिवरायांवर चांगली मालिका होऊ शकते. छत्रपती शिवरायांवर चांगली मालिका व्हावी यादृष्टीने शासनाने लक्ष घालावे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 9-"दांडी मार्च" यात्रेचा 75 वा वर्ष दिन साजरा करण्यासंबंधातील खर्च यासंबंधीची ही मागणी आहे. यासाठी 24 लाख 51 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. 75 वा वर्ष दिन साजरा करण्यासाठी युवक बिरादरी या सामाजिक संघटनेला आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे. या संघटनेचा आणि शासनाचा काही संबंध येत नाही. ही शासकीय संस्था आहे असे मला वाटत नाही. अशी वस्तुस्थिती असताना या युवक बिरादरी सामाजिक संघटनेला हे अर्थसहाय्य का उपलब्ध करुन देण्यात आले? याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात द्यावी.

सभापती महोदया, कृषि व पशुसंवर्धन विभागाची बाब क्रमांक 49- महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांच्या अंतर्गत काम करत असलेल्या कामगारांना, न्यायालयाने दिलेल्या निवाडयानुसार सेवानिवृत्ती लाभ देण्याकरिता सहाय्यक अनुदान मंजूर करणे या विषयासंबंधीची मागणी आहे व या अनुषंगाने 1 कोटी 5 लाख 66 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या विद्यापीठांतर्गत काम करत असलेल्या अस्थायी कामगारांनी कायमस्वरुपी आस्थापनेवरील लाभाचा फायदा मिळावा म्हणून शासनाकडे मागणी केली होती. परंतु शासनाने त्यांची मागणी मान्य केली नाही. म्हणून संबंधित कर्मचारी औद्योगिक न्यायालयात गेले आणि न्यायालयाने त्यांच्या बाजुने निर्णय दिला. 75 कामगार सेवानिवृत्त झालेले असून त्यांना 94 लाख 65 हजार रुपये थकबाकी देण्यात आलेली आहे. शासनाने यासंबंधी लागलीच निर्णय दिला असता तर त्या कर्मचा-यांना कोर्टात जावे लागले नसते. कागारांच्या बाबतीत असे वारंवार घडत असते. शासन कामगारांच्या मागण्या मान्य करीत नाहीत नंतर ते कर्मचारी कोर्टात जातात आणि न्याय मिळवून घेतात. नंतर शासनाला या कामगारांना त्यांचा लाभ द्यावा लागतो. यापुढे तरी कामगारांना कोटाची पायरी चढावयास लावू नये...

यानंतर श्री. कानडे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 19:35

श्रीमती संजीवनी रायकर ...

पृष्ठ क्र.38 बाब क्र.56 शासकीय दूध योजनेसंदर्भातील ही बाब आहे. रोजंदारीवर वर्षानुवर्षे काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांना नियमित करावयाचे आहे. या कामगारांना कोर्टात जावे लागले. यासाठी 11 लाख 11 हजार 146 रुपयांचे थकीत वेतन शासनाने या मागणीद्वारे मंजूर केले आहे. याशिवाय कोर्टात जाण्याचा खर्च आला तो वेगळाच आहे. पृष्ठ क्र.43 बाब क्र.60 आणि 61 प्रा.शाळांसाठी अनुदान यासंदर्भातील ही बाब आहे. 15 हजार कनिष्ठ महाविद्यालयांना 2 कोटी 2 लाख 33 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माध्यमिक शाळांच्या बाबतीत कोणती तरतूद करण्यात आली आहे ? 2000 सालापासून ज्या शाळा अनुदानावर आलेल्या आहेत त्यांना अद्यापि अनुदान मिळालेले नाही. ज्या शाळांचे मूल्यांकन पूर्ण झालेले आहे त्या शाळांना शासनाने तातडीने अनुदान मंजूर करावे अशी मी विनंती करते. पाल्यांना मोफत शिक्षण देण्यासाठी जी तरतूद मागील अधिवेशनात केली होती ती पुरेशी नाही. उरलेल्या पाल्यांसाठी सुध्दा तरतूद करावी. ज्यांची मुले आता इंजिनिअर झालेली आहेत अशा शिक्षकांच्या पाल्यांना मोफत शिक्षणाची सुविधा मिळालेली नाही. या अधिवेशनात यासाठी तरतूद होईल असे वाटले होते परंतु ती झालेली दिसत नाही. ती आशा फोल ठरली आहे. विधी व न्याय विभागाच्या अंतर्गत बाब क्र.161 मध्ये जलद गती न्यायालयासाठी 14 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु आज परिस्थिती पाहिली तर 10-10 वर्षे खटल्यांचे निकाल लागत नाहीत. मुंबईतील न्यायालयामधील खटल्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. जी न्यायालये आहेत त्याठिकाणी अशिलांना बसण्यासाठी जागा सुध्दा नाही. न्यायाधिश कसे काम करतात हा सुध्दा चिंतेचा विषय आहे. या न्यायालयांची प्रत्यक्ष पाहणी करुन त्यासाठी सुध्दा काही तरतूद केली तर ते योग्य होईल. पृष्ठ क्र. 17 बाब क्र.23 यामध्ये पोलिसांच्या आस्थापनेवर काही नियुक्त्या केल्या जाणार आहेत. राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागामध्ये 4-4 वर्षे निकाल लागत नाहीत. पोलीस निरीक्षकाने आरोपी पकडून दिले. 80 हजार रु. आरोपीने भरले अजून निकाल लागलेला नाही. निरीक्षक सुखाने नांदतो आहे. शालेय न्यायाधिकरणामध्ये त्याच्या बाजूने निकाल लागला तरी अद्याप त्याला शाळेने घेतलेले नाही. शासन स्वत:च कोर्टाचे आदेश पाळत नाही तर संस्थांना आदेश देण्याचा शासनाला कोणता अधिकार आहे ? पृष्ठ क्र. 164 बाब क्र.199 शासकीय वसतीगृहांमध्ये सुखसोयी उपलब्ध करुन देणे यासंदर्भातील

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ...

आहे. यासाठी 30 कोटी रुपये शासन खर्च करणार आहे. ही चांगली गोष्ट आहे. परंतु यासाठी या लोकांना आंदोलन करायला लावू नका. त्यांना योग्य त्या सुविधा द्याव्यात एवढी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

-----

....2

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग पृष्ठ क्र.5 बाब क्र.1 यामध्ये लोकसभा आणि विधानसभा यांच्या मतदारसंघाच्या सीमा ठरविण्यासाठी 6 लाखांची मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, लोकप्रतिनिधींच्या जिव्हाळयाचा आणि उत्सुकतेचा हा विषय आहे. राज्य शासनातर्फे जी समिती केंद्र शासनाने गठीत केलेली आहे त्या समितीवर प्रतिनिधी आहे. माझा प्रश्न असा आहे की, निश्चितपणाने या समितीचे काम कुठपर्यंत आलेले आहे ? खरोखरच मतदारसंघाच्या सीमा ठरविण्यासाठी जे डिलिमिटेशन कमिशन नियुक्त करण्यात आलेले आहे त्याची सध्याची परिस्थिती काय आहे हे सभागृहाला सांगावे. सभापती महोदय, पृष्ठ क्र.5 बाब क्र.2 यामध्ये मतदारांना ओळखपत्रे देण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 1994 साली निवडणूक आयोगाने सर्व राज्यांना आदेश दिले होते की मतदारांना ओळखपत्रे देणे बंधनकारक आहे. महाराष्ट्रामध्ये 6 कोटी 58 लाख 74 हजार मतदार होते त्यापैकी 4 कोटी 44 लाख 55 हजार 999 मतदारांना ओळखपत्रे दिली होती. 2 कोटी 14 लाख 18 हजार 03 मतदारांना ओळखपत्रे देण्याचे बाकी आहे. 1994 मध्ये या सगळया मतदारांना ओळखपत्रे दिली असती तर 10 कोटी रुपयांचा आता खर्च आला नसता.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ..

आतापर्यन्त अनेक मतदारांनी निवडणूक कार्यालयाकडे ओळखपत्रे गहाळ झाल्याबद्दलच्या तक्रारी केल्या आहेत . मला या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, ज्यांची ओळखपत्रे गहाळ झालेली आहेत त्यांना पुन्हा ओळखपत्रे देण्यात येणार आहेत काय ? सभापती महोदया, यानंतर मला बाब क्रमाक 5 पान नंबर 5 संबंधी बालावयाचे आहे विख्यात अभ्यागतांसाठी 39 मोटारगाडया खरेदी करण्याकरिता 1 कोटी 81 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये 29 ॲम्बॅसॅडर्स घेण्यात येणार आहेत आणि 10 होन्डा सिटी गाडया घेण्यात येणार आहेत. विख्यात अभ्यागताची व्याख्या काय करण्यात आली आहे ? विख्यात अभ्यागत म्हणजे नेमके कोण आहेत ? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टीकरण करावे असे मला त्यांना सांगावयाचे आहे. सभापती महोदया, यानंतर बाब क्रमांक 6 पान नंबर 6 संबंधी मला बोलावयाचे आहे ग.दि.माडगुळकरांच्या स्मारकासाठी 35 लाख 23 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे 2002-2003 चा अर्थसंकल्प सादर करीत असतांना माननीय अर्थमंत्र्यांनी 25 लाख रुपयांची तरतूद करुन दोन वर्षात हे स्मारक पूर्ण केले जाईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. त्यासंदर्भात मला अत्यंत खेदाने म्हणावेसे वाटते की, पुन्हा माननीय वित्त मत्र्यांना पूरक मागणी यासाठी करावी लागत आहे. हे स्मारक बांधण्यासाठी आता जागेचा काही प्रश्न नाही. सांगली जिल्हयातील आटपाडी तालुक्यात शेटफळे येथे जागा निश्चित करण्यात आलेली आहे. तेव्हा सध्याच्या परिस्थितीमध्ये ग.दि.माडगुळकरांच्या स्मारकाची काय परिस्थिती आहे ? किती कालावधीत हे स्मारक पूर्ण होणार आहे याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी देणे आवश्यक आहे ती माहिती त्यांनी द्यावी अशी माझी त्यांना विनती आहे. सभापती महोदया, यानंतर मला बाब क्रमांक 9 पान नंबर 6 संबंधी बोलावयाचे आहे.दांडी मार्च यात्रेचा 75 वा वर्ष दिन साजरा करण्यासबंधातील खर्च भागविण्यासाठी 24 लाख 51 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.अशासकीय वा खाजगी संस्थाना सहाय्यक अनुदान देण्यासाठी 24 लाख 51हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास तातडीने द्यावयाच्या मदतीसाठी हे पैसे वापरावेत असे संकेत असतांना 24 लाख 52 हजार रुपयांची पूरक मागणी करुन दांडी यात्रेचा 75 वा वर्ष दिन साजरा करण्यासाठी हे पैसे देण्यात आलेले आहेत वास्तविक हे पैसे देत असतांना असे निकष ठरविण्यात आलेले आहे की ,ज्या वेळी नैसर्गिक

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अवचट ....

आपत्ती येते त्यावेळी हे पैसे वापरण्यात यावेत परंतु तसे करता हे पैसे दुस-या कारणासाठी वापरण्यात आलेले आहेत. कोणत्या संस्थेला हे पैसे दिलेले आहेत ? "युवक बिरादरी"नावाच्या संस्थेला हे पैसे देण्यात आलेले आहेत.श्री. क्रांती शहा हे या सस्थेचे संस्थापक आहेत. त्या संस्थेला हे पैसे देण्यात आलेले आहेत. त्या ऐवजी सेवा दला सारख्या संस्थेला पैसे दिले असते तर अधिक बरे झाले असते .परंतु त्यांना पैसे न देता युवक बिरादरीच्या श्री. क्रांती शहा यांना पैसे दिले आहेत तेव्हा त्यांनी कोणती क्रांती केली होती ? त्याचबरोबर या संस्थेकडून हिशोब घेतला होता किवा नाही ? हा महत्वाचा प्रश्न आहे.त्याचबरोबर अशासकीय संस्थांना मदत देत असतांना कोणते निकष आहेत याचे स्पष्टीकरण माननीय मंत्रिमहोदयांनी करावे असे मला त्यांना सांगावयाचे आहे. सभापती महोदया, यानंतर पान नंबर 24 बाब क्रमाक 36 संबंधी मला बोलावयाचे आहे कारागृहामध्ये मोबाईल जॅमर यंत्रणा बसविण्यासाठी 7 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. गेल्या महिन्यात लोक लेखा समितीने नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहाला आणि पुणे येथील येरवडा कारागृहाला भेट दिली होती. त्या कारागृहाला भेट देण्यासाठी सदस्य गेले होते त्यावेळी मोबाईल बाहेर काढून ठेवण्यात यावे मोबाईल आतमध्ये नेता येणार नाही अशा प्रकारची पाटी तेथे लावण्यात आल्याचे आम्हाला दिसून आले होते. आत मध्ये गेल्यानंतर आम्ही सबंधित अधिका-यांना असे विचारले की, "तुम्ही जामरची मागणी करीत आहात त्या अर्थी आतमध्ये मोबाईल जात असले पाहिजेत. आमदारांनीसुध्दा आपल्याजवळील मोबाईल बाहेर काढून ठेवले होते आतमध्ये कोणीही मोबाईल घेऊन जात नाहीत अशा वेळी आपल्याला जामरची काय आवश्यकता आहे? " जर आतमध्ये कोणी मोबाईल घेऊन जात असेल तर संबंधित जो कोणी अधिकारी यास जबाबदार असेल त्याच्याविरुध्द कोणती कारवाई केली गेली आहे ? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. यानंतर मला बाब क्रमांक 65 पान नंबर 48 ंसबंधी बोलावयाचे आहे.मराठवाडा विकास कार्यक्रम पॅकेज खालील महानगरपालिका क्षेत्रात सुखसोयीचा विकास करण्यासाठी 6 कोटी 8 लाख 86 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.ही पूरक मागणी करण्यात आल्याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो.परंतु मला असे सांगावयाचे आहे की, नगरपालिका असो किंवा महानगरपालिका असो ज्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री विलास अवचट ....

कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्यांना योग्य ती मदत दिली गेली पाहिजे या बाबतीत मी आपल्याला संभाजीनगर महानगरपालिकेचे उदाहरण देतो. मराठवाडा म्हटल्यानंतर मराठवाडयामध्ये अगोदरच अनुशेष आहे आणि तो अनुशेष भरुन न काढता तो आणखी वाढविला जात आहे. तेव्हा हा अनुशेष कमी होईल याकरता मराठवाडयासाठी तातडीने पैसे देण्यात आले पाहिजे. संभाजीनगर महानगरपालिकेच्या महापौराचे पंत्र माझ्याकडे आहे. 2001 सालापासून 2005 सालापर्यन्त त्यांना अनुदान देण्यात आलेले नाही. 34 कोटी 36 लाख रुपयांचे अनुदान त्यांचे थकलेले आहेत. त्यांनी माझ्याकडे जे पत्र दिले होते ते पत्र मी माननीय मंत्रीमहोदयांकडे देईन.हे पैसे त्यांना त्वरित देण्यात यावे अशी मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, "संभाजीनगर महानगरपालिका ही टॉप टेन महानगरपालिकेमध्ये येईल यासाठी प्रयत्न केले जातील. " तेव्हा ही महानगरपालिका टॉप टेनमध्ये येण्यासाठी हे पैसे त्यांना दिले तर त्या पैशाचा उपयोग त्या महानगरपालिकेला होईल. सभापती महोदया, यानंतर पान नंबर 48 बाब क्रमांक 67 संबधी मला बोलावयाचे आहे.दलित वस्त्यामध्ये सुविधा पुरविण्यासाठी 10 कोटी 51 लाख 62 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अवचट .....

या ठिकाणी आपण म्हटले आहे की, दलित वस्त्यांमध्ये सुविधा पुरविण्याकरिता नागरी स्थानिक संस्थांना अतिरिक्त अनुदान. तर या नागरी स्थानिक संस्था म्हणजे कोण ? त्यांचे निकष काय आहेत ? आतापर्यंत त्यांनी कोणत्या सुविधा दिलेल्या आहेत ? कारण अनेक तक्रारी या बाबतीत आलेल्या आहेत. म्हणून याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदया, त्यानंतर बाब क्रमांक 163, पृ.136, विधी व न्याय विभागाची ही पूरक मागणी आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला जवळ जवळ 45 वर्षे झालेली आहेत. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी आहे. परंतु खेदाने सांगावेसे वाटते की, मराठी भाषेला न्याय देण्यासाठी, तालुका आणि जिल्हा न्यायालयांमधील कामकाज मराठीमध्ये चालावे यासाठी, सन्माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण यांना या ठिकाणी काल अशासकीय प्रस्ताव आणावा लागला. त्याच बरोबर मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो की, येथे जी व्यथा व्यक्त केलेली आहे त्याबाबत त्यांनी आश्वासन दिलेले आहे आणि त्याची वचनपूर्ती .. कारण किमान तीन महिन्याच्या आत मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये मराठीकरण होईल असे वाटते एवढे बोलून मी भाषण संपवितो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

****

..... 4वाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MAP/KGS. श्री.गायकवाड नंतर --- 19:45

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, मी अत्यंत मोजक्या शब्दांमध्ये काही विशिष्ट मुद्यांवर माझे विचार व्यक्त करणार आहे. बाब क्रमांक 18, पृ.13 आणि बाब क्रमांक 22, पृ. 17 यावर मी प्रथमत: माझे विचार मांडणार आहे. या ठिकाणी सरकारी अभियोग संचालनालयाच्या आस्थापनेवर 172 पदांचे पुनरूज्जीवन करण्याचे सरकारने ठरविले आहे त्यामध्ये लिपिक आणि शिपायांची पदे नियमित सेवेमध्ये घेतलेली आहेत आणि त्यासाठी तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर बाब क्रमांक 22 मध्ये गृह खात्यामध्ये जवळ जवळ 11021 पदे भरण्यासाठी तरतूद केलेली आहे आणि ही सगळी पदे नव्याने भरली जाणार आहेत आणि ती देखील नियमित वेतनश्रेणीमध्ये भरली जाणार आहेत. असे असताना माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.पुरके आणि राज्यमंत्री श्री.मुश्रीफ हे मात्र शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांसाठी मानधनावर कंत्राटी पध्दत लागू करीत आहेत. महाराष्ट्रामध्ये कोणत्याही विभागामध्ये अशा प्रकारे कंत्राटी पद्धत लागू केलेली नाही. केवळ ती शिक्षण क्षेत्रामध्येच लागू केलेली आहे. म्हणजे इतर सर्व विभागांमध्ये आपण नियमित वेतनश्रेणीमध्ये पदे निर्मिती करता आणि ती भरता देखील पण त्याचवेळेस शिक्षण क्षेत्रातील केवळ शिक्षकांच्या बाबतीत मात्र त्यांना वेठबिगार करून कंत्राटी पध्दतीने आपण नेमत आहात हे समजणे कठीण आहे. तेव्हा याबाबत शासनाने पुनर्विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदया, बाब क्रमांक 60, पृ. 43 - या ठिकाणी खाजगी प्राथमिक शाळांच्या अनुदानाचा प्रश्न आहे. परंतु तेथे काही विशिष्ट शाळांना आपण 40 आणि 60 मध्ये अनुदानावर आणत आहात. पण आजही अशा अनेक शाळा आहेत की, ज्यांचे मूल्यांकन होऊन त्या आता अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत. त्यामुळे ही तरतूद अपुरी पडणार आहे असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. त्याचबरोबर एक महत्त्वाचा मुद्दा आहे की ज्यावर अनेकदा या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. त्या खात्याच्या मंत्र्यांनी आश्वासन देखील दिलेले आहे. ही अगदी छोटीशी बाब असताना त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करता येणे शक्य असतानाही आणि ती बाब मान्य करूनही तरतूद यामध्ये होऊ शकलेली नाही. सीएचबीवर काम करणारे जे शिक्षक आहेत त्यांना एका घड्याळी तासाला, जो स्वत:चे रक्त आटवून शिकवित असतो त्याला त्यासाठी 20 रुपये मानधन आपण देता. हे मानधन वाढविण्यासाठी, 20 रुपयांवरून 50 रुपये करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे, पण त्यासाठी तरतूद या पुरवणी मागण्यांमध्ये होऊ शकली असती तरीही ती

..... 4वाय 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

करण्यात आलेली नाही हे विशेष आहे. त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदया, संस्थेचे जे काही वेतनेतर अनुदान आहे त्यासाठी देखील यामध्ये तरतूद केलेली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या काही शाळा आहे, ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांचेही अनुदान देण्याबाबत सरकार नेहमीच दुर्लक्ष करीत असते. या बाबतीत मागील अधिवेशनामध्ये चर्चा झाली असता या शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना 2-3 महिन्यांचे वेतन मिळाले. पण नंतर पुन्हा त्यांचे वेतन बंद झालेले आहे. याबाबत शिक्षण विभागाकडे विचारणा केली असता यासाठी अनुदान मंजूर झालेले नाही, तरतूद नाही म्हणून अनुदान देऊ शकत नाही असे सांगण्यात आले. खरे म्हणजे या अनुदानासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद होऊ शकली असती पण ती करण्यात आलेली नाही.

( यानंतर श्री.जागडे ....4झेड 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 19:50

श्री. रामनाथ मोते.....

प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी गट सम्मेलने आयोजित केली जातात. एकीकडे राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत आम्हाला नेहमी सांगितले जाते. आर्थिक चणचण असल्यामुळे बचत करण्याचा शासन प्रयत्न करीत असते. परंतु योग्य प्रकारचे नियोजन नसल्यामुळे ही बचत होऊ शकत नाही. वर्षानुवर्षे जी प्रथा सुरु आहे, ती आजही सुरु आहे. प्राथमिक शिक्षकांची जी गट सम्मेलने आयोजित केली जातात, त्यावर होणारा खर्च हा अनाठाई आहे. महिन्यातून एक दिवस या प्रमाणे वर्षातून 12 गट सम्मेलने आयोजित केली जातात. खरे म्हणजे याची आवश्यकता नाही. गट सम्मेलनावर जो खर्च केला जात आहे, तो फुकटच जात आहे. पैशाचा हा अपव्यय होत आहे. यामध्ये शिक्षकांचा वेळही फुकट जातो. या गटसम्मेलनामुळे काहीच फायदा होत नाही. या गट सम्मेलनांमध्ये आमदारांचा, खासदाराचा, सरपंचाचा सत्कार केला जातो. अशाच प्रकारचे कार्यक्रम या गट सम्मेलनामध्ये आयोजित केले जातात. तसेच या गट सम्मेलनात फक्त जेवणावळी होत असतात. त्या शिवाय दुसरे काहीच होत नाही. शिक्षणांचे कोणतेही काम या गट सम्मेलनातून होत नाही. सभापती महोदया, या गट सम्मेलनात येणा-या प्रत्येक शिक्षकाला 15 रुपये दिले जातात. एक शिक्षकाच्या पाठीमागे 15 रुपयाचा खर्च धरला दर महिन्याला या कार्यक्रमासाठी शासनाने 45 लाख रुपये खर्च होत आहे. हा सर्व खर्च अनाठाई होत आहे. म्हणून याबाबत शासनाने योग्य तो विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, या ठिकाणी श्री. सुरुपसिंग नाईक आणि अत्रामसाहेब बसले आहेत, म्हणून मी एका गोष्टीचा उल्लेख करीत आहे. शिष्यवृत्तीची एक चांगली योजना या शासनाने राबविली आहे, त्याबद्दल शासनाला धन्यवाद द्यावयाला हवेत. या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांकडे वेधीत आहे. सैनिकी शाळांमध्ये एससीएसटी आणि वीजेएनटीचे 289 विद्यार्थी आहे. गेल्या तीन वर्षापासून म्हणजेच 2002-2003 पासून या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही. तेव्हा याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मला अशी माहिती मिळाली होती की, आदिवासी विभागाचे जे सचिव होते, ते यामध्ये अडथळे आणीत होते. आता या विभागाचे मंत्री श्री. गावितसाहेब आहेत. ते अत्यंत उत्साही आहेत. त्यांची काम करण्याची मनापासून धमक आहे. आता या खात्याचे सचिव श्री. नगराळे आले आहेत. ते अतिशय चांगले आहेत. त्यामुळे आदिवासी मुलांसाठी अतिशय चांगल्या प्रकारचे काम त्यांच्याकडून होईल, अशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते......

मला अशा आहे. सभापती महोदया, आदिवासी विभागामार्फत ज्या निरनिराळ्या योजना राबविल्या जातात, त्या बाबतचे नियोजन खालच्या स्तरावर योग्य प्रकारे होत नाही. ठाणे जिल्ह्यातील वाडा भागात सहा ते सात शाळा त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था न झाल्यामुळे अजूनपावेतो सुरु झालेल्या नाहीत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे आज या शाळा बंद आहेत. तेव्हा या बाबतचा विचार माननीय मंत्रिमहोदयांनी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, आदिवासी क्षेत्रात काम करणा-या अधिक्षकांची पदे अजूनपावेतो भरण्यात आलेली नाहीत. अनेक वेळा या बाबतची चर्चा झाली आहे. या बाबत अनेक वेळा आंदोलने करण्यात आली आहेत, उपोषण करण्यात आले आहे. 2003 मध्ये परीक्षा घेण्यात आल्या होत्या. परंतु अद्यापही निवड होऊनही संबंधीतांना अधिक्षक पदांच्या नेमणुका मिळालेल्या नाहीत. त्यामुळे अधिक्षकाचे काम आमच्या शिक्षकालाच करावे लागत आहे. तेव्हा अधिक्षकाची पदे त्वरीत भरण्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करावा, अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, साईप्रसाद आदिवासी सेवा मंडळ, वासिंद, ता. शहापूर, जिल्हा ठाणे ही आदिम-कातकरी जमातीच्या आदिवासी मंडळींची संस्था असून कोकण विभागातील सर्व कातकरी जमातींच्या लोकांसाठी कार्य करीत असून कातकरी मुलांसाठी सर्व सोयी-सुविधा युक्त केंद्रिय आदिवासी आश्रमशाळा मौजे दहागाव, ता. शहापूर, जिल्हा ठाणे येथे चालवित आहे. सर्व ॲक्टिव्हीटीज या आश्रमशाळेत राबविल्या जातात. या आश्रमशाळेचे विद्यार्थी विविध स्पर्धामध्ये नैपुण्य मिळवित आहे. या केंद्रिय आश्रमशाळेस केंद्राचे अनूदान अद्यापही मिळत नाही. या संस्थेस राज्य शासनामार्फत जर अनुदान दिले तर कातकरी आदिम-जमातीच्या विद्यार्थ्यांना या निश्चितच मोठा फायदा होणार आहे. सभापती महोदय, मी मांडलेल्या या सर्व समस्यांकडे शासनाने गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांचे प्रश्न आम्हाला या ठिकाणी मांडावे लागत आहेत. गेल्या पाच वर्षापासून उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना 6500 ऐवजी 7225 अशी वेतनश्रेणी मिळावी, अशी मागणी करण्यात येत आहे. शिक्षण विभागाने या बाबतचा जी.आर. देखील काढला आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

परतु शासन कशाप्रकारे नियोजन करीत आहे हे आम्हाला कळत नाही. या संदर्भात प्रत्येक विभागाने वेगवेगळा जी.आर. काढणे आवश्यक आहे कां? आज नगर विकास विभागाने वेगळा जी.आर. काढला आहे, आदिवासी विकास विभागाचा वेगळा जी.आर. आहे. आज शिक्षण विभागाने जी.आर. काढून माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वेतनश्रेणी लागू केली आहे. परंतु आदिवासी आश्रमशाळेतील उच्च माध्यमिक विभागामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना 6500 या वेतनश्रेणीमध्येच काम करावे लागते. मुळात 7225 ही वेतनश्रेणी त्यांना अनुज्ञेय आहे. इतर शिक्षकांप्रमाणेच काम करणारे हे आदिवासी भागातील शिक्षक केवळ आदिवासी भागामध्ये सर्व गोष्टींचा त्याग करुन काम करीत आहेत म्हणून त्यांना खालच्या दर्जाची वेतनश्रेणी द्यावयाची काय? त्या संदर्भात सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी विचार करु असे आश्वासन देण्यात आले आहे. या शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता देण्याची बाब सुध्दा मान्य झाली आहे. तेव्हा या शिक्षकांचे हे प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर सुटावेत अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे लांबलेले भाषण मी पूर्ण करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास, सामान्य प्रशासन व महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदया, माझ्या नगर विकास, सामान्य प्रशासन व महसूल विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, मधुकर सरपोतदार, जोगेंद्र कवाडे,मा. सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री नतिकोद्दीन खतिब, अनंत तरे, विलास अवचट व डॉ. एम. ए. अझीज इत्यादी माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपले विचार व्यक्त केले. यामध्ये अनेक माननीय सदस्यांनी बाबनिहाय चर्चा करुन आपल्या चांगल्या सूचना विभागाला केल्या आहेत. त्यांच्या या चांगल्या सूचनांचा उपयोग माझ्या विभागाला पुढील धोरण बनवितांना निश्चितपणे होईल असा मला विश्वास वाटतो. या ठिकाणी नगर विकास विभागाच्या संदर्भात दोन-तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित झाले आहेत. या विभागामार्फत राज्यातील सर्व नगरपालिका व महानगरपालिकांच्या संदर्भात केंद्राच्या वतीने ज्या काही योजना जाहीर झाल्या आहेत त्या संदर्भात मी आपणास प्रथमत: माहिती देतो. आपणा सर्वांना माहीत आहे की, राज्यामध्ये मोठया झपाटयाने नागरीकरण वाढत चालले आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील झपाटयाने नागरीकरण झालेले एक नंबरचे राज्य आहे. या शहरांचा एकात्मिक कालबध्द आणि परिणामकारक विकास करण्यासाठी केंद्र सरकारच्या अर्बन डेव्हलपमेंट विभागाने एक महत्वाची योजना तयार केली आहे. ती म्हणजे "नॅशनल अर्बन रिनिव्हल मिशन". या योजनेमध्ये दोन भाग आहेत. प्रामुख्याने त्यामध्ये मुंबई, पुणे, नाशिक व नागपूर हे महाराष्ट्रातील चार महत्वाचे मेट्रो सिटी कव्हर केले आहेत. नॅशनल अर्बन रिनिव्हल मिशनच्या माध्यमातून या शहरांचा मोठया प्रमाणात विकास होणार आहे. फक्त ही चारच शहरे नाहीतर अ,ब व क नगरपालिकांच्या क्षेत्राचाही विकास करण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र सरकारच्या अर्बन डेव्हलपमेंट विभागाने मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला आहे. ही अत्यंत सुवर्ण संधी आपल्याला लाभली असून तिचा उपयोग तुम्ही, आम्ही, लोकप्रतिनिधीं सर्वांनी करुन घेतला पाहिजे. या ठिकाणी नगर विकास विभागाच्या ज्या दोन-तीन महत्वाच्या योजना होत्या त्या तुम्हा सर्वांना माहीत आहेत. युरीफ आणि आय.डी.एफ.सी. मध्ये असलेल्या सर्व योजना मर्ज करुन अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फॉर मिडल टाऊन अशी योजना तयार झाली असून या योजनेच्या माध्यमातून क वर्ग, ब वर्ग व अ वर्ग नगरपालिका आणि महानगरपालिका, सर्व स्थानिक स्वराज्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

संस्थांचा अतिशय शास्त्रशुध्द पध्दतीने विकास करणे शक्य आहे. त्यासाठी मोठा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या ठिकाणी एक अत्यंत महत्वाची दूरगामी परिणाम करणारी योजना अर्बन रिनिव्हल मिशनच्या माध्यमातून आकाराला आली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

ती म्हणजे आजपर्यंत 40 हजार लोकवस्तीच्या वरील शहरांना घरकुलाच्या संदर्भात फक्त वाल्मिकी आंबेडकर योजना उपलब्ध होती. पण नॅशनल अर्बन रिन्युअल मिशनच्या माध्यमातून "क" वर्गासारख्या अत्यंत छोटया नगरपालिका असल्या तरी तेथे दारिद्रयरेषेखाली राहणा-या नागरिकांना देखील या माध्यमातून घरकुलांचा लाभ घेता येणे शक्य होणार आहे. त्यामुळे या योजनेच्या सुविधांचा उपयोग करुन घेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपला डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन, याबाबतीत जी नोडल एजन्सी ठरविली आहे, त्यांच्याकडे पाठवावयाचा आहे आणि केंद्र शासन यासाठी मोठा निधी उपलब्ध करुन देणार आहे. नगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था या सेवा देणा-या संस्था आहेत आणि त्यामध्ये सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून तेथे काही महत्वाचे रिफॉमर्स् करुन घेणे आवश्यक आहे. आपण असे म्हणतो की, हे कॉम्प्युटरचे युग आहे आणि म्हणून ई-गव्हर्नन्सचा जास्तीतजास्त उपयोग नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून नगरविकास विभाग प्रयत्नशील आहे. एन. ए. करण्यासाठी अनेक कागदपत्रे लागतात आणि त्यासाठी बराच वेळही लागतो. यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीनेही नगरविकास विभाग प्रयत्न करीत आहे. आता 12 वा वित्त आयोग आला आहे. त्याच्या माध्यमातून मोठया प्रमाणात निधी मिळणार आहे. त्यातील 50 टक्के निधी सुंदर आणि स्वच्छ शहरे करण्यासाठी उपयोगी पडणार आहे. 12 व्या वित्त आयोगाकडून जो निधी मिळणार आहे, त्यातील 50 टक्के निधी घनकचरा व्यवस्थापन आणि बायो-मेडिकल वेस्टसाठी वापरावा लागणार आहे आणि तसे ते बंधनकारक असणार आहे. त्यामुळे आपली शहरे सुंदर आणि स्वच्छ होणार आहेत.

सभापती महोदय, नगरपालिकेत नेमणूक केलेला जो कर्मचारी असतो, त्याची नेमणूक केल्यापासून तो रिटायर होईपर्यंत कुठे बदली करता येत नाही. याचे कारण तेथे **सेवा वर्ग केडर** तयार केलेले नाही. त्यामुळे त्यांच्या कडून स्थानिक स्वराज्य संस्थेला परिणामकारकरित्या सेवा घेता येत नाही. म्हणून नगरविकास विभागाने आता केडरायझेनचे धोरण आणले आहे आणि त्याची आठ दिवसाच्या आत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून जे नोटीफीकेशन काढावयाचे आहे, ते काढले जाणार आहे. म्हणजे एखादा महसूल विभाग असेल, जसे औरंगाबाद, पुणे, नागपूर असे जे महसूली विभाग आहेत, तेथील नगरपालिकेच्या कर्मचा-यांची बदली करणे शक्य होणार आहे.

. . . .5 बी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असा एक चांगला धाडसी आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे आणि या देखील सर्वसामान्य माणसाला चांगला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : किती दिवसात करणार ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 8-10 दिवसात करणार. शहरातील गरीब माणसांसाठी नागरी विकास करताना सुवर्ण जयंती शहर रोजगार योजना अधिक परिणामकारक व्हावी यासाठी दारिद्रयरेषेखालील लोकांचा सर्व्हे करण्याचे राहीले होते. तर तो सर्व्हे करण्याच्या दृष्टीकोनातून सूचना दिल्या आहेत आणि त्याचा सर्व्हे सुरु झाला आहे. विधानसभेमध्ये मुंबईच्या सर्व लोकप्रतिनिधींनी अशी मागणी केली होती की, मुंबई शहरातील सेस इमारतींना सवलतीच्या दरात कर आकारणी व्हावी. ते मान्य करण्याच्या दृष्टीकोनातून आपण आजच हे बिल सभागृहामध्ये इंट्रोडयुस करीत आहोत. यामुळे सेस इमारतीत राहणा-या सर्व लोकांना प्रॉपर्टी टॅक्स देण्याच्या बाबतीत मोठया प्रमाणात निश्चित प्रकारे सवलत मिळणार आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. मुंबई शहरातील सुविधा या नगरविकास विभागाच्या अखत्यारित येतात आणि या मुंबई शहराला एक वर्ल्ड क्लास सिटी करण्याच्या दृष्टीकोनातून एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून असेल, जागतिक बँकेमार्फत मिळणा-या कर्जाच्या माध्यमातून असेल, केंद्र शासनाकडून मिळणा-या मदतीच्या माध्यमातून असेल, या शहराच्या विकासासाठी जवळजवळ 35 हजार कोटी रुपयांच्या वेगवेगळया योजना करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. मुंबईचे शांघाय करण्याची तुमची-आमची कल्पना आहे. यादृष्टीकोनातून महाराष्ट्र अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट असेल, मुंबई अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट असेल किंवा मेट्रो रेल्वेचा प्रोजेक्ट असेल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (पुढे चालू...

अनेक जलसेतू आहेत. जलसेतू करण्याच्या विषय असेल, स्लम रिहॅबिलिटेशन करण्याचा विषय, एस.आर.अे. योजनेचा विषयातील सगळया योजना राबविण्यात येत असल्याचे मी सांगितले. फर्स्ट क्लास सिटी करण्याच्या दृष्टीकोनातून नगरविकास विभागाचा जाणुनबूजून प्रयत्न चालू आहे . 2640 कोटी रुपयाचा नियतव्यय सन 2005-2006 मध्ये नगरविकास विभागासाठी ठेवलेला आहे. एवढ्या मोठ्याप्रमाणात नियतव्यय यापूर्वी कधी ठेवलेला नव्हता. . या ठिकाणी ज्या काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्याबद्दल सविस्तर बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु निश्चितपणे सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याच्या दृष्टीकोनातून नोंद घेऊन, त्याबाबतची कारवाई केली जाईल. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात, महसूल विभागाच्यासंदर्भाने काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले, त्याबाबत निश्चितप्रकारे नोंद घेतली जाईल. या तिन्ही विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

श्री.मधुकर चव्हाण : दलित वस्ती सुधारणेखाली 10 कोटी रुपयाची तरतूद आहे ती कोणत्या संस्थांना देणार आहात ?

श्री.राजेश टोपे : दलित वस्ती सुधारणा योजना ही जिल्हा पातळीवरील योजना आहे. डी.पी.डी.सी.च्या मान्यतेने दलित वस्ती सुधारणेसाठी खर्च होत असतो. दलित वस्ती सुधारणेमध्ये दलित वस्त्या सुधारणेच्या दृष्टीने पैसे वापरले जातात. त्यासाठी हा पैसा ठेवलेला आहे.

डॉ.एम.अे.अझिज : महसूल विभागाच्या संदर्भाने मंत्री महोदय उत्तर देत असतील तर मी वक्फ बोर्डाला अनुदान देण्याच्या संदर्भात मी बोललो होतो, त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

श्री.राजेश टोपे : आतापर्यन्त त्यासाठी निधी उपलब्ध करु दिला. त्याबाबत गाभीर्याने विचार केला जाईल.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : मंत्री महोदयांनी जे काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याबाबत विचार केला जाईल असे सांगितलेले आहे.

--

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे, सन्मानयनीय सदस्य श्री.वसंत पवार साहेब, यांनी गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांवर आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

विडी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाच्या संबंधाने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी सूचना केलेली आहे. विडी कामगारांच्या घराचा प्रश्न हा केंद्र आणि राज्य सरकारच्या कक्षेतील आहे. सोलापूर येथे विडी कामगारांच्या घरांची योजना सुरु केलेली आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.वसंत पवार साहेबांनी नाशिक येथील विडी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. त्यासंबंधातील प्रस्ताव आल्यानंतर विचार करण्यात येईल. त्यानंतर सन्माननीय सदस्य आदरणीय श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी दादर येथील राजगिरी पुनर्रचित इमारती मध्ये श्रीमती रमणी बोजा बंगेरा ही महिला अस्तित्वात नसतांना तिच्या नावे गाळा वितरित केला, या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला परंतु त्या महिलेच्याच नावाने म्हाडाने गाळा वितरित केलेला आहे,ही वस्तुस्थिती आहे.

त्यानंतर गृहनिर्माण विभागाच्या ज्या एकूण मागण्या आहेत त्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण,पशुसंवर्धन,दुग्धविकास,मत्स्यव्यवसाय,औकाफ, विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधी व न्याय विभाग, पशुसंवर्धन विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, शिक्षण आणि वफ्क या खात्याच्या पुरवणी मागण्यांच्या सदर्भात चर्चा करण्यात आली. विधी व न्याय विभागाच्या मागण्यांझच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.कवाडे साहेब, श्रीमती कांता नलावडे, शिक्षण खात्याचय मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.निकोसे, सन्माननीय सदय श्री.वसंत पवार, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, सन्माननीय सदस्या श्रीमती रायकरताई, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपले विचार मांडले.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ 20:10

श्री. हसन मुश्रीफ....

विधी व न्याय विभागाच्या संबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडेताईंनी महिलांसाठी विशेष न्यायालयाची गरज प्रतिपादन केलेली आहे. अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाण, बीड, जवळगाव, नागपूर आणि यवतमाळ या नऊ जिल्हयांमध्ये महिलांवर होणा-या अत्याचाराची प्रकरणे स्वतंत्रपणे निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालये आपण यापूर्वीच स्थापन केलेली आहेत. 1998 मध्ये ठाणे, पुणे आणि कोल्हापूर या तीन ठिकाणी न्यायालये स्थापन केली आहेत.आणि आता चंद्रपूर, सोलापूर, धुळे, वर्धा, नांदेड, जालना, परभणी, सातारा, सांगली या ठिकाणच्या विशेष न्यायालयाचे प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहेत. महिलांवर होणारे अत्याचार आणि त्याबाबतच्या केसेस लवकरात लवकर निकाली निघाव्यात यासाठी ही न्यायालये स्थापन करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. श्री. जोगेंद्र कवाडेसाहेब यांनी दलितावरील अत्याचाराचे खटले जलद निकाली काढण्यासाठी फास्टट्रॅक कोर्ट स्थापन करावे, अशी मागणी केलेली आहे. यापूर्वीच दिनांक 30 जानेवारी, 1990 रोजी अधिसूचना काढून जिल्हयामध्ये आणि वरील सगळया विभागामध्ये विशेष न्यायालय स्थापन करुन शासनाने हे खटले नगरदिवाणी, सत्र न्यायालय आणि विशेष न्यायालयाद्वारे लवकरात लवकर या खटल्यांची सुनावनी नियमितपणे घेऊन ते खटले निकाली काढण्यात येत आहेत. त्यामुळे ॲट्रॉसिटीचे खटले प्रलंबित राहणार नाहीत, हे मी श्री. जोगेंद्र कवाडेसाहेबांना सांगू इच्छितो. विशेषत: या सभागृहात अनेक शिक्षक प्रतिनिधी असल्यामुळे शिक्षण या विषयावर त्यांची मते अनेक निमित्ताने, या सभागृहात मांडली जातात व दिवसभर शिक्षण खात्यावर चर्चा होत असते. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोतेसाहेब असतील, श्रीमती संजीवनी रायकर असतील किंवा इतर शिक्षक प्रतिनिधी असतील त्यांनी या खात्यावर बोलण्याची गरज नव्हती. कारण दिवसभर आम्हाला त्यांचे प्रबोधन चालूच असते. सभापती महोदया, या शिक्षणाबाबत गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते. 10+ 2+ 3 ही शिक्षण पध्दती आपण अवलंबिलेली आहे. या पध्दतीतून आपण अनेक बेकारांचे अड्डे तयार केले की काय? अशी शंका यावी, अशा प्रकारची ही शिक्षण पध्दती झालेली आहे. चीन राष्ट्राची लोकसंख्या दहा वर्षापूर्वीच 100 कोटीच्या वर गेलेली आहे.सध्या चीनची लोकसंख्या 140 कोटी आहे. त्या राष्ट्रातील गरीब लोकांना कधी ब्रेड खायला मिळायचा नाही. परंतु ते राष्ट्र आता पुढे आलेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ.....

प्राथमिक शिक्षणाला त्यांनी महत्व दिले. प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. आणि ते राष्ट्र खूप पुढे गेले. त्यांनी अशी शिक्षण पध्दती राबविली की, शिक्षण घेऊन तरुण मुलगा बाहेर पडला की, त्याला नोकरी तरी लागेल किंवा त्याला स्वत:चा व्यवसाय काढता येईल. म्हणून व्यवसायाला चालना देणारी शिक्षण पध्दती अंमलात आणणे आणि बेकारी नष्ट करणे गरजेचे आहे. श्री. रामनाथ मोते आणि श्रीमती संजीवनी रायकर व इतर अनेक जे शिक्षक सदस्य आहेत त्या सर्वांच्या शिक्षणाच्या बाबतीत ज्या मागण्या आहेत त्या मागण्यांना सातत्याने शासनाचा पाठिंबा राहिला आहे. शासनाने सातत्याने सांगितलेले आहे की, आपण ज्या मागण्या सातत्याने मांडलेल्या आहेत, मूल्यांकन झालेल्या शाळांना अनुदान देण्याचा प्रश्न असेल, वेतनश्रेणीचा प्रश्न असेल, निवडश्रेणीचा प्रश्न असेल त्या सगळया प्रश्नांना जास्तीत जास्त न्याय देणे हे शासनाचे कर्तव्य आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. साडेनऊ हजार कोटी रुपये शासन त्यावर खर्च करीत आहे.वयोगट दोन ते चौदा वर्षे वयाच्या मुलांची शिक्षणाची सगळी जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. साडेतीन लाख प्राथमिक शिक्षक आहेत. अडीच लाख माध्यमिक शिक्षक आहेत. तरी सुध्दा इयत्ता दुसरी ते सातवीपर्यंतच्या 8 लाख 31 हाजर 75 मुलांना लिहिता आणि वाचता येत नाही, ही आपल्यासारख्या महाराष्ट्र राज्याला भूषणावह गोष्ट नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ.....

परंतु शिक्षणाच्या दर्जाच्या बाबतीत चर्चा होणार आहे की नाही ? केवळ आपण पगार आणि वेतनश्रेणी यामध्येच गुंतून पडणार आहोत काय ? शिक्षणाच्या दर्जाच्या संदर्भात सभागृहामध्ये दिवसभर स्वतंत्रपणे चर्चा व्हावयास पाहिजे. मला एका गोष्टीचा अभिमान आहे की, प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याऱ्या राजर्श्री शाहू महाराजांच्या जिल्हयातून मी आलेलो आहे. 1918 साली शाहू महाराज यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले होते. तेथील मी मुलगा आहे. स्वत:च्या बजेटमधील 6 टक्के रक्कम ते यासाठी द्यावयाचे. श्री. गोपाळकृष्ण गोखले हे इंग्रजांच्या काळामध्ये त्यावेळच्या पार्लमेंटचे सदस्य होते आणि त्यांनी सक्तीच्या व मोफत शिक्षणाची मागणी केली होती. त्यांच्या कागल या गावचा मी आहे. त्यामुळे मला प्राथमिक शिक्षणाबद्दल फार तळमळ आहे. प्राथमिक शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. ही भांडवली गुंतवणूक आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांना सांगू इच्छितो की, शिक्षणाबद्दल आमच्या भावना फार संवेदनशील आहेत. तुमच्या ज्या छोटया छोटया मागण्या असतील त्याचा विचार करु. मच्छिमारांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी एकच कॉमन विषय मांडलेला आहे...

श्रीमती कांता नलावडे : शिरवळ येथील शाळेच्या बाबतीत मी विचारले होते.

श्री. हसन मुश्रीफ : तुमचे जे छोटे छोटे प्रश्न असतील ते संपवून टाकू.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : तुमच्या सगळया मागण्या मान्य झालेल्या आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्या श्रीमती कांताताई नलावडे यांना सांगू इच्छितो की, आपण बैठक घेऊन विषय संपवून टाकू. सभापती महोदया, मच्छिमारांच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे आपण कापसासाठी तीन चार हजार कोटी रुपये देतो, ऊसासाठी पॅकेज देतो. आंब्याचे नुकसान झाले तर त्यासाठी सुध्दा मदत देतो. मच्छिमारांसाठी आपण दरवर्षी डिझेलच्या विक्रीकराच्या संदर्भात 150 कोटीची सवलत देत होतो. परंतु व्हॅटमुळे अडचण निर्माण झाली. आमच्या मत्स्यविकास खात्याचा 150 कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव आहे परंतु व्हॅटमुळे थोडीशी अडचण आलेली आहे. ही सवलत देण्यासाठी मत्य विकास विभाग सातत्याने प्रयत्नशील राहील हे मी सांगू इच्छितो. अशीच सवलत मिळण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. म्हणून या सर्व विभागांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

----

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ.शी./मु.शी.**: पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. काल आपल्या सभागृहामध्ये आम्ही सलमान खानच्या प्रकरणाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली होती. काल माननीय सभापतीनी असे निदेश दिले होते की, विधानसभेमध्ये यासंबंधीचे जे निवेदन केले जाईल ते निवेदन या सभागृहामध्ये करण्यात यावे. आता आपल्या सभागृहाचे आजचे कामकाज संपावयास आलेले आहे. माझी अशी माहिती आहे की, विधानसभेमध्ये यासंबंधीचे निवेदन झालेले आहे. यासंबंधीचे निवेदन या सभागृहामध्ये होणार आहे की नाही ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : यासंबंधी उद्या निवेदन करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, काल माननीय सभापतींनी आदेश दिलेले आहेत. या सभागृहामध्ये निवेदन करावयास पाहिजे. माननीय सभापतींनी दिलेले निदेश शासन पाळत नाही काय ?

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शासन हा विषय एवढया लाईटली का घेत आहे ?

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला हा विषय समजलेला आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील विधानसभेमध्ये आहेत. आपण मागण्यांवरील चर्चा चालू ठेवावी. तोपर्यन्त मी माननीय उपमुख्यमंत्री यांना बोलवून घेतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा. ( चर्चा पुढे सुरु )

श्री.बाबा सिध्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदया, कामगार विभागाशी संबंधित मागणी क्रमांक 168 सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेली आहे. सभागृहाने ही मागणी मंजूर करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी एकविरा देवीच्या तीर्थक्षेत्रासाठी निधी द्यावा असा मुद्दा मांडला होता. ही बाब जरुर तपासून पाहून त्यासाठी तरतूद करण्याचा प्रयत्न केला जाईल. मा.सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी निवडणुकीपूर्वी झाली पाहिजे असा मुद्दा उपस्थित केला. विभागामार्फत यासंबंधी चौकशी करुन निवडणूक आयोगाकडे त्याप्रमाणे प्रस्ताव पाठविण्यात येईल. मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी यशवंत ग्रामसमृध्दी योजनेवर गेल्या वर्षी किती खर्च झाला आणि तीर्थक्षेत्र विकासाच्या किती योजना घेण्यात आल्या आहेत असे दोन मुद्दे मांडले होते. शासनाने एकूण 130 तीर्थक्षेत्र विकासाच्या योजना घेतलेल्या आहेत. मागील वर्षी यासाठी 350 कोटीची तरतूद केली होती, यावर्षी मात्र 130 कोटीची तरतूद केली आहे. यापैकी 30 कोटी रुपये मिळाले असून 100 कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. ग्रामविकास विभागाच्या सन 2005-06 सालाच्या पूरक मागण्या सभागृहाने एकमताने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के ( बंदरे राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील तांबडणे, मालवण, तळाशील व देवबाग येथील बंधा-याची धूप होत असल्याचे म्हटले होते. ही धूप त्सुनामी लाटांचा परिणाम म्हणून झालेली आहे. डीपीडीसीच्या माध्यमातून या कामासाठी फंड उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मा.सदस्य श्री.जयंत पाटील यांनी अतिशय मौलिक सूचना केल्या आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील जल वाहतुकीसाठी व महाराष्ट्र जल वाहतुकीसाठी विभागाकडून भरीव मदत करण्यात यावी असे म्हटले होते. याबाबत शासन विचार करील. बंदरे विभागाच्या मागण्या सादर करण्यात आल्या आहेत त्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो माझे दोन शब्द संपवितो.

----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा अत्राम ( सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदया, सामाजिक न्याय विभागाच्या मागणी क्रमांक 197 व 198 सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि येथे थांबतो.

------

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदया, गृह विभागाच्या पूरक मागण्या मंजूर करण्याच्या संदर्भात सभागृहात चर्चा होत असताना मा.विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, मा.सदस्य श्री.जयंत पाटील, मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, मा.सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, मा.सदस्य श्री.विनोद तावडे, मा.सदस्य कर्नल सुधीर सावंत, मा.सदस्या डॉ.नीलमताई गो-हे, मा.सदस्य श्री.रमेश निकोसे, मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण, मा.सदस्य श्री.नतिकोद्दिन खतिब, मा.सदस्य डॉ.वसंत पवार, मा.सदस्य श्री.अनंत तरे, मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, मा.सदस्या श्रीमती कांताताई नलावडे, मा.सदस्य डॉ.एम.ए.अझिज, मा.सदस्य डॉ.दीपक सावंत, मा.सदस्या श्रीमती संजीवनी रायकर, मा.सदस्य श्री.विलास अवचट, आणि शेवटचे एकोणिसावे मा.सदस्य श्री.रामनाथ मोते या सर्व सन्माननीय सदस्यांनी गृह खात्यासंबंधीच्या चर्चेत भाग घेतला. पोलीस दलामध्ये काय काय सुधारणा केल्या पाहिजेत ते त्यांनी सांगितले आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 20:25

(श्री. सिध्दाराम म्हेत्रे पुढे सुरु...)

तसेच या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती चांगली रहावी यादृष्टीने मा.सदस्यांनी आपले विचार मांडून शासनाला मार्गदर्शन केलेले आहे. त्यांनी केलेल्या मागदर्शनाचा उपयोग गृहविभागाच्या पुढच्या ज्या योजना कार्यान्वीत करावयाच्या आहेत त्यामध्ये निश्चितपणे केला जाईल. त्यांनी मांडलेल्या विचारांना अग्रभागी ठेवून पुढील योजनांच्या बाबतीत कारवाई केली जाईल. गृहविभागाच्या 153.20 कोटीच्या पुरवणी मागण्या आहेत. 1960च्या निकषानुसार पोलीस विभागामध्ये 11 हजार 21 पदे निर्माण करण्यात येणार आहेत. 2003चे निकष आणि श्रॉफ समितीच्या शिफारशी स्वीकारल्या तर या पोलीस विभागामध्ये एकूण 90368 पदे निर्माण करावी लागतील. परंतु श्रॉफ समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या नाहीत. त्यामुळे 1960च्या निकषाप्रमाणे 11 हजार 21 पदे भरण्यात येणार आहेत. आज जी परिस्थिती आहे तशी परिस्थिती 1960 सालामध्ये नव्हती. आता राजकीय लोकांना संरक्षण द्यावे लागते, धार्मिक स्थळांचे संरक्षण करावे लागते, वाहतुकीच्या समस्या असतात, अशी विविध प्रकारची कामे पोलिसांना करावी लागतात. आता पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण असून त्यांना 16 ते 18 तास ड्युटी करावी लागते. आता ही 11 हजार 21 पदे भरल्यानंतर पोलिसांवरील कामाचा ताण थोडा हलका होण्यास मदत होईल. त्यांना जी 16 ते 18 तासांची ड्युटी करावी लागते त्यामध्ये निदान 4-5तास कमी होऊन त्यांना रिलिफ मिळेल. लातूर जिल्ह्यातील बाभळगाव याठिकाणी आरपीटीएसची प्रशिक्षण शाळा सुरु करण्यात येणार आहे. त्यामध्येही 164 पदे निर्माण होणार आहेत. नवीन पोलीस स्टेशनचीही मागणी आहे. अंबेजोगाई येथे अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय सुरु करण्यात येणार आहे. अंबेजोगाई (ग्रामीण), सावरने व ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील टेकावडे अशा तीन ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यात येणार आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा गावामध्ये भारत राखीव बटालीयनची स्थापना करण्यात येणार आहे. या बटालीयनच्या स्थापनेचा खर्च केन्द्र सरकार करणार असून ती चालविण्याचा खर्च राज्य शासन करणार आहे. त्यासाठी 6 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याठिकाणी 1007 पदांची निर्मिती केलेली आहे. पोलीस निवास व बिगर निवासी कार्यालये यांची बांधकामे पूर्ण करण्यासाठी 40 कोटीची तरतूद केलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सिध्दाराम म्हेत्रे...)

पोलिसांच्या जुन्या वसाहती तीन वर्षात दुरुस्त करण्यात येणार असून त्यासाठी 126 कोटीचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. तुरुंगातील कैद्यांना मिळणा-या आहार भत्त्यामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. पूर्वी 15.65 रु. भत्ता मिळत होता. त्यामध्ये 4.50 रु.वाढ करुन 21.05 रु. असा आहार भत्ता कैद्यांना देण्यात येणार आहे. वित्त आयोग आणि केन्द्र शासन यांच्या योजनांमार्फत पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. 36 कोटीचा कार्यक्रम केन्द्राने मंजूर केला असून 18 कोटी रु. केन्द्राने उपलब्ध करुन दिले आहेत. त्यातील 16.90 कोटी रु. खर्च झालेले आहेत व 1.26 कोटी रु. शिल्लक आहेत. या 1.26 कोटी मधून नक्षलग्रस्त भागामध्ये रात्रीच्या वेळी वापरावयाच्या गॉगल दुर्बीणसाठी 70 लाख रु. आणि मुंबईतील पोलिसांसाठी पिस्तोल घेण्यासाठी 36 लाख रु. आणि ग्रामीण भागातील पोलिसांसाठी 24.5 लाख रु. खर्च करण्यात येणार आहेत. दरवर्षी केन्द्राकडे 184.20 कोटीचा कार्यक्रम पाठवावा असे केन्द्राचे डायरेक्टीव्हज् आहेत. दरवर्षी 110 ते 120 कोटीच्या कार्यक्रमाला मंजुरी मिळते. आतापर्यन्त 654 कोटी रु. या योजनेतून खर्च झ ालेले आहेत. केन्द्राने 2005-06 या वर्षाकरिता ही योजना चालू ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.या योजनेंतर्गत शासनाने 184 कोटीचा प्रस्ताव तयार करुन तो केन्द्राकडे पाठविलेला आहे.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ 20:30

श्री.सिध्दाराम म्हेत्रे...

तो 184 कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे. सभापती महोदय, मी पोलीस कल्याण योजनेच्या बाबतीत माहिती सांगू इच्छितो. प्रत्येक पोलीसाकडून दरमहा 40 रुपये मेडीकल उपचारासाठी घेण्यात येत असतात. पोलिसांना काही मोठा आजार झाला तर त्यास लागलीच उपचार घेता यावा म्हणून या योजनेतून पोलिसांना मदत देता यावी म्हणून ही योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यास माननीय मंत्री महोदय उत्तर देत नाही. नको ती माहिती या ठिकाणी देत आहे. घाटकोपरच्या बॉम्बस्फोटातील आरोपी निर्दोष सुटले त्या केसच्या बाबतची सद्य:स्थिती काय आहे याबाबतची काहीही माहिती माननीय गृह राज्यमंत्र्यांकडून दिली जात नाही. इतर सन्माननीय सदस्यांनी देखील काही प्रश्न उपस्थित केले आहेत त्याबाबतीत देखील माहिती दिली जात नाही. स्पेंसिफीक प्रश्नांची माहिती दिली गेली पाहिजे यासंबंधी कृपया आपण माननीय मंत्री महोदयांना आदेश द्यावेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, ज्या पुरवण्या मागण्या सभागृहासमोर मांडल्या गेल्या आहेत त्याबाबतची माहिती देत आहे. या पुरवण्या मागण्या कशासाठी मांडण्यात आल्या आहेत याची माहिती या सदनाला तसेच जनतेला कळावी म्हणून ते सविस्तर माहिती सदनाला सांगत आहेत. केवळ उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देणे म्हणजे ही काही चर्चा नाही. या पुरवण्या मागण्या आहेत आणि त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय सभागृहाला माहिती सांगत आहेत. उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील दिली जातील. परंतु प्रथम सरकारची बाजू या ठिकाणी ऐकून घेतली पाहिजे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी हे शासन आल्यापासून दरोडे,खून,बलात्कारांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे असे सांगितले व त्यासंबंधीची आकडेवारी या ठिकाणी दिली. याबाबतीत मी खुलासा करतो की, त्यांनी जी आकडेवारी दिली आहे ती वस्तुस्थितीला धरुन नाही. माझ्याकडे लेटेस्ट आकडेवारी उपलब्ध आहे ती मी या ठिकाणी सादर करतो. 1995 पासून...

श्री. पांडुरंग फुंडकर : या ठिकाणी 50 वर्षापूर्वीची आकडेवारी कशाला सांगत बसता.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : युतीची सत्ता होती त्यावेळेस गुन्हयांचे प्रमाण काय होते व आता गुन्हयांचे प्रमाण किती आहे याची तुलना करावी लागेल. त्या शिवाय गुन्हयांचे टक्केवारीचे प्रमाण कळणार नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 1995 या वर्षी एकूण 40 हजार 289 गुन्हयांची नोंद झाली होती. 2004 या वर्षी 29 हजार 93 एवढी गुन्हयांची नोंद झालेली आहे. म्हणजे जवळपास 11 हजाराने गुन्हयांची संख्या कमी झालेली आहे. लोकसंख्येत वाढ झालेली असताना देखील गुन्हयांच्या संख्या कमी झालेली आहे. 1995 या वर्षी 210 बलात्काराच्या गुन्हयांची नोंद झालेली आहे. 2004 या वर्षी बलात्काराच्या गुन्हयांची नोंद 186 एवढी झालेली आहे. या बाबतीत देखील प्रमाण कमी इ ाालेले आपल्याला दिसून येईल.

श्री. आर.आर.पाटील : युतीच्या काळात शासनावर विश्वास नव्हता म्हणून अशा गुन्हयांची नोंद होत नव्हती. आता शासनावर लोकांचा विश्वास बसलेला असल्यामुळे गुन्हयांची नोंद पोलीस स्टेशनमध्ये होत आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, राज्यातील प्रत्येक जिल्हयात अत्याधुनिक प्रयोग शाळा निर्माण झाल्या पाहिजेत अशी या ठिकाणी मागणी केली गेली. या ठिकाणी श्री. मोरे यांच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला गेला. मुंबई शहरात अत्याधुनिक अशी प्रयोगशाळा नसल्यामुळे आरोपी श्री. मोरे यांचे रक्ताचे नमुने कलकत्ता येथील प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. कलकत्ता येथे अतिशय अत्याधुनिक प्रयोगशाळा आहे. श्री. मोरे यांच्या प्रकरणी काही त्रुटी राहू नये, त्या त्रुटींचा त्यास फायदा होऊ नये म्हणून काळजी घेण्यात येऊन त्याच्या रक्ताचे नमुने कलकत्ता येथील अत्याधुनिक प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे..

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 20:35

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.मंत्रीमहोदयांनी जी माहिती दिली त्यातून अतिशय गंभीर गोष्ट निर्माण होईल. मुंबईमध्ये तपासाच्या सुविधा पूर्ण नव्हत्या म्हणून कलकत्ता येथील लॅबोरेटरीमध्ये नमुने तपासासाठी पाठविले. मोरेचे प्रकरण सर्वदूर गाजले म्हणून आपण तपासासाठी कलकत्ता येथे पाठविले.अशा बलात्काराच्या सगळया केसेस कलकत्ता येथे पाठविल्या काय ? परंतु ज्या केसेस कलकत्ता येथे पाठविल्या नाहीत अशा अनेक केसेसमध्ये तपासात त्रुटी राहिल्यामुळे आरोपी सुटले. सुनील मोरेचे प्रकरण गाजले त्यामुळे शासनाने ते प्रतिष्ठेचे केले ही चांगली गोष्ट आहे. परंतु या अगोदर बलात्काराच्या केसेसमध्ये पुरावे गोळा करताना मुंबईच्या लॅबमधील व्यवस्था अपुरी असल्यामुळे आरोपी निर्दोष सुटण्याची शक्यता होती. मुंबईच्या लॅबमध्ये तपासासाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता का केली नाही ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय,म्हणूनच कलकत्ता येथे सुसज्ज प्रयोगशाळा आहे.तशीच महाराष्ट्रात सुध्दा सुसज्ज प्रयोगशाळा निर्माण व्हावी म्हणून आधुनिकीकरणाच्या योजनेमध्ये पैसे मंजूर केलेले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, नाशिक येथील प्रयोगशाळेसाठी पैसे मंजूर केलेले आहेत. मुंबई येथील प्रयोगशाळेसाठी ही मागणी करण्यात आलेली नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,कलकत्ता येथे पाठवितो त्याप्रमाणे नाशिकला नमुने पाठविता येतील. बालकामगारांसंबंधी याठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला. बालकामगारांची मुक्तता करण्याबाबत केलेली घोषणा प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील. बालकामगारांच्या बाबतीत समस्या निवारणासाठी कामगार विभाग,गृह विभाग आणि महिला व बालकल्याण विभाग यांची एकत्रित बैठक घेतली जाईल आणि त्यामध्ये निर्णय घेतला जाईल. मांढरादेवी येथील दुर्घटनेबाबत उल्लेख करण्यात आला. डॉ.नीलम गो-हे आणि श्री. अनंत तरे यांनी मुद्दा उपस्थित केला की, या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी न्या.कोचर यांची नेमणूक करण्यात आली आहे त्यासाठी 20 लाख रुपयांची तरतूद कशासाठी ? आपला देश हा उत्सवप्रिय देश आहे.देशामध्ये दर 15-20 दिवसांनी याठिकाणी कोणते ना कोणते तरी सण साजरे होत असतात. मांढरादेवी येथे जो प्रकार घडला तो पुढे घडू नये यासाठी....

**उपसभापती** : मा.मंत्रीमहोदयांना मी सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे सदस्य बोलत असताना पृष्ठ क्रमांक आणि बाब क्रमांक याचा उल्लेख करावा अशा सूचना देतो त्याप्रमाणेच आपले उत्तर सुध्दा लिमिटेड ठेवा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे यांनी प्रश्न विचारला होता की,मध्यवर्ती कारागृह आर्थर रोडमध्ये शौचालयासाठी किती तरतूद करण्यात आली आहे ? राज्यात एकूण 1200 शौचालयाकरिता 3 कोटी 96 लाखांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये मुंबई आथर्ररोड कारागृहातील शौचालयासाठी 1 कोटी 9 लाख 37 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. भायखळा जिल्हा कारागृहामध्ये एकूण 54 स्वच्छतागृहे आहेत त्यासाठी 21 लाख 16 हजार 530 रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मा.सदस्य श्री. सुधीर सावंत यांनी सूचना केल्याप्रमाणे या विंगमध्ये तज्ञ अधिका-यांची पदेनिर्माण करण्यात येणार आहेत. सायबर गुन्हे रोखण्यासाठी याची मदत होणार आहे. 11 हजार पदांमध्ये याचा समावेश करण्यात आलेला आहे. मी विनंती करतो की,गृह विभागाच्या मागण्या सदनाने मंजूर कराव्यात.

**उपसभापती** : मा.गृहमंत्र्यांनी काही दिवसापूर्वी 11 हजार पोलिसांची नव्याने भरती शासन करणार आहे असे सांगितले होते. आम्ही ते पेपरमध्ये वाचले होते. यापूर्वी ओपन कॅटॅगरीतील उमेदवारांसाठी वयाची 28 वर्षाची अट शिथिल करण्यात येणार होती. यावेळी पोलीस भरती झाली. वयाची अट शिथिल करण्याच्या संदर्भात जीआर न निघाल्यामुळे पात्र असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती झाल्या परंतु वयाची अट शिथिल करण्याचा जीआर न निघाल्यामुळे पात्र असलेले उमेदवार देखील परत पाठविण्यात आले. आता ज्यावेळी नव्याने पोलीस भरती करण्यात येईल त्यावेळी झालेला अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने शासन यामध्ये सुधारणा करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, शरियतच्या नुसारच बलात्काराच्या गुन्हयामध्ये सास-याने बलात्कार केला असेल तरी तो माफ करावा याचे समर्थन उघडपणे केले जात आहे. काल सहारा वाहिनीवर दाखविले की मुंबईमध्ये अशा बैठका झाल्या. मा उपमुख्यमंत्री सभागृहात नसताना मी असा मुद्दा मांडला होता . स्वत:हून दखल घेतली नाही तर अनेक केसेसमध्ये महिलांवर दबाव आणायला सुरुवात झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. डॉ.नीलम गो-हे...

म्हणून मला आपल्याला अशी विनंती आहे की, आपण आतंकवादी विरोधी पथक तयार केलेले आहे .त्या अन्वये अशा गुन्हयाच्या बाबतीत कायदा न मानता शरियतचा कायदा मानणार असे जे म्हणतात अशा लोकांना या पथकाच्या मार्फत समज देण्यात यावी. व त्यासबंधी कार्यक्रम हाती घेण्यात यावा अन्यथा सगळीकडे हा कायदा धाब्यावर बसविण्याच्या बाबतीत संबंधितांना समर्थन देण्यास सुरुवात झालेली आहे. तर अशा लोकांच्या विरुध्द माननीय उपमुख्यमंत्र्यांनी कारवाई केल्यास बरे होईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बलात्काराच्या केस संबंधी इंडियन पीनल कोड मधील कलमांचाच वापर केला जाईल आणि त्याच तरतुदी लागू होतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी :सलमान खानने ऐश्वर्या रावला फोनवरुन दिलेल्या धमक्या

मु.शी: :सलमान खानने ऐश्वर्या रावला फोनवरुन दिलेल्या धमक्या बाबत श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सदस्यानी यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.पांडुरंग फुंडकर: सभापती महोदय, काल आम्ही एक नियम 93 ची सूचना दिली होती आणि त्या सूचनेवर खालच्या सभागृहात जसे निवेदन होईल तसे वरच्या सभागृहात उद्या निवेदन करावे असे माननीय सभापतींनी आदेश दिले होते. तेव्हा त्याप्रमाणे आता निवेदन करण्यात यावे.

**उपसभापती** :या बाबतीत आज निवेदन करण्यात यावे असे माननीय सभापतींनी निर्देश दिले होते.

श्री.आर.आर.पाटील : हे निवेदन सदस्यांना वितरित करण्यात आलेले नाही परंतु तरीही निवेदन करण्यास आपण सांगितले तर विधान सभेत केलेले निवेदन तयार असून आम्ही ते करु शकतो. हे निवेदन सन्माननीय सदस्यांना वितरित केलेले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : निवेदन करण्यात यावे.

श्री.आर.आर.पाटील : हे निवेदन आता करण्यात येईल.

श्री.सिध्दराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) :सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी "सलमान खान याने एश्वर्या राय हिला फोनवरुन दिलेल्या धमक्या " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन करीत आहे.

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

अस्धारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

...... 5जे 3 ...

( गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी आता आम्हाला या निवेदनाची जी प्रत दिली आहे त्यावर सूचना देणाऱ्या सदस्यांची नावे पाहिल्यास तेथे श्री.गोपीनाथ मुंडे, श्री. राज पुरोहित, श्री.प्रकाश मेहता वगैरे विधान सभा सदस्यांची नावे आहेत की ज्यांचा या सभागृहाशी काहीही संबंध नाही. ...

**उपसभापती** : आपण निवेदनाची मागणी केल्यानंतर माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आधीच उठून सांगितले होते की, आपल्याला आजच निवेदन पाहिजे असल्यास मी ते निवेदन करण्यास तयार आहे. परंतु या सभागृहाच्या सदस्यांना निवेदनाच्या प्रती वितरित केलेल्या नाहीत. मात्र विधानसभेमध्ये आज जे निवेदन केलेले आहे तेच येथे सदस्यांना पाहिजे असल्यास, ते निवेदन करण्याची आमची तयारी आहे. त्यावेळेस आपणच त्यांना तसे निवेदन करण्यास सांगितले होते. त्यामुळे त्यांनी आहे त्या निवेदनाच्या प्रती आपल्याला दिल्या आहेत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये आज जे निवेदन आम्ही केले आहे तेच मी येथे केलेले आहे आणि त्याच्या प्रती सदस्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. पण तरीही मी उद्या या सदनाच्या सदस्यांची नावे असलेले निवेदन आपल्यासाठी आजच्या तारखेने वितरित करीन.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा. (चर्चा पुढे चालू..)**

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राज शिष्टाचार राज्यमंत्री): सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी माझ्या विभागासंबंधात जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या संबंधात मी काही खुलासा करू इच्छितो. सभापती महोदय, राजशिष्टाचार विभागाच्या बाब क्रमांक 5 च्या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट आणि सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले होते. विख्यात अभ्यागतांसाठी वाहन खरेदी संबंधात त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या डिग्निटरी व्हेईकल्स ज्या असतात त्या माननीय राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, न्यायाधीश, राज्यपाल अशा मान्यवरांसाठी वापरल्या जातात. साधारणत: 10 वर्षे किंवा 1 लाख कि.मी. चालविल्यानंतर या गाड्या बदलाव्यात असे शासनाचे धोरण आहे आणि त्याप्रमाणे आपण या गाड्या बदलत आहोत.

त्यानंतर सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 188 आणि 204 संबंधात सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक धोरण असावे अशी सूचना केली होती. तर मी या संदर्भात आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेसाठी अशी एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे आणि हा प्रस्ताव सध्या विचाराधीन आहे आणि लौकरच त्यावर कार्यवाही केली जाईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर एखादी सिरिअल काढण्याबाबतचा मुद्दा येथे मांडला होता. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, जे मान्यवर आहेत, जे आपले राष्ट्रीय नेते आहेत त्यांच्यावर जे पिक्चर केले जातात त्यासाठी साधारणपणे 50 लाखापर्यंत अनुदान देण्याची तरतूद आपल्याकडे आहे.

त्यानंतर सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाब क्रमांक 47, 48, 49 व 50 या बाबतीत बोलताना सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी विचारले होते की, 10 कोटी रुपये नेमके कशासाठी द्यायचे आहेत ? मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, ड्रीप इरिगेशनसाठीची जी पेंडिंग सबसिडी आहे त्यासाठी हे पैसे दिले जाणार होते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कृषी आणि पणन विभागा कडून जे परदेशी दौरे होतात त्यामध्ये कृषी विद्यापीठाच्या लोकांना देखील बरोबर न्यावे अशी सूचना केली. त्यांच्या या सुचनेचे जरूर पालन केले जाईल.

..... 5के 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील ....

सभापती महोदय, त्यानंतर जलसंधारण विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य मेजर सावंत आणि डॉ.वसंत पवार यांनी काही सूचना येथे केलेल्या आहेत. त्यावर निश्चितपणे विचार करून निर्णय घेतला जाईल असे मला सांगावयाचे आहे. परंतु उद्योगाच्या बाबतीत बाब क्रमांक 172 च्या संदर्भात कोणी काही सूचना केल्या नाहीत. पण उद्योगांच्या बाबतीत आवर्जून मला येथे सांगावयाचे होते की, माननीय मुख्यमंत्री काही दिवसांपूर्वी अमेरिकेला गेले होते. तेथे याच अनुषंगाने 2-3 करार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये एक हिस्टोस्टेम या कोरियन कंपनी बरोबर करार करण्यात आलेला असून कॉर्ड ब्लडची बँक बनविण्याचा आणि स्टेम सेल्स संबंधात रिसर्च करण्याचा हा अतिशय महत्वाकांक्षी आणि मोठा प्रकल्प आपल्याकडे सुरू होणार आहे. तसेच रिअल इस्टेट आणि गृहनिर्माणाच्या बाबतीत देखील दोन-तीन मोठे करार, एमओयूज करण्यात आले आहेत. शिवाय मायक्रोसॉफ्टने मराठीमध्ये म्हणजे भारतीय भाषेमध्ये पहिल्यांदाच एमएस ऑफिस हे सॉफ्टवेअर केलेले आहे त्यामुळे आता मराठीमध्ये आपल्याला एमएस आफिस आता आपल्याला मराठीमध्ये पहिल्या प्रथमच उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे एव्हिएशनच्या बाबतीत बोईंग कंपनीनेदेखील आपल्याकडे एअरक्राफ्ट मेंटेनन्स आणि पायलटच्या प्रशिक्षणासाठी नाशिक किंवा नागपूरला येण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. थीम पॉवरच्या बाबतीतसुद्धा एक एमओयू साईन करण्यात आलेला आहे. तेव्हा सभापती महोदय, या प्रमाणे खुलासा केल्यानंतर मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो की, उद्योग, कृषी, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, जलसंधारण व खार जमीन विकास या विभागांच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

****

( यानंतर श्री.जागडे ....5एल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यावर माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, श्री. जोगेंद्र कवाडे, श्रीमती नीलम गो-हे, श्री. रमेश निकोसे, श्रीमती कांता नलावडे यांनी आपले विचार मांडीत असताना चांगल्या सूचना केल्या आहेत.

सभापती महोदय, बाब क्र. 199 वर बोलत असताना माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी असे सांगितले की, आदिवासी विद्यार्थ्यांच्या हॉस्टेलमध्ये स्वच्छता गृहे असावे. त्या ठिकाणी कंपाऊंड वॉल असावी. सभापती महोदय, महाराष्ट्रात एक लाखापेक्षा जास्त विद्यार्थी आज हॉस्टेलमध्ये राहत आहेत. त्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी, त्यांना चांगलया प्रकारचे शिक्षण मिळावे, यासाठी समाजकल्याण विभाग तसेच सामाजिक न्याय विभाग सतत प्रयत्नशील आहे. माननीय सदस्यांनी या बाबत ज्या ज्या सूचना केल्या आहेत, त्याचा शासन निश्चितपणे विचार करील.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि श्री. जोगेंद्र कवाडे यांनी मागासवर्गीयांच्या घरबांधणीबाबतचा विचार मांडला आहे. त्यांच्या विचारांशी मी सहमत आहे. ग्रामीण आणि शहरी विभागात मागासवर्गीयांना स्वस्त आणि चांगल्या प्रकारची घरे उपलब्ध करुन देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने 30 कोटी रुपयाची तरतूद केली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी सैन्य भरती बाबत तसेच पोलीस भरती बाबत मागासवर्गीयांची भरती होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे, असे विचार मांडले आहेत. मागासर्गीय, आदिवासी, भटक्या आणि विमुक्त जातीचा उमेदवार सैन्य भरतीसाठी तसेच पोलीस भरतीसाठी शारीरिक दृष्ट्या सक्षम असतो. परंतु काही टेक्नीकल बाबींसाठी तो मागे राहतो. त्यामुळे मागासवर्गीय, आदिवासी, भटक्या आणि विमुक्त जातीच्या उमेदवारांना संधी मिळत नाही. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून सैन्य भरती आणि पोलीस भरतीच्या वेळी मागासवर्गीय उमेदवारांना प्रशिक्षण देण्याची योजना राबवित आहोत. त्यासाठी 10 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांनी मातंग समाजाच्या उन्नतीचा विषय या ठिकाणी मांडला आहे. मातंग समाजाच्या उन्नतीसाठी लघुजी साळवे अभ्यास आयोगाची निर्मिती करण्यात आली होती. या आयोगाला डिसेंबर महिन्यांपर्यन्त मुदतवाढ दिली आहे. या आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक आणि त्यांच्या बरोबर असलेल्या कर्मचा-यांच्या वेतनासाठी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे......

तसेच इतर खर्चासाठी 9 लाख 46 हजार रुपयाची तरतूद केली आहे. आता हा अभ्यासगट या बाबतचा सखोल अभ्यास करुन त्या बाबत अहवाल शासनाला सादर करेल.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी नांदेडचे समाजकल्याण समाजकल्याण अधिकारी श्री. शेंदोरकर यांच्या बाबतची तक्रार केली आहे. श्री. शेंदोरकर यांची पूर्ण चौकशी करुन योग्य ती कारवाई करु, असे या पूर्वी सांगितले होते. त्याप्रमाणे याबाबत काय करता येईल ते मी पाहतो. माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी तसेच त्यांच्या उन्नतीसाठी सामाजिक न्याय विभागाने गेल्या सात ते आठ महिन्यात चांगले निर्णय घेतले आहे. तसेच त्या निर्णयाची अंमलबजावणी देखील केली आहे. म्हणून मी मा. सदस्यांना विनंती करतो सामाजिक न्याय विभागच्या मागण्यांना मान्यता द्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, अनंत तरे, माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, डॉ. दीपक सावंत, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते इत्यादी सदस्यांनी भाग घेतला त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी आश्रमशाळेची बांधकामे व्यवस्थित होत नाहीत असे सांगितले. त्यांना सांगू इच्छितो की, यापूर्वी आश्रमशाळा बांधल्या आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी दोन वर्षापासून 38 कोटी रुपये दिले आहेत. त्यामध्ये बऱ्याचशा ठिकाणी दुरुस्त्यांची कामे चालली आहेत. प्रामुख्याने त्याठिकाणी विद्युतीकरण करीत आहोत, स्वच्छतागृहे व्यवस्थित बांधीत आहोत, त्या ठिकाणी असलेली कंपाऊंड भिंत व्यवस्थित करीत आहोत.तसेच यावर्षी आणखी 29 नवीन आश्रमशाळा बांधीत आहोत, आणि जवळ जवळ 51 वसतिगृहे बांधीत आहोत. त्यामध्ये विद्यार्थ्यांना रहाण्याची चांगली सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने निश्चितपणे बदल केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितच फायदा होईल.

तसेच, धडगाव, अक्कलकुवा या दोन तालुक्यांमधील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाबतीत उल्लेख झाला. त्याबाबतीत सांगावयाचे झाले तर मूळ इंग्रजीमध्ये असलेले ड्राफ्टींग मराठीमध्ये ट्रान्सलेशन करीत असतांना धडगावचे धाडगाव करण्यात आले आहे व प्राथमिक आरोग्य केंद्र, कातरीचे काटरी असे करण्यात आले आहे. तेव्हा ही एक प्रकारची स्पेलिंग मिस्टेक आहे अशापध्दतीने इंग्रजीचे मराठीकरण चुकीच्या पध्दतीने झाल्यामुळे दोन-तीन ठिकाणी नावामध्ये बदल झालेला आहे. आरोग्याच्या बाबतीत मांडवीला पहिल्यांदा आपले हेल्थ युनिट होते. त्याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र झाल्याबरोबर आपल्याला हे हेल्थ युनिट दुसरीकडे हलविता येईल. त्या भागामध्ये 25 हेल्थ युनिट होते व त्या ठिकाणी ऑनररी डॉक्टर नेमण्यात आले होते. त्या भागात पूर्वी कनेक्टिव्हिटी नव्हती, म्हणून त्या ठिकाणी हे हेल्थ युनिट तयार केली होती. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र तयार करतांना त्याठिकाणी आपण एरीया सुध्दा बघतो. लोकसंख्या कमी असली तरी चालेल परंतु 5 ते 6 किलोमीटरच्या आतमध्ये सर्व एरीया कव्हर झाला पाहिजे. अशाप्रकारे कनेक्टिव्हिटीच्या हिशेबाने प्राथमिक आरोग्य केंद्र त्या ठिकाणी सजेस्ट केले आहेत आणि दोन ग्रामीण रुग्णालये केली आहेत, 9 सब सेंटर्स प्रामुख्याने या दोन तालुक्यांसाठी करीत आहोत. त्यामुळे कुपोषणाचा प्रश्न सोडवायला व आरोग्याच्या समस्या सोडवायला मदत होईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

सभापती महोदय, साठवण बंधाऱ्याच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर ज्या कामांचे सर्व्हे झ ााले आहेत त्यासाठी तरतूद केली आहे. पाच वर्षासाठी त्याकरिता अमूक इतका निधी आपल्याला द्यावाच लागेल. या हिशेबाने त्यामध्ये तरतूद केली आहे. आणि त्या नंतर जर प्रस्ताव आले तर त्यांना प्रशासकीय मान्यता देऊन ते काम करण्यात येईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. काही ठिकाणी आश्रमशाळा थोडया उशिराने सुरु केल्या आहेत. कारण त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची अडचण होती. त्यामुळे उशीर झाला आहे. या आश्रमशाळांना सुविधा पुरविल्या पाहिजेत याकरिता 38 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याबाबत सर्व आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना व प्रकल्प अधिकाऱ्यांना निदेश दिले आहेत की, प्रत्येक आश्रमशाळेमध्ये स्वत:ची पाणीपुरवठा योजना तयार केली पाहिजे. आणि त्या पध्दतीने बऱ्याच ठिक्‌ाणी पाणीपुरवठा योजना झाल्या आहेत. या पुढील काळात ज्या आश्रमशाळा व वसतिगृहे तयार होतील त्या ठिकाणी प्रामुख्याने स्वत:ची पाणी पुरवठा योजना तयार केलेली असेल अशा पध्दतीने त्याकरिता बजेटमध्ये तरतूद केली जाईल. त्याचप्रमाणे केंद्रीय आश्रमशाळांच्या बाबतीत याठिकाणी सांगण्यात आले. त्यासाठी केंद्राने एक कमिटी स्थापन करण्याबाबत निदेश दिले आहेत . त्या कमिटीमध्ये तीन सेक्रेटरी असतील, ट्रायबल सेक्रेटरी हे चेअरमन असतील. त्यांच्याकडे जे प्रस्ताव येतील त्यांची छाननी करुन ते केंद्राकडे पाठविण्यात येतील. शिक्षण विभागाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये असलेली तफावत आपण तपासून घेऊ. आणि आश्रमशाळेतील शिक्षकांनाही न्याय देण्याचा प्रयत्न करु. प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत आपण म्हणाला होता की, आम्ही प्रयत्न करीत आहोत. हा भत्ता आदिवासी विभागात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना देण्याच्या बाबतीत कश्यापध्दतीने मदत करता येईल याचा विचार करुन निश्चितपणे लवकरात लवकर निर्णय घेऊ एवढे सांगून आदिवासी विकास विभागाच्या 231 ते 269 या क्रमांकाच्या मागण्या सभागृहानें मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आता संपली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पु.शी.**
**मु.शी.** } **सदस्य अ□ुपस्थिती समितीचा अहवाल सादर □र□**

श्री.नतिकोद्दीन खतिब (समिती प्रमु□) : महोदय, मी आपल्या अ□ुमती□ सदस्य अ□ुपस्थिती समितीचा पहिला अहवाल सादर करतो.

मी समिती प्रमुख, सदस्य अनुपस्थिती समिती (विधानपरिषद) समितीचा पहिला अहवाल सभागृहात सादर करीत आहे.

समितीची बैठक गुरुवार, दिनांक 14 जुलै, 2005 रोजी दुपारी 2.00 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. या बैठकीमध्ये श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या रजेचा अर्ज विचारात घेण्यात आला.

श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांनी दम्याच्या आजारामुळे दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे येथे औषधोपचारासाठी दाखल झाल्यामुळे मुंबई येथील अर्थसंकल्पिय अधिवेशन दिनांक 14मार्च, 2005 ते 16 एप्रिल, 2005 या एकूण 34 दिवसाच्या कालावधीत विधान परिषदेच्या बैठकीत अनुपस्थित राहण्याबाबत केलेल्या अर्जावर समितीने विचार केला. श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांनी विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्यासंबंधी रजेच्या अर्जात दिलेले कारण ग्राहय असल्यामुळे त्यांना दिनांक 14 मार्च, 2005 ते 16 एप्रिल, 2005 या कालावधीत विधान परिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे.

**उपसभापती**: सदस्य अ□ुपस्थिती समितीचा अहवाल सभा□ृहाला सादर झाला आहे.

समिती□ सादर □लेल्या अहवालात श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यां□ अहवालात उल्ले□लेल्या □ालावधी□रिता अ□ुपस्थित राह□याची अ□ुमती दे□यात यावी अशी शिफारस □ली आहे. तरी अ□ुमती द्यावी □ाय ? (थोडे थांबू□) अ□ुमती दे□यात येत आहे.सदस्यां□ तसे □ळवि□यात येईल.

----------

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक.

**L.C.BILL NO. XIX OF 2008.**

**(A BILL FURTHER TO AMEND THEMUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)**

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 19 - मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 19 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

. . . .5 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 20-7-2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 9 वाजून 01 मिनिटांनी,गुरुवार, दिनांक 20 जुलै 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही